श्रीमंत महाराज सरकार सयाजीराव गायकवाड,

सेनाखासखेल समशेरबहादूर यांच्या आज्ञेनें तयार होणारी

महाराष्ट्रग्रंथमाला.

ग्रंथ--३.

इंग्लंड देशाचा विस्तार.

(प्रोफेसर जे. आर. सीलो, एम्. ए. ह्याच्या एक्सपान्शन् आफ् इंग्लंड नांवाच्या पुस्तकाचा मराठी तर्जुमा.)

हें पुस्तक

गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.

ह्यांनीं तयार करून,

मुंबईंत

नेटिव ओपिनियन छापखान्यांत छापिलें.

सन १८९३.

अनुक्रमणिका.

प्रस्तावना.

श्रीमंत सरकार महाराज सयाजीराव गायकवाड यांचे हुकुमानें जी **महाराष्ट्र ग्रंथमाला** तयार होत आहे, तिचा हा तिसरा ग्रंथ आहे. या मालेचा पहिला ग्रंथ माकिआव्हेलीच्या **प्रिन्स** नांवच्या पुस्तकाचा तर्जुमा "राजधर्म" या नांवानें प्रसिद्ध झालेला वाचकवर्गापुढें आलाच आहे. राजधर्म पुस्तक या मालेपैकीं पहिलेंच असल्यामुळें व ही माला पुढें कशी काय चालेल याचा आरंभीं अंदाज करतां न आल्यामुळें त्या पुस्तकांत या मालेविषयीं कांहींच लिहिलें गेलें नाहीं, तें आतां लिहिण्यास सवड झाली आहे. नाना तऱ्हेच्या विषयांवर अनेक ग्रंथ इंग्रेजी वगैरे भाषांत प्रसिद्ध आहेत. तशा धर्तीवर कांहीं ग्रंथ आपल्या भाषेंतही असावे असा हेतु मनांत धरून महाराज साहेबांनीं कित्येक इंग्रेजी पुस्तकाधारें मराठींत पुस्तकें लिहिण्याचा हुकुम दिला. त्याअन्वयें हीं पुस्तकें तयार होत आहेत. ही माला पुढें कशी व कोठपर्यंत चालावयाची याजबद्दल आज अंदाज केलेला नाहीं. तसेंच हींत येणारे ग्रंथांत अमुकच विषयांचें विवेचन असावें असाही निर्बंध केलेला नाहीं. सामान्यतः प्रस्तुत देशस्थित्यनुरूप उपयुक्त विषयांवर विवेचन केलेले कोणतेही ग्रंथ हींत येतील. बेकन साहेबाचे निबंधांचा तर्जुमा तयार झाला असून तो ह्या मालेचा दुसरा ग्रंथ होय.

अलीकडे विद्याव्यासंगाचे योगानें आमच्या ह्या हिंदुस्थानांत पाश्चिमात्य विचारांचा फैलाव जारीनें सुरू आहे. ते विचार सर्वथैव

चांगले आहेत किंवा नाहींत ह्या प्रश्नाचा निकाल करणें कठिण आहे. तरी इतर प्रत्येक गोष्टींतल्याप्रमाणें या विचारांत सर्वच चांगलें अगर सर्वच वाईट असें असूं शकणार नाहीं. आह्मा हिंदुस्थानवासी लोकांच्या संबंधानें पाश्चिमात्यांचे विचार कित्येक चांगले व कित्येक वाईट आहेत, असाच वरील प्रश्नाचा निकाल अखेरीस मिळेल. एवढी मात्र गोष्ट खरी कीं, ते सर्व विचार अनुभवजन्य आहेत. मोकळ्या मनानें विचार करणाऱ्या गृहस्थास अनुभवजन्य गोष्ट जास्त पटेल, यांत संशय नाहीं. व ज्या अर्थी आज आपण पृथ्वीवरील सुधारणेच्या शिखराप्रत पोंचलेल्या एका अत्युच्च पाश्चिमात्य राष्ट्राच्या ताब्यांत आहों, त्या अर्थी आह्मांस उपयुक्त ह्मणून जें कांहीं ते आह्मांस दाखवितात, तें तसेंच ग्रहण करण्यापूर्वी तें आह्मांस खरोखरी कितपत उपयोगी आहे, हें त्यांनींच प्राप्त करून दिलेल्या ज्ञानशक्तीनें आह्मी ठरविलें पाहिजे. आह्मांस इंग्रजी विद्या शिकवून आपलें सर्व विचारभांडार राज्यकर्त्यांनीं खुलें करून दिलें आहे. अशा प्रकारें खुलें झालेल्या भांडाराची आपण सर्व लोक स्वशक्त्यनुसार मनास वाटेल तशी लूट करीत आहों व त्या लुटीचा पाहिजे त्या प्रकारें व पूर्ण स्वतंत्रतेनें उपभोग करून व प्रत्येकास योग्य वाटेल त्याप्रमाणें भिन्न भिन्न मतांचें अवलंबन करून कमी जास्त प्रमाणानें तदनुसार वर्तनक्रम ठेवीत आहों. अशा प्रकारें एका राष्ट्राचें विचारभांडार दुसऱ्यामध्यें प्रसार होण्याचे मार्ग अनेक आहेत. विद्याखातें हें या मार्गांपैकीं एक मार्ग आहे. इतर युरोपियन लोकही मन मानेल त्याप्रमाणें प्रसंगानुसार आपलें ज्ञानभांडार आह्मांस देत आहेत. हें राज्यकर्त्यांच्या नात्यानें झालें. आह्मां प्रजाजनांस पाश्चिमात्य ज्ञान मिळविण्याचा मार्गही एकच आहे असें नाहीं. आपल्यांतीलच कित्येक सद्गृहस्थ युरोप वगैरे भरभराटीच्या ठिकाणीं

जाऊन तिकडील व्यापार व कलाकौशल्य यांचें ज्ञान मिळवून तें इकडे येऊन आह्मांस करून देत आहेत. कित्येक तर पुस्तकरूपी जें प्रचंड ज्ञानभांडार इंग्रेजी भाषेंत आहे तेंच आपल्या देशी भाषेंत उतरून घेण्याचा प्रयत्न करून देशी भाषांच्या ग्रंथसंग्रहास अल्पस्वल्प भर घालीत आहेत. याच शेवटच्या जातीच्या प्रयत्नाचा प्रस्तुत पुस्तक हा एक परिणाम आहे.

प्रस्तुत काळीं इंग्रेजी ग्रंथांतरीं असलेलं ज्ञान देशी भाषांत आणणें किती आवश्यक आहे, हें येथें सांगण्याची जरूर नाहीं. कारण जो जो ह्मणून त्या गोष्टीचा थोडा तरी विचार करील, त्यास त्याची आवश्यकता सहज कळून येईल. मतभेद झाला तर इतक्याचपुरता होईल कीं, कोणत्या प्रकारचे ग्रंथ देशी भाषांत असणें अवश्य आहे. आमचें तर यासंबंधीं ठरीव मत असें आहे कीं, कल्पित कादंबऱ्यांतून वर्णिलेली इंग्रेजांच्या रीतिभातींची व त्यांच्या सामाजिक व्यवहारांची माहिती कांहीं एका दृष्टीनें आह्मांस कितीही उपयुक्त असली, तरी इंग्रेजी भाषेंत अनेक शास्त्रीय विषयांवर जे असंख्यात ग्रंथ आहेत, त्यांचें अंशतः तरी दिग्दर्शन देशी भाषांत होणें अत्यंत इष्ट आहे. अत्युत्तम तऱ्हेच्या कल्पित कादंबऱ्या जरी आपल्यांत थोड्या आहेत, तरी तशा प्रकारच्या ग्रंथांची आतां आवश्यकता नसून, ती आमच्या समाजाच्या फुरसतीच्या सुखरूप काळांत भरून काढावयाची आहे. व अशा प्रकारचें स्वास्थ्य आपल्यास येईल तेव्हां ती भरून काढिली जाईलही, यांत संशय नाहीं. तूर्त आमचेपुढें राजकीय व सामाजिक विषयांच्या संबंधाचे प्रश्न फार निकडीचे व गहन झाले आहेत. ही निकड दिवसेंदिवस वाढत आहे. प्रत्येक प्रश्नावर आजपर्यंत कितीही चर्चा झाली असली, तरी तो प्रश्न अद्यापिही पूर्ववत् किंबहुना जास्तच गहन होत आहे. प्रस्तुत

पुस्तक अशा प्रकारच्या चर्चेस अंशतः तरी मदत होईल, अशी आह्मांस आशा आहे. कारण अशा प्रकारच्या पुष्कळ प्रश्नांवर ह्या पुस्तकांत निर्भीडपणानें परंतु पूर्ण गांभीर्यानें टीका केलेली आहे. ह्या पुस्तकाचे मूळ कर्ते **प्रोफेसर सीली** ह्यांची आज इंग्लंडांत महान विद्वान पंडितांत गणना होत आहे. इतिहास कसा असावा या विषयावरील मतें त्यांच्या लेखानें पुष्कळ बदललीं आहेत. त्यांचें विचारस्वातंत्र्य व भाषागांभीर्य अत्युत्कट आहे, यांत संशय नाहीं. सर चार्लस डिल्क ह्मणून प्रसिद्ध मुत्सद्दी इंग्लंडांत आहेत, ते प्रोफेसर सीली यांजविषयीं असें लिहितात कीं, "इंग्लंडच्या परमुलखांतील राज्यासंबंधीं प्रश्नांची वाटाघाट चालू असतां प्रोफेसर सीली यांचें नांव जेव्हां जेव्हां ह्मणून निघेल, तेव्हां तेव्हां त्या प्रश्नांवर कोणा एखाद्याचा मतभेद असतांही त्यास असें कबूल करावें लागेल कीं, जो हेतु मनांत धरून लेख लिहिले असतां ते सर्व जगताच्या अत्यंत उपयोगाचे होतील, तो हेतु मनांत धरून ज्या थोड्या ग्रंथकारांनीं लेख लिहिले आहेत, त्यांपैकीं प्रोफेसर सीली हे एक आहेत." तेव्हां अशा गृहस्थाचे लेख सर चार्लस डिल्क ह्मणतात त्याप्रमाणें सर्वत्रांस अत्यंत उपयुक्त होतील यांत संशय नाहीं. राजा व प्रजा या उभयतांनींही स्वकल्याणार्थ घेण्याजोगे मासलेवाईक व शांतमनेंकरून प्रगट केलेले धडे प्रस्तुत पुस्तकांत प्रचुर आहेत. कित्येक स्वार्थपर राजपक्षीय ब्रिटिश मुत्सद्यांची सीली यांनीं अकारण निर्भर्त्सना केलेली नाहीं, व प्रजाजनांकडून पाट थोपटून घेण्याकरितां व अत्यंत लोकप्रियता मिळविण्याकरितां संतप्त मनानें राजपक्षीयांवर केवळ शाब्दिक कोरडा त्यांनीं उचललेला नाहीं. तात्पर्य, उभय पक्षांचें कल्याण ज्यांत पुष्कळ आहे असाच, उपदेश त्यांच्या लेखांत गोंवलेला आहे. खरोखरी घडून आलेल्या गोष्टींचा त्यांनीं अपलाप केला नसून, त्यांनीं

सत्यही सोडलें नाहीं. मतभेद पाहिजे तितका व्हावा परंतु घडलेल्या गोष्टींचें यथार्थ वर्णन करण्यांत भेद असूं शकणार नाहीं. तसेंच सीली यांचे लेखांत राजनीतिशास्त्रावरही बरेंच विवरण आहे. इतिहास आणि राजनीतिशास्त्र यांचा कसा निकट संबंध आहे व एकाच्या मदती-शिवाय दुसऱ्याचें वर्णन कसें अपुरें होईल हें स्पष्टपणें दाखविण्याकरितांच प्रस्तुत विषयावर विवेचन करण्याचें त्यांनीं पत्करिलें. ते ह्मणतात, " इतिहास आणि राजनीतिशास्त्र यांजमध्यें जो निकट संबंध आह्मांस दिसत आहे तो प्रत्यक्ष उदाहरणानें स्पष्ट करून दाखवितां यावा याच मुख्य हेतूनें आह्मीं ' इंग्लंडचा विस्तार ' या विषयावर हें पुस्तक लि-हिण्याचें हातीं घेतलें " इ० इ०. आज आह्मा हिंदु लोकांची स्थिति हरएक प्रकारें निकृष्ट झालेली आहे असें सर्व ह्मणतात. तर ती तशी होण्याचें कारण काय, त्यांतून तरण्यास उपाय काय, आजपर्यंत जे उपाय या संबंधांत राज्यकर्त्यांकडून अगर प्रजाजनांकडून कर-ण्यांत आले त्यांत काय चुका झाल्या, वगैरे प्रश्नांवर अंशतः तरी सीली यांनीं टीका केलेली आहे. ती आमच्या ह्या प्रस्तुत स्थितींत आह्मांस फार जरूरीची आहे. एवढ्यावरून ह्या पुस्तकाचा मराठींत तर्जुमा करण्याचें प्रयोजन काय हें व्यक्त होईल. आतां ज्या ग्रंथकारानें असा सुरस ग्रंथ निर्माण केला त्याजविषयीं दोन शब्द लिहून पुढें त्याचीं मतें काय आहेत याचा विचार करूं.

२. प्रोफेसर जॉन् राबर्ट सीली हे हल्लीं इंग्लंडांत एक मोठे विद्वान ग्रंथकार आहेत. हे इ. स. १८३४ या वर्षी लंडन शहरीं जन्मले. त्यांचे वडील पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा धंदा करीत असत. प्रोफेसर सीली यांनीं आपला अभ्यास लंडन् शहरच्या शाळेंत व केंब्रिज येथील क्राइस्ट कालेजांत केला. ते इ. स. १८५७ या वर्षी बि. ए.

झाले, व परीक्षेंत वर आल्यामुळें त्यांस मोठा मान मिळाला. लवकरच त्यांस फेलो नेमण्यांत आलें. कांहीं दिवसपर्यंत त्यांनीं क्राइस्ट कालेजांत व्याख्यानकाराचें काम करून मग लंडन सिटि स्कुलांत प्राचीन भाषांच्या अध्यापकाचें कामही केलें. नंतर इ. स. १८६३ या वर्षी लंडन येथील युनिव्हर्सिटी कालेजांत त्यांस लाटीन भाषेचे प्रोफेसर नेमण्यांत आलें. केंब्रिज युनिव्हर्सिटींत राजानें नेमलेला ह्मणून एक प्रोफेसर असतो त्याची जागा चार्लस किंग्सलेनंतर इ. स. १८६९ या वर्षी सीली यांस मिळाली, तेव्हांपासून त्यांचें इतिहासाचें अध्यापन जारीनें सुरू झालें. अर्वाचीन इतिहासाची विद्यार्थी हेळसांड करितात ती न करितां त्याची त्यांनीं चांगली माहिती करून घ्यावी हा त्यांच्या अध्यापनाचा मुख्य मुद्दा असे. ज्या गृहस्थांस मुत्सद्दी व्हावयाचें असेल त्यांस तर अर्वाचीन इतिहासाची अगदीं पूर्ण माहिती असलीच पाहिजे असें ते ह्मणतात. प्रथमतः प्राचीन इतिहासाचें पूर्ण अध्ययन करून नंतर त्याच धोरणानें अर्वाचीन इतिहासाची माहिती करून घेणें चांगलें, असें कित्येक ह्मणतात; पण हें मत सीली यांस अगदीं पसंत नाहीं. असा द्राविडी प्राणायाम करण्यापेक्षां प्रथमतः अर्वाचीन इतिहासाकडेच नीट लक्ष द्यावें; व मग सवडीप्रमाणें प्राचीन इतिहास पहावा. प्राचीन इतिहास वाईट आहे असें नाहीं, परंतु एकाच मनुष्यानें सर्व गोष्टींची माहिती करून घेण्यांत अतोनात वेळ घालविला, तर त्या माहितीचा उपयोग करण्यास पुढें त्यास वेळ सांपडणें कठिण. असो. इ. स. १८६५ या वर्षी "येशु ख्रिस्त याचें चरित्र आणि त्याचीं कृत्यें" नांवाचें एक पुस्तक इंग्लंडांत प्रसिद्ध झालें. त्याचे कर्ते प्रोफेसर सीलीच होत असें सर्वत्र मानण्यांत येतें. हें पुस्तक प्रसिद्ध झालें तेव्हां जिकडे तिकडे फार चळवळ सुरू झाली. दुसरे यांचे प्रसिद्ध ग्रंथ खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत. 'नेपोलियनच्या वेळेची जर्मनी आणि

एशिया यांची स्थिति' (१८७९), 'इंग्लंड देशाचा विस्तार' (१८८३), 'नेपोलियनचें लहानसें चरित्र' (१८८६). शिवाय 'निबंध आणि व्याख्यानें' ह्या सदराखालीं प्रोफेसरांचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. आणखी 'अकेडमी' व इतर साप्ताहिक पत्रांत व मासिक पुस्तकांत यांचे लेख पुष्कळ येत असतात.

ज्या अडचणींमुळें हें पुस्तक प्रसिद्ध होणें लांबणीवर पडलें त्यांजमुळेंच एक अलभ्य लाभ घडून आला तो येथें सांगण्यास मला फार संतोष वाटतो. ज्या सरकारच्या कृपेचें हें पुस्तक फळ आहे त्यांच्याच कृपाप्रसादानें हल्लींच्या ह्या काळांत तरी अत्यंत अभिलषणीय व अनेकांस दुर्घट असें युरोपीयप्रदेशदर्शनाचें श्रेय मजसारख्या साधनहीनांस घडून आलें, व त्यांतही दुर्भिळ जें विद्वज्जनदर्शन तेंही वरील योगानें मला प्राप्त झालें. ज्या प्रसिद्ध विद्वद्वर्याचा ग्रंथ मी वाचकांस सादर करीत आहें, त्यांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा योग मला घडून आला. ता. १९ आक्टोबर सन १८९२ रोजीं मी प्रोफेसरांच्या भेटीस त्यांची परवानगी घेऊन केंब्रीज येथें गेलों. ज्यांचा ग्रंथ मी देशी भाषेंत आणण्याचा प्रयत्न केला त्यांस प्रत्यक्ष भेटून त्यांजविषयीं आपली कृतज्ञताबुद्धि प्रगट करावी ह्यापेक्षां माझा अन्य हेतु त्यांची भेट घेण्यांत नव्हता. प्रोफेसर यांजपाशीं मी सुमारें दीड तास होतों. ते वृद्ध व विद्याव्यासंगांत निमग्न असणारे असे दिसले. हिंदुस्थानच्या स्थितीबद्दल ते फार कळकळ बाळगितातात. प्रस्तुत पुस्तक विशेषतः ऐतिहासिक विवेचनाच्या रीतीबद्दल त्यांनीं लिहिलें असून हिंदुस्थानचा संबंध केवळ त्यांत अंगभूत आला आहे, असें ते बोलले. आपलीं पुस्तकें इतर भाषांतून लिहिलीं गेल्यानें ग्रंथकारांस अवर्णनीय आनंद होत असतो असें ते ह्मणाले. प्रस्तुत पुस्तकाची एक मराठी प्रत मी त्यांस दाखविली,

तेव्हां मराठी वाचतां येत नाहीं म्हणून त्यांस फार खेद वाटला. सीली हे आरंभीं सात वर्षे युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन येथें लाटिन भाषेचे प्रोफेसर असून हल्लीं सुमारें वीस वर्षे कीज् कॉलेज, केंब्रिज, येथें इतिहासाचे प्रोफेसर आहेत. ह्या ठिकाणीं त्यांची नेमणूक ग्लाड्स्टन साहेबांनीं केली. हे प्रजापक्षाचे आहेत, तरी पाक्षिक वादविवादांत फारसे न पडतां विद्याभ्यासंगांत व पुस्तकें लिहिण्यांत सर्वदा निमग्न असतात. हल्लींच 'परराष्ट्रांशीं इंग्लंडचा वर्तन क्रम' (The foreign policy of England) ह्या विषयावर त्यांनीं एक प्रचंड ग्रंथ लिहिला असून तो लवकरच प्रसिद्ध होईल. ह्याच्यांत फक्त युरोपीय राष्ट्रांचाच विचार केलेला असल्यामुळें हिंदुस्थानसंबंधीं विचार त्यांत येणार नाहींत. हिंदुस्थानची राज्यपद्धति लोकांस किती सुखावह आहे ह्याविषयीं बोलणें चालू असतां एका महत्वाच्या मुद्यावर खालीं लिहिल्याप्रमाणें त्यांनीं आपलें मत दिलें. कोणत्याही राष्ट्रानें आपला पूर्वापार परिपाठ व वर्तनक्रम एकदम झुगारून देऊन, इतर राष्ट्रांत सुखावह दिसणारे नवीन परिपाठांचा एकदम स्वीकार केला असतां त्याजपासून फायदा होईल कीं नाहीं याजबद्दल प्रोफेसरांस फार संशय आहे. प्रस्तुत कालीं जपान देशांत चालू असलेल्या प्रयोगाच्या फलद्रूपतेबद्दल त्यांस फार भीति वाटते. खरी राष्ट्रसुधारणा कोणती हा वादग्रस्त प्रश्न आहे. आपण विद्यमान गोष्टी सुस्थितीस आणाव्या, परंतु त्यांचा नाश करूं नये असें सीली साहेबांनीं बोलून दाखविलें. या प्रोक्त विद्वानाच्या उक्तीचा आम्ही आज चांगला विचार करणें अवश्य आहे. हा मला झालेला प्रत्यक्ष भेटीचा लाभ माझ्या बंधूंस कळविण्यास मला फार आनंद वाटत आहे.

२. "इंग्लंड देशाचा विस्तार" ह्यांतील विषय व्याख्यानांनीं झालेला आहे. प्रथमतः त्यांनीं विद्यार्थ्यांस दिलेलीं हीं व्याख्यानें असून मागा-

हून इतरांच्या उपयोगाकरितां तीं त्यांनीं छापून काढिलीं. ह्या त्यांच्या पुस्तकावर नानातऱ्हेचे अभिप्राय निरनिराळ्या ठिकाणांहून आले असून, त्यांतील कित्येक माझ्या पाहण्यांत आले, तेव्हां सीली यांचीं मतें काय आहेत व त्यांजवर इतरांचें काय ह्मणणें आहे याचा प्रस्तुत स्थळीं विचार करणें अप्रासंगिक होणार नाहीं. असें करितांना प्रथमतः ग्रंथकाराची विवेचनपद्धति व सिद्ध करण्याचे मुद्दे काय आहेत ते सांगितले पाहिजेत.

ह्या पुस्तकाचे दोन भाग आहेत. दोहोंत मिळून दोन भिन्न विषयांचें एकाच दृष्टीनें विवेचन केलें आहे. ग्रंथकाराचा कटाक्ष विशेषतः इंग्लंडच्या शेवटच्या तीन शतकांच्या इतिहासकारांवर आहे; ह्मणजे ह्या शतकांचा इतिहास लिहितांना मुख्य गोष्ट कोणती घडत होती हें इतिहासकारांच्या लक्षांत न येतां, इतर क्षुल्लक गोष्टींवर ते पाहिजे तितका पाल्हाळ लावीत बसतात असें ग्रंथकाराचें ह्मणणें आहे. इंग्लंड देशाची राज्यवृद्धि जी आज इतकी सर्व जगभर अतोनात झालेली दिसत आहे, ती केवळ आकस्मिक आहे असें साधारणतः मानण्यांत येतें ही चुकी होय. तसेंच तिचें राजकीय प्रकरणांत काय महत्व आहे हेंही कोणास कळत नाहीं. अर्थात् इतिहास आणि राजनीतिशास्त्र यांची परस्परापेक्षता कोणाच्या ध्यानांत येत नाहीं. तर ह्या सर्व चुका व्यक्त करून दाखवाव्या, ह्या उद्देशानेंच सदर पुस्तक लिहिलें आहे असें ते ह्मणतात. ह्या मुख्य मुद्याचा विचार करितांना इतर कित्येक महत्वाच्या प्रश्नांचा त्यांनीं विचार केला आहे. पहिल्या भागांत अमेरिकेंतील व इतर ठिकाणच्या वसाहती यांजविषयीं साधारणतः लोकांचा समज व्यक्त करून दुसऱ्या भागांत तीच गोष्ट त्यांनीं हिंदुस्थानाविषयीं केली आहे.

राज्यविस्तारासंबंधानें इंग्लिश समजांत दोन अगदी विरुद्ध मतें प्रचारांत आहेत. एक अतिशयोक्तगुण व दुसरें अवमानितगुण. पहिलें मत धारण करणारे लोक इतका हा विस्तार पाहून आश्चर्यातिशय व हर्षोद्रेक यांनीं चकित होऊन असें ह्मणतात कीं, एक प्रकारचें भूषण व मनास समाधानकारक असें समजून हें एवढें विस्तृत राष्ट्र स्वतःकडेसच आपण राखिलें पाहिजे. दुसरें मत असें आहे कीं, हा एवढा विस्तार केवळ अन्यायी परापहरणानें झाला आहे, तो निरुपयोगी असून त्याचें ओझें विनाकारण इंग्लिश राष्ट्रास सोसावें लागतें; हा इंग्लंडावर लादलेला अनुपयुक्त भाग आहे, ह्मणून ज्या उपायांनीं हा सर्व विस्तार नाहींसा होईल ते उपाय राज्यकर्त्यांनीं योजावे. प्रस्तुत पुस्तकांत ह्या दोनही मतांचें अवलंबन केलेलें नाहीं.

पहिल्या मताच्या विरुद्ध प्रोफेसर असें ह्मणतात कीं:—

१. अतीव विस्तृत राष्ट्रें प्रजांना फारशीं सुखावह असूं शकणार नाहींत.

२. पूर्वजांच्या शौर्यधैर्यादि गुणांचें केवळ चीज ह्मणून राष्ट्रविस्तार राखिला पाहिजे ह्या समजांत फारसें तथ्य नाहीं.

३. ताब्यांतील मुलूख ह्मणजे ताब्यांतील इतकी संपत्ति असें हे लोक समजतात तेंही बरोबर नाहीं.

४. अतीव विस्तार झाला ह्मणून तो करणारांच्या अंगीं शौर्यधैर्यादि गुण विलक्षण वास करीत होते, हेंही सिद्ध होत नाहीं.

दुसऱ्या मताविरुद्ध प्रोफेसर असें ह्मणतात कीं:—

१. जुन्या काळच्या विस्तृत राज्यासारखें इंग्लिश राज्य जुलमी नाहीं.

[illegible]ओसाड प्रदेशांवर स्वाभाविक रीत्या वाढत गेलें आहे.

३. जर तारीफ करण्यासारखें त्याच्यांत कांहीं नसेल, तर दोष देण्यासारखें अगर अस्वाभाविक असेंही त्यांत कांहीं नाहीं.

४. इंग्लंडांत जास्त वाढलेल्या लोकसंख्येस वसाहती ह्या तेथें जाऊन राहण्यास सोयीची जागा आहे.

५. अमेरिकेंतील युनाय्टेड स्टेट्स् स्वतंत्र झाली याजवरून इतर वसाहतीही केव्हां तरी स्वतंत्र होतील असा सिद्धांत काढतां येत नाहीं. वरील पहिल्या मताच्या विरुद्ध तिसऱ्या कलमांत सांगितलेल्या ज्या दोषामुळें त्या वसाहती एकवार स्वतंत्र झाल्या तो दोष आतां काढून टाकण्यांत आला आहे.

६. वीज आणि वाफ, ह्या दोन अद्भुत शक्तींचा शोध लागल्यानें दूर अंतरावरील प्रदेशांत धर्मैक्याचा प्रसार शक्य होऊन ते एका अंमलाखालीं सुखानें नांदण्याचीं साधनें जीं पूर्वी अस्तित्वांत नव्हतीं तीं हल्लीं उपलब्ध झालीं आहेत.

७. अलीकडे लोकनियुक्ततेचें तत्त्व प्रसृत होऊं लागल्यापासून दूर दूर प्रदेश एका अंमलाखालीं राहण्याची उत्कृष्ट सोय प्रचारांत येऊं लागली आहे.

असो, यावरून इतकेंच सिद्ध होतें कीं, जरी एकवार झालेला विस्तार राखलाच पाहिजे असें नाहीं, तरी तो राखणें इष्ट व फायदेशीर आहे.

एकंदर राष्ट्रविस्तारासंबंधीं ग्रंथकाराचें हें मुख्य मत झालें. आतां ह्याजविषयीं इतिहासकारांचा समज चुकीचा झाला असल्याबद्दल प्रोफेसरांनीं पदोपदीं इतकें विवरण ह्या ग्रंथांत केलें आहे कीं, त्याचे उतारे पुनरपि येथें घेणें शक्य नाहीं. ह्मणून पुस्तकांतील पृष्ठांचें तारण मात्र येथें देतों. पृष्ठ १।२।३।२९।१९८।२६१।२६९ वगैरे.

सदर पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर सन १८८९ च्या जुलई महिन्याच्या वेस्ट मिन्स्टर रिव्ह्यूमध्यें याच विषयावर एक निबंध आला, त्यांतील थोडासा उतारा येथें दिल्यानें ग्रंथकाराचें ह्मणणें व्यक्त होईल. रिव्ह्यूकार ह्मणतात, "या तत्त्वास अनुसरून इंग्लिश वसाहतींची गत व प्रस्तुत स्थिति देऊन व इतर राष्ट्रांशीं या राष्ट्राची तुलना करून जी कल्पना इंग्रज लोकांच्या मनांत बरोबर वसत नाहीं, ती सीली यांनीं त्यांस करून दिली आहे. इंग्लंडच्याबाहेर इंग्रज लोक रहातात, याची बहुतेकांस कल्पनाही नाहीं हें सीली यांचें ह्मणणें खरें आहे. वसाहती आपल्या राज्याचाच एक भाग आहे असें त्यांस वाटत नाहीं. ब्रिटिश राज्यांत मोठमोठीं शहरें कोणतीं आहेत, अगर मॉन्ट्रिअल, सिडने, मेलबोर्न वगैरे शहरें इंग्लंडांतील आपल्या शहरांइतकींच मोठीं आहेत, हें कितीकांस बरें माहीत आहे ? इंग्लंडांत लोकसंख्या अतोनात वाढत आहे हें त्यांस कबूल आहे. ते असें ह्मणतात कीं, आपला मुलूख १,२०,००० चौरस मैल आहे तो कांहीं वाढला नाहीं. हल्लींच त्यांत लोकसंख्या दाट आहे. तिची वाढ इतकी जलद आहे कीं, सुमारें ७० वर्षांत लोकसंख्या दुप्पट होत आहे, ह्मणून इतक्या लोकांचें पुढें आतां काय होईल याचा विचार करीत आपण बसतों, व पुनः वसाहतींचा उपयोग काय असाही प्रश्न विचारण्यास आपण तयारच. (पहा, पान १२८–१२९). याचें कारण इंग्रज लोकांस वसाहतींबद्दल फारशी माहिती नाहीं हेंच खरें." गेल्या दोन तीन शतकांत एकंदर इंग्लिश व्यवहारांचा कल राष्ट्रवृद्धीकडे होता हें निर्विवाद आहे. परंतु ह्या विस्ताराची पुढें सुव्यवस्था कशी लागावी ह्याचा विचार कोणी करीत नाहींत. ह्या विस्ताराला फाजील प्रधानत्व सीलीनें दिल्याबद्दल त्यांजवर कित्येकांनीं कडक दोषारोप केले

आहेत, व त्यांचें थोडेंसें दिग्दर्शन पुढें येईल. तरी हें पुस्तक लिहून आज आठ वर्षें झाल्यानें ह्या गोष्टीचें महत्व जें त्या वेळीं योग्य दिसणारें नव्हतें, तें आज सहज व्यक्त होणारें आहे. एका अर्थी मला असें वाटतें कीं, ह्या विषयाचें विवेचन सीली यांनीं अगदीं स्पष्टपणें शेवटास पोंचविलें नाहीं व तसें आठ वर्षांपूर्वी करतांही आलें नसतें. केवळ राष्ट्रविस्तारच घेऊन चाललें तर सिकंदर बादशहाचें राज्य अतोनात वाढलें होतें; तैमुर्लंगानेंही त्याला माहीत असलेले बहुतेक देश जिंकले होते; फार कशाला, नुकतेंच नेपोलियन बादशहानें सर्व यूरोपखंड जिंकून इतर खंडांतही पुष्कळ प्रवेश केला होता; मग इतक्या ह्या विस्तारास महत्व कां नाहीं व इंग्लंडच्या विस्तारावरच विशेष जोर देण्याचें प्रयोजन काय? इतकेंच नाहीं तर ह्याच विषयावर अनेक ग्रंथ प्रसिद्ध होत आहेत. डिल्क साहेबांचें ह्या विस्तारावर एक मोठें पुस्तक प्रसिद्ध झालें असून, फ्रीमनसारख्या इतिहासकारांनीं ह्या विषयावर ग्रंथ लिहिले आहेत. तेव्हां मला असें वाटतें कीं, इंग्लिश राष्ट्रविस्तार निराळ्याच तत्त्वास अनुसरून झाला आहे व ह्मणूनच इतर राष्ट्रविस्तारापासून तो भिन्न आहे. सर्व प्रदेशांवर एका राष्ट्राचा अंमल असूनही लोकनियुक्ततेच्या तत्त्वामुळें प्रत्येक देशावर स्वतःचाही अंमल असण्याची योजना हल्लीं शक्य आहे; ह्मणजे जरी प्रत्येक प्रदेशाचीं राज्यसूत्रें अंततः एके ठिकाणीं एकवट झालीं, तरी ज्यानें त्यानें आपल्या हितानहितांत स्वतः मन घालून आपल्या सोयीप्रमाणें व्यवस्था करून घेण्याची तजवीज यांत येत आहे. ही तजवीज सिकंदर अगर तैमुर्लंग अगर नेपोलियन यांनीं मनांतसुद्धां आणिली नाहीं, ह्मणूनच त्यांचा लयही क्षणमात्रांत झाला असावा, असें मानण्यास जागा आहे; व ह्याच विशेषामुळें ब्रिटिश राष्ट्रविस्तार जास्त चिरस्थायी होईल असा संभव आहे. सर्व प्रदेश मिळून आपण एक आहों,

सर्वांच्या हितानहितावर सरकारचें सारखें लक्ष पाहिजे, युनायटेड स्टेट्स् ह्या राष्ट्रानें ह्या बाबतींत इतरांस कित्ता घालून दिला आहे, वगैरे मजकूर जो सीली वारंवार लिहितात त्याचें बीज हेंच असावें. प्रस्तुतच्या नवीन पार्लमेंटांत हाच विषय प्रधान असून ऐरिश प्रश्न हा त्याचा केवळ आरंभ आहे. माझें ह्मणणें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, निरनिराळ्या प्रदेशांत स्वतःचा राज्यकारभार पाहणारी निरनिराळी लोकनियुक्त सभा असून, तिनें निवडलेले सभासद मुख्य पार्लमेंटांत असावे, व प्रत्येकास स्वतःचा राज्यकारभार पाहण्यास सवड होऊन सर्व मिळून एक राष्ट्र बनावें, अशी जी सोय (जीस Federation Scheme असें ह्मणतात) ती अमलांत अणण्याचे आज विचार चालले आहेत. ते कालांतरानें पूर्णपणें अंमलांत आल्यास जी गोष्ट आज असंख्य युगें शक्य नसून राष्ट्रकलह कायम होते, ती अस्तित्वांत येऊन सर्वत्र शांतता होण्याचा संभव आहे. व प्रस्तुत शतकांत जी शांतता चोहोंकडे दृष्टीस पडते तीही सदर तत्त्व न समजतां तरी अंमलांत येत चालल्यामुळें नसेलशी कशावरून ? आफ्रिकेंत प्रदेश वाढविणारी मंडळी स्थापन झाली असून सर्व एशियाखंडसुद्धां युरोपियन होऊन जाईल कीं काय, अशी जी भीति कित्येक वेळां मानण्यांत येते, तिची उपपत्तिही ह्या वरील तत्त्वांत असावी असें वाटतें. जिकडे तिकडे राजांविरुद्ध प्रजांचे हक्क वाढत आहेत हें ह्या गोष्टीस पुष्टि आणणारें आहे. तेव्हां इतिहासाचें खरें सार जें कांहीं निघालें पाहिजे असें सीली ह्मणतात, तें ह्यांत असून ह्या पुस्तकासही ह्याचमुळें महत्व आलें आहे.

आतां इतिहास कसा असावा ह्याविषयीं दोन तीन ठिकाणीं मजकूर आहे. पृष्ठ १२।१३ वर "इतिहासाचा संबंध राष्ट्राशीं

आहे" वगैरे मजकूर, पान २७८ वर "इतिहास ह्मणजे राज्य करण्याचा कायदा नव्हे" इ. मजकूर व आणखी "इतिहास ह्मणजे काय कीं, घडून आलेल्या गोष्टी जमेस धरून त्यांच्या माहितीनें नवीन उद्भवलेले प्रश्न सोडविणें" (पान ११०) वगैरे मजकूर पाहवा. वरील उताऱ्यांवरून 'इतिहास' शब्दास ग्रंथकर्त्यानें काय अर्थ दिला आहे, तो व्यक्त होतो. इतिहासाचा खरा उपयोग, पुढें काय घडणार आहे त्याचा आगाऊ अंदाज करणें, हा होय. गोष्ट घडून आल्यावर ती सर्वांस समजतेच; परंतु घडून येण्याचे पूर्वी तिचें भाकीत करून ठेवणें हें काम इतिहासाचें. कित्येक ग्रंथकारांचें असें ह्मणणें आहे कीं, इतिहास मनोरंजक असावा. परंतु कल्पित कथेप्रमाणें कवित्व शक्तीनें केलेलें अद्भुत वर्णन जसें मनोरंजक असतें, तसा इतिहास मनोरंजक असूं शकणार नाहीं. ज्या एखाद्या गोष्टीपासून भावी परिणाम महत्वाचे घडून येतील ती गोष्ट मनोरंजक समजावयाची; ह्मणजे मनोरंजक ह्याचा अर्थ उपयुक्त अगर महत्वाची असा झाला. हें इतिहासाचें महत्व कसें समजावें याविषयीं विवेचन पहिल्या भागांतील आठव्या प्रकरणाच्या आरंभीं चार पांच पानें सविस्तर केलेलें आहे. परंतु इतिहास मनोरंजक असावा असें लिहितांना थाकरेसारखे कित्येक ग्रंथकार त्याचा अर्थ भलताच समजतात. त्यांचें ह्मणणें इतिहासांत फाजील गंभीरता वाढली आहे, ह्मणजे अमुक एक गोष्ट घडली तशी न घडती, तर कोणते भिन्न परिणाम घडले असते, अशा प्रकारचा विचार करण्याची निरुपयोगी चाल पडली आहे. परंतु हुबेहुब वर्णन करून वाचकांचें मनरंजन करणें हें इतिहासाचें काम, असें कादंबरीकारास वाटणें साहजिक आहे. परंतु प्रस्तुतच्या इतिहासांतील चुकी काढून त्यांतील विवेचन खरें उपयुक्त करतां येण्यासारखें आहे असें दाखवून, सीली यांनीं थाकरेनें केलेल्या इतिहास शब्दाच्या अर्थांतील चुकी दाखविली आहे.

पुढें इतिहास व राजनीतिशास्त्र यांचा संबंध काय हें दाखवावयाचें आहे. याविषयीं आमचे ग्रंथकार असें ह्मणतात कीं, इंग्लंड देशाचा अतीव विस्तार इष्ट असेल तर तो कोणत्या धरतीवर राहवा व तो अनिष्ट असेल तर तो कसा कमी करावा, हा प्रश्न राजनीतिशास्त्राचा आहे; तरी तो इतिहासशास्त्राचाही आहे: ह्मणजे इतिहासांत सांगितलेल्या माहितीशिवाय असे प्रश्न सोडवितां येणार नाहींत. "आमच्या ह्या सर्व विवेचनाचा अखेरचा हेतु असें दाखवावयाचा आहे कीं, वरील दोन शास्त्रांचा एकमेकांशीं फारच निकट संबंध आहे. दोहोंत मिळून एकाच विषयाचें दोन निरनिराळ्या दृष्टींनीं विवेचन केलें जातें." या शास्त्रांस चुकीचा अर्थ येण्याचें कारण, हीं दोन शास्त्रें एकाच विषयाच्या दोन शाखा असतांही तीं अगदीं भिन्न समजलीं गेलीं हें होय. "हें नीट समजून सांगतां यावें ह्मणून ह्या दोनही शास्त्रांस अगदीं उघड अनुलक्षून असलेला प्रस्तुत पुस्तकाचा विषय आह्मीं हातीं घेतला आहे."

प्रोफेसरांनीं इंग्लिश इतिहासकारांवर जो हा वरप्रमाणें दोषारोप केला आहे, तो प्रसिद्ध विद्वान् गृहस्थ जॉन मोर्ले यांस संमत नाहीं. कलोनियल लायब्ररी सीरीज्मध्यें क्रिटिकल् मिसलनी नांवाचे टीकारूप लेख मोर्ले यांनीं लिहिले आहेत. त्यांत एके ठिकाणीं सीलींच्या पुस्तकावर बरीच कडक टीका केलेली आहे. मोर्लेसारख्या विद्वान् गृहस्थाचें ह्मणणें बहुधा सर्वमान्य असावयाचें. पुस्तकांतील इतर पुष्कळ प्रश्नांवर मोर्ले यांणीं मत दिलें नाहीं. तें दिलें असतें तर विषयविवेचनास पुष्टि आली असती. फक्त सीली यांनीं दिलेलें इतिहासाचें स्वरूप कितपत खरें आहे याचाच मोर्ले यांनीं विचार करून नंतर वसाहती करण्याच्या निरनिराळ्या गृहस्थांनीं सुचविलेल्या पद्धति त्यांनीं तपासून पाहिल्या आहेत. ह्या पद्धतींच्या प्रश्नावर सीली यांनीं

विशेष विचार केला नसल्यामुळें तद्विषयक मोर्ले यांची टीका येथें घेण्याचें कारण नाहीं. इतिहासाविषयीं मोर्ले असें ह्मण-तात कीं, "इतिहासकार या नात्यानें लिहितांना अठराव्या शतकास निराळेंच स्वरूप देऊन सीली हे निराळ्याच दृष्टीनें त्याजकडे पाह-ण्याविषयीं आपणांस सांगतात. हें भिन्न स्वरूप त्यांनीं विलक्षण चतु-राईनें व लेखनशक्तीनें स्पष्ट करून दाखविलें आहे. मात्र ह्या विशिष्ट स्वरूपाच्या नवीनतेची प्रशंसा सीली यांनीं जरा कमी केली पाहिजे होती. सर्व पुस्तकभर इतिहासकारांवर व लोकांवर असा खरमरीत दोषारोप त्यांनीं केला आहे कीं, 'इंग्लंडचे अलीकडील इतिहासांत बहु-तेकांत नीरसत्वाचा भास होतो', ही सीली यांनीं गृहीत घेतलेली गोष्ट नाशाबीत करावी असें वाटल्याशिवाय राहत नाहीं." अठराव्या शतकांत घडलेल्या व्यवहारांचें खरें स्वरूप कोणासही कळलें नाहीं ही गोष्ट खरी असेल, तर शोचनीय आहे खरी; परंतु तिच्या खरेपणाचाच मोर्ले यांस संशय आहे. त्यांचें असें ह्मणणें आहे कीं, अठरावें शतक बहुतेकांस नीरस वाटत नाहीं इतकेंच नाहीं, तर ज्यांना ज्यांना ह्मणून इंग्लिश भाषा वाचतां येते, त्या सर्वांना इतर सर्व शतकांपेक्षां अठराव्या शतकाचीच जास्त माहिती आहे. अठराव्या शतकांत त्या वेळच्या नामांकित पुरुषांत व गोष्टींत सर्वत्रांस महत्व व आनंद वाटतो. मोर्ले ह्म-णतात, "सीली लौकिक इतिहासकारांविषयीं बोलतात. लौकिक इति-हासकारांत मेकॉलेशिवाय दुसऱ्या ग्रंथकारांस प्रथम पद देतां येत नाहीं. ह्या विख्यात ग्रंथकाराची भाषासरणि, इतिहासशास्त्राचा त्यानें दिलेला अर्थ, मानवी समाजाविषयीं त्याचे विचार, ह्यांजविषयीं कोणाचें कांहीं जरी ह्मणणें असलें, तरी इतिहासाचें महत्व व त्याजविषयीं जिज्ञासा हीं लोकांच्या मनांत त्याच्या निबंधांनीं जितकीं वाढविलीं, तितकीं दुसऱ्या

कोणत्याही पुस्तकानें वाढविली नसतील. .... अठराव्या शतकाविषयीं मेकॉलेचें विवरण सर्वथैव पुरें अगर खरें आहे किंवा नाहीं, अगर तें इतर गोष्टींनीं स्तुतीस पात्र आहे कीं नाहीं, हें पाहण्याचा प्रस्तुत प्रसंग नाहीं. आह्मांस इतकेंच सांगावयाचें आहे कीं, मेकॉलेसारख्या अतिशय लोकप्रिय ग्रंथकारानें अठराव्या शतकाचें वर्णन स्पष्ट, मनोवेधक व रसभरीत वाणीनें केलें असून, लौकिक ग्रंथकारांस त्या शतकाचें स्वरूप शुष्क व नीरस वाटतें असें जें सीली लिहितात, तें मिथ्या होय."

हें मोर्ले यांचें ह्मणणें जरी बऱ्याच अंशीं खरें असलें, तरी सीली यांच्या तर्फेनें येथें असें सांगतां येईल कीं, अठराव्या शतकाचें स्वरूप इतिहासकारांस नीरस वाटतें, हें एवढेंच वाक्य घेऊन, त्याचा पूर्वापार संबंध व सर्व पुस्तकभर सीली यांनीं केलेलें विवेचन यांजकडे दुर्लक्ष केलें असतां, त्याजवरील टीका यथार्थ होणार नाहीं. या नीरसतेचें स्पष्टीकरण सीली यांच्या लेखावरून असें दिसतें कीं, इंग्लंडच्या सर्व राजकीय व्यवहारांचा कल त्या शतकांत विशेषतः प्रदेशवृद्धीकडे होता, इकडे लोकांचें दुर्लक्ष झालेलें आहे. वरील वेस्ट मिन्स्टर रिव्ह्यूंतील उताऱ्यावरून हें उघड होत आहे कीं, लोकसंख्येच्या वृद्धीबद्दल लोक फिकिरींत दिसतात, यावरून आपलाच आणखी पुष्कळ मुलूख युरोपाच्या बाहेर आहे हें लोकांच्या लक्षांत नसतें. तिसऱ्या जॉर्जाच्या कारकीर्दीत अनेक व्यवहार इंग्लंडांत घडले. परंतु प्रदेशवृद्धीशीं त्यांचा कितपत व काय संबंध होता हें फारसें दाखविलेलें नाहीं. लोक स्वतंत्रताप्रिय असल्यामुळें राजाशीं भांडत असत, एवढेंच त्या कारकीर्दीचें वर्णन नेहमीं करण्यांत येतें. तर ह्या प्रदेशवृद्धीच्या एका गोष्टीकडे दुर्लक्ष झाल्यामुळें तीच गोष्ट स्पष्टपणें लोकांस दाखवि-

ण्यासाठीं सीली यांनीं फार शब्द खर्च केले आहेत. परंतु याच्या-पलीकडे त्या प्रत्येक शब्दांत शब्दशः सत्य आहे असें नाहीं, व प्रत्यक्ष सीली यांसही तें कबूल आहे असें त्यांच्या इतर लिहिण्यावरून दिसत नाहीं. वादग्रस्त विषयाचें विवेचन करण्याच्या भरांत स्वपक्षपुष्ट्यर्थ ग्रंथकार स्वप्रतिपादित वाक्यास अत्यंत प्रधानत्व स्वाभाविक रीत्या देतो, ह्मणून तें अक्षरशः तसेंच घेऊन चालणें रास्त नाहीं. ह्मणून मेकॉलेचें उदाहरण देतांना विचार करण्याचा प्रश्न इतकाच कीं, प्रदेशवृद्धीकडे मेकॉलेचेंही दुर्लक्ष झालें होतें किंवा काय? ह्या प्रश्नाचा विचार मोर्ले यांनीं केला नाहीं. मेकॉलेचा इतिहास अनेक गोष्टींनीं उत्तम असेल, परंतु आमच्या अवलोकनांत तो जितका आला आहे, त्याजवरून असें ह्मणणें भाग पडतें कीं, ह्या प्रदेशविस्ताराचें विशिष्ट स्वरूप, ज्याजबद्दल वर चर्चा करण्यांत आली, तें मेकॉले यास त्या काळीं समजलें नाहीं व तें इतकें स्पष्ट समजणारेंही नव्हतें इतकेंच नव्हे,तर सीली यांनीं पुस्तक लिहिलें त्या वेळेपेक्षां आज तें स्पष्ट दिसत आहे, व तें कायम होण्यास आणखी किती काल लागेल हें सांगवत नाहीं. ह्मणून मेकॉलेचें उदाहरण प्रस्तुत विवेचनास फारसें लागू पडत नाहीं.

मेकॉलेचें उदाहरण दिल्यावर इतर इतिहासकारांनीं सीली ह्मणतात त्याप्रमाणें चुकी केली आहे किंवा काय ह्या प्रश्नाचा विचार मोर्ले करितात. "अठराव्या शतकाचा इंग्लंडचा इतिहास इंग्लंडांत नसून अमेरिकेंत व एशिया खंडांत आहे हें इतिहासकारांस समजत नाहीं', हें सीली यांचें लिहिणें खऱ्या प्रकाराच्या उलट आहे. ग्रीन साहेबानें इंग्लंडचा इतिहास लिहिला आहे. त्यानें अठराव्या शतकाचा दिलेला वृत्तांत फारसा संतोषकारक नाहीं. असें असतांही सीलींनीं लिहिल्या-प्रमाणेंच त्याच्याही ग्रंथांत लेख आहे"

कार्लाइलचे इतिहासांतही ग्रीनचेचप्रमाणें हकीगत आहे. तिचा उतारा मोर्ले यांनीं दिलेला आहे. फक्त भाषेमध्यें कायतो भेद; बाकी सीली यांच्याप्रमाणेंच कार्लाइलचीही हकीगत आहे.

ह्यांशिवाय लौकिक ग्रंथकारांचीं आणखी उदाहरणें मोर्ले यांनीं दिलेलीं नाहींत.

येथें असें सांगणें जरूर आहे कीं, लौकिक इतिहासकार या शब्दांवर मोर्ले यांनीं जो कटाक्ष धरला आहे, तो इतका तीव्र असण्याचें कारण दिसत नाहीं. लौकिक याचा अर्थ लोकप्रिय व सर्वमान्य अगर प्रमुख असाच केला पाहिजे असें नाहीं; व सीली यांच्या लिहिण्याच्या एकंदर झोंकावरूनही असें दिसत नाहीं. लौकिक ग्रंथ ह्मणजे साधारणतः लोकप्रचारांत, शाळांतून व पाठशाळांतून विद्यार्थी व शिक्षकवर्गांत चालत असणारे जे ग्रंथ ते. तेव्हां अशा ठिकाणचें सामान्य लोकमत मोर्ले ह्मणतात त्याप्रमाणें व ग्रीन व कार्लाइलसारख्यांचे वर्णनाप्रमाणें नसून, सीली यांनीं वर्णन केल्याप्रमाणेंच आहे असें आह्मांस वाटतें. शाळांतून चालणारा कोणताही इतिहास घ्या; पार्लमेंट व त्यांचीं कृत्यें यांशिवाय त्याजपासून इतर गोष्टींची थोडीच माहिती मिळेल. केवळ इतिहासशास्त्रावरच परिश्रम करून त्यांत नांवाजलेले विद्वान् लोक खेरीजकरून इतर सर्व सामान्य वाचकवर्गाला शाळांतून मिळालेल्या अपुऱ्या माहितीवरच तृप्त राहवें लागतें. सीली यांनीं जें स्वरूप स्पष्ट करून दाखविलें आहे तें कोणासही व प्रत्यक्ष मोर्ले यांसही नाकबूल नाहीं. परंतु इतर लोकांस तें चांगलें माहीत नव्हतें असें सांगण्यांत ज्या जोरदार व तीव्र शब्दांचा व कंटाळवाण्या पुनरावृत्तीचा सीली यांनीं उपयोग केला आहे तो मात्र सर्वथा विहित नाहीं.

आतां मोर्ले यांनीं सीलीवर दुसरा एक दोष आणिला आहे. ते

ह्मणतात, "एकाच गोष्टीचा आग्रह धरून तिचें विवरण करण्याच्या भरांत इतर गोष्टींस सीली हे मुळींच किंमत देत नाहींत, हें ठीक नाहीं. इतर ग्रंथकारांनीं सर्व गोष्टींचा विचार समतोलतेनें केला आहे. अठराव्या शतकाच्या इतिहासाचें देशविस्तार हें अतिशय महत्वाचें स्वरूप आहे असें कांहीं वेळ कबूल केलें, तरी तिसरा जॉर्ज राजा व लोकपक्ष यांजमधील तंट्यांचें महत्व आपण कां न मानावें यास कांहींच कारण नाहीं. वुइल्क्सच्यां वेळचीं नीरस भांडणें सीली यांस कंटाळवाणीं वाटतात, तरी त्याच भांडणांत हितकर राज्यपद्धति व सार्वजनिक स्वातंत्र्य यांसारखे मोठे परिणाम गुंतले गेले असल्यामुळें एका विद्वान ग्रंथकारानें या नीरस भांडणांचेंच वर्णन करण्यांत आपलें सर्वोत्तम वाक्चातुर्य खर्चिलें आहे. अमेरिकेच्या वसाहती स्वतंत्र झाल्या ही गोष्ट सीलींस फार महत्वाची वाटते; परंतु त्याच गोष्टीचे इंग्लंडच्या आंतील व्यवस्थेवर जे परिणाम घडले त्यांजविषयीं सीली एक शब्दही लिहीत नाहींत. मोठमोठ्या मुत्सद्यांचें असें ह्मणणें आहे कीं, खुद्द इंग्लंडांत लोक भांडत होते ह्मणूनच अमेरिकेंत लोकांस भांडण्यास अवसान आलें, व जर अमेरिकेंतील वसाहती स्वतंत्र झाल्या नसत्या, तर प्रत्यक्ष इंग्लंडच्या लोकांची स्वतंत्रता नष्ट होण्याचा अनिष्ट परिणाम घडून आला असता. ह्मणून सीली यांचें लिहिणें केवळ एकदेशीय आहे. 'ज्या नियमांनीं राष्ट्रें उन्नतावस्थेस येऊन वृद्धि पावून भरभराटीस येतात व शेवटीं लयास जातात, ते नियम शोधून काढण्याचें' ब्रीद धारण करून त्याच ब्रीदास प्रत्यक्ष स्वतःच्या वर्तनानेंच सीली यांनीं बाध आणिला आहे, कारण अशा एकदेशीय वर्णनानें तें ब्रीद तडीस जाणार नाहीं."

हा मोर्ले यांचा दोषारोप बऱ्याच अंशीं खरा वाटणारा आहे.

तरी सीली यांचे लेखांतच त्याचें अंशतः निरसन आहे. सीली हे इंग्लंडचा इतिहास लिहीत नाहींत. ते इतिहासांतील एका स्वरूपावरच लिहीत आहेत. ह्मणून त्यांचें ह्मणणें एकदेशीय असलेंच पाहिजे. ह्याप्रमाणें एकाच विषयाचें समर्थन करितांना इतर विषयांकडे दुर्लक्ष करा असें त्यांनीं कोठेंही सांगितलें नाहीं. ज्या गोष्टीची हेळसांड झालेली त्यांस दिसली, ती प्रमुख असल्यामुळें तिला महत्व देऊन वाच-कांपुढें मांडतांना ते वारंवार इतकेंच सांगतात कीं, धर्मसुधारणा, सामा-जिक स्वतंत्रता वगैरे गोष्टी मात्र जमेस धरून देशविस्ताराकडे जें इतिहा-सकारांनीं दुर्लक्ष केलें तें बरोबर नसून उलट देशविस्तार ही गोष्ट वरच्या-प्रमाणेंच महत्वाची असण्याचें कारण ते असें देतात कीं, तिच्या योगानें इतर पुष्कळ राजकीय उलाढालींची चांगली संगति जमते. इतर गोष्टींस सीली यांनीं कमी महत्व दिलें नाहीं हें पाहण्याचें असेल तर पान १९८।१९९ वरील मजकूर पहावा. त्यांनीं इतिहासाची व्याख्या केवळ अप्रासंगिकतेनें दिली असल्यामुळें ती व्याख्या स्वतःस लागू करून घेण्याचें त्यांस बिलकुल प्रयोजन नव्हतें.

आणखी मोर्ले असें ह्मणतात कीं, अमेरिकेंतील देशविस्तार म-हत्वाचा वाटण्याचें खरें कारण इंग्लंडांत घडत होतें. इंग्लंडांत लोकसंख्या वाढल्यामुळेंच बाहेर वसाहती करणें शक्य झालें व त्यांस महत्व प्राप्त झालें. देशविस्तार हें इंग्लंडच्या मोठेपणाचें एक साधन आहे, ह्मणून ह्या साधनरूपी कारणास मुख्य गोष्टीपेक्षां जास्त महत्व देतां येत नाहीं.

याजवर इतकेंच सांगणें जरूर आहे कीं, इंग्लंडचा विशेष विस्तार झाला तेव्हां इंग्लंडांत लोकसंख्या वाढली नव्हती व वसाह-तींत लोक जाऊन राहत नव्हते. "अमेरिकेंत वसाहत करण्यास जे

लोक" इ. इ. मजकूर पृष्ठ १४१ वर पाहावा. देशविस्तार इंग्लंडच्या मोठेपणाचें एक साधन आहे असें ह्मणणें ह्मणजे इंग्लंड व वसाहती ह्या पृथक् आहेत असें समजण्याची इंग्रज लोकांची जी चुकीची संवय सीली यांनीं काढून टाकण्याचा इतका प्रयत्न केला आहे, तिलाच पुष्टि आणल्यासारखें होतें. सर्व प्रदेश मिळून एक राष्ट्र बनावें व सर्वत्रांच्या हितानहिताकडे सारखें लक्ष पुरविलें जावें, ह्याकरितां जी तोड सुचविण्याचा सीलींचा आग्रह आहे, तिजकडे वरील दोषारोप करतांना लक्ष पुरवलेलें दिसत नाहीं.

ह्या इतक्या विवेचनानें प्रस्तुत पुस्तकाचें स्वरूप वाचकांच्या लक्षांत येईल; तथापि पहिल्या भागांतील विषय थोडा क्लिष्ट वाटल्यामुळें त्याची विषयविवेचनपद्धति कशी आहे तें येथें दाखविणें इष्ट दिसतें.

पहिल्या प्रकरणांत इतिहासाचा साध्य हेतु काय असावा व इंग्लंडचे इतिहासापासून काय शिकावयाचें ह्याचा विचार करून हल्लींचा ब्रिटिश राज्यविस्तार किती आहे हें सांगितलें आहे. इंग्लंडचे ताब्यांतील एकंदर मुलुखांची यादी उत्पन्न व लोकसंख्येसह परिशिष्ट २ यांत दिली आहे. तिचा हें पहिलें प्रकरण वाचतांना उपयोग होईल. दुसरे प्रकरणांत इतिहास लिहिण्याची पद्धत कशी असावी हें सांगून तिला अनुसरून अठराव्या शतकांत युरोपीय इतिहासांत मुख्य गोष्टी कोणत्या घडल्या व त्यांजपासून खरा परिणाम काय झाला हें सांगितलें आहे. तिसऱ्या व चवथ्या ह्या दोन प्रकरणांचा विषय एकच आहे व वसाहत करण्याच्या निरनिराळ्या पद्धती प्राचीन काळापासून कसकशा बदलत गेल्या हें सांगून, पश्चिम युरोपांतील पांच राष्ट्रांनीं वसाहत करण्याची दूषित पद्धत स्वीकारल्यानें, त्यांपैकीं एकाचीच शेवटीं सरशी कां झाली हें दाखविलें आहे. पांचव्या प्रकरणांत अमेरिकेचें वजन साधारणतः युरो-

पीय राष्ट्रांवर व विशेषतः इंग्लंडावर कसें पडलें हें सांगितलें आहे. सहाव्या प्रकरणांत व्यापार व लढाई यांची परस्परसापेक्षता इंग्लंड देशाचें उदाहरण घेऊन दाखविली असून, व्यापारोद्देश प्रदेशवृद्धीस कसा कारण झाला हें दाखविलें आहे. सातव्या प्रकरणांत ह्याच देशविस्ताराचीं स्थित्यंतरें कसकशीं होत गेलीं याचा ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला आहे. याच स्थित्यंतरांपैकीं अमेरिकेंतील युनायटेड् स्टेट्स् ह्या वसाहतीचें स्वतंत्र होणें हें एक स्थित्यंतर असल्यामुळें त्याचा विचार शेवटच्या आठव्या प्रकरणांत केला आहे. सारांश, मुलगा मोठा झाल्यावर आईबापांपासून विभक्त व्हावयाचाच, तद्वतच वसाहतीही परिपक्व दशेस आल्यावर स्वतंत्र होणारच, हा समज चुकीचा आहे असें दाखवून, शुद्ध पायावर राष्ट्रविस्तार आज काल पाहिजे तितका होऊं शकेल हें सिद्ध केलें आहे.

ह्या पहिल्या भागांत राजनीतिशास्त्रातील कित्येक निरनिराळ्या महत्वाच्या प्रश्नांचा सीली यांनीं प्रसंगवशात् विचार केला आहे. हे प्रश्न गहन असल्यामुळें त्यांजविषयीं बराच मतभेद होण्याचा संभव आहे. वसाहती करण्याची उत्तम पद्धति कोणती; त्यांचें मूळ देशापासून स्वतंत्र होणें इष्ट आहे किंवा नाहीं; युनायटेड स्टेट्स्ची भरभराटी कशामुळें झाली; हल्लींच्या वसाहती स्वतंत्र होतील तर त्या जास्त भरभराटीस येतील किंवा नाहींत; असे हे प्रश्न फार व्यापक आहेत. ह्या प्रश्नांचा येथें विचार करीत बसणें प्रशस्त दिसत नाहीं. मूळ ग्रंथाची संगति समजण्यास इतकें लिहिणें पुरें आहे असें वाटतें.

आतां पुस्तकांतील दुसऱ्या भागास ह्मणजे हिंदुस्थानसंबंधीं विचारास आरंभ करूं.

ह्या दुसऱ्या भागांत ग्रंथकारानें काय सांगितलें आहे, त्याज-

बद्दल विचार करावयाचा. मागें एकदां सांगण्यांत आलेंच आहे कीं, या पुस्तकांत हिंदुस्थानचा विचार स्वतंत्र रीतीनें केलेला नाहीं; तर इतिहासकारांची विवेचनपद्धति कशी चुकत चालली आहे व ह्या शास्त्राचा फलितार्थ काय, हें दाखवितांना हिंदुस्थानांतील ऐतिहासिक गोष्टींचें उदाहरण घेऊन, ग्रंथकारानें स्वमत प्रतिष्ठापन केलें आहे. शिवाय ह्या विवेचनांत हिंदुस्थानच्या कित्येक महत्वाच्या प्रश्नांवर अंगभूत चर्चा केलेली आहे; ह्मणने त्या प्रश्नांस प्रधानत्व देऊन स्वतंत्र रीतीनें जरी त्यांचा विचार केलेला नाहीं, तरी ह्या विद्वान् ग्रंथकाराचीं निरनिराळ्या विषयावरील मतें आज मितीस आपणांस फार उपयुक्त आहेत. पहिल्या भागांतील विवेचन जरासें अस्पष्ट दिसल्यामुळें त्याची प्रकरणवार संगति मुकतीच सांगितली. परंतु ह्या दुसऱ्या भागांतील मजकूर स्पष्ट असून तो आहे तसाच वाचला असतां फार मनोरंजक होईल. तसेंच पहिल्या भागांतील विवेचन जगाच्या इतिहासाचें अध्ययन करणारास जरी उपयोगाचें आहे, तरी सामान्य मराठी वाचकवर्गास तें फार नीरस वाटण्याचा संभव आहे, परंतु हिंदुस्थानसंबंधीं माहिती सर्वत्रांस मनोरंजक होईल.

"हिंदुस्थानच्या राज्यासंबंधीं स्वतंत्र रीतीनें येथें विचार कर्तव्य नाहीं; तर इंग्लंडच्या संबंधानें मात्र त्याचा विचार कर्तव्य आहे. ह्या विषयाचें विवेचन आह्मी ऐतिहासिक व राजनीतिशास्त्रदृष्ट्या करणार आहों. ऐतिहासिक दृष्ट्या ह्मणजे ज्या कारणांनीं हिंदुस्थान जिंकलें गेलें त्या कारणांचा विचार करणें व राजनीतिशास्त्रदृष्ट्या ह्मणजे ह्या नवीन विस्ताराचें महत्व व चिरस्थायिकता यांजबद्दल विचार करणें" (पान ३१६). एवढ्यावरून ग्रंथकाराची पुढील विवेचनाची दिशा समजेल. वर 'अतिशयोक्त गुण' ह्मणून एक मत प्रचारांत असल्याचें सांगितलें आहे. त्यांतील तथ्य पाहतांना ग्रंथकार असें कळवितात

कीं, कित्येक गृहस्थ स्वजातीयांच्या पराक्रमाची जी फार स्तुति करीत असतात व केवळ हा गर्व जागृत ठेवण्याकरितां तरी एकवार जिंकलेले देश आपण हंमेश स्वाधीन ठेविण्याचा यत्न केला पाहिजे असें जें ह्मणतात, तें उभय राष्ट्रांच्या हितास बाधक असून अशा पोकळ मिरवणुकीच्या गोष्टीचा खऱ्या विवेचनांत तादृश उपयोग नाहीं. इतिहास व राजनीतिशास्त्र यांचा निकट संबंध कसा आहे तो एकवार दाखविण्यांत आलाच आहे. या दोहोंचें पर्यवसान राष्ट्राच्या सुखवृद्धींत झालें पाहिजे. इतिहासाचें काम राष्ट्राशीं आहे, ह्मणून जर ह्या शास्त्राच्या विवेचनापासून सुखवृद्धि न होईल, तर त्याची मातबरी काय राहणार? आतां हें राष्ट्र कोणतें याचा निर्णय पुढील वाक्यावरून होतो. "प्रस्तुत आपण इंग्लंड व हिंदुस्थान या उभयतांचें कल्याण कशांत आहे हें पाहिलें पाहिजे, व त्यांतही विशेषेंकरून हिंदुस्थान देश इंग्लंडाहून जास्त मोठा व जास्त दरिद्री असल्यामुळें इंग्लंडापेक्षां हिंदुस्थानचेंच कल्याण कोणतें, हें प्रथम पाहिलें पाहिजे." यावरून परदेश ताब्यांत ठेवण्यानें कोणतेंही राष्ट्र आपल्यावर केवढी जबाबदारी ओढून घेतें हें व्यक्त होईल. परंतु सीली ह्मणतात कीं, वस्तुस्थिति समजण्यांतच जर विपर्यास घडला आहे, ह्मणजे ऐतिहासिक रीत्या हिंदुस्थानचें इंग्लंडशीं जडलेलें नातें कशा प्रकारें उद्भवलें आहे, ह्याजविषयींच जर इतिहासकारांच्या कल्पना बरोबर नाहींत, तर इतिहासापासून राजनीतिशास्त्रास मदत व्हावी कशी व तत्परिणामी राष्ट्रहित तरी व्हावें कसें?

हिंदुस्थान देश इंग्रजांचे ताब्यांत आहे असें ह्मणण्यांत येतें, तेव्हां 'ताब्यांतील मुलूख' याचा अर्थ काय, ह्याजबद्दल सीली असें ह्मणतात कीं, स्वतः इंग्रज लोक हिंदुस्थानच्या जमिनीचा उपभोग घेत नाहींत. हिंदुस्थानापासून खंडणी वगैरे कांहीं एक त्यांस मिळत नाहीं. थोडेसे

गोरे लोक पगार ह्मणून कांहीं पैसा जरी इंग्लंडांत नेतात, तरी तो केवळ त्याच्या नोकरीच्या बदला आहे; ह्मणून स्वामित्वाबद्दल कांहीं इंग्रजांस मिळतें असें ह्मणतां येत नाहीं. तर इंग्रज सरकार हिंदुस्थान ताब्यांत ठेऊन परराज्यसंबंधींचे व्यवहार फार भानगडीचे व जोखमाचे करून घेतें याजबद्दल त्यास फायदा एक व्यापाराशिवाय दुसरा नाहीं. हा व्यापार वाढत आहे व हिंदुस्थान त्यांचे ताब्यांत आहे, तोंपर्यंतच विशेषेंकरून तो टिकणारा आहे. तरी हिंदुस्थानास ताब्यांतील मुलूख ही संज्ञा लावण्यास जास्त आधार काय आहे हें पाहतांना हिंदुस्थान इंग्रजांनीं कसें जिंकलें ह्याजबद्दल विवेचन करून त्यांनीं असें ठरविलें आहे कीं, लढाईचें मुख्य जोखीम काळे लोकांवरच पडलें असल्यामुळें, त्यांनींच हा देश इंग्रजांस जिंकून दिला असें ह्मणणें जास्त शोभतें. हिंदुस्थानांत राष्ट्रीयत्वाचा अभाव असल्यामुळें, अर्थात् तेथें स्वत्व परत्व नसल्यामुळें तेथील सधनतेचा उपयोग करून, उच्च प्रतीचें पाश्चात्य लष्करी शिक्षण ग्रहण करण्याची बुद्धिमत्ता हिंदुस्थानवासी लोकांत असल्यामुळें तें शिक्षण त्यांस देऊन, इंग्रज लोकांस कांहीं देशी सैन्य तयार करितां आलें, व तेथें अंतस्थ चाललेल्या कलहांच्या साह्यानें ही राज्यरूप इमारत त्यांस उभारितां आली. व पुढें राज्यकर्ते ह्या नात्यानें जे अनेक व्यवहार त्यांचे हातून घडून आले त्यांजवरून, एतद्देशीय राजांबरोबर झालेल्या तह व करारनाम्यांवरून, व मुख्यतः सन १८५८ सालीं प्रगट झालेल्या प्रसिद्ध जाहिरनाम्यावरूनहीं, असें व्यक्त होतें कीं, इंग्लंडांतील प्रजा व हिंदुस्थानांतील प्रजा यांजमध्यें विजयाच्या जोरावर इंग्रज सरकारानें कांहीं एक भेदबुद्धि दाखविलेली नाहीं. ह्याप्रमाणेंच ह्या अफाट देशावर थोडेसे इंग्रज लोक अंमल करितात, ह्यांतही मानलेल्या अद्भुततेचें निरसन वरच्याप्रमाणेंच सीलींनीं केलें आहे. देशांत राष्ट्रीयत्व

असण्यास समानजातित्व, समानधर्मत्व व समानार्थित्व हीं तत्त्वें कायम पाहिजेत. परंतु ह्यांपैकीं एकही तत्त्व हिंदुस्थानांत कायम नसल्यामुळें हिंदुस्थानावर राज्य करणें सुलभ झालें आहे.

हिंदुस्थान देश जिंकण्यांत येणेंप्रमाणें हा ऐतिहासिक विपर्यास ग्रंथकारानें व्यक्त केला आहे.

या सीलींच्या विवेचनावर अनेकांनीं अनेक आक्षेप आणिले आहेत, त्या सर्वांचें येथें विवेचन करणें अशक्य आहे. सर आल्फ्रेड लायल यांनीं आक्सफर्ड येथें एकदां एक व्याख्यान दिलें होतें, त्याचें विवेचन बाँबे ग्याझेट वर्तमानपत्राच्या तारीख २० जून सन १८९१ च्या अंकांत आलें होतें. सदर वर्तमानपत्रांतील मजकूर तरी अक्षरशः येथें देणें फार लांब होईल ह्मणून त्यांतील आक्षेपांचें स्वरूप थोडक्यांत खालीं देतों:—

'प्रोफेसर सीली यांच्या पुस्तकांतील हिंदुस्थानसंबंधीं लेखाच्या कांहीं भागावर चांगली चरचरीत टीका व्याख्यानांत केली असल्यामुळें त्यास विशेष महत्व आलें आहे. हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्यस्थापनेस जी स्थिति कारण झाली तिजबद्दल लौकिक ग्रह चुकीचा असून त्याचेंच सीली यांच्या उत्कृष्ट पुस्तकांतील दोन वाक्यांत मंडन केलें आहे. तीं दोन वाक्यें हीं:—पहिलें, हिंदुस्थान देश इंग्रज लोकांनीं जिंकला तो त्यांनीं अगदीं न समजतां जिंकला व इतकें आकस्मिक व अपूर्वसंकल्पित दुसरें महत्कृत्य इंग्रजांचे हातून कांहीं घडलें नाहीं. दुसरें, अशा प्रकारची दुसरी गोष्ट पूर्वी कधीं घडून आलेली नव्हती, व ह्मणून ज्या मंडळीच्या हातांत ईस्ट इंडिया कंपनीचीं सूत्रें दीडशें वर्षेपर्यंत होतीं, त्यांजलाही असा प्रकार घडून येईल असा अंदाज करितां आला नाहीं. ह्या दोन्हीं वाक्यांतील मजकूर लायल यांस बिलकूल संमत नाहीं, व असें

मानण्यास त्यांनीं लेखी आधारही दाखविले आहेत. त्यांत प्रत्यक्ष बाबर बादशहाविषयीं सुद्धां त्यांनीं असें सांगितलें आहे कीं, हिंदुस्थान जिंकण्याचे कामास नुकतीच सुरुवात झाली तोंच तें काम सोपें आहे असें त्यास त्या वेळीं सुद्धां वाटलें. ह्याच्या पुष्टीकरणार्थ ईस्ट इंडिया कंपनीच्या हकी- कतींतून आणखीही कित्येक आधार दाखविले आहेत. यानंतर क्लाईव्ह साहेबाचें प्रमाण पुढें आणिलें आहे. शिवाय ते असें सांगतात कीं, चांगलें लष्करी शिक्षण देऊन तयार केलेल्या सैन्यापुढें अपरंपार अशि- क्षित लोकांचा टिकाव लागणार नाहीं हें पूर्वी कोणास कळलेलें नव्हतें असें नाहीं. हिंदुस्थानांत काय प्रकार घडणार आहे याचा अंदाज इंग्लंडचे सरकारास जरी नव्हता व आकस्मिकता व उद्देशाभाव हीं जरी इंग्लंडांत होतीं व हिंदुस्थानांत नव्हतीं, तरी त्यांचे हुकूम हिंदुस्थानास येऊन पोंचण्यास पांच महिने लागत व या अवकाशांत पाहिजे तितक्या उलाढाली घडून येत. इ. इ.

'सर लायल यांनीं यापुढें फ्रेंच मुत्सद्दी डुप्ले याजविषयीं विचार केला आहे व त्यांतच हिंदुस्थान देश जिंकण्यास ज्या कित्येक गोष्टी साधनीभूत झाल्या त्यांचा विचार केलेला आहे. हिंदुस्थानामध्यें राष्ट्री- यत्व नव्हतें ह्या गोष्टीस सीलीप्रमाणें लायल यांनीं प्राधान्य दिलेलें नाहीं. बंगालमध्यें असलेल्या विपुल धनसंचयाचा कंपनीस फार उपयोग झाला. परदेशीय पुरुषांस हार जाणें हें सर्व हिंदु राजांस फार वेळपर्यंत अगदीं स्वाभाविक झालें होतें. हिमालयाच्या पलीकडून आंत मुसल- मान लोक येत व सपाट प्रदेशांतील शेतकऱ्यांवर आपला अंमल बसवीत. अशा प्रकारें परकीयांच्या अंमलाखालीं राहण्याची ज्या लोकांस संवय झाली, त्यांस आणखी एका परकी लोकांनीं समुद्रांतून येऊन जिंकल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. "इंग्लिश लोक हिंदुस्थानांत परकी असल्यामुळें

त्यांनीं हिंदुस्थानवासी लोकांकरितां कायदे करणें बरोबर नाहीं, अशा प्रकारचे उद्गार जेव्हां पुनः कोणी काढील, तेव्हां हा वरील मजकूर आपण चांगला ध्यानांत ठेविला पाहिजे. हिंदुस्थानांत असें देशी राज्य क्वचित्‌च आहे कीं, जें परकीय राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं नाहीं आणि त्यांत सुद्धां ब्रिटिश राज्याइतकीं जुनीं राज्यें थोडींच आहेत.* "

येणेंप्रमाणें सर लायल यांच्या व्याख्यानांतील मजकूर दिलेला आहे. या वरील ह्मणण्यांत विचार करण्यासारखे मुख्य मुद्दे दोनच दिसतात. ते हेः—

(१) हिंदुस्थान सहज जिंकतां येईल हा अंदाज आरंभींच्या परकीय व्यापाऱ्यांस कितीसा होता व त्या अंदाजानुरूप त्यांचे प्रयत्न कितपत चालले होते, याजबद्दल प्रोफेसर यांच्या व सर लायल यांच्या ह्मणण्यांत तफावत काय आहे ?

(२) इंग्रज लोकांचें राज्य इतर देशी राज्यांइतकेंच परकी व जुनें आहे, ही गोष्ट कितपत खरी आहे?

पहिल्या मुद्यावर प्रोफेसर यांचीं जीं दोन वाक्यें पुढें आणलेलीं आहेत त्यांचा मागचा पुढचा संदर्भ व प्रोफेसर यांचा सिद्ध करण्याचा मुद्दा यांचा विचार केल्याशिवाय तीं आहेत तशींच घेऊन चालणें रास्त

---

* या शेवटच्या वाक्याचा मूळ उतारा कित्येक इंग्रजी जाणणारांस समजणें अवश्य वाटल्यावरून देतोंः—

'It may be well to bear this in mind the next time we hear it proclaimed that the English, being an alien power in India, cannot make laws for its people. There is scarcely a native state in India which is not under alien rule and there are few amongst them which have much greater claims to antiquity than the British Raj.'

नाहीं. हीं दोन्ही वाक्यें जरी दोन निरनिराळ्या ठिकाणीं आलीं आहेत, तरी दोन्ही ठिकाणीं प्रोफेसर यांचा हेतु आरंभीं दाखविलेला ऐतिहासिक विपर्यास उघड करून सांगण्याचा आहे. ह्मणजे हिंदुस्थान पश्चिमात्यांच्या अमलाखालीं जाणें ही एक अतीव अद्भुत गोष्ट घडून आली, व निदान ह्या गोष्टींत तरी सर्वव्यापी कार्यकारणभावाचा नियम बंद पडला असा जो सार्वत्रिक चुकीचा समज आहे, तो काढून टाकण्याचा आहे. हा कार्यकारणभाव स्पष्ट करून चुकीचा लौकिक ग्रह दुरुस्त करण्यापलीकडे दुसरें प्रयोजन प्रोफेसर यांचें नाहीं. थोड्याशा व्यापाऱ्यांनीं एवढा अवाढव्य देश क्षणमात्रांत पादाक्रांत करणें ही काय थोडी अद्भुत गोष्ट झाली ? तर याजवर सीली असें प्रतिपादन करितात कीं, थोड्याशा पाश्चात्य लोकांनीं हिंदुस्थान देश तद्देशीय लोकांबरोबर लढाई करून जिंकला ही गोष्ट ह्मणण्यासारखी खरी नाहीं. इंग्लंडचे सरकारानें हिंदुस्थानच्या तत्कालीन सरकाराविरुद्ध लढाई पुकारलेली नाहीं. निदान हिंदुस्थान जिंकण्याच्या इराद्यानेंही ते लोक इकडे आलेले नाहींत. ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना व्यापाराकरितांच झाली व आपला मूळ उद्देश सोडून देऊन ते देश जिंकण्याच्या कृत्यास लागले, ही गोष्ट इंग्लंडचे सरकारास व कंपनीचे डायरेक्टरांसही न आवडून त्यांजकडून कित्येक वेळां त्यांस दपटशेही आलेले आहेत, व हें गॅझेट पत्रकारांसही मान्य आहे. ह्मणून वरील वाक्यें लिहितांना लोक जी विलक्षण अद्भुतता या कृत्यांत मानतात ती कशी उद्भवली हें दाखविण्याचा हेतु प्रोफेसर यांचा आहे, व हीच अद्भुतता काढून टाकण्याचा जर ते प्रयत्न करीत आहेत, तर उलट तीस पुष्टि आणणारें वाक्य ते कसे लिहितील ?

आतां कार्यकारणभावानें जरी ही गोष्ट अद्भुत नाहीं, तरी

तिचा अंदाज आरंभीं इंग्लिश राष्ट्रास कितीसा होता हें पाहिलें तर, प्रोफेसरांचें ह्मणणें रास्त दिसतें: ह्मणजे आरंभीं हा अंदाज कोणासच नव्हता; उद्योग होता व्यापाराचा आणि परिणाम झाला दुसराच, ही गोष्ट खोटी नाहीं. शिवाय हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, वरील मजकूर लिहितांना हिंदुस्थानांतील इंग्रजी मुत्सद्यांचें वर्तन प्रोफेसरांपुढें नसून मूळ इंग्लंड सरकारचेंच वर्तन त्यांच्यापुढें आहे. कारण बाबरप्रमाणें अगर क्लाईव्हप्रमाणें हिंदुस्थान सहज जिंकतां येईल हेंही कित्येक दूरदर्शी गृहस्थांस आगाऊ कळून आलें असल्याचें प्रोफेसरच पदोपदीं सांगत आहेत. मात्र हा दुरदर्शीपणा ते स्वजातीयांकडे ओढून न घेतां डुप्लॉ वगैरे परकीय मुत्सद्यांत तो प्रथम आढळल्याचें ते सांगतात. हिंदुस्थानांत ऐक्यभाव नसल्यामुळें ते लोक स्वत:विरुद्ध लढण्यास उद्युक्त होतील, व त्यांस युरोपीय लष्करी शिक्षण दिल्यास ते उत्तम प्रकारें लढतील, हें प्रथम डुप्ली यानें उघडकीस आणिलें. आतां ही गोष्ट प्रथम फ्रेंच लोकांस कळली कीं इंग्रज लोकांस कळली याचा निर्णय, ज्यांनीं ह्मणून परकीयांचा हिंदुस्थानांत प्रवेश झाला त्या वेळचा इतिहास वाचला असेल, त्यांस सहज करतां येईल. प्रसिद्ध इतिहासकार मिल्ल यांचेंही ह्मणणें असेंच असून, त्याचा उतारा प्रोफेसर यांनीं पृष्ठ ३४८ वर घेतलेला आहे तो पहावा.

यावरून डुप्लीच्या पूर्वीं हिंदुस्थान सहज जिंकतां येईल ही कल्पना कोणास होती एवढेंच पहाणें उरलें आहे. प्रथमारंभीं असें सांगितलें पाहिजे कीं, कोणतीही गोष्ट अस्तित्वांत असणें निराळें व ती अस्तित्वांत आहे हें लोकांस माहीत असणें निराळें. न्यूटननें गुरुत्वाकर्षण शोधून काढण्यापूर्वींही तें घडत होतें. ह्मणून ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यवस्थापकांस हिंदुस्थान सहज जिंकतां येईल,

हा अंदाज केव्हां करतां आला ह्याचा निर्णय करणें कठिण नाहीं. प्रोफेसर ह्मणतात त्याप्रमाणेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना होऊन दिडशें वर्षें होईतोंपर्यंत हा अंदाज त्यांस झाला नव्हता असेंच ह्मणावें लागतें. कंपनी स्थापन होण्याच्या पूर्वीं ही गोष्ट अस्तित्वांत असून बाबर बादशहासही कळली होती, हें ह्मणणें जरी निर्विवाद असलें, तरी ती त्याच वेळीं कंपनीसही माहीत होती, हें ह्मणणें किती असंभवनीय आहे बरें ? निदान ही गोष्ट बाबर यास कळली होती, हें तरी कंपनीच्या गृहस्थांस केव्हां कळलें असेल बरें !

कंपनीची स्थापना इ. स. १६०० ह्या वर्षीं झाली. तेव्हांपासून १५०वर्षें ह्मणजे इ. स. १७५० पर्यंत हिंदुस्थान सहज जिंकतां येईल ही कल्पना जर कोणाच्या मनांत उद्भवलेली असली, तर ती या वर्षाचे पूर्वीं फार तर ५।६ वर्षेंच उद्भवली असेल; कारण ई. स. १७४४ पर्यंत ह्याविषयीं त्यांस कांहीं कल्पनाही नव्हती, हें इतिहासप्रसिद्धच आहे ह्मणून प्रोफेसर यांच्या ह्मणण्यांत तफावत केवळ ह्या सहा वर्षांचीच ह्मणतां येण्यासारखी आहे. वस्तुतः ह्मणजे ह्या राज्यव्यवहाराची स्पष्टता सीली यांच्या ह्मणण्याप्रमाणें १७५० नंतरच दृश्य होऊं लागली. ‘ सीली यांस निरसन करण्यास दुर्घट, अशीं जीं आणखी कित्येक उदाहरणें पुढें आणिलेलीं आहेत, तींही १७५० च्या पुढचींच आहेत. दोन ठिकाणीं तर १७५९ व १७६४ हे दोन सन गॅझेटकारांनींच दाखल केलेले आहेत. एके ठिकाणीं मात्र इ. स. १६९० चे सुमारचा एक ठराव त्यांनीं पुढें आणिलेला आहे; तो जरी खरा असला, तरी निदान त्याचा अंमल तरी फारसा झालेला दिसत नाहीं, व त्यांतही मुख्य उद्देश व्यापारसंबंधाचाच आहे असें ह्मणावें लागतें.

दुसऱ्या मुद्यांत दोन भाग आहेत. पहिला, इतर देशी राज्यांमध्यें राजा व प्रजा यांत जो परकीपणा आढळतो त्यापेक्षां जास्त परकीपणा इंग्रजी राज्यांत नाहीं. दुसरा, इंग्रजी राज्यापेक्षां जास्त जुनीं राज्यें क्वचितच आहेत. हा दुसरा मुद्दा सिद्ध करण्याचें काम जितकें सोपें आहे तितकेंच कठिणही आहे. मुंबई बेट इंग्रजांस मिळालें त्या वर्षापासूनही इंग्रजांचा अंमल हिंदुस्थानांत आहे असें ह्मणतां येईल. नाहीं तर इ. स. १७७३ या वर्षी रेग्युलेटिंग आक्ट पसार झाला, तेव्हांही ब्रिटिश राज्य हिंदुस्थानांत व्यवस्थितपणें होतें असें ह्मणतां येईल किंवा नाहीं, याची शंका आहे. राज्य नवीन स्थापन झाल्याची मुख्य खूण ही कीं, दिवाणी फौजदारी अंमल नवीन राज्यकर्त्यांच्या हातांत जाऊन त्याची त्यांजकडून व्यवस्था होऊं लागते. ही रेग्युलेटिंग आक्टपासून सुरू झाली. व हल्लींचा विशेष राज्यविस्तार व व्यवस्था हीं तर लॉर्ड वुल्यम बेंटिंक व लॉर्ड डलहौसी यांचेच कारकीर्दीपासून चांगलीं सुरू झालीं. ह्याप्रमाणें कितीही मागें गेलें, तरी हल्लींच्यापैकीं बरींच देशी राज्यें ब्रिटिश राज्यापेक्षां जुनीं आहेत असें ह्मणतां येईल.

आतां पहिल्या भागाचा विचार करूं. स्वत्व व परकीयत्व हे गुण परस्परापेक्ष आहेत. त्यांचा पूर्ण भाव अगर पूर्ण अभाव असा एकाही पदार्थांत दिसत नाहीं. तेव्हां ह्या दोन गुणांचें कमीजास्त प्रमाण कोठें आहे इतक्याचाच निर्णय करतां येईल. सीली यांनीं राष्ट्रीयत्वाच्या ज्या तीन खुणा वर दिल्या आहेत, त्या येथेंही कांहीं अंशीं उपयोगी पडण्यासारख्या आहेत. त्या ह्या:—समानजातित्व, समानधर्मत्व व समानार्थित्व. ह्यांपैकीं प्रत्येक खुणेचा निरनिराळा विचार करून ती ह्या देशांतील प्रस्तुतच्या प्रमुख देशी राज्यांस व ब्रिटिश राज्यास लावून पहावी, ह्मणजे त्याजपासून स्वभावतः काय निष्पन्न

होतें तें कळून येईल. येथें इतकेंच सांगितलें पाहिजे कीं, ब्रिटिश राज्यकर्ते व त्यांची प्रजा यांच्यांत मुळींच भेदबुद्धि नसावी, व असेल तर ती काढून टाकण्यास प्रत्येकानें तयार असावें, ह्मणजे त्यांतच उभयतांचें अत्यंत कल्याण आहे, हीच गोष्ट आह्मांस अत्यंत मान्य आहे. परंतु मुळारंभीं असलेल्या खऱ्या नात्याचा विपर्यास केल्यानें हा हेतु साधतो असें आह्मांस वाटत नाहीं व सीलींच्या पुस्तकाचा उद्देशही असाच आहे. जाति व धर्म यांसंबंधानें हिंदुस्थानवासी व युरोपियन लोकांचा भिन्नभाव अगदीं स्पष्ट आहे, ह्मणून तो सिद्ध करण्याचा खटाटोप नको. समानार्थित्वाच्या संबंधानें सीली यांनींच एके ठिकाणीं चांगलें विवेचन केलें आहे तें पृष्ठ ३१२।३१३।४१४ यांजवर पहावें. तेव्हां एकंदरींत सीलींवर आणलेल्या ह्या आक्षेपांत फारसें तथ्य नाहीं.

आतां दुसरा एक लहानसा आक्षेप सर चार्लस डिल्क यांचा आहे. ह्या गृहस्थांस सीली यांचें पुस्तक किती पसंत पडलें हें मागें एकदां सांगण्यांत आलेंच आहे. त्यांच्या 'प्रॉब्लेम्स आफ् ग्रेटर ब्रिटन' नांवाच्या पुस्तकांत पृष्ठ४०९ वर सीली यांच्या पुस्तकावर कांहीं मजकूर लिहिलेला आहे, व पुस्तकाची तारिफ करून पुढें ते ह्मणतात कीं, 'हिंदुस्थानसंबंधींचे प्रश्न फार भानगडीचे असल्यामुळें सीली यांनीं एकाच ठिकाणीं दोन परस्परविरुद्ध वाक्यांचा समावेश केला आहे.' वस्तुतः ह्या विरोधाचें फारसें महत्व प्रत्यक्ष डिल्क यांसही वाटलें नाहीं, व त्याजमुळें प्रोफेसरांचे विवेचनास बाध येत नाहीं. पुस्तक समग्र वाचणारास त्याचें निरसन सहज कळून येईल.

आतां ह्या पुस्तकांत उपयुक्त प्रश्नांवर प्रोफेसर यांचें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष काय ह्मणणें आहे तें थोडक्यांत सांगावयाचें.

प्रथमतः इंग्रज सरकारानें कोणत्या गोष्टींबद्दल खबरदारी ठेविली पाहिजे हें सर चार्लस डिल्क यांच्याच शब्दांनीं सांगतों.—“ शत्रूंशीं सामना करून लष्करी जोरावरच आपण हिंदुस्थान राखिलें पाहिजे, हें प्रोफेसर सीली यांचें ह्मणणें खरें असेल व पृथ्वीवरील इतर प्रदेशांपेक्षां हिंदुस्थानांतच जर ब्रिटिश राज्यास अपाय जास्त असेल, तर त्या संकटांस हार न जातां तीं काय आहेत हें स्पष्टपणें समजून घेण्याचा प्रयत्न करणें अवश्य आहे. प्रोफेसर सीली यांच्या मतें ब्रिटिश राज्यास मुख्य संकट असें आहे कीं, हिंदुस्थानांत बंड होऊन त्याच वेळीं परशत्रूचा हल्ला आल्यास त्याचें निवारण करणें ब्रिटिश सरकारास जड जाईल व केवळ हिंदुस्थानाकडेच जास्त सैन्याचा पुरवठा त्यांस करितां येणार नाहीं. दुसरी एक भीति सीली सुचवितात ती पृष्ठ ३८३ वर पहावी.”

आतां इंग्रजी अंमलापासून हिंदुस्थानास जे काय नफेतोटे झाले, त्याजबद्दल प्रोफेसर असें ह्मणतात.—मुख्य फायदा हिंदुस्थानास ह्मटला ह्मणजे जी अंदाधुंदी पुष्कळ वर्षेपर्यंत हिंदुस्थानांत माजली होती ती मोडून जाऊन तिच्या ठिकाणीं सर्वत्र संपूर्ण शांततेची स्थापना झाली ही होय. तसेंच आजपर्यंत झालेल्या इतर परकी राजांपेक्षां इंग्रज लोकांचा अंमल जास्त सुखावह आहे हेंही कबूल केलें पाहिजे. “हिंदुस्थानावर राज्य करण्याची इंग्रजांची पद्धत कितीही दुराचाराची असो व लोकांना ती कितीही अयोग्य व व्यर्थ खर्चाची वाटो, मुसलमान लोक हिंदुस्थानांत राज्य करूं लागले, तेव्हांपासून ज्या ज्या लोकांचीं राज्यें हिंदुस्थानांत झालीं, त्या सर्वांत इंग्रजांचें राज्य चांगलें आहे ही गोष्ट नाकबूल करणें फार साहसाचें आहे. इंग्रज सरकारचे राज्य करण्याचे यत्न अंतीं विफळ झाल्यामुळें जी दुर्दशा हिंदुस्थानची होईल,

ती पूर्वी असलेल्या दुर्दशेपुढें कांहींच नाहीं असें ह्मणावें लागेल" (पृष्ठ ३३८). तरी हिंदुस्थानास अपाय काय झाले याजबद्दल प्रोफेसरांचा मजकूर पृष्ठें ३४०,३९६ व ५०६ यांजवर पहावा. ह्या सर्व गोष्टी राजा व प्रजा ह्या उभयतांनीं नीट विचार करण्यासारख्या आहेत. आज ब्रिटिश सरकारानें हिंदुस्थानांतून आपलें आंग काढून घेतल्यास काय अनर्थ घडतील ते प्रोफेसर यांनीं स्पष्टपणें सांगितलेच आहेत व असें करणें फारच अप्रयोजक होईल. तसेंच सरकारानेंही लोकांस ऊर्जित दशेस आणण्याचा प्रयत्न हल्लींच्याहून जास्त केला पाहिजे. प्रस्तुत पुस्तकांतील विवेचन हें राजा व प्रजा या उभयतांच्या सुखवृद्धीस अत्यंत कारणीभूत आहे असें आह्मांस वाटतें. त्यांतही हिंदुस्थानची अशी निकृष्ट स्थिति फार दिवस कां चालली, ह्याजबद्दल सीली यांनीं लिहिलेल्या मजकुराचा प्रत्येकानें विचार करण्यासारखा आहे.

आतां हिंदु लोकांची सुधारणा पूर्वी कशी होती व तिचे परिणाम लोकांत अत्यंत दृढ बसून गेले असल्यामुळें ती एकदम नाहींशी करून क्षणमात्रांत नवी सुधारणा अमलांत आणणें किती अनिष्टकारक आहे, याजबद्दल ग्रंथकारांनीं बरेंच विवरण केलें आहे. तें लांब असल्यामुळें येथें न देतां पृष्ट ४०३ पासून ४०९ पर्यंतचा मजकूर वाचकांनीं पहावा. नीतिमत्ता, बुद्धिमत्ता व तत्त्वज्ञान यांसंबंधानें पाश्चिमात्यांबद्दल आह्मां पौर्व्य लोकांचे मनांत अचंबा वाटतो कीं काय ह्याचाही त्याजवरून निर्णय होईल. येथें हिंदु धर्माचाही विचार केलेला आहे, त्याजबद्दल पृष्ठें ३८१।४६४।४६५।४६६ वरील मजकूर पहावा. हिंदु धर्मावर आज पुष्कळ आघात होत आहेत तरी तो जीव धरून आहे. परंतु आह्मांस एक मोठी उणीव आजकाल दिसते ती ही कीं, इतर राष्ट्रें आपआपले धर्माचें व्यवस्थेशीर शिक्षण लोकांस देत असतां आमच्या धर्माबद्दल

मात्र आह्मी अत्यंत बेपर्वा आहों. ह्मणजे हिंदु धर्माची स्पष्ट उपपत्ति व स्थायिक मतें यांचें सोपे रीतीनें विवेचन केलेलें पुस्तक सर्व लोकांनीं शिकणें व धर्मग्रंथांत सांगितल्याप्रमाणें वर्तनक्रम ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. तसेंच ब्राह्मणी धर्माबद्दल प्रोफेसर एके ठिकाणीं असें ह्मणतात कीं, त्यानें " इतर धर्माप्रमाणें तद्धर्मीयांचे ठिकाणीं स्वराष्ट्राभिमान उत्पन्न केला नाहीं (पृष्ठ ३८३ पहा)." हें मत भीतभीतच दिलेलें आहे, हें मुळांत पाहिलें ह्मणजे समजेल. परंतु तें पुढें पृष्ठ ४६४ वर दिलेल्या मागील बंडांतील काडतुसाच्या हकीकतीशीं व शिवाजी व शाहूमहाराज व बाजीराव पेशवे यांनीं केलेल्या पराक्रमांशीं किती संगतवार आहे, हें सहजीं कळून येणारें आहे.

ह्या प्रश्नांप्रमाणेंच हिंदुस्थानांत इंग्रजी शिक्षण प्रथमारंभीं सुरू झालें त्या वेळची चित्तवेधक हकीकत सदरहू पुस्तकांत पृष्ठें ४२४ व ४२५वर थोडक्यांत दिलेली आहे ती पहावी. इतक्या महत्वाच्या प्रश्नाचा निकाल तशा प्रकारचा झाल्यामुळें आज काय परिणाम झाले ते स्पष्ट दृष्टोत्पत्तीस येत आहेत. याजवर निबंधमाला पुस्तकांत पृष्ठ ६२९ (आवृत्ति १८८९ ची) वर एक लेख आहे तो सदर लेखाशीं किती मिळतो आहे तो वाचकांनीं पहावा. ज्या प्रश्नाचा निकाल मेकॉले साहेबांच्या ह्मणण्यावरून करण्यांत आला, तो प्रश्न सामान्य नव्हता व मेकॉले साहेबांच्या ह्या लेखावर निबंधमालेंत टीका आहे ती वाचण्याजोगी आहे.

ब्रिटिश राज्याच्या चिरस्थायिकतेचा विचार यांत केलेला आहे, परंतु ह्या प्रश्नाचा निकाल ग्रंथकारांनीं स्पष्टपणें केला नाहीं, व हा प्रश्न इतका बिकट आहे व दैवाची गति इतकी विचित्र आहे, कीं याचा निकाल आज करून ठेवणें शक्यच नाहीं.

येणेंप्रमाणें प्रश्नांचें स्वरूप वाचकांपुढें ठेविलें आहे. ही प्रस्ता-

वना फारच लांब वाढली याबद्दल खेद वाटतो; तरी हिंदुस्थानांतील स्थितीचें वर्णन सामान्य वाचकवर्गापुढें स्पष्ट ठेवणें हेंच जास्त इष्ट वाटल्यावरून तसें केल्याबद्दल वाचकवर्ग मला दोष देणार नाहींत, अशी आशा आहे. इतिहास व राजनीतिशास्त्र यांचा संबंध ह्या ग्रंथांत सुरेख दाखविला असून याजपासून इंग्रजी भाषा न जाणणारांस विचारस्वातंत्र्यही येण्याजोगें आहे, असें आह्मांस वाटतें. वाचकवर्गांनीं विद्वान् प्रोफेसरांच्या विचारस्वातंत्र्याचा अवश्य अनुभव घ्यावा, हींच आमची त्यांस मनापासून विनंति आहे. ह्या पुस्तकापासून शिकावयाचें काय तें पदोपदीं सांगण्यांत आलें आहेच, ह्मणून पुस्तक वाचणारांस तें सहज समजेल.

शेवटीं ह्या कृतीविषयीं दोन शब्द लिहून हा लेख संपवितों. प्रस्तुत ग्रंथ मुळांत बराच कठिण आहे, व ग्रंथकाराची भाषासरणि फार चित्तवेधक आहे, तेव्हां मुळांतील सर्व गुण तरजुम्यांत सर्वांशीं उतरण्याची आशा बाळगणें निष्फळच आहे. तशांत या तरजुम्याच्या कामांत माझी मति प्रवीण आहे, असा मी आव घालीत नाहीं. यथाशक्ति काम करवलें तसें केलें आहे. हा माझा यत्न वाचक गोड करून घेतील, इतकीच माझी प्रार्थना आहे. कोणी प्रांजळ बुद्धीनें या कृतींतील दोष दाखविल्यास मी त्यांचे आभार मानून चुकीची दुरुस्ती करण्याविषयीं तत्पर राहीन. अशा टीकेबद्दल मीच केवळ ऋणी होईन असें नाहीं, तर विद्यावृद्धीचें ब्रीद बाळगणाऱ्या ज्या महाराजांनीं हें पुस्तक तयार करविलें आहे, त्यांनाही तें पाहून समाधान वाटणारें आहे. श्रीमंत महाराज हे आपणां महाराष्ट्रीयांवर जे अनंत उपकार करीत आहेत, त्यांची फेड केवळ एकाच तऱ्हेनें होणें शक्य आहे ती अशी कीं, त्यांच्या आश्रयाखालीं प्रसिद्ध झालेले ग्रंथ आपण सर्वांनीं एकवार तरी लक्षपूर्वक वाचावे.

हें भाषांतर अगदी शब्दशः करण्याचा प्रयत्न केलेला नाहीं व असा प्रयत्न कदाचित् सिद्धीसही गेला नसता. मूळ ग्रंथकाराचे विचार कोठेंही सुटले नसावे असें वाटतें. भाषेंत व्याकरणदृष्टीनें, कित्येक ठिकाणीं अर्थासंबंधानें, कांहीं तपासण्याच्या कामीं झालेल्या ढिलाईमुळें, व कांहीं छापतांना, मिळून बऱ्याच चुका राहिल्या आहेत, हें मी समजून आहें. काळजी घेववली तितकी घेतली असतांही चुका राहिल्या आहेत, तर त्यांजबद्दल वाचकजन मजला माफी करतील.

पुस्तकाचे प्रथम क्रम व द्वितीय क्रम असे दोन भाग आहेत, त्यांस भाग ही संज्ञा देऊन ते तसेच ठेविले आहेत. प्रत्येक भागांत आठ आठ व्याख्यानें मूळ ग्रंथकारानें दिलेलीं आहेत. आतां ह्या पुस्तकास व्याख्यानाचें स्वरूप राहिलें नाहीं, म्हणून तो शब्द काढून त्या ठिकाणीं प्रकरण हा शब्द घातला आहे. म्हणजे दोन भाग मिळून एकंदर सोळा प्रकरणें ह्यांत आहेत. प्रकरणाच्या मथाळ्यावरचा लेख कित्येक ठिकाणीं मराठींत शब्दशः उतरणें अशक्य वाटल्यावरून तो बदलून त्याच्या ठिकाणीं आंतील विषयास शोभेल असा निराळाच लेख घातला आहे.

मूळ ग्रंथकाराच्या कांहीं टिपा मूळांत आहेत त्यांच्यापुढें ग्रं. क. अशीं अक्षरें घातलीं आहेत. शिवाय स्वतः मला पुष्कळ ठिकाणीं टिपा द्याव्या लागल्या. कारण वाचकांस इतिहासाची पूर्ण माहिती आहे असें गृहीत धरून ग्रंथकारानें प्रस्तुत ग्रंथ हा घडलेल्या गोष्टींवर टीका म्हणून लिहिला आहे. ती इतिहासाची माहिती आमचेकडील वाचकवर्गास बहुशः असणार नाहीं. टीकेचें खरें मर्म समजण्यास ती माहिती अवश्य असली पाहिजे असें समजून मी आणखी टिपा जोडल्या आहेत. कित्येक ठिकाणीं तर ह्या फारच लांबलचक झाल्या आहेत.

तसें करण्याचा हेतु इतकाच कीं, संपूर्ण माहिती पुस्तकांत जवळच तयार असलेली वाईट नाहीं. मग वाचकवर्ग तिचा उपयोग पाहिजे तसा करोत.

पुस्तकाचे शेवटीं प्रत्येक भागावर मीं प्रश्न दिले आहेत. या प्रश्नांचे योगानें मूळ विषय समजला किंवा नाहीं तें पाहण्यास सुलभ पडेल, अशी आशा आहे.

देशी भाषेच्या वृद्ध्यर्थ अतोनात परिश्रम करीत असलेले उदार बडोदेंराज्याधिपति **श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड** यांच्या आज्ञेनें हें पुस्तक लिहिलें गेलें. ह्मणून याचें सर्व श्रेय त्यांजकडेसच आहे. याशिवाय आणखीही कित्येक सुरेख ग्रंथ सरकारआज्ञेवरून देशी भाषांत लिहिण्याचें काम चालू आहे, तेव्हां हे महाराज सरकारचे अखिल महाराष्ट्रावर अत्यंत उपकार आहेत. आरंभ केल्यापासून हें पुस्तक तडीस नेण्यास कित्येक अपरिहार्य कारणांमुळें फाजील काळ लागला त्याबद्दल मी सरकारची सविनय माफी मागतों. हें पुस्तक छापण्याचे पूर्वीं तें माझे मित्र रा. रा. केशवराव परांजपे यांणीं तपासून शुद्ध केलें, व त्यांत उपयुक्त अशा पुष्कळ सूचना केल्या, त्याजबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. तसेंच प्रोफेसर सीली यांणीं आपले पुस्तकाचें भाषांतर करण्याची परवानगी मला फुकट दिली याजबद्दल त्यांचेही फार उपकार आहेत. अखेरीस उदार महाराज सरकारांनीं ही अल्प सेवा माझ्याकडून करून घेतल्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी व ऋणी आहें. अशीं हीं पुस्तकें तयार करण्यांत महाराज सरकारचा जो स्तुत्य हेतु आहे तो परमेश्वर सफळ करो अशी त्याजला प्रार्थना करून हा लांब वाढलेला प्रस्ताव लेख पुरा करितों.

गोविंद सखाराम सरदेसाई.

मूळ ग्रंथकाराची प्रस्तावना.

प्रस्तुत पुस्तक छापण्याकरितां तयार करीत असतां त्यांतील हिंदुस्थानसंबंधीं भाग लिहिण्यांत प्रोफेसर कॉवेल ह्यांनीं बरीच मदत दिली ह्मणून त्यांचा, व मि. कनिंगहाम ह्यांच्या "इंग्लिश उद्योग व व्यापार ह्यांची वृद्धि" ह्या उत्कृष्ट पुस्तकाचा मला फार उपयोग झाला, ह्मणून त्यांचा, मी फार आभारी आहें.

भाग पहिला.

वसाहतींविषयीं.

इंग्लंड देशाचा विस्तार.

भाग १.

प्रकरण पहिलें.

इंग्लंडच्या इतिहासकारांचा कल.

आमचें मत असें आहे कीं, इतिहास लिहिण्याची पद्धत शास्त्रीय मार्गास अनुसरून असली पाहिजे; व तो लिहिणारांनीं कांहीं तरी व्यवहारोपयोगी साध्य हेतु धरला पाहिजे. प्राचीन काळीं घडलेल्या गोष्टींचें वर्णन करून वाचकांची इच्छा तृप्त करणें इतक्यानेंच इतिहासाचें काम पुरें होत नाहीं. तर प्रस्तुत काळीं जें काय चाललें आहे, त्याविषयीं झालेलीं मतें, व भविष्य काळीं काय काय गोष्टी घडून येतील, यांचा केलेला अंदाज, हीं इतिहासवाचनानें नेहमीं सुधारत गेलीं पाहिजेत. जर हें आमचें मत खरें असेल, तर इंग्लंड देशाच्या इतिहासाच्या शेवटीं तात्पर्य ह्मणून कांहीं तरी काढलेलें असणें अवश्य आहे. इतिहासापासून कांहीं तरी मोठा सिद्धांत निघेल, तरच तो इतिहास खरा उपयोगाचा समजतां येईल. इंग्लंड देशाच्या इतिहासांत तेथील सर्व व्यवहारांचा कल साधारणतः कोणीकडे कसा आहे, हें सांगितलेलें असावें, ह्मणजे पुढें काय काय गोष्टी घडून येण्याचा संभव आहे, व त्या गोष्टी घडून आणण्यासाठीं आज आपण कोण कोणते उपाय केले पाहिजेत, याचें विवेचन करण्यास

लोकांस सुलभ पडेल. हल्लीं जगांत होत असलेल्या एकंदर घडामोडीमध्यें इंग्लंड देशाचें अंग किती आहे, याचा विचार केला ह्मणजे अशा प्रकारच्या इतिहासाची फारच अवश्यकता आहे, हें सहज ध्यानांत येईल. आणखी तशा प्रकारच्या इतिहासाची अवश्यकता विशेषेंकरून वाटण्याचें कारण हें कीं, जगाचा जसजसा इतिहास वाढत आहे, तसतसें त्यांतील राहटीमध्यें इंग्लंड देशाचें महत्व कमी न होतां उलट वाढतच जात असलेलें दिसून येत आहे. हॉलंड, स्वीडन ह्यांसारख्या देशांचा इतिहास आतां एका प्रकारें अगदीं संपुष्टांत आला आहे, असें मानल्यास मोठें गैर होणार नाहीं. प्राचीन काळीं हे देश वैभवास चढलेले होते; परंतु ज्या कारणांच्या योगानें त्यांस मोठेपण प्राप्त झालें होतें, तीं कारणें आतां राहिलीं नाहींत, ह्मणून या देशांची गणना पहिल्या प्रतीच्या देशांत न होतां दुसऱ्या प्रतीतच होते. वस्तुस्थिति अशी असल्यामुळें अशा देशांच्या प्राचीन इतिहासास महत्व देणें केवळ मनाच्या समजुतीकरितां आहे. कदाचित् शास्त्रदृष्ट्या कांहीं महत्व त्यास येत असेल; परंतु अशा इतिहासापासून व्यवहारोपयोगी तात्पर्य एवढेंच घ्यावयाचें कीं, नशिबानें ज्यास जें जें प्राप्त होईल, त्यांत त्यानें संतोष मानून राहावें. परंतु इंग्लंडची गोष्ट तशी नाहीं. प्रत्येक गोष्टींत इंग्लंडचें पाऊल एकंदरींत फार वेगानें पुढें पडत चाललें आहे. सोळाव्या शतकापेक्षां सतराव्या शतकांत, सतराव्यापेक्षां अठराव्या शतकांत, अठराव्यापेक्षा एकुणिसाव्यांत, येणेंप्रमाणें इंग्लंड देशाची उत्तरोत्तर वृद्धिच होत चालली आहे. या देशाच्या प्रस्तुतच्या अवाढव्य विस्तारामुळें त्याच्या भावी स्थितीबद्दलचा एक मोठा प्रश्नच होऊन बसलेला आहे. ह्या प्रश्नाचा चांगला काळजीपूर्वक विचार करण्याचें कारण असें आहे कीं, जितकें जितकें राज्य वाढत जातें, तितकीं तितकीं त्याजला नवीन संकटें उत्पन्न होत

असतात; आणि हीं संकटें, प्राचीन काळीं समुद्रवलयांकित ल्हानशा द्वीपांतच जेव्हां सर्व इंग्लंड देशाचा समावेश होत होता, त्या वेळीं माहित होणारीं नव्हतीं.

ह्यावरून इंग्लिश इतिहासाचें महत्व उत्तरोत्तर फास्त वाढत आहे, हें आपण कबूल केलें पाहिजे. कोणत्याही राष्ट्राची पूर्व स्थिति त्याच्या भावी स्थितीला कारणीभूत होत असते; तेव्हां हें उघड होतें कीं, इंग्लंडचा पूर्वीपासून आजपर्यंतचा इतिहास चांगला अवलोकन केला, तरच पुढें इंग्लंडची स्थिति काय होणार हें सांगतां येईल. तथापि जे इंग्लंडचे इतिहासकार हल्लीं लोकांना प्रिय आहेत, त्यांचें मत आमच्यासारखें आहे, असें दिसत नाहीं. प्रस्तुतच्या इंग्लंडच्या इतिहासांची इतिकर्तव्यता काय, ती बिलकूल दाखविलेली नाहीं इतकेंच नाहीं, तर शेवटीं ते फार विरस होत जाऊन त्यांचें महत्वही अगदींच कमी होऊं लागल्यासारखें दिसतें. म्हणून ते वाचले असतां एखाद्यास असें वाटेल कीं, इंग्लंड देशाची शक्ति अलीकडे दोन शतकें वाढत जात नसून, जणूंकाय त्या देशाचा वृद्धापकालच होत चालला आहे, व असें होत होत अखेरीस त्या शक्तीचा लवकरच लय होईल. ही गोष्ट खरी आहे काय? इंग्लंडच्या शक्तीचा प्रवाह असाच कमी कमी होत एखाद्या अफाट वाळवंटांत मुरून जाऊन शेवटीं नाहींसा होणार काय? ह्यावरून प्रसिद्ध वर्ड्स्वर्थ[१] इंग्लिश कवीनें:—

गेला काल किती तरी, नचि कळे आरंभ झाला कधीं,
तेव्हांपासुनि आंग्लभूमिजनतास्वातंत्र्यरूपी नदी।
राहे वाहत. पाहती जरि बहू तीच्या निरोधूं रयी[२]
सेतू आणिक पाट, ती न लवही संमान दावी तया.॥

---

१. हा इंग्लंडांत एक फार नामांकित कवि होऊन गेला. याचा काल इ. स. १७७० पासून १८५० पर्यंत. २. वेगास.

तीचा ओघ चिरायु हो ह्मणवुनी आहेत हीं साधनें
नाना वास्तव अत्यवश्य, तरि ते संक्षुब्ध होई मनें. ।
तीचा ओघ दिगंतविश्रुत असा पावो विलोपा कधीं
पंकीं वा पुलिनीं निरर्थक, न यो ही गोष्ट चित्तामधीं. ॥

असें जें ह्मटलें आहे त्याची आह्मांस आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. ही अशुभ गोष्ट घडून यावी "ही गोष्ट चित्तामधीं न यो" असें येथें कवीनें ह्मटलें आहे. तथापि प्रत्यक्ष ब्रिटिश लोकांच्या स्वतंत्रते-संबंधानें जरी ही अशुभ गोष्ट घडली नसेल, तरी लौकिक इतिहासांतील त्या स्वतंत्रतेचें वर्णन पाहिलें ह्मणजे ती घडल्याचाच भास होतो.

आतां हा आमच्या इतिहासकारांचा दोष काढून टाकणें असेल, तर त्यास काय उपाय केले पाहिजेत याचा आपण विचार करूं. जे विद्यार्थी इतिहासाचा अभ्यास करीत असतील, त्यांजला हा प्रश्न मोठा महत्वाचा आहे. सगळ्या इंग्लंडाचा इतिहास एकदम डोळ्यांपुढें आणून त्याजपासून काय तात्पर्य निघतें, याचा आपल्यास विचार कर्तव्य आहे. आजपर्यंत इतिहास शिकणें ह्मणजे, नांवें, तारखा, राजांची मालिका आणि लढाया हीं तोंडपाठ करणें यापेक्षां जास्त कोणी कांहीं समजत नसत. परंतु या सर्वांपासून काय निष्पन्न होतें, व या सर्व गोष्टी एके ठिकाणीं करून तोंडपाठ करण्याचा काय हेतु असावा, याचा विचार करण्याची आतां वेळ आहे. ज्याप्रमाणें एखाद्या शास्त्रांत फार व्यापक व सर्व-सामान्य नियम आणि व्यवहारोपयोगी महत्वाचीं तत्वें काढलेलीं असतात, त्याचप्रमाणें तीं इतिहासांतही असावीं, व जर इतिहासापासून आपल्याला घेण्याजोगें तात्पर्य निघत नसेल, तर त्याचा अभ्यास करणें केवळ मनास करमणूक वाटण्याकरितांच आहे असें ह्मणावें लागेल, व असें झालें

१. बरोबरीचीं.

ह्मणजे इतर विषयांपेक्षां इतिहासाचें महत्व कांहींच जास्त नाहीं असें होणार आहे.

कोणीही गृहस्थ इंग्लंडच्या इतिहासाचा अभ्यास करूं लागला ह्मणजे त्यास लागलेंच असें कळून येईल कीं, वर्षानुवर्ष, शतकानुशतक राष्ट्रोन्नति व सुधारणा सतत वाढत चालली आहे. प्रत्येक प्राणिमात्राचें व एकंदर सर्व राष्ट्राचें पाऊल पुढें पडत आहे. ट्यूडर* अगर स्टुअर्ट† घराण्यांतील राजे राज्य करीत असतांना जी इंग्लंडची स्थिति होती, ती हल्लीं नाहीं व हें मत विशेषेंकरून गेल्या एक दोन शतकांच्या इतिहासावरून दृढ होत आहे. परंतु ही सुधारणा ह्मणजे काय व तिचें परिमाण किती, हें समजलें पाहिजे. खरोखर नीट विचार करून व आह्मीं वर दर्शविलेला हेतु लक्षांत ठेवून जर इतिहासाचा अभ्यास करणें असेल, तर ह्या वरील प्रश्नाचें उत्तर कांहींतरी निश्चयात्मक ठरविलें पाहिजे. जुन्या इतिहासकारांची चाल अशी आहे कीं, ते केवळ सुरस वर्णनें करण्यामध्येंच भूषण मानून पुस्तकसमाप्तीपूर्वीं भाषावैचित्र्यानें परिपूर्ण असे शुष्क अर्थवाद मात्र करीत असतात. परंतु अशा शुष्क अर्थवादांस आपण भुलून न जातां खरोखर प्रकार काय आहे तो समजून घेण्यास झटून प्रयत्न केला पाहिजे.

ह्या अर्थवादांत सुधारणेचा बिलकूल विचार केलेला नाहीं, असें आमचें ह्मणणें नाहीं. परंतु त्यासंबंधाचें लिहिणें सर्व संदिग्ध आहे. सुधारणा या शब्दाची व्याख्या कोठेंच कोणीं दिलेली नाहीं. अलंकारिक

---

* ट्यूडर घराण्याच्या राजांनीं इ. स. १४८५ पासून इ. स. १६०३ पर्यंत इंग्लंडांत राज्य केलें.

† स्टुअर्ट घराण्याच्या राजांनीं इ. स. १६०३ पासून इ. स. १७१४ पर्यंत इंग्लंडांत राज्य केलें.

भाषेनें मात्र वर्णन केलेलें आढळतें. सुधारणा ह्मणजे काय, तर उजेड; अथवा, काळोख व संधिप्रकाश यांतून सकाळीं वर निघून मध्यान्हीस येणारा सूर्य. अर्थात्च दिवस उदयास येण्याच्या पूर्वी जो काळोख असतो, त्याची उपमा तमोयुग* (डार्क एजीस) ह्मणून जो पूर्वी अविवक्षित काळ होऊन गेला, त्यास देण्यांत येते. परंतु ही सुधारणा दिवसें दिवस वाढतच जाणार, किंवा ज्याप्रमाणें सृष्टिक्रमांतील आपला सूर्य दोन प्रहर जाहल्यानंतर कमी कमी होत जाऊन सायंकाळीं अस्तास जातो, अगर मध्येंच खग्रास ग्रहण लागून त्याचा सर्व प्रकाश एकदम नाहींसा होतो, त्याप्रमाणें ती हळूहळू किंवा एकदम नाहींशीच होणार याचा विचार केलेला नाहीं. अलंकारिक वर्णनानें विषयांची परिस्फुटता न होऊन केवळ भाषावैचित्र्य आणि वाक्पांडित्य यामुळेंच तो प्रिय वाटतो.

---

* तमोयुग.—मध्यकालाच्या मर्यादा पांचव्या शतकापासून तों पंधराव्या शतकापर्यंत ठोकळ मानानें धरल्या आहेत. तसेंच बहुतेक ह्या सगळ्या काळभर ज्ञानाच्या नांवानें युरोपांत निबळ अंधःकार होता, ह्मणून ह्या सगळ्या काळाला ठोकळ मानानें इंग्रजींत 'डार्क एजीस' ह्मणजे तमोयुग असें नांव देण्यांत आलें आहे. तथापि शेवटल्या दोन तीन शतकांचा ह्या युगांत वास्तविक समावेश करतां येत नाहीं. तसेंच तिसऱ्या व चवथ्या शतकांची तमोयुगांत गणना करण्यास हरकत नाहीं. कारण ह्या शतकांत विद्येचा ऱ्हास होत होता. तो असा कीं, उत्तरेचे व्हांडाल्स् वगैरे रानटी लोकांनीं रोमन महाराष्ट्रावर स्वाऱ्या करून पश्चिम बादशाहीचा विध्वंस केला, इतकेंच नाहीं, तर सर्व सुधारणेचें जें कांहीं निदर्शन त्या ठिकाणीं होतें, त्या सर्वांचा त्यांनीं नाश करून टाकला; त्यांतच सर्व विद्यांचा, कलांचा, पुस्तकसंग्रहांचा नाश झाला. परंतु समजा कीं, तसा नाश त्यांनीं केला नसता, किंबहुना ते रानटी लोक आले नसते, व पश्चिम रोमन बादशाही आपोआप लयास गेली असती, तरी विद्येचा पूर्ण ऱ्हास झाला असता. असें जरी खरें आहे, तरी ह्या दोन शतकांस तमोयुग नांव दिलें जात नाहीं. तेव्हां ही संज्ञा वास्तविक रीत्या सहाव्या शतकापासून तों अकराव्या शतकापर्यंतच्या कालाला देण्यांत येते. ह्या तमोयुगांत एकंदर युरोपीयन लोकसमाजाची स्थिति अति निकृष्ट होती. राष्ट्रीय, सामाजिक, धार्मिक, नैतिक, राजकीय, मानसिक वगैरे सर्व प्रकारें ती स्थिति अति शोचनीय होती.

सुधारणेचें वर्णन वरप्रमाणें करणें ह्मणजे चुकीच्या तत्वविवेचनाचा एक सुरेख मासला आहे. असंख्य गोष्टी आपल्या दृष्टिगोचर होतात, त्या एका काळींच आपल्या समोर येतात, इतकें मात्र त्यांजविषयीं आपल्यास समजतें; जास्त कांहींच समजत नाहीं. ह्या गोष्टी कशा घडल्या व त्यांचा परिणाम काय झाला, वगैरे प्रश्नांचा निकाल करतांना इतिहासकार काय युक्ति लढवितात पहा. ह्या सर्व गोष्टींचा ज्यांत अंतर्भाव होईल, असा एक शब्द काढतात. त्या शब्दानें ह्या सर्व गोष्टी एके ठिकाणीं गोंवल्या गेल्या असें वाटतें मात्र; परंतु तें तसें नसतें. अशाच तऱ्हेचा हा 'सुधारणा' शब्द आहे. या शब्दाची स्पष्ट व्याख्या कोणीच देत नाहींत. त्याच्या अर्थाविषयीं विवेचन करतांना अलंकारिक भाषा पुष्कळ घातलेली असते, परंतु तींत तथ्यांश थोडाच असतो. या अलंकारिक भाषेवरून सहज असा समज होऊन जातो कीं, सुधारणा ह्मणजे अज्ञात व अपरिमित गुणांनीं युक्त अशी एक सजीव शक्तिच आहे. या शक्तीचें नुसतें नांव घेतलें, ह्मणजे अतिशय चमत्कारिक व अतिशय भिन्न अशा ज्या ज्या गोष्टी आपल्यास दिसतात, त्या सर्वांचें इत्थंभूत निरूपण झालें असा भास होतो. आचारविचार बदलले; नवीन यांत्रिक युक्त्या निघाल्या; धर्मसंबंधीं जुलूम नाहींसा झाला; मोठमोठे कवी व कारागीर होऊन गेले; शास्त्रीय शोध सुरू जाहले; राजकीय व्यवहारांत लोकांस स्वतंत्रता प्राप्त जाहली. अशा प्रकारच्या नाना तऱ्हेच्या निरनिराळ्या गोष्टी निरनिराळ्या वेळीं घडून आल्या असतांही त्या सर्व इतिहासांत एके ठिकाणीं एक शब्दानें गोंवल्या गेल्या, इतकेंच कायतें वरील वर्णनापासून आपल्यास कळतें. त्या सर्वांचा परस्परांशीं दुसरा कांहींच दृश्य संबंध त्यापासून कळून येत नाहीं. त्या सर्व गोष्टींस कांहीं तरी गुप्त कारण आहे व तें कारण ह्मणजे सुधारणेच्या नियमांची प्रवृत्ति हें होय, असें ह्या इतिहास

कारांनीं गृहीत घेतल्याप्रमाणें लिहून ठेविलें आहे. परंतु ही गृहीत गोष्ट सिद्ध करून दाखविण्याचा त्यांनीं प्रयत्न केलेला नाहीं.

वरील मताचा विचार करतांना त्यास आपण जास्त सयुक्तिक असें स्वरूप देऊन पाहूं. प्रथमतः विचारस्वातंत्र्य एवढेंच एक तत्व घेऊन त्याजपासून काय काय परिणाम झाले तें पाहूं. शास्त्रीय शोध व यांत्रिक युक्त्या निघाल्या, त्यास इतर पुष्कळ कारणांची जरूर असेल; परंतु विचारस्वातंत्र्य हें मुख्य कारण होय, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हे शोध व युक्तया यांचे योगानें मनुष्यजीविताचें मूळचें स्वरूप बदलून जाऊन, त्याला जास्त संकीर्ण असें अलीकडील स्वरूप प्राप्त झालें, हें साहजिक आहे. ह्या स्वरूपभिन्नत्वासच आपण सुधारणेची वृद्धि असें समजूं. इतकें झालें तरी दुसऱ्या अशा आणखी कित्येक गोष्टी आहेत कीं, त्यांचा वरील तत्वाशीं बिलकूल संबंध नाहीं. राजकीय स्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्यापासून निघालेलें नाहीं. प्लेटो* आणि आरिस्टाटल† या विख्यात तत्ववेत्यांचें विचारस्वातंत्र्य ग्रीस देशांत सुरू होण्यापूर्वी अथेन्सच्या लोकांस राज्यव्यवहारामध्यें पूर्ण स्वतंत्रता होती; परंतु पुढें ती नाहींशी झाली. रोमन लोक बऱ्याच अंशीं अज्ञान व रानटी असतांना त्यांजला राजप्रकरणीं स्वतंत्रता होती, परंतु तेच जरा प्रौढ दशेस आल्यावर त्यांची स्वतंत्रता नष्ट झाली. तसेंच कवित्वशक्तीचाही वरील विचारस्वातंत्र्याशीं कांहींच संबंध नाहीं. कारण, ग्रीस देशांत तत्वशास्त्राची

* प्लेटो.— (इ. स. पूर्वी ४२७ पासून ३४७ पर्यंत) ग्रीस देशांतील एक विख्यात तत्त्ववेत्ता व साक्रेटीस ह्याचा शिष्य.

† आरिस्टाटल.— (इ. स. पूर्वी ३८४ पासून ३२२ पर्यंत) हा जगांतील अतिविख्यात पुरुषांपैकीं एक असून ग्रीस देशांत प्रसिद्ध तत्त्ववेत्ता होऊन गेला. हा प्रथमतः प्लेटोचा शिष्य असून पुढें शिकंदर बादशहाचा गुरु होता. हाच सर्व तत्त्वशास्त्रांचा पुरस्कर्ता होय.

वृद्धि होऊं लागल्याबरोबर कवितेस उतरती कळा लागली. तद्वतच रोमन लोकांमध्यें डांटी* वगैरे विख्यात कवि झाले ते, रेनेसन्स† म्हणून विद्येचें पुनरुज्जीवन होऊन, लोकांत विचारस्वातंत्र्य वाढलें, त्याच्या पूर्वीच झाले, त्यानंतर झाले नाहींत.

---

* डांटी–(इ. स. १२६५ पासून १३२१ पर्यंत) हा इटली देशांत एक विद्वान कवि होता.

† रेनेसन्स (विद्यापुनरुज्जीवन.)—

तमोयुगांत लोकसमाजाची स्थिति सर्वत्र सर्वच प्रकारानें अति निकृष्ट होती, असें सांगितलेलें आहे. त्यामध्यें विद्येचाही न्हास झालेला होता. ह्या तमोयुगाच्या सहा शतकांत ग्रीस देशांत ज्ञानसंग्रह व ग्रंथपठण चालू होतें, पण केवळ सांचलेल्या पाण्याप्रमाणें त्याची स्थिति झाली होती. वाढ तर नव्हतीच, पण होतें तें हर प्रकारें नष्ट होत होतें. तमोयुगांत सर्वत्र सामाजिक स्थिति निकृष्ट होती, परंतु धर्मोपदेशक, व (आपले शब्द त्यांना लावणें असेल तर) शास्त्री, भट, भिक्षुक ह्या वर्गामध्यें ज्ञान वास्तव्य करित होतें. त्याच्या वेळीं क्रिस्ती धर्म भ्रष्ट झालेला होता खरा, परंतु तो भ्रष्ट होता ह्मणूनच तो टिकला. त्या वर्गाचे दुर्गुण कितीही असोत, पण त्यानें विद्याजागृतीचीं दोन तीन साधनें फार जपून ठेविलीं ह्याबद्दल त्याचें अभिनंदनच करावें लागेल. त्यांनीं धर्म कायम राखला. त्यांनीं पुराण पुस्तकें जपून ठेविलीं. त्यांनीं हस्तलिखितें बचावून ठेविलीं. ह्याचा पुढें फारच चांगला उपयोग झाला. हळूहळू समाज सुधारूं लागला. समाजसुधारणेचीं सर्व अंगें उदयास येऊं लागलीं. परंतु उदयाचें मुख्य कारण पुराणभाषांचें पुनरुज्जीवन होय. लाटिन व ग्रीक भाषा नष्ट झालेल्या नव्हत्या. परंतु त्या भ्रष्ट झालेल्या होत्या, व क्वचित् ठिकाणींच कायम होत्या. सुमारें बाराव्या शतकामध्यें ह्या पुराण भाषांची लोकांस गोडी लागूं लागली. त्यामुळें त्यांचा अभ्यास सुरू झाला. त्या भाषांचे ग्रंथ बाहेर निघूं लागले. पुढें धर्मश्रद्धा कमी होत चालली. भिक्षुक वर्गाचा कंटाळा येत चालला. धर्माची सुधारणा होऊं लागली. त्यामुळें पुराणभाषांचा अभ्यास जारीनें होऊं लागला. ह्याचा परिणाम पुढें थोडासा वाईट झाला, तो असा कीं, विद्येचें बाह्य स्वरूप ह्मणजे शब्दपांडित्य मात्र वाढत चाललें, पण विषयगाढता नाहींशी होत चालली. असो, तरी सर्व विद्यांस चलन मिळूं लागलें. तमोयुगामध्यें ह्या भाषांचा अभ्यास कायद्यानें बंद केला गेला होता. पण ह्या स्थितींत बाराव्या शतकांत अंतर पडलें. लोक जुन्या पोथ्या शोधून काढण्याच्या खटपटीस लागले. येणेंप्रमाणें विद्याजागृतीस आरंभ झाला. तो पुढें वाढतच गेला. नवीन धर्मसंस्थापना, मुद्रणकलेचा शोध, अमेरिकेचा शोध वगैरे गोष्टींनें त्या जागृतीचे वृद्धीस फारच साह्य झालें.

ह्या सर्व गोष्टींचा मेळ कसा बसावा? आम्ही वर सांगितलेलेंच आहे की, 'सुधारणा' हा एक शब्द उपयोगांत आणून अशा भिन्न गोष्टींचें वर्णन इतिहासकारांनीं केलें आहे. परंतु हा शब्द अत्यंत संदिग्ध असल्यामुळें, त्याचें वर्णनही यथास्थित होणार नाहींच. ह्मणून सुधारणा या शब्दांत काय काय अर्थ गर्भित आहेत, याचा प्रथमतः विचार केला पाहिजे. या शब्दाचे विस्तृत व संकोचित असे दोन अर्थ मानतां येतील, व या दोहोंपैकीं जो अर्थ मनांत धरून आपले लेख इतिहासकारांनीं लिहिले असतील, त्याप्रमाणें त्यांचें वर्णन संपूर्ण अगर अपुरें होईल. सुधारणा याचा संकोचित अर्थच मुख्य आहे व तोच नेहमीं सर्वांचे नजरेसमोर प्रायः असतो, ही गोष्ट खरी; तथापि विस्तृत अर्थाकडे आपण दुर्लक्ष करतां नये. एखाद्या विवक्षित समाजाची राजकीय स्थिति कशी आहे व ती कशी बदलत जात आहे, याचा विचार करणें, हा सुधारणेचा संकोचित अर्थ झाला; कारण कायद्यांनीं अगर राजकर्त्यांनीं उत्पन्न होणाऱ्या किंवा सुधारतां येणाऱ्या मानुष स्थितीचा भाग फार थोडा आहे. मनुष्यसुखाचीं एकंदर जीं काय साधनें असतील, त्या सर्वांचा सारखा विचार करणें, हा खरा विस्तृत अर्थ होय. परंतु विशिष्ट समाज अगर राष्ट्र यांतील सर्व व्यक्तींच्या एकीपासून झालेला परिणाम हा केवळ या विस्तृत अर्थाचा एक भाग आहे. या दोन अर्थांचा परस्परांशीं संबंध साक्षात् नाहीं. विस्तृत अर्थांत समावेश होणाऱ्या गोष्टी संकोचित अर्थांतील गोष्टींच्या कारणांहून अगदीं भिन्न कारणांनीं उत्पन्न झाल्या आहेत. उदाहरणार्थ, शास्त्राची उन्नति हा एक सुधारणेचा भाग आहे. जरी ह्या उन्नतीस एका विशिष्ट राजकीय देशस्थितीची जरूर आहे, तरी शास्त्रोन्नति व राजकीय देशस्थिति एकच प्रमाणानें बदलत जातील, असा नेम नाहीं; ह्मणून शास्त्रोन्नतीचा अंतर्भाव राजकीय स्थितींत होणार नाहीं. या दोन भागांस अनुलक्षून

इतिहासकारांचें कर्तव्य द्विधा झालें आहे. पूर्वापार न समजतां असा परिपाठ पडला आहे कीं, इतिहासकारांनीं आपलें लक्ष फक्त या दुसऱ्या संकोचित भागाकडेसच लाविलें आहे. हल्लीं जे उत्तम म्हणून इतिहास आहेत तेच घ्या, म्हणजे असें कळून येईल कीं, सर्वांचें लक्ष, समाज आणि राजनीति, त्यांची अंतरुन्नति, व त्यांचीं परस्पर कर्तव्यें, याच गोष्टींकडे लागलेलें आहे. मनुष्याचे हातून जीं जीं म्हणून कृत्यें घडतात, त्या सर्वांत हे वरील विषय मात्र अत्यंत महत्वाचे आहेत, असें मानण्यास कारण नाहीं. ग्रीस देशाचे प्रसिद्ध इतिहासकार थ्युसिडायडीस* यानीं ज्या काळाचा इतिहास लिहिला आहे, त्या काळांत वास्तविक महत्वाच्या गोष्टी म्हटल्या तर तत्वज्ञानांत खर्च झालेलें साक्रेटीस† याचें चरित्र व कलाकौशल्याचे कामांत फिडियास‡ यानें केलेले परिश्रम हीं होत. परंतु या दोन्हीविषयीं थ्युसिडायडीस

* थ्युसिडायडीस—हा ग्रीस देशांत एक प्रसिद्ध इतिहासकार होऊन गेला. याचा काल इ. स. पूर्वी ४७१ पासून ४०० पर्यंत.

† साक्रेटीस—हा आथेन्सचा रहाणारा. हा मोठा तत्वज्ञानी पुरुष होता. याचा बाप शिल्पकार होता, व यासही ती कला थोडथोडी अवगत होती. त्या वेळच्या रीतीप्रमाणें त्यानें कांहीं दिवस लष्करांत काम केलें, व कांहीं लढायांत झेनोफन व आल्किबायडीस यांचे जीव वांचविले. तो फारच साधा पोषाख करीत असे, व त्याचें रहाणेंही फार साधें असे. तो नेहमीं सद्गुणांची भक्ति करावी, असें सांगत असे. त्याचा शिष्यसमूह मोठा होता. तो फार निस्पृही असे, व चांगला वक्ताही होता. त्यायोगानें त्याला शत्रु पुष्कळ झाले. त्यांनीं त्याच्यावर अथेन्सच्या तरुण मुलांचीं मनें बिघडविल्याचा, धर्मामध्यें कांहीं ढवळाढवळ केल्याचा, व देवांची थट्टा केल्याचा, असे तीन आरोप ठेवले, आणि त्याला विष देऊन ठार मारिलें. साक्रेटीसचा इतिहास व त्याच्या उक्ति ह्या, त्याचे दोन प्रसिद्ध शिष्य झेनोफेन आणि प्लेटो, यांनीं लिहून ठेवल्या आहेत. तत्ववादांतील शब्दांचे बरोबर अर्थ ठरविण्याचा, प्रश्नरूपानें सत्य शोधून काढण्याचा, व मन आणि नीति इकडे तत्वज्ञानाचा उपयोग कसा करतां येईल ह्याचें विवेचन करण्याचा, त्याचा उद्योग जबरदस्त होता. त्याचा जन्म क्रि. श. पूर्वी ४६९ सालीं होऊन, मृत्यु क्रि. श. पूर्वी ३९९ वर्षी झाला.

‡ फिडियस—हा प्राचीनकाळीं ग्रीस देशामध्यें एक फार प्रसिद्ध शिल्पकार होऊन गेला. पर्शियन लोकांनीं अथेन्स शहराचा विध्वंस केल्यावर अथीनियन लोकांनीं

यानें फारसें लिहिलें नसून, लढाया, निरनिराळ्या पक्षांतील तंटे या-विषयींच पुष्कळ वर्णन लिहून ठेविलें आहे. परंतु लढाया आणि तंटे यांचें आतां फारसें महत्व राहिलें नाहीं. सर्व विषय एकदम मनांत आणण्याची व समजून देण्याची शक्ति थ्युसिडायडीस याचे अंगीं नव्हती, असें नाहीं. ज्या शहरचें वर्णन तो देतो त्याचें वैभव पूर्णपणें त्यास माहीत असतें. तें त्यास माहीत नसतें तर, त्यानें "आह्मी सौंदर्यप्रीति आणि काटकसर ह्या दोन गुणांचा स्वतःचे ठिकाणीं संयोग करून, निःसत्वविरहित तत्वज्ञानाचा अभ्यास करितों," असें कसें लिहिलें असतें; इतकेंच नाहीं, तर ज्या राजकीय कारणांमुळें तें वैभव उत्पन्न झालें, तीं कारणें देण्यास तो नेहमीं तयार असतो, हें वरील त्याच्या लिहिण्यावरूनच सिद्ध होतें. त्यानें बुध्याच समजून उमजून जास्त विषयांवर लिहिलें नाहीं. वास्तविक पाहिलें असतां, ऐतिहासिक शोधापासून फायदा करून घेणें असेल, तर सर्व विषय एकदमच न घेतां प्रत्येकाविषयीं निरनिराळें विवेचन केलें पाहिजे. एकदम सर्व विषयांचें विवेचन करण्यानें विषयभिन्नतेचा भपका दिसतो खरा; परंतु त्यापासून खरा फायदा होत नाहीं. जर वर्णनामध्यें खरोखर विचार-गांभीर्य असण्याची जरूर असेल, तर प्रत्येक विषय निरनिराळा घेतल्या-शिवाय तोडच नाहीं. इतिहासाचें स्वरूप कसें असावें, याजबद्दल पूर्वीच्या इतिहासकारांच्या अभिप्रायाचा आह्मी मुळींच अव्हेर करीत नाहीं. फक्त जे विषय त्यांनीं सोडले आहेत, त्यांचा मात्र इतिहासांत यापुढें समावेश करणें आह्मांस प्रशस्त दिसतें. इतिहासाचा संबंध राष्ट्राशीं आहे, ह्मणून

त्याजला अथेन्सची दुरुस्ती करण्याचें काम दिलें होतें. त्यानें अथीनी देवतेचा फार उत्तम पुतळा तयार केला. पेरिक्लीज् हा त्याचा आश्रयदाता होता. आपलें व पेरिक्लीजाचें आकृतिसाम्य त्या पुतळ्यांत त्यानें दाखविलें, हें अघोर पातकाचें कृत्य केलें, अशा आरोपावर त्यास लोकांनीं कैद केलं. तो कैदेंतच क्रिस्तापूर्वी ४३२ व्या वर्षीं मरण पावला.

अमुक एक राष्ट्रांतील समाजास अनुलक्षून त्याची वृद्धि कसकशी होत गेली व त्यांत काय काय फेरफार झाले, हें पाहण्याचें काम इतिहासाचें आहे. राष्ट्राचा अर्थच असा आहे कीं, अमुक एक मर्यादेंत राहणारा प्रत्येक मनुष्य तेथील अंशभूत असा समजला जातो. परंतु असें आहे तरी केवळ व्यक्तीसच इतिहासांत जागा देणें रास्त नाहीं. तर दर व्यक्तीचा सामान्यतः सर्व राष्ट्राशीं जितका संबंध असेल, तितक्यापुरताच तिचा विचार इतिहासांत केला पाहिजे. इंग्लंडांतील कोणीं मनुष्यानें एक शास्त्रीय शोध लाविला, अथवा एक सुरेख चित्र तयार केलें, ह्या गोष्टी इंग्लंडच्या इतिहासांत येण्याचें कारण नाहीं. व्यक्तीच्या आंगच्या गुणाचे मानानेंच इतिहासांत व्यक्तीस जागा मिळत नाहीं; तर त्या गुणाचा सर्व राष्ट्राशीं सामान्यतः जितका संबंध उत्पन्न झाला असेल, तितक्या मानानें त्यास इतिहासांत जागा मिळते. क्लिऑनपेक्षां* साक्रेटीस फार मोठा मनुष्य होता, तरी थ्युसिडायडिसचे इतिहासांत क्लिऑन याजला जास्त जागा दिलेली आहे. तसेंच न्यूटन† हार्लेपेक्षां‡ फार मोठा होता, तरी

---

* क्लिऑन–हा आथेन्सचा रहाणारा होय. हा मूळ कातडें कमावण्याचा धंदा करीत असे. पुढें कपट, हुशारी, वक्तृत्व ह्यांच्या जोरावर तो फार वजनदार मनुष्य झाला. डिमास्थेनिस यानें लासिडिमोनियन्स लोकांवर केलेल्या स्वारींत तो होता. पुढें तोच सेनापति झाला. त्यानें थ्रेस प्रांतांतील थोरान शहर घेतलें, आणि आंफिपोलिस येथें, स्पार्टन् सेनापति ब्रासिडास ह्याशीं लढत असतां तो रणांत पडला (क्रि. पू. ४२२). अरिस्टोफेनिस व थुसिडायडीस नांवाचे इतिहासकार, तो गर्विष्ठ बडबड्या पण भेकड होता, असें लिहितात, परंतु हें त्यांचें मत कदाचित् पक्षपाताचें असावें.

† न्यूटन–सर ऐसाक न्यूटन (१६४२—१७२७) हा इंग्लिश गृहस्थ मोठा गणिती व पदार्थविज्ञानशास्त्रवेत्ता होता. त्याचा शिक्षक मि. (पुढें डा.) ऐझाक बारो नांवाचा महा विद्वान् मनुष्य होता. न्यूटन ह्यानें प्रकाश व रंग ह्यासंबंधानें, व आकर्षण शक्तीसंबंधानें कल्पना बसविली. त्यानें एक स्वतः दुर्बीण तयार केली होती. त्यानें सरकारची नोकरी बरीच केली. पदार्थविज्ञानशास्त्रावर त्याचे फार उपकार झालेले आहेत.

‡ हार्लें–राबर्ट हार्लें, अर्ल् आफ् आक्स्फर्ड व मार्टिमर (१६६१–१७२४).

ॲन* राणीचे कारकीर्दीचा इतिहास लिहितांना इतिहासकारांचें लक्ष न्यूटनकडे फारसें न जातां हार्लेकडेच विशेष गेलेलें आहे.

इतक्या विवरणावरून आमच्या आरंभींच्या प्रश्नाचें खरें स्वरूप लवकर ध्यानांत येईल. "इंग्लिश इतिहासाचा कल कोणीकडे, अगर हेतु काय आहे" हा तो प्रश्न होय. ह्याचें स्वरूप पूर्वीपेक्षां आतां बरेंच नियमित झालेलें दिसेल. हल्लीं सर्व जगतांत काय काय सुधारणा होत चालली आहे, याचा विचार ह्या प्रश्नांत करावा, असें आमचें ह्मणणें नाहीं इतर देशांपेक्षां इंग्लंडची विशेष सुधारणा कोणती, याचाही विचार करण्याचें तूर्त आह्मांस प्रयोजन नाहीं. इंग्लंड या शब्दाचा अर्थ प्रस्तुत विषयापुरता आह्मीं इतकाच समजतों कीं, "इंग्लंड देशांत राजकीय नात्यानें राहणारा समाज." इतका संकोचित अर्थ केला ह्मणजे कदाचित् वरील प्रश्न वाचकांस फारसा उपयुक्त वाटणार नाहीं. परंतु त्यांस तो तसा न वाटला तरी, त्याचा विचार करणें पूर्वीपेक्षां आतां जास्त सुलभ होईल, यांत संशय

हा राणी ॲनच्या कारकीर्दींत एक मुत्सद्दी होता. हा राजपक्षाचा होता. १७०१ मध्यें तो हाउस आफ् कामन्समध्यें वक्ता होता. १७०४ मध्यें हा सेक्रेटरी आफ् स्टेट झाला. १७१० मध्यें गोडोल्फिन ह्याला प्रधानकीच्या जागेवरून दूर केल्यावर हा मुख्य प्रधान झाला. तीन वर्षांनीं त्याला त्या जागेवरून दूर केलें. त्याचें मन दुर्बल होतें. त्याच्यामध्यें कामाची हुशारी नव्हती. १७१५ त त्याच्यावर कांहीं आरोपावरून खटला झाला, व दोन वर्षें तो कैदेंत होता. १७१७ नंतर त्यानें आपलें आयुष्य घरीं बसून घालविलें.

* राणी ॲन—ह्या राणीनें ग्रेट ब्रिटनवर इ. स. १७०२–१७१४ पर्यंत राज्य केलें. ही दुसऱ्या जेम्सची दुसरी मुलगी होय. हिचा नवरा डेन्मार्कचा राजा जार्ज हा होता. हिला सतरा मुलें झालीं. पण सगळीं लवकरच मेलीं. तिची कारकीर्द फार उत्कर्षाची होती. ह्याच कारकीर्दींत मार्लबरोनें स्पेनच्या गादीसंबंधाच्या युद्धांत, फ्रान्सदेशाबरोबर लढाया मारल्या व फ्रान्स देश अगदीं खालावून टाकला. ह्या कारकीर्दींत स्काटलंड देश इंग्लंडाशीं जोडला गेला. हिच्या कारकीर्दींत विद्वान लोक पुष्कळ होऊन गेले. ह्मणून ह्या काळाला 'आगस्टन' हें नांव आहे. हिचा जन्म १६६४ त झाला.

नाहीं. ह्मणून आतां प्रश्न असा निघतो कीं, इंग्लिश समाजाच्या उन्नतीची दिशा कोणती आहे व त्या उन्नतीचा हेतु काय आहे? ह्या दोहोंचेंही उत्तर "स्वातंत्र्य," "प्रजासत्ताक राज्य," असें सहज तोंडांतून निघून जाईल. परंतु ह्या उत्तरीं दिलेल्या शब्दांचा अर्थ फार व्यापक असून, नक्की ठरलेला नाहीं. युरोपांतील इतर देशांपेक्षां इंग्लंड देशाच्या सुधारणेचें एक विशिष्ट व मुख्य अंग स्वातंत्र्यच आहे खरें; तरी स्वातंत्र्य हाच केवळ इंग्लिशांचा हेतु आहे, व तें मिळविण्याकरितांच त्यांचे सर्व प्रयत्न चालले आहेत, असें नाहीं. कारण स्वातंत्र्य ते हल्लीं पुष्कळ दिवस भोगीत आहेत. सतराव्या शतकांत जे अंतस्थ तंटे इंग्लंड देशामध्यें झाले, त्यांचेयोगानें त्यांचें स्वातंत्र्य प्रथमतःच जरी त्यांस प्राप्त झालें नाहीं, तरी त्याजपूर्वी मिळालेलें त्यांजकडेस कायम झालें, इतकी गोष्ट खरी. त्यापुढें जे तेथील लोकांचे प्रयत्न राजकीयसंबंधांत सुरू आहेत, ते सर्व स्वातंत्र्य मिळविण्याकरितांच आहेत, असें लोक मानितात. परंतु हें मानणें चुकीचें आहे. पाहिजे तर स्वातंत्र्य हा शब्द सोडून देऊन 'प्रजासत्ताक राज्य' स्थापनेकडे त्यांचे प्रयत्न चालू आहेत, असें आपण ह्मणावें, व हल्लींच्या समाजाचेंही सामान्यतः मत तसेंच असल्याचें दिसतें. अलीकडील इंग्लिश इतिहासांत घडून आलेल्या गोष्टींचा कल विशेषतः असा दिसून येतो कीं, प्रथमतः मध्यम स्थितींतले लोकांस, व हळुहळु खालच्या प्रतीचे लोकांस, राजकीय प्रकरणांत थोडी थोडी सत्ता मिळत चालली आहे.

वास्तविक पाहिलें असतां या एकुणिसाव्या शतकांत निःसंशय लोकांचा कल प्रजासत्ताक राज्याकडेसच आहेसा दिसतो. अठराव्या शतकांत असा कल होण्यास नुकताच आरंभ झाला होता. ह्याच गोष्टीकडे विशेषतः सर्व लोकांचें लक्ष व्यापून गेल्याचें दिसतें. याचें कारण राजकीय संबंधांत जे कांहीं वादविवाद व तंटे चालतात, त्या सर्वांचा विषय हाच आहे. परंतु

इतिहासकारांनीं एवढ्यावरच तृप्त राहतां कामा नये. जरा जास्त दूर अंतरावर त्यांनीं उभें राहून, चांगली खोल नजर फेंकून, सर्व गोष्टींचा विचार केला पाहिजे. इंग्लिश राष्ट्राची स्थिति कसकशी बदलत चालली आहे, याचा शांतपणें विचार करूं लागलें, ह्मणजे दुसरा एक मोठा फरक दृष्टीस पडल्याशिवाय राहत नाहीं, व तो फरक जरी वरच्यापेक्षां फारसा मोठा नसला तरी खचीत जास्त महत्वाचा आहे. त्याजविषयीं लोकांमध्यें विशेष चर्चा व वाटाघाट चालू नाहीं, याचें कारण एक तर हा फरक फारच हळुहळु घडून आला आहे; व दुसरें, तो अमलांत येत असतां त्याजला विरुद्ध प्रतिपक्षी फारसे नव्हते. आह्मीं ह्मणतों तो फरक इंग्लिश लोकांचें वर्चस्व जगतांतील इतर पुष्कळ देशांवर आज बसत चाललें आहे, हा होय. "इंग्लिश राष्ट्राचा या पृथ्वीवर नुकताच झालेला विस्तार" या विषयाकडे लोकांचें फारसें लक्ष गेलेलें दिसत नाहीं.

इंग्रज लोक ह्या पृथ्वीवर चहूंकडे पसरत चालले आहेत, व त्यांचें राष्ट्र अतोनात वाढत चाललें आहे, या गोष्टीकडे कोणाचें फारसें लक्ष पोंचलेलें दिसत नाहीं, हें विशेष आश्चर्यकारक आहे. जणुंकाय बेसावध असतांनाच इंग्रजांनीं अर्धें जग जिंकून तेथें वसाहत केली, असा यापासून भास होतो. अठराव्या शतकांत मुलूख जिंकण्याचें काम सपाट्यानें चाललें असतां इंग्रजांच्या विचारांत अगर इतर व्यवहारांत बिलकुल फेरबदल त्यावेळीं झाला नाहीं. अजूनपर्यंत त्यांची अशी समजूत आहे कीं, यूरोपाच्या उत्तरेस लहानशीं बेटें आहेत, त्यांतच कायती आपली सर्व वसाहत आहे. परमुलखांत आपल्या लोकांनीं स्थापिलेल्या वसाहती नाहींत, असें त्यांच्या बोलण्यावरून व्यक्त होत असतें. उदाहरणार्थ, इंग्रजांची लोकसंख्या किती ह्मणून कोणीं विचारलें असतां, कानडा व आस्ट्रेलिया येथील लोक त्या गणनेंत घेतले जात नाहींत. अशीच विचार करण्याची ठरीव पद्धत तद्देशीय

इतिहासकारांनीं उचलली असल्याचें दिसतें. यामुळें अठराव्या शतकाचें वर्णन करितांना मुख्य गोष्ट त्यांच्या लक्षांतून अजिबात निघून जाते. पार्लमेंटांतील भांडणें व हरएक बाबतींत स्वातंत्र्य मिळविण्याविषयींच्या खटपटी, यांचेंच वर्णन करितांना त्यांचा वेळ निघून जातो. सदर्हू वादविवाद व खटपटी अठराव्या शतकांत ह्मणजे नवीन चालू झाल्या होत्या, असें नाहीं. उलटपक्षीं सतराव्या शतकांत जीं भांडणें व खटपटी चालल्या होत्या, त्यांचेंच प्रतिबिंब अठराव्या शतकांत पडलेलें होतें. अठराव्या शतकांतील इंग्लंडचा इतिहास इंग्लंडमध्यें घडून आलेला नाहीं; तर अमेरिका व एशिया यांमध्यें खरोखरी तो घडून आला आहे, हें ते विसरून जातात. म्हणून प्रस्तुत व भावि स्थितीचा विचार करतेसमयीं नवीन जिंकून स्वराज्यास सामील केलेले जे कित्येक मुलूख आहेत, ते आपण विसरतां नये. फक्त इंग्लंड देशासच प्रमुखपणा देणें व इतर मुलूख विसरणें, ही चुकी होय.

पूर्वीपेक्षां प्रस्तुतच्या तद्देशीय वस्तुस्थितींत हल्लीं काय विशेष फरक झाला आहे, त्याचा आपण जास्त कसोशीनें विचार करूं. एलिझाबेथ राणी इंग्लंडमध्यें राज्य करीत असतां, युरोप खंडाच्याबाहेर इंग्रज लोकांचा मुलूख बिलकुल नव्हता. आठव्या हेन्‌री* राजाच्या कारकीर्दीपासून पर मुलुखांत वसाहती करण्याविषयीं निरनिराळया युक्तया निघाल्या, परंतु त्या सफल झाल्या नाहींत. आठव्या हेन्‌रीच्या कारकीर्दींत होअर नांवाच्या गृहस्थानें वसाहती करण्याची खटपट प्रथमतः चालू केली. तेव्हांपासून गिल्बर्ट व राले यांच्या वेळेपर्यंत वसाहतींच्या ज्या ज्या कल्पना निघाल्या, त्या सर्व फुकट गेल्या होत्या. इंग्लिश राज्यास ग्रेट ब्रिटन असें सुद्धां नांव हा वेळपर्यंत नव्हतें. कारण स्काट्‌लंडचें राज्य स्वतंत्र होतें, व ऐर्लंडामध्यें जरी इंग्रजांची वसाहत झाली होती, तरी तो मुलूख

* इ. स. १५०९ पासून १५४७ पर्यंत.

आपला म्हणण्यालायक स्थितीस येऊन पोहोंचला नव्हता. स्टुअर्ट घराण्यांतील राजे राज्य करूं लागले, त्यावेळेपासून दोन नवीन फरक दृष्टीस पडूं लागले. यांपैकीं एकाची समाप्ति ॲन राणीच्या कारकीर्दीच्या समाप्तीबरोबर* जाहली. दुसरा मात्र आजपर्यंत अव्याहत चालला आहे. पहिला फरक इंग्लंड, स्काट्लंड, ऐर्लंड या तीन देशांचें एकीकरण होणें, हा होय. हें एकीकरण ॲन राणीच्या कारकीर्दीच्या समाप्तीपूर्वीच झालें, असें जरी अक्षरशः खरें नाहीं व हें अक्षरशः खरें होण्यास जरी पुढें पुष्कळ अवधि लागली, तरी वास्तविक ही गोष्ट सतराव्या शतकांतच व स्टुअर्ट राजे राज्य करीत असतांच घडून आली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. दुसरा फरक द्वीपांतरीं व समुद्रांतरीं इंग्लिश राज्याची वृद्धि होणें, हा होय. हा प्रकार, इसवी सन १६०६ या वर्षी व्हर्जिनियाची पहिली सनद झाली, तेव्हां सुरु झाला. सतराव्या शतकांत हा प्रकार साधारणपणें वृद्धिंगत होत होता; तरी इंग्लिश राष्ट्राचा खरोखरी अवाढव्य विस्तार व अवाढव्य राज्यकारस्थान हीं अठराव्या शतकापर्यंत जारीनें चालू झालीं नव्हतीं. हा विस्तार हल्लीं बरोबर किती आहे याचा आपण आतां अंदाज करूं.

इंग्लिश राष्ट्राच्या विस्ताराचा विचार करतांना जीं कांहीं थोडींशीं लहान लहान ठिकाणें आहेत व ज्यांचा उपयोग केवळ समुद्रकांठचीं बंदरें ह्मणून, अगर नाक्यावरचीं लढाऊ ठिकाणें ह्मणून होत आहे, त्यांचा समावेश यांत केला जाणार नाहीं. ग्रेट ब्रिटन व ऐर्लंड खेरीज करून हल्लींच्या ब्रिटिश राज्यांत समावेश होणाऱ्या मुलुखाचे चार मोठे भाग करतां येतील. या चारही देशांत राहणारे लोक बहुतेक इंग्लिशच असून त्यांवरील सर्व अंमल इंग्लंडच्या राजाकडेस आहे. शिवाय आणखी पांचवा एक मोठा

* इ. स. १७१४.

देश आहे. तोही इंग्रजांचेच ताब्यांत असून त्याजवर त्यांचाच अंमल चालतो. तरी तेथील रहिवाशी लोक इंग्रज लोकांपासून अगदीं भिन्न आहेत. पहिल्या चार भागांचीं नांवें—कानडाचें राज्य; वेस्ट इंडियन बेटें—याजमध्यें दक्षिण व मध्य अमेरिका यांतील बराच मुलूख येतो; तिसरा केप कॉलनी वगैरे आफ्रिकेंतील इंग्रजांचे ताब्यांतील मुलूख; चवथा आस्ट्रेलिया येथील राज्य व न्यू झीलंड. ह्या सर्व भागांत इंग्लिशांच्या वसाहती आहेत. पांचव्या भागांत इंग्लिशांची वसाहत नसून केवळ तो त्यांच्या ताब्यांतला देश इतकेंच आहे. त्यास हिंदुस्थानदेश ह्मणतात. घोटाळा न होण्यासाठीं पहिल्या चार भागांस 'वसाहती' असें ह्मणून हिंदुस्थानास फक्त 'ताब्यांतील मुलूख' असा शब्दनिर्बंध सोयीसाठीं पुढील विवेचनांत करण्यांत येईल.

या एकंदर मुलुखाचा विस्तार किती आहे व त्याजपासून इंग्लिशांना काय फायदा आहे, या दोन प्रश्नांचा आतां विचार कर्तव्य आहे. आपण प्रथम लोकसंख्येचाच विचार करूं. नवीन वसाहत केली असल्यामुळें पुष्कळ ठिकाणीं लोकसंख्या अगदींच विरळ आहे. कानडा व न्यू फाउंडलंड या दोहोंची मिळून लोकसंख्या इसवी सन १८८१ यावर्षी ४५ लक्षांहून थोडी जास्त होती; ह्मणजे सरासरी स्वीडन देशाच्या लोकसंख्येइतकी होती. वेस्ट इंडियन बेटें, येथील लोकसंख्या सुमारें १९ लक्ष होती, ह्मणजे सरासरी ग्रीस देशाच्या लोकसंख्येइतकी. दक्षिण आफ्रिकेंतील ब्रिटिश मुलुखांची लोकसंख्या सुमारें १७॥ लक्ष आहे. परंतु यापैकीं इंग्लिश लोक ह्मटले ह्मणजे निम्याहूनही कमीच आहेत. आस्ट्रेलियाची लोकसंख्या सुमारें ३० लक्षाची आहे. ह्मणजे स्वित्झर्लंडच्या लोकसंख्येपेक्षां थोडी जास्त आहे. ह्यांची एकंदर बेरीज एक कोट साडे सात लक्ष झाली. ह्मणजे सरासरी मानानें एक कोट इंग्लिश लोक ग्रेट ब्रिटन व ऐर्लंड यांचे बाहेर आहेत.

इंग्रज लोकांच्या ताब्यांतील हिंदुस्थान देशाची लोकसंख्या सुमारें १९ कोट ८० लक्षपर्यंत* आहे. ही खेरीज करून आणखी त्या देशांतील स्वतंत्र संस्थानांची लोकसंख्या सुमारें ६ कोट ७० लक्षपर्यंत आहे. दोन्ही मिळून सर्व हिंदुस्थानाची लोकसंख्या, रशिया खेरीजकरून सर्व युरोपच्या लोकसंख्येइतकी आहे.

इतकी हिंदुस्थानाची लोकसंख्या मोठी आहे, तरी ज्याप्रमाणें इंग्लंडच्या ताब्यांतील इतर चार मुलुखांची एक कोट लोकसंख्या एकजातीयच आहे, तशी ही नाहीं, हें सहजीं कळून येतें. वरील एक कोट लोक इंग्रजांचेच वंशज आहेत, ह्मणून त्यांची व इंग्रजांची स्नेहबंधनें फार मजबूद आहेत. हिंदुस्थानांतील लोकांची जात व धर्म इंग्रज लोकांच्याहून अगदीं भिन्न असून केवळ जिंकले गेल्यामुळेंच ते इंग्रजांच्या ताब्यांत राहत आहेत. हिंदुस्थान इंग्रजांचे ताब्यांत राहिल्यापासून इंग्रजांची शक्ति अगर सुरक्षितपणा वाढला आहे किंवा नाहीं, ह्याचा संशयच आहे. एवढें खरें आहे कीं, हिंदुस्थान इंग्रजांचे ताब्यांत राहिल्यामुळें इंग्रजांची जबाबदारी व भीति हीं दोनहीं जास्त वाढलीं आहेत.

इंग्रजांच्या ताब्यांतील वसाहतींची हिंदुस्थानाहून अगदीं भिन्न स्थिति आहे. राज्य चिरस्थायी राहण्यास ज्या कांहीं गोष्टींची अवश्यकता असते, त्यांपैकीं बऱ्याच गोष्टी या वसाहतींच्या मुलुखांत आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. एक देश दुसऱ्याचे ताब्यांत राहण्यास मुख्यत्वेंकरून तीन गोष्टींची जरूर आहे. दोन्ही देशांतील लोक एकजातीयच असले पाहिजेत; दोघांचा धर्म एक असला पाहिजे आणि दोघांचें नफानुकसान एक असलें पाहिजे. इंग्रजांच्या वसाहतींस पहिल्या

* हे आंकडे सन १८८१ च्या खानेसुमारीवरून घेतले आहेत

दोन गोष्टी लागू आहेत, त्यामुळें त्यांचा त्यांजवर ताबा बराच निर्भय राहतो. दोघांचें नफानुकसानही एकच असावें, अशाबद्दल प्रयत्न चालू आहेत व त्या प्रयत्नांस यशही चांगलें येईल, अशी आशा आहे. ह्मणून इंग्लिश राष्ट्राच्या भावि स्थितीचा विचार करतांना हिंदुस्थानापेक्षां या वसाहतींकडे आपण जास्त लक्ष पोंचविलें पाहिजे.

लोकसंख्येच्या मानानें विचार करणें सोडून देऊन, फक्त देशविस्ताराच्या मानानें पाहूं गेलें तर, ह्या वरील ह्मणण्याचें महत्व सहज कळून येईल. एक कोट इंग्रज लोकांची संख्या यूरोपाच्या बाहेर आहे, हें प्रथमारंभीं विलक्षण दिसतें; परंतु, आह्मी जें पुढें सांगणार आहों, त्याच्याशीं तुलना करून पाहिलें असतां, हें कांहींच नाहीं, असें वाटेल. ह्या एक कोट लोकसंख्येनें व्यापलेली जागा थोडी नाहीं, तर अतोनात आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें दर चौरस मैलांत लोकांची वस्ती २९१ आहे. परंतु कानडामध्यें ही संख्या दर चौरस मैलास फक्त १ असामी, इतकीच आहे. इंग्लंडच्या इतकी कानडाची लोकसंख्या वाढली, अशी जर कल्पना केली, तर तेथील लोकसंख्या एक अब्जाहूनही जास्त होईल. इतकी लोकसंख्या होण्यास अतिशयच अवधि पाहिजे, हें खरें आहे; तरी हल्लींच्यापेक्षां बरीच लोकसंख्या वाढण्यास फार अवधि नको. कानडाचें राज्य आहे असें टिकलें तर, सुमारें ५० वर्षांचे आंतच तेथील लोकसंख्या ग्रेट ब्रिटनच्या संख्येइतकी ह्मणजे सुमारें १० कोट सहज होईल.

हे आंकडे पाहिले ह्मणजे कदाचित् वाचक चकित होऊन जातील. परंतु ते पाहून आपण असा विचार केला पाहिजे कीं, हीं अशी लोकसंख्या वाढणें, हें चांगलें आहे कीं वाईट आहे, फक्त देशाचा विस्तार आणि लोकसंख्या हीं वाढण्यापेक्षां राष्ट्राची मानसिक शक्ति आणि नीतिमत्ता वाढणें अवश्य आहे किंवा नाहीं, आणि लहानशा राष्ट्राच्या हातून मोठमोठाले

पराक्रम आजपर्यंत झाले आहेत, किंवा नाहींत? आह्मी असें समजतों कीं, नुसती संख्या वाढणें, हें बरें किंवा वाईट ह्या अद्यापि संशय आहे. परंतु याचा विचार तूर्त कर्तव्य नाहीं. तूर्त इतकें खरें आहे कीं, ही जी एवढी मोठी वृद्धि झाली आहे, ती मोठी महत्वाची आहे. तिजविषयीं आह्मीं दुर्लक्ष करितां नये. ही बरी वाईट कशीही असली, तरी अर्वाचीन इतिहासांत या गोष्टीचें अत्यंत महत्व आहे. आणि ही गोष्ट घडून आली ह्मणजे जगताच्या वस्तुस्थितीमध्यें लोकसंख्या वाढली इतकाच फरक झाला व तिजपासून मानसिक व नैतिक परिणाम कांहींच घडून आले नाहींत, हें मानणें, मोठी चूक होय. हे इंग्रज लोक एका लहानशा बेटांतून मोठ्या महाद्वीपांत जाऊन राहिले; उत्तर अक्षांशाच्या ५०° वरील जमीन सोडून उष्ण कटिबंधांत किंवा दक्षिण गोलार्धांत त्यांनीं प्रवेश केला; प्राचीन काळापासून वाढत गेलेला स्वदेश व स्वज्ञाति सोडून, दूर देशांत नवीन वसाहती त्यांनीं केल्या; मोठमोठीं कारागिरीच्या धंद्यांचीं शहरें सोडून, ओसाड जमिनींत उंसाची लागवड करण्याचा धंदा त्यांनीं पतकरिला; जंगली प्रदेशांत ज्या ठिकाणीं मूळच्या रानटी लोकांपेक्षां दुसऱ्या कोणाचा शिरकाव नव्हता, त्या ठिकाणीं निर्मक्षिक अशा मेंढरस्त्यांचाच त्यांस स्वीकार करावा लागला. ह्या गोष्टींनीं त्यांच्या आचारविचारांत व नीतिमत्तेंत फरक होणार नाहीं, हें संभवेल तरी कसें? इतकेंच नाहीं, तर थोड्याच काळांत त्यांचा बाह्य आकारही बदलल्याशिवाय राहणार नाहीं. आज कानडा* किंवा व्हिक्टोरिआ* येथील इंग्रज लोक ग्रेट ब्रिटनच्या लोकांसारखे नाहींत, हें आपणांस बरेच दिवस कळलें आहे. तर मग जर ग्रेट ब्रिटनचा व ह्या मोठमोठ्या वसाहतींचा अंतस्थ संबंध आहे असाच कायम राहिला, किंवा तो चालत आहे त्याच दिशेनें जास्त निकट झाला,

* अमेरिकेंतील इंग्रजांच्या वसाहती.

तर ह्या वसाहतींतील लोकसंख्या ग्रेट ब्रिटनच्या लोकसंख्येइतकी वाढली असतां, इंग्लंडच्या वस्तुस्थितीमध्यें कांहींच फरक होणार नाहीं, हें संभवत नाहीं. हा फरक बरा वाईट कसाही असो; ह्या वसाहतींची सर्व गोष्टींनें वृद्धि होणें, ही गोष्ट इंग्लंडचे संबंधानें अत्यंत महत्वाची व विचारणीय आहे, यांत संशय नाहीं.

भावि स्थितीचा विचार करतांना तर वरील गोष्टींचें महत्व अपार आहे, असें ह्मणावें लागतें. एखाद्या गोष्टीचें महत्व पुष्कळ असतांही ती फार साधी असल्यामुळें तिच्याविषयीं विशेष कांहीं सांगावयाचें नसतें. ह्मणून इतिहासांत तिला महत्व प्राप्त होत नाहीं. इंग्रज लोकांनीं स्वदेशांतून परदेशांत जाऊन वसाहत केली, ही गोष्ट ह्याच सदरांत येते, असा लोकांचा ग्रह असलेला दिसतो. जणुं काय, ही गोष्ट स्वाभाविक रीत्या घडणाऱ्या गोष्टींपैकींच असून, ती न घडणें, अशक्यच होतें; अथवा ज्या राष्ट्रामध्यें लोकसंख्या फाजील वाढली आहे व जें राष्ट्र नाविक विद्या व शक्ति ह्यांच्या योगानें सर्व राष्ट्रांत श्रेष्ठ गणलें जातें, अशा राष्ट्रांतील लोकांनीं ओसाड अशा परमुलुखांत बिनहरकत जाऊन वसाहत केली, हें साहजिच होतें. परंतु हा ग्रह चुकीचा आहे, असें दाखविणें फार कठीण नाहीं. आमचें असें ह्मणणें आहे कीं, इंग्रज लोकांनीं परमुलुखांत जाऊन वसाहत करणें, ही गोष्ट इंग्लिश इतिहासामध्यें फार मोठी असून तिजविषयीं वृत्तांत मोठा व चित्तवेधक होईल. अठराव्या शतकांत जीं कांहीं कारस्थानें एकंदर युरोप खंडांत घडून आलीं, त्यांचें मूळ बीज ही वरील गोष्ट होय, असें आह्मी बिनधोक ह्मणूं शकतों. फ्रान्सचा राजा चौदावा लुई* ह्याच्या वेळेपासून तों नेपोलियनच्या† वेळेपर्यंत ज्या ज्या लढाया इंग्रज लोकांनीं चालविल्या

* चौदावा लुई इ. स. १६४३ पासून १७१५ पर्यंत.

† इ. स. १८०० चा सुमार.

होत्या, त्या केवळ ह्या ' नव्या जगाच्या* ' ह्मणजे नवीन शोध लागलेल्या जमिनीच्या मालकीबद्दल होत्या. आणि हीच गोष्ट बरोबर न समजल्यामुळें अठराव्या शतकांतील इंग्रज लोकांचा इतिहास पुष्कळांस कंटाळवाणा वाटतो.

ह्या गोष्टींचा इतिहास लिहितांना मुख्य मुद्दा हा लक्षांत ठेवावयाचा आहे कीं, इंग्रजांच्या ताब्यांत दोन भिन्न काळीं दोन भिन्न राष्ट्रें होतीं. नवीन वसाहती करण्याकडे इंग्लंडच्या ग्रहदशेचा जोर इतका बलवत्तर होता कीं, स्वतः उत्पन्न केलेलें एक राष्ट्र गमावल्यावर त्याच्या ठिकाणीं लागलेंच दुसरें राष्ट्र केवळ आपोआप उत्पन्न होऊन, इंग्लंडास न जुमानतां त्याच्या ताब्यांत आलें. वर जे लोकसंख्येचे आंकडे दिले आहेत, ते केवळ ह्या दुसऱ्या राष्ट्रासंबंधाचे आहेत. समुद्रांतरीं इंग्रज लोक एक कोट आहेत, ह्मणून जेव्हां आह्मीं वर लिहिलें, तेव्हां दुसरी एक गोष्ट त्या वेळीं सांगितली नाहीं. ती ही कीं, सुमारें शंभर वर्षांपूर्वीं इंग्रजांची दुसरी एक वसाहतींची रांग असून त्यावेळींच तेथील लोकसंख्या तीस लक्षपर्यंत होती. परंतु हे लोक लढाई करून इंग्रजांपासून स्वतंत्र झाले व त्यांनीं एक नवीन प्रजासत्ताक राज्य स्थापन केलें. तेथील लोकसंख्या शंभर वर्षांमध्यें पूर्वीपेक्षां सोळापट जास्त वाढली आहे, ह्मणजे एकंदर इतकी वाढली आहे कीं, ती, ग्रेट ब्रिटन आणि इंग्रजांच्या ताब्यांतलि हल्लींच्या दुसऱ्या वसाहती, ह्या दोहोंच्या लोकसंख्येबरोबर झाली आहे; ही गोष्ट सुद्धां अत्यंत महत्वाची आहे. इंग्रजांच्या ताब्यांतून इतके लोक गेले, ह्म-

* ' नवें जग '–ह्मणजे पंधराव्या शतकांत व तदनंतर सांपडलेले अमेरिका व इतर बेटें वगैरे प्रदेश. ह्यांत अमेरिकाखंड हेंच मुख्य आहे. यास सोयीसाठीं पुढील विवेचनांत आह्मी अमेरिका असेंच ह्मणत जाऊं. वस्तुतः नुकतेच वर सांगितलेल्या चार भागांचा एवढ्यांत अंतर्भाव होतो, असें समजावें.

ष्टून ह्या गोष्टीचें महत्व जास्त मानावयाचें, असें नाहीं. तर अशा प्रकारची आरंभीं क्षुल्लक वसाहत होऊन, तेथील लोकसंख्या फक्त शंभर वर्षांत रशियाखेरीज करून युरोपांतील दुसऱ्या कोणत्याही देशाच्या लोकसंख्येपेक्षां जास्त वाढावी, हें सामान्य नाहीं. परंतु अमेरिकेएवढी वसाहत इंग्रजांच्या ताब्यांतून गेल्यापासून सार्वभौम इंग्लिश राष्ट्राच्या भावि स्थितीविषयीं प्रत्येक इंग्रज गृहस्थाचें मन फारच कचर खाऊं लागलें आहे.

कारण, इंग्रज लोकांनीं पर मुलखांत वसाहती केल्या, ही गोष्ट जर अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत फारच ऐतिहासिक महत्वाची आहे, तर इंग्लिश राष्ट्राच्या भावि स्थितीसंबंधीं एक मोठा व्यापक प्रश्न असा निघतो कीं, ज्याप्रमाणें एकवार वसाहती त्यांचे ताब्यांतून जाऊन स्वतंत्र झाल्या, तद्वतच हल्लीं असलेल्या ह्या दुसऱ्या वसाहती स्वतंत्र होणार नाहींत कशावरून ? इंग्लिश इतिहासाच्या उत्तम अध्ययनापासून शेवटीं सार ह्मणून कांहीं काढलेलें असलें पाहिजे ह्मणून जें वर सांगण्यांत आलें आहे, तें, या वरील प्रश्नाचें योग्य उत्तर देणें, हें होय.

" वसाहती ह्मणजे एखाद्या झाडावरचीं फळें होत. फळ जसें पिकेपर्यंत झाडाला चिकटून राहतें व पिकल्यावर झाडापासून तुटून पडतें, तद्वतच वसाहतीही आरंभीं मूळ देशाशीं चिकटून राहतात, परंतु परिपक्व दशेस आल्यावर त्या मूळ देशापासून स्वतंत्र झाल्याशिवाय राहणार नाहींत." असें एक पूर्वापार कित्येकांचें ह्मणणें आहे, व टर्गो ह्मणून जो विख्यात फ्रेंच मुत्सद्दी अठराव्या शतकांत होऊन गेला, त्यानें, अमेरिकेनें आपलें स्वातंत्र्य खलित्यानें प्रसिद्ध करण्यापूर्वीं पंचवीस वर्षें, सदरील वाक्यांतील भविष्याचा उच्चार केला होता. त्यानें आणखी असें ह्मटलें होतें–" अमेरिकेंतील लोकांच्या अंगांत स्वतंत्रतेनें राहण्याची शक्ति येतांच

कार्थेज*प्रमाणें ते स्वतंत्र झाल्याशिवाय राहणार नाहींत." जेव्हां ही गोष्ट भविष्य केल्याप्रमाणें पुढें अक्षरशः घडून आली, तेव्हां सहजच जें वाक्य गृहीत घेऊन हें भविष्य टर्गो यानें काढलें होतें, तें वाक्य विशेषें-करून इंग्लिश लोकांच्या मनामध्येंतरी अगदीं सिद्ध करून दाखविलेल्या तत्वाप्रमाणें बिनचूक उतरलें, यांत नवल काय ? याच कारणामुळें इंग्रजी राज्याचा जो नवीन इतका विस्तार झाला आहे, त्यासंबंधानें इंग्रजांना फारसें महत्व अगर भूषण वाटत नाहीं. ते ह्मणतात कीं, "इतका जलद व इतका मोठा विस्तार झाला तर त्यांत काय विशेष आहे ? आपल्याला कांहीं त्याजपासून फायदा नाहीं." हें इतकें विस्तृत राज्य आपल्याला सांभाळितां येणार नाहीं, असें त्यांना वाटतें, म्हणून आपण तें सांभाळ-ण्याची इच्छा करणेंही जरूर नाहीं, असें ते मानितात. कारण ज्या लढाईचे योमानें, युनायटेड् स्टेट्स्मधील वसाहती स्वतंत्र झाल्या, त्या लढा-ईचें वर्णन करितांना इंग्रज इतिहासकार असें सिद्ध करणें जरूरीचें मान-तात कीं, या वसाहती स्वतंत्र होणें, ही गोष्ट केवळ अपरिहार्य होती, इतकेंच नाहीं, तर उलटी ती इंग्लंडच्या फायद्याचीच होती. उघडच आहे, द्राक्षें हातास येत नसलीं ह्मणजे, तीं आंबट म्हणून सोडून गेल्या-शिवाय मनाचें समाधान झालें, असें कसें दाखवितां येईल ?

---

* कार्थेज–हें एक आफ्रिकेंत फार विख्यात शहर होतें. त्याच्या स्थापनेचा काळ बरोबर कळलेला नाहीं. कोणी ह्मणतात कीं, ख्रिस्ती शकापूर्वी सुमारें ८६९ वर्षांपूर्वी तें स्थापलें गेलें. कोणी ह्मणतात कीं रोम शहर ख्रिस्ती शकापूर्वी ७५३ व्या वर्षी रोम्युलसनें वसवलें, व त्यापूर्वी ७२ किंवा ९३ वर्षें कार्थेज वसलेलें होतें. त्याचा व त्याच्या प्रजासत्ताक राज्याचा अभ्युदयकाळ ७३७ वर्षें होता, व त्याचा अत्युत्कर्ष हानिबाल व हामिलकार ह्या प्रसिद्ध पुरुषांच्या अमदानींत झाला. रोम शहराबरोबर कार्थेजनें तीन मोठमोठीं युद्धें केलीं, त्यांना "प्यूनिक वॉर्स" असें नांव आहे. शेवटल्या युद्धांत दुसरा आफ्रिकेनस सिपियो ह्यानें त्या शहराचा विध्वंस केला. (सन १४७ ख्रिस्तापूर्वी). हे लोक विश्वासघातकी असे फार प्रसिद्ध होते. "प्युनिका फेडिस" (प्यूनिक विश्वास ह्मणजे विश्वासघात) ही प्रसिद्ध ह्मण त्यांवेचवरून पडली आहे.

हें इतिहासकारांचें म्हणणें बरोबर आहे किंवा नाहीं, याचा विचार करण्याची आतां जरूर नाहीं. तूर्त आम्हांस इतकेंच सांगावयाचें आहे कीं, इंग्रजांच्या पुढें तूर्त दोन मार्ग आहेत, व त्यांपैकीं कोणता पसंत करावा, हाच कायतो आज अत्यंत महत्वाचा प्रश्न त्यांच्या समोर आहे. पहिला मार्ग हा कीं, वर जे त्यांच्या वसाहतींचे भाग सांगितले, ते कालांतरानें स्वतंत्र होऊन त्यांचीं निरनिराळीं चार स्वतंत्र राज्यें बनतील, व स्वतंत्र झाल्यावर त्या चारांपैकीं कानडा, व पश्चिम इंडियन देश, या दोहोंना असा प्रश्न निघेल कीं, आपण निरनिराळे स्वतंत्र रीतीनें राहण्यापेक्षां युनायटेड स्टेट्सलाच जाऊन मिळणें फायदेशीर होईल किंवा नाहीं? कांहीं झालें तरी हें निर्विवाद आहे कीं, ह्या नवीन वसाहती केलेल्या सर्व प्रदेशांत इंग्लिश लोकांचें नांव व इंग्लिश लोकांच्या संस्था ह्यांचें वर्चस्व फार राहील. आणि हे देश स्वतंत्र होऊं लागले तरी त्यावेळीं अशी कांहीं युक्ति लढवितां येईल कीं, ते देश आपला मातृदेश जो इंग्लंड त्याशीं वैरभाव न धरितां स्नेहभावाचें नातें कायम राखतील. ते देश स्वतंत्र झाल्यावर, युरोपांतील कांहीं जवळच्या देशांचा जसा इंग्लंडशीं संबंध आहे, तसाच ह्या देशांचाही संबंध राहील. लोकसंख्या दाट असेल खरी, परंतु ती लोकसंख्या जर्मनीच्यापेक्षां कमी राहून फ्रान्सच्या लोकसंख्येबरोबर तर नाहींच असणार. परंतु रशिया आणि युनायटेड स्टेट्स् यांचे विस्ताराचें मान फारच वाढेल. कारण, रशियाची लोकसंख्या आजच इंग्लंडच्या दुपटी इतकी असून युनायटेड स्टेट्सचीही लौकरच इंग्लंडच्या दुप्पट होईल. याजमुळें इंग्लंडचे व्यापाराला अगदीं नवीन प्रकारचे धोके उत्पन्न होतील.

दुसरा मार्ग हा कीं, ज्याप्रमाणें युनायटेड स्टेट्स्मध्यें निरनिराळीं दूरदूरचीं संस्थानें एकमेकांपासून भिन्न असतांही एका अमलाखालीं सुखानें नांदत आहेत, त्याप्रमाणेंच इंग्लंड देशालाही आपले निरनिराळे दूरदूरचे

मुलूख आपल्या एका अमलाखालीं सुखानें राखतां येतील. असें करितां आलें तर, राशिया आणि युनायूटेड स्टेट्स् या देशांची, लोकसंख्या व क्षेत्रफळ यांचे मानानें, जशी हल्लीं पहिले वर्गांत गणना होते, त्याचप्रमाणें इंग्लंडचीही होऊं लागेल, ह्मणजे युरोपाच्या देशांत वरिष्ठ वर्गांत त्याची गणना होऊं लागेल. ही गोष्ट इंग्रजांस इष्ट आहे, असें त्यांनीं गृहीत घेण्यास कारण नाहीं. विस्तार मोठा असणें ह्मणजे खरोखरी मोठेपणा आहेच, असें नाहीं. दुसऱ्या वर्गांत गणना होऊनही नीतिमत्ता व शहाणपणा यांचेसंबंधानें जर इंग्लंडच्या राष्ट्रास अग्रगण्यता प्राप्त होईल, तर बाह्य विस्ताराचा मोठेपणा नसल्यापासून नुकसान नाहीं. इतकें खरें कीं, सर्व वसाहती कायम राखाव्या किंवा नाहीं, या प्रश्नाचा निकाल एकदम विचार केल्याशिवाय ठरवून ठेवणें रास्त नाहीं. शांतपणें विचार करून त्याचा योग्य निकाल लावला पाहिजे, हें निर्विवाद आहे.

या प्रश्नाचा नीट निकाल लावतां यावा ह्मणून, इंग्लंडानें आज इतके दिवस जो देशविस्ताराचा कल दाखविला आहे, त्याचा ऐतिहासिक रीत्या पुढील भागांत विचार करण्याचा आमचा इरादा आहे. हा विस्तार दूरवर विचार करून झालेला आहे, व त्याची राष्ट्रवृद्धीस जरूर असून तो पुष्टिकारक आहे, असें विचाराअंतीं दिसून आल्यास त्याजविषयीं आमचे मनांतील क्षुद्रता नाहींशी होईल; तसेंच युनायूटेड स्टेट्सूच्या वसाहती स्वतंत्र झाल्या, ही गोष्ट बुडबुड्याच्या क्षणिकत्वाप्रमाणें देशविस्ताराचा अपरिहार्य परिणाम नाहीं, तर त्या वेळीं कित्येक अल्पकालिक गोष्टी अस्तित्वांत होत्या, त्यांजमुळें वसाहतींस स्वतंत्रता प्राप्त झाली; व आतां त्या गोष्टी अस्तित्वांतून गेल्या आहेत, असें आपल्यास विवेचनाअंतीं आढळून आल्यास अलिकडच्या दुसऱ्या वसाहतींच्या चिरस्थाईपणाविषयीं आपल्या आशा दृढ होतील.

प्रकरण दुसरें.

अठराव्या शतकांतील इंग्लंड देशाची स्थिति.

अठराव्या शतकांत इंग्लंड देशाचा विस्तार फार जलद झाला. ह्मणून हा विस्तार कोणत्या प्रकारचा होता व तो करण्यामध्यें इंग्रज लोकांची हिंमत आणि अवसान हीं किती खर्च झालीं, हें समजलें पाहिजे, तर त्या शतकाविषयीं जे ऐतिहासिक लेख आहेत, त्यांच्याशिवाय दुसरें साधन नाहीं. हा हेतु मनांत धरून वाचलें तर त्या ऐतिहासिक लेखांससुद्धां एक विशेष महत्व प्राप्त होईल, असें आह्मांस वाटतें.

अठराव्या शतकाविषयीं इंग्रज लोकांच्या कल्पना फार अस्पष्ट आणि घोंटाळ्याच्या आहेत, हें लौकिक इतिहासांवरून आणि त्या शतकाविषयीं जें वारंवार बोलणें निघतें, त्यावरून व्यक्त होतें. ह्या शतकाच्या बहुतेक भागांत वस्तुस्थितीचें स्थिरत्वच सर्वांच्या दृष्टीस पडतें. त्यावेळीं झालेल्या लढायांचे परिणामच पुढें घडून आले नाहींत, असा भास होतो. तसेंच नवीन राजकीय कल्पना निघत असल्याचेंही आढळून येत नाहीं. हा काळ जरी भरभराटीचा होता असें दिसतें, तरी त्यांत विशेष स्मरणीय असें कांहीं घडून आल्याचें दिसत नाहीं. पहिला आणि दुसरा जॉर्ज यांचे अंधक पुतळे; वाल्पोल्* आणि पेल्हाम्† ह्यांच्या लांब आणि कंटाळवाण्या कारकीर्दी; व्यापाराच्यासंबंधानें स्पेन देशाशीं झालेलें युद्ध;‡ डेटिंजेन¶ व फांटेनाय§ येथील ल-

* वाल्पोल्:—इंग्लंडांतील एक मुत्सद्दी याची कारकीर्द (१७२१–१७४२)

† पेल्हाम्:—वाल्पोलच्या पुढचा मुत्सद्दी वुइल्मिंग्टन, त्याच्या पुढचा मुत्सद्दी पेल्हाम् होय. ह्याची कारकीर्द १७४३–१७५४.

‡ युद्धः—इ. स. १७३९–१७४८

¶ इ. स. १७४३.

§ इ. स. १७४५.

ढाया; बेअकली मुख्य प्रधान न्यूकासल;* वुइल्किस्च्या† वेळचीं नीरस भांडणें; दुष्परिणामी अमेरिकेंतील युद्ध; ह्या व इतर सर्व गोष्टींमध्यें गांभीर्यतेचा अभाव आहे, असें लोकांस वाटतें; तसेंच त्यावेळचे सर्व लोक व सर्व व्यवहार पूर्वीच्याशीं अगदीं अभिन्न असे मानले जात असून त्यांच्यांत मनास आल्हाद देणारें उच्चत्वनीचत्व कोठेंच कोणास दिसत नाहीं. परंतु ह्या सर्व गोष्टी, ज्या एका बंधनांत गोंवून एक मालिका तयार करितां येईल, असें ऐक्यबंधन कोठें आहे, हें कोणास माहित नाहीं. त्यावेळचा फ्रान्सचा इतिहाससुद्धां अशाच प्रकारचा क्षुद्र दिसतो. तरी पण तेथील सर्व गोष्टींचें ऐक्यबंधन उघड असल्यामुळें त्या गोष्टी कोणास दुर्बोध होत नाहींत. 'राजक्रांत्यागमनकाल,' असें एका शब्दानें थोडक्यांत फ्रान्सच्या अठराव्या शतकांतील इतिहासाचें

---

* न्युकासलः—याची कारकीर्द इ. स. १७५४–१७५६ पर्यंत. हा गृहस्थ प्रधानकीच्या लायक नव्हता.

† वुइल्किस्–(जन्म स. १७२७, मृत्यु १७९७) हा 'नार्थ ब्रिटन' नामक एका वर्तमानपत्राचा एडिटर होता. हें पत्र राजपक्षाच्या विरुद्ध पक्षाकडील होतें. ह्या पत्रांत सरकारच्या वर्तनावर खरमरीत टीका केली जात असे. सन १७६३ सालीं अशीच एक कडक टीका त्यांत आली. त्या वेळचा मुख्य प्रधान ग्रेनृव्हिल, ह्यानें वुइल्किस् ह्याला वारंट काढवून पकडिलें. ह्याचा खटला चीफ जास्टिस प्राट ह्यांजपुढें चालून तो सुटला; त्यामुळें सर्व लोकांस फार आनंद झाला. परंतु ह्या त्याच्या बेअब्रूच्या लिहिण्याबद्दल पार्लमेंटांतून त्यास काढून टाकण्यांत आलें. ह्यावेळीं दोन प्रश्नांवर पार्लमेंटांत फार विवाद झाला. एक, जनरल वारंट ह्मणजे इसमाचें नांव वगैरे न घालितां काढलेलें पकडसमान, हें कायदेशीर आहे किंवा नाहीं! दुसरा पार्लमेंटाच्या सभासदाला बेअब्रू केल्याच्या सबबीवर पकडतां येतें किंवा नाहीं! पहिल्या प्रश्नाचा निकाल कांहींच झाला नाहीं. दुसऱ्या प्रश्नाचा निकाल पार्लमेंटानें वुइल्किस्च्या व कोर्टाच्या विरुद्ध केला. ह्यावेळीं लोक आणि पार्लमेंट यांजमध्यें बेबनाव फार होता, ह्मणून पुढें हे तंटे बरेच दिवस सुरू होते. इ. स. १७६८ सालीं लोकांनीं वुइल्किस् ह्यास तीनदां पार्लमेंटांत निवडून पाठविला असून तीनही वेळ पार्लमेंटानें त्याला आपल्यांत घेण्याचें नाकारिलें; व सरतेशेवटीं वुइल्किस् ह्यास ११८० मतें व त्याच्या विरुद्ध असलेल्या गृहस्थास ३०० मतें मिळालीं असतांही त्या गृहस्थासच पार्लमेंटानें कबूल केलें. पुढें ह्या सर्व भांडणांत लोकपक्षाचाच मोड झाला.

वर्णन करतां येईल. परंतु इंग्लंडच्या अठराव्या शतकाविषयीं काय बरें ह्मणतां येईल? त्यावेळच्या इतिहासाचा निष्कर्ष काय? व कोणत्या भावि प्रसंगाच्या त्यावेळच्या गोष्टी सूचक होत्या?

ह्या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी एका विशिष्ट कालांतील ऐतिहासिक गोष्टींचें ऐक्यबंधन शोधून काढण्याची आमची दिशा तरी बरोबर आहे काय? हें पाहिलें पाहिजे.

ऐतिहासिक गोष्टींचे विभाग राज्यकर्त्यांच्या 'कारकीर्दीप्रमाणें करण्याची पडून गेलेली चाल अगदीं निरुपयोगी आहे. हें आपण अगदीं सहजगत्या करतों; कारण एखाद्या राजाची कारकीर्द अगदीं क्षुल्लक असलेली आपण ओळखतों, किंबहुना तिची क्षुद्रता जाणून तिची अतिशयोक्तिही आपण करतों; असें असतें त्या वेळींसुद्धां आह्मी हेच विभाग मानीत असतों; इतकें तें आमच्या आंगवळणीं पडून गेलें आहे. इंग्लंडचे राजे पहिले तीन जॉर्ज. हे आमच्या मतें लोकांना वाटतात इतके क्षुल्लक नव्हते; तथापि राजा कितीही मोठा असला तरी त्याचें नांव त्याच्या काळास देण्याचा कोणासही अधिकार नाहीं. उदाहरणार्थ, "१४ व्या लुइचा काळ," ह्या शब्दांपासून लोकांमध्यें किती गैरसमज झाला आहे तो पहा! ह्यावरून इंग्लिश इतिहासाचे सोईस्कर विभाग करण्याचा उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे हा होय. ॲान राणीची कारकीर्द, दुसऱ्या जॉर्जाची कारकीर्द, अशा प्रकारचीं निरुपयोगीं नांवें प्रत्येक भागाला देऊं नये. त्यांच्या ऐवजीं जे दुसरे विभाग करावयाचे ते राष्ट्राच्या स्थितींत खरोखर जो कांहीं फेरफार झाला असेल, त्याजवर अवलंबून असले पाहिजेत. एका राजापासून दुसऱ्या राजापर्यंत असे विभाग करण्यापेक्षां एका मोठ्या गोष्टीपासून दुसऱ्या मोठ्या गोष्टीपर्यंत, असे विभाग करणें हेंच इष्ट आहे, व असें करतां यावें एवढ्यासाठींच घडलेल्या सर्व गोष्टींचा चांगला विचार व चांगलें पृथक्करण केलें पाहिजे.

अमुक एक गोष्ट चांगली महत्वाची आहे, असें बरोबर खात्री करून एकदा ठरविणें, हें पहिलें काम होय. नंतर त्या गोष्टीचीं कारणें शोधून काढणें, हें दुसरें काम. अशा रीतीनें प्रत्येक गोष्ट अखिल राष्ट्राच्या वृद्धीला कारणीभूत आहे, असें दिसून येईल; व अशा प्रकारच्या संवृद्धीचा राष्ट्राच्या इतिहासामध्यें एकएक स्वतंत्र भाग होईल, व त्या भागाचें नांवही त्या गोष्टीच्या विषयावरून देतां येईल.

ह्या आमच्या ह्मणण्याच्या स्पष्टीकरणार्थ आपण तिसऱ्या जॉर्जाच्या कारकीर्दीचा विचार करूं. ही कारकीर्द ६० वर्षें चालली होती. साठ वर्षेपर्यंत एकच राजा राज्य करीत होता, ह्मणून ह्या साठ वर्षांतील सर्व गोष्टींमध्यें ऐतिहासिक ऐक्यता आहे, असें मानणें किती चुकीचें आहे बरें! तर मग या ठिकाणीं कोणते योग्य असे विभाग पाडले पाहिजेत ? महत्वाच्या गोष्टी निवडून काढून मग विभाग पाडावे, हें उघड आहे. ह्या कारकीर्दीचे दोन भाग करतां येतील. पहिला भाग, अमेरिकेंतील इंग्रज लोकांचें इंग्लंडपासून स्वतंत्र होणें. दुसरा भाग, फ्रान्स येथील राज्यक्रांतीमुळें सुरू झालेली चळवळ हा होय.

राष्ट्राच्या इतिहासामध्यें जसे मोठे विभाग पाडतां येतात तसे लहानही पाडतां येतात. कारण ह्या मोठ्या गोष्टींचा सूक्ष्म रीतीनें विचार केला ह्मणजे त्यांचा परस्परांशीं संबंध आहे, असें दिसून येतें व ज्या गोष्टी कालानुक्रमाप्रमाणें एकमेकींच्या जवळ असतात, त्या एकजातीय आहेत असेंही पुढें कळून येतें. अशा पुष्कळ संबद्ध गोष्टी मिळून एक मोटी गोष्ट होईल, व ह्या मोठ्या व मिश्र गोष्टींचें नांव त्या प्रकरणास लागू पडेल. ह्मणजे इतिहासाचे मोठ्या व मिश्र गोष्टी समाविष्ट केलेले मुख्य भाग प्रथम करून त्यांचेच छोट्या गोष्टी समाविष्ट केलेले पोटविभाग करतां येतील.

इतिहासांतील कांहीं काळांना आह्मीं वर सांगितलेली पद्धत लागू करणें इतकें सोपें वाटतें कीं, आह्मी ती सहजगत्याच लागू करीत असतों. फक्त एक गोष्ट मनांत आली असतां तिचें मुळांतील स्वरूप काय आहे, हें एकदम समजून येतें, व पुष्कळ गोष्टींचा परस्परांशीं संबंधही उघड दिसून येतो. फ्रान्सच्या पंधराव्या लुइची कारकीर्द वाचीत असतां विचार करण्यापूर्वींच एकदम असें कळून येतें कीं, "फ्रेंच राजसत्तेचा ऱ्हास" हेंच प्रकरण सध्यां चाललें आहे. परंतु इतर कित्येक कालांना ही पद्धत सहजीं लावतां येत नाहीं, व अशा कालाच्या संबंधानेंच सर्व घोटाळा आणि नैरस्य दृष्टोत्पत्तीस येतें. अठराव्या शतकाविषयीं इंग्रज लोकांना घोटाळा आणि नीरसता दिसून येते ती अशाच ठिकाणीं होय. परंतु अशा बहुतेक प्रसंगीं वाचकांचीच चुकी होत असते. तत्कालीन गोष्टींची ऐक्यता कशी करावी ह्याची अटकळ जर त्यांना होईल तर त्या कालाची गोडी त्यांस लागेल, परंतु सूक्ष्म दृष्टीनें विचार केल्याशिवाय ही ऐक्यता त्यांस आढळून येणार नाहीं.

या पद्धतीस अनुसरून आतां अठराव्या शतकांतील मोठ्या महत्वाच्या गोष्टींचा विचार कर्तव्य आहे. प्रत्येकाचें महत्व किती आहे, त्याचा तपास करून त्या सर्वांची ऐक्यता कशी होते, हें आपण शोधून काढलें पाहिजे. "अठरावें शतक" ह्या शब्दांचा उपयोग ह्या ठिकाणीं ठोकळ मानानेंच केला आहे. वास्तविक पाहिलें तर ह्या काळाचा प्रारंभ सन १६८८ त इंग्लंडांत झालेल्या राज्यक्रांतीपासून होऊन समाप्ति सन १८१५ तील तहाबरोबर* झाली. आतां एवढ्या काळांत महत्वाच्या

* सदरील तहाला 'दुसरा पारिसचा तह', असें नांव आहे. हा वाटर्लूच्या लढाईनंतर झाला. त्यावर सन १८१५ च्या नोव्हेंबरच्या २० व्या तारखेस सर्व पक्षांच्या सह्या झाल्या. वाटर्लूच्या लढाईंत नेपोलियन बोनापार्ट याच्या पक्षाचा मोड झाल्या-

गोष्टी कोणत्या आहेत, हें पाहूं. इंग्लंडांत ह्या काळांत राज्यक्रांति झाले-ली नाहीं व अंतस्थ अस्वस्थतेच्या दोनच गोष्टी घडलेल्या दिसतात. एक जाकोबाइट* लोकांचीं निष्फळ बंडें. पहिलें सन १७१९ तील आणि दुसरें सन १७४९ तील. राजघराण्यांतही ह्या शतकांत फेरफार झाला, व जरी हा फेरफार नित्यक्रमाविरुद्ध झाला, तरी पार्लमेंटाच्या ठरावानें तो अगदीं शांततेनें तडीस गेला. दुसरी; ज्या मोठया गोष्टी घडल्या त्या सर्व एकजातीयच आहेत, व त्या परदेशांशीं लढाया ह्या होत.

धर, शरण जाण्याशिवाय नेपोलियनास मार्ग राहिला नाहीं· तो इंग्रजांस शरण गेला, व त्यास ठार मारावें, अशी जी कांहींची सूचना होती, ती रद्द करून त्यास सेंट हेलेना बेटामध्यें कैद करून ठेवलें. ह्या तहांत असें ठरविलें कीं, तारीख ९ जून १८१५ रोजीं व्हियना येथें झालेल्या व १८१४ च्या मे महिन्यामध्यें, पारिस येथें झालेल्या तहांतील शर्ती पाळल्या जाव्या. फ्रान्सची मर्यादा १७९० त होती, तितकीच रहावी. लढाईचा बहुतेक खर्च फ्रान्सनें सोसून त्याचा सर्व फड पांच वर्षांत फ्रान्सकडून व्हावी, व तोपर्यंत उत्तरेकडील, त्या देशाचे किल्ले ओलीस ह्मणून इंग्लिश सैन्याच्या ताब्यांत ठेवले जावे. ह्या तहानें जी लढाई संपली तिजमध्यें इंग्लिशांस मेहनत फार पडली होती, ह्मणून त्यांचें युरोपांत वर्चस्व फारच वाढलें, व फ्रान्साचें फारच कमती झालें.

* जाकोबाइट पक्ष ह्मणजे दुसऱ्या जेम्स राजाच्या तर्फेचे लोक. हा राजा १६८८ त राज्यभ्रष्ट झाला; तसें करण्यांत तिसरा वुइल्यम याची मदत घेतलेली होती. दुसऱ्या जेम्साच्या मागें हाच तिसरा वुइल्यम पुढें इंग्लंडचा राजा झाला. ही गोष्ट ज्यांस आवडली नाहीं, व आवडल्यावरसुद्धां, सर्वतोपरी वुइल्यमची सत्ता कबूल करण्याची शपथ ज्यांनीं घेतली नाहीं, ते ह्या वुइल्यमास व तत्पक्षीयांस प्रतिकूल झाले व जेम्सच्या पक्षास जाऊन मिळाले. त्यांचें एक शतकपर्यंत राजपक्षाविरुद्ध सतत उद्योग चालले होते, परंतु ते निष्फळ झाले. फ्रान्सकडून त्यांस ह्या कामांत पुष्कळ वेळां मदत मिळाली. स. १७१५ व १७४५ ह्या वर्षांतील बंडें अशाच प्रयत्नाचे परिणाम होत. पहिलें बंड जेम्स राजाचा मुलगा जेम्स एडवर्ड ह्यानें केलें, त्याला ' ओल्ड प्रिटेंडर ' असें नांव दिलेलें आहे. तें वर्ष दीड वर्ष चाललें. ह्या बंडानें सर्व इंग्लंड देश हालवून सोडला होता. परंतु पुढें जेम्स पळून गेला, व बंडवाल्या लार्डांना शिक्षा झाल्या. दुसरें बंड दुसऱ्या जेम्साचा नातु चार्लस एडवर्ड ह्यानें केलें. ह्याला ' यंग प्रिटेंडर ' अशी संज्ञा आहे. ह्यानेंही दीड वर्ष इंग्लंडास दहशतींत ठेवलें होतें. परंतु शेवटीं त्याची दाणादाण उडून तो पळून गेला.

चवदाव्या आणि पंधराव्या शतकांत शंभर वर्षांचें युद्ध* (हंड्रेड इयर्स वार) झाल्यानंतर इंग्लंडमध्यें ज्या कांहीं लढाया झाल्या त्या सर्वां-

* शंभर वर्षांचें युद्ध (हंड्रेड इयर्स वार).—हें युद्ध इंग्लंडचा राजा तिसरा एड्वर्ड याच्या कारकीर्दींत सुरू झालें. सन १३३७ च्या सुमारास हा एड्वर्ड फ्रान्सच्या गादीवर आपला हक्क सांगूं लागला. तो असाः—फ्रान्सचा राजा तिसरा फिलिप सन १२८५ त वारल्यावर त्याचा मुलगा चवथा फिलिप तेथील गादीवर बसला. त्यानें सन १३१४ पर्यंत राज्य केलें. त्याचे मुलगे तीन, त्यांनीं अनुक्रमानें राज्य केलें. शेवटला मुलगा चवथा चार्लस हा १३२८ त वारला. ह्या तीनही मुलांना पुत्र नव्हता. तेव्हां सालिक नांवाच्या कायद्याप्रमाणें राज्याचा वारस सहावा फिलिप ह्मणजे चवथ्या फिलिपाच्या भावाचा मुलगा होता; सालिक कायद्याप्रमाणें मुलींना राज्य मिळत नसे. तेव्हां तो फिलिप गादीवर बसला. आतां १३२८ त जो चवथा चार्लस वारला त्याची बहीण इसाबेला, इंग्लंडच्या दुसऱ्या एड्वर्ड राजाला दिली होती, तिचा मुलगा तिसरा एड्वर्ड होय. ह्या एड्वर्डानें आपला हक्क दाखिवला तो असाः—बायकांना त्या वारस असल्या तरी राज्यप्राप्ति नव्हतीच; पण अशा बायकांच्या पुत्रांना वारस होतां येत असे, परंतु हे पुत्र आपले आजाच्या वेळीं जन्मलेले असले पाहिजेत, तरच त्यांचा वारसाचा हक्क चाले. तेव्हां एड्वर्डाचा जन्म १३१२ त असल्यामुळें आजा असतांचा होता, तेव्हां त्याचा गादीवर हक्क चालत होता. ह्मणून सहाव्या फिलिपाला गादीवर बसवावें किंवा एड्वर्डाला, किंवा दुसऱ्या कोणाला बसवावें, असा प्रश्न फ्रान्साच्या वड्या लोकांपुढें आला. त्यांनीं योग्य ऊहापोह करून सहाव्या फिलिपाला गादी दिली. तो ठराव एड्वर्डाला कबूल झाला, व त्याची मालकीही त्यानें १३३१ त कबूल केली होती; परंतु कांहीं प्रांतांसंबंधानें मात्र ह्या उभयतांचें भांडण सुरू होतें. तें सुरू असतां फिलिपानें स्काट्लंडाच्या डेविड राजाला कुमक केली व ह्या डेविडचें व इंग्लंडचें वितुष्ट होतें, तेव्हां फ्रान्साशीं हळू हळू युद्ध सुरू झालें. प्रथमतः बारीक सारीक कारणें उपस्थित होऊन पार्लमेन्टाच्या अनुमतानें त्याने फ्रान्साच्या गादीवरचा आपला हक्क प्रसिद्ध करून स. १३३७ त लढाई सुरू केली. ती सन १३३७ पासून तों १३४७ पर्यंत चालली. ह्या अवकाशांत १३४६ त क्रेसीची मोठी लढाई झाली. तींत फ्रेंचांचा पाडाव झाला. पुढें लागलीच नेविलस्क्रासची लढाई झाली. तींतही फ्रेंचांचा पाडाव झाला. पुढें १३४७ सालीं इंग्लिशांनीं क्याले नांवाच्या बंदरास वेढा दिला. बंदराचें संरक्षण तेथील रहिवाशांनीं फार चांगलें केलें. परंतु त्यांच्यानीं फार वेळ टिकाव धरवला नाहीं. शेवटीं तें शहर इंग्लिशांच्या हस्तगत झालें. ह्या वेळीं दोन्ही देशांस थोडी क्षीणता आली ह्मणून दोन्हीं राजांनीं लढाई थोडा वेळ तहकूब केली. पुढें १३५५ त लढाईस पुनः आरंभ झाला.

पेक्षां ह्या अठराव्या शतकांतील लढाया फारच मोठ्या होत्या व ह्या केवळ दर्शनीय व सद्धेतुक असल्यामुळें इतक्या पुरत्या त्या पूर्वींच्या लढायांहून भिन्न होत्या असें ह्मणण्यास हरकत नाहीं. इंग्लंडचें सैन्य आणि आ-

---

ह्या वेळीं फ्रान्साचा राजा जॉन होता. १३५५ पासून १३६० पर्यंत ही लढाई चालू होती. १३५६ मध्यें पायटियर्स येथें निकराची लढाई झाली. तींत इंग्रजांचीच सरशी झाली. १३५५ पासून १३७६ पर्यंत एडूवर्डाचा मुलगा ब्लॉक प्रिन्स ह्यानें इंग्लंडांत आपली तलवार फारच गाजिवली. १३६० पासून इंग्रजांचा पाय साधारण मानानें मागें पडूं लागला, तो पुढें झालाच नाहीं. १३७६ मध्यें राजपुत्र ब्लॉक प्रिन्स वारला, व १३७७ त शुद्द एडूवर्डास देवाज्ञा झाली. मध्यें कांहीं दिवस ह्मणजे १३७७–१४१३ पर्यंत आपसांत तंटे असल्यामुळें हें युद्ध तहकुब होतें. १४१३ त पांचवा हेन्री गादीवर बसला आणि फ्रान्साच्या युद्धास पुन्हां प्रारंभ झाला. फ्रान्साच्या गादीवर १३८० पासून १४२३ पर्यंत सहावा चार्लस हा होता, व १४२३पासून १४६० पर्यंत सातवा चार्लस त्या गादीवर होता. पांचव्या हेन्रीनें असें कांहीं भयंकर मागणें फ्रान्सावर केलें कीं, फ्रान्सास युद्धाशिवाय गत्यंतरच राहिलें नाहीं. त्याप्रमाणें १४१५ त युद्ध सुरू झालें. हेन्रीच्या पहिल्या मोहिमेंत अजिंकोर्टची लढाई १४१५त फारच निकराची झाली. तींत इंग्रजांचा जय झाला, व फ्रेंचांचें अतिशय नुकसान झालें. नंतर फ्रान्सांत आपसांत लढाई सुरू झाली. तेव्हां हेन्री मध्यें पडला व स. १४१७ त त्याची दुसरी मोहीम सुरू झाली; तींतील ठळक गोष्ट ह्मणजे १४१९ तील रोवेन शहराचा पाडाव ही होय. तें शहर मोठ्या संकटानें हेन्रीच्या हातीं आलें. पुढें १४२० त ट्रायिस येथें तह होण्याचा रंग आला. परंतु हेन्री हा फार हटवादी होता ह्मणून तह झाला नाहीं. पुढें हेन्री १४२२ त मेला, व सहावा हेन्री गादीवर आला. १४२२ पासून तों १४३१ पर्यंत इंग्रजांचें डोकें वर होतें. ह्या लढाईंत आर्लीन्सचा वेढा, जोन आफ् आर्क हिनें हिंमतवारीनें केलेलें त्याचें रक्षण, हेन्रीला वेस्ट मिन्स्टरमध्यें झालेला फ्रान्सच्या गादीचा अभिषेक, पुढें जोनचा मृत्यु ह्या ठळक ठळक गोष्टी होत्या. ह्यानंतर इंग्लिशांचा पाय मागें पडत चालला. तो शेवटीं इतका कीं, फ्रान्स देश समूळ त्यांचे हातांतून गेला. सन १४४९ त रोवेन शहरही गेलें, त्यावेळीं सफक नामक सरदाराच्या हातीं इंग्लंडचा कारभार होता. रोवेन शहर गेल्यामुळें सफोकाबद्दल जिकडेतिकडे काहूर उठलें. त्याचा खून झाला. ज्याक् केड याचें बंड सुरू झालें, जिकडे तिकडे अस्वस्थता झाली. सन १४५२ त इंग्लडांतच आपसांत युद्ध सुरू झालें, तें १४८५ त समाप्त झालें. येणेंप्रमाणें फ्रान्सबरोबरील शंभर वर्षांचे युद्धाची समाप्ति झाली. नंतर इंग्लंडचा फ्रान्समध्यें कांहींच प्रदेश उरला नाहीं.

रमार प्रथम स्थाइक झालें तें ह्या वेळींच होय. कामन्वेल्थच्या* वेळीं झालेल्या लढायांच्या योगानें इंग्लंडाच्या मोठ्या आरमारास एक ठाम आकार प्राप्त झाला, आणि तिसऱ्या वुइल्यमच्या कारकीर्दीपासून† लोकांचें सैन्य 'म्युटिनी बिला'अन्वयें‡ स्थापित झालें. सन १६८८ च्या राज्यक्रांतीपासून तों वाटर्लुच्या¶ लढाईपर्यंत एकंदर सुमारें सात मोठमोठीं युद्धें झालीं. त्यांपैकीं

---

* कामन्वेल्थः—इ. स. १६४० त 'लांग पार्लमेंट' नांवाची सभा भरली. पार्लमेंटची व राजाची मारामार तेव्हांपासून सुरू झाली, ती १६४९ पर्यंत चालली. ह्या सालीं चार्लस राजा राज्यभ्रष्ट झाला, व त्याच्या अपराधांची चौकशी करून त्यास १६४९ च्या जानेवारीच्या २९ तारखेस फांशीं दिला. ह्या वेळेपासून तों १६६० ह्या वर्षी दुसऱ्या चार्लस राजाला गादीवर बसवीपर्यंत जें राज्य झालें, तें केवळ प्रजासत्ताक होतें. हाऊस आफ लार्ड्स सभेलासुद्धां फांटा दिलेला होता. राज्य प्रथम जरी प्रजासत्ताक होतें, तरी आलिव्हर क्रामवेल त्याचा सूत्रधार होता. सर्वांला त्याची दहशत फार होती. पुढें त्याची सत्ता इतकी वाढली कीं, १६५३ त त्यानें 'लांग पार्लमेंट' काढून टाकलें. नंतर एक थैलीपत्र प्रसिद्ध करून त्यांत क्रामवेल याला राष्ट्राचा 'रक्षक' नेमला. हा आलिव्हर क्रामवेल १६५८ सालीं वारला. नंतर त्याचा मुलगा रिचर्ड याजकडे रक्षकत्व आलें. परंतु तो नादान असल्यामुळें त्यानें तें काम सोडून दिलें. नंतर १६६० त दुसरा चार्लस याला बोलावणें पाठवून त्यास लोकांनीं गादीवर बसविलें. ह्या मधील प्रजासत्ताक राज्यास, कामन्वेल्थ ह्मणजे सार्वजनिकसत्ता असें नांव आहे, व त्यास 'प्युरिटन कारकीर्द' असेंही ह्मणतात, कारण प्युरिटन धर्मी क्रामवेल हा त्याचा रक्षक होता, व त्यावेळीं त्याचे मंत्री, त्याचे सैन्य, लोक, रीति वगैरे सर्व कांहीं त्या मताचे होते.

† सन १६८८ पासून १७०२ पर्यंत.

‡ म्युटिनि बिलः— राजाजवळ कांहीं सैन्य नेहमीं तयार ठेवलेलें असतें. त्याच्या पगारादाखल दरसाल रक्कम ठरवावी लागते, साल सुरू होतांच सदरील सैन्य वर्षभर राहील, असा एक कायदा पसार होत असतो. तो झाला नाहीं व पगाराची रक्कम काढून ठेवली नाहीं तर तें सैन्य बडतर्फ केल्याप्रमाणें होतें. कारण राजाजवळ त्यांना पगार देण्याला पैसे नसतात. ह्यांत आणखी एक दोन कलमें आहेत.

¶ वाटर्लुची लढाईः— सन १८१५ त झाली. इंग्लिशांनीं फ्रेंचाचा ह्या लढाईंत पराभव केला. हीच नेपोलियन बोनापार्टाबरोबरची शेवटली लढाई होय. हींत इंग्लिशांकडील सरदार ड्यूक ऑफ् वेलिंग्टन हा होता. ह्या लढाईनंतर नेपोलियनची बादशाही समाप्त होऊन त्यास सेंट हेलना ह्मणून आफ्रिकेच्या पूर्वेस एक बेट आहे, तेथें इंग्रजांच्या कैदेंत जाऊन रहावें लागलें.

अतिशय लहान सुमारें सात वर्षेपर्यंत टिकून, अतिशय मोठीं सुमारें बारा वर्षेपर्यंत टिकलीं होतीं. एकंदर १२६ वर्षांपैकीं ६४ वर्षे ह्मणजे सुमारें निमेपेक्षां जास्ती वर्षे ह्याप्रमाणें केवळ लढाईंत गेलीं.

ह्या लढाया पूर्वीच्या लढायांपेक्षां फार मोठ्या होत्या. ह्यास प्रमाण त्यांच्या खर्चाचें ओझें जें देशावर पडलें तें पाहिलें ह्मणजे सहज कळून येतें. अठराव्या शतकाच्यापूर्वी इंग्रज लोकांनीं लढाया केल्या नाहींत, असें नाहीं, तरी अठराव्या शतकापर्यंत इंग्लंडाला फारसें कर्ज नव्हतें. अठराव्या शतकाच्या आरंभीं त्यांचें कर्ज सुमारें दहा लक्षांपेक्षांही कमीच होतें. परंतु अठरावें शतक संपल्यानंतर ह्मणजे इसवी सन १८१७ ह्या वर्षी इंग्लंडचें कर्ज ८४ कोटी इतकें झालें. तरी ह्या कर्जाइतकाच लढाईचा खर्च झाला, असें समजूं नये. कारण स्वतः जवळ असलेलें द्रव्य खर्चून आणखी चौऱ्यांशी कोटी जास्त कर्ज लढाईसाठीं काढावें लागलें. तथापि केवळ ह्या कर्जाचाच आंकडा घेऊन चाललें तरी एकशें वीस वर्षांत ८४ कोटी कर्ज ह्मणजे दर वर्षी ७० लक्ष रुपये सरासरी मानानें लढाईकडे खर्च झाला. असें असून बहुतेक अठराव्या शतकामध्यें प्रतिवर्षी राज्यव्यवस्थेचा खर्च सत्तर लाखांपेक्षां कधींही जास्त झालेला नाहीं.

अशा प्रकारचीं मोठीं युद्धें चालू होतीं, हेंच त्या काळाचें विशिष्ट वर्णन उघड आहे. कारण हें विशिष्ट वर्णन ह्या काळाबरोबरच सुरू होऊन तो संपतांच समाप्तही झालें. कारण सन १८१९ पासून हिंदुस्थानामध्यें आणि इतर वसाहतींत इंग्रजांच्या लढाया थोड थोड्या सुरू होत्या; तरी युरोपांतील मोठमोठया राष्ट्रांशीं पुष्कळ दिवस चालू असलेला वैरभाव जसा अठराव्या शतकामध्यें होता, तसा पुढें फक्त एकदांच आढळून आला व तोही दोनच वर्षे होता.

आतां आपण ह्या युद्धांचें स्वरूप काय होतें, तें पाहूं. पहिलें युद्ध युरोपांतलें. सन १६८८ च्या इंग्लंडांतील राज्यक्रांतीमुळें* इंग्लंडास ह्या

---

* १६८८ तील इंग्लंडमधील राज्यक्रांतिः--इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस ह्यानें आपलें राज्य साधारणपणें जुलमानेंच केलें, असें ह्मटल्यास चालेल. परंतु आपल्या प्रजेशीं तो लबाडीनेंही फार वागला. राजकीयरीत्या फ्रेंचांशीं तो नेहमीं सलुख्यानें वागत असे. फ्रेंचांपासून पैसे घेऊन आपला कार्यभाग करी. पार्लमेंटची सभा वेळचे-वेळेस भरवीत नसे. काथोलिक पंथाची फार कळकळ बाळगी, व त्यांच्याकरितां स्थापित धर्माविरुद्ध वागे. अशा हरतऱ्हेनें त्याचें वर्तन घाणेरडें वाटूं लागलें होतें. ह्याच्या मरणानंतर दुसरा जेम्स हा गादीवर बसला. त्यानें तर जुलुम व अविचार ह्यांचा कळतच उडविला. आपल्या भावाप्रमाणें हाही रोमन कॅथोलिक पंथाभिमानी होता. आज बरींच वर्षे राजाची सत्ता प्रबळ होती. राजा हा ईश्वरी अवतार, तो प्रजेच्या कल्याणार्थ राज्य करतो, तो करील तें प्रमाण, त्यावर प्रजेचा कांहीं अधिकार नाहीं, असें मत चालत आलें होतें. त्याचा ह्यानें कळस केला. कॅथोलिक धर्माचा प्रसिद्धपणें कैवार घेऊन त्यानें पूर्वींचे कांहीं कायदेही मोडले. लबाडी करून पार्लमेंट आपल्या तर्फेचें करण्याचा प्रयत्न केला. फ्रान्सच्या राजाशीं संबंध भावाप्रमाणें ठेविला. कायद्याविरुद्ध सैन्य भरूं लागला व कॅथोलिकांना मोठ्या जागा देऊं लागला; मागें काढून टाकलेलें हाय कमिशन कोर्ट स्थापित केलें. त्या कोर्टानेंही जुलुम केला. कार्पोरेशनचें परवाने हिसकून घेतले. न्यायाधिशांना अन्यायी होऊं दिलें. ह्यानें सर्व धर्मपंथीयांना आपापले धर्म बेलाशक पाळण्याबद्दलचें एक पत्रक देवळांतून वाचण्याचा ठराव काढिला. तो बिशपांनीं नाकबूल केला, व त्याविरुद्ध अर्ज केला. ह्मणून त्यांचेवर खटला केला. अशा तऱ्हेचीं अनन्वित कृत्यें केलीं. तेव्हां लोक कंटाळले, व त्यांनीं हालंडचा वुइल्यम प्रिन्स ऑफ आरेंज ह्यास कळविलें कीं तुह्मी येथें येऊन राज्य घ्यावें, सर्व राज्य तुमच्या बतीचें आहे. त्या खलित्यावर सर्व मोठमोठ्या लोकांच्या सह्या होत्या. वुइल्यम हा दुसरा जेम्स ह्याची बहीण मेरी हिचा मुलगा होता, तसेंच जेम्सच्या पहिल्या बायकोपासून झालेली मुलगी त्याला दिलेली होती. त्याला केलेलें पाचारण त्यानें कबूल केलें. परंतु त्याला येण्याला अडचणी फारच होत्या. कर्मधर्मसंयोगानें त्या सर्वांचें निवारण आपोआप झालें, व तो इंग्लंडांत सैन्य घेऊन आला. जेम्सला प्रथम तो येतो आहे, हें खरेंच वाटेना. पण तो जेव्हां आला, तेव्हां त्यानें ताबडतोब जेवढे जुलुमाचे कायदे केले होते, ते भराभर रद्द केले. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. त्यानें कांहीं तडजोडीची युक्ति केली व तडजोड चालली असतां आपण पळून गेला. वुइल्यमानें जाहीरनामा प्रसिद्ध केला, त्यांत जेम्सची जुलुमी कृत्यें सर्व लिहून आपला येण्याचा उद्देशही दाखल केला. नंतर लार्ड लोकांनीं राज्य-

युद्धांत पडावें लागलें. ह्याची हकिगत मेकाले ह्यांनीं लिहून ठेविली असल्यामुळें लोकांस बरीच माहीत आहे. हें युद्ध १६८९ पासून १६९७ पर्यंत सुरू होतें.* त्यानंतर दुसरें मोठें युद्ध स्पेनच्या गादीला वारस नेम-

---

सूत्र आपले ताब्यांत घेतलें. पुढें राज्याच्या व्यवस्थेसंबंधानें तीन कल्पना निघाल्या. त्यांपैकीं एक सर्वांस पसंत पडून वुइल्यम व त्याची पत्नी मेरी ह्यांस समाईक राज्य दिलें. ह्याचा एक परिणाम असा झाला कीं, राजाचे पुष्कळ हक्क कमी झाले. 'राजा ईश्वरी अवतार' हें तत्व मोडलें गेलें. राजाला अधिकार प्रजेपासून येतो, असें मत स्थापित झालें. ही राज्यक्रांति १६८८ त झाली. या राज्यक्रांतीची एक विलक्षण गोष्ट ही कीं, ती रक्तपाताशिवाय, धामधुमीशिवाय झाली. जसा एखादा राजा मरून त्याच्या वारसाकडे राज्यसूत्र नियमानें जातें, त्याप्रमाणेंच या राज्यक्रांतीच्या वेळीं झालें. राज्यक्रांति व्हावयाची ह्मणजे बहुतकरून अशी कधींही होत नसते.

* १६९०-९७ ची फ्रान्स व इंग्लंड ह्यांच्या दरम्यानची लढाई:— चवदावा लुई ह्याचा उद्योग स्वतःचें राज्य वाढवावयाचा होता व इंग्लंडच्या वुइल्यमाचा उद्देश तो उद्योग तडीस न जाऊं देण्याचा होता. लुईनें प्रथम ऐर्लंडांतील लोकांस वुइल्यमच्या विरुद्ध चिथविण्याचें व जेम्सला मदत देण्याचे प्रयत्न चालविले. ते तडीस गेले असते तर वुइल्यमची इंग्लंडांत स्थिति फार धोक्याची झाली असती. परंतु १६९० सालीं बाईन नदीजवळच्या लढाईंत जेम्सचा पराभव झाला; तसेंच १६९१ सालीं ऑघ्रिम मुक्कामीं ऐरिशांचा व त्यांच्या कुमकेस आलेल्या सेंट रूथ ह्याचा निकराची लढाई होऊन वुइल्यमच्या सैन्यानें मोड केला. त्यामुळें वुइल्यमची बाजू बचली. नंतर आयर्लंडांत वुइल्यम असतांना इंग्लंडाच्या बंदरांत आपलीं आरमारें पाठवून, इंग्लंडांत धामधूम उडविण्याचा लुईनें प्रयत्न केला. परंतु परकी आरमारें स्वारीसाठीं आलीं आहेत असें कळतांच एकंदर देश इतका खवळला कीं, त्या आरमारांस परत जाणें भाग पडलें. वुइल्यमनें युरोपखंडांत बरेच स्नेही मिळविले होते. त्यामुळें फ्रान्सला कोणाची मदत नव्हती. वुइल्यम युरोपांत आपल्या उद्योगांत असतां लुईनें पुन्हां संधि राखून इंग्लंडावर हल्ला करण्याचा व साधेल तर जेम्सला गादीवर बसविण्याचा उद्योग चालविला. हें सन १६९२ सालीं घडलें. इंग्लंडांत शत्रूनीं पुष्कळ फाटाफूट करून ठेविली होती. परंतु ती बाहेर फुटल्यामुळें समयीं उपयोगी पडली नाहीं. लुईनें आपलें ४४ तारवांचें आरमार कप्तान टूर्विल ह्याचे हातासालीं देऊन पाठविलें. परंतु त्याचा असा पराभव झाला कीं, तो सांगणेंही कठीण. ह्या जयानें वुइल्यमचा दुसरा धोका नाहींसा झाला. ह्यानंतर आतां पुढील लढाईचा भाग, सर्व युरोपखंडांत, व त्यांत विशेष नेदरलंडां-

ण्याबद्दलचें (वार आफ् धि स्पॅनिश सक्सेशन) सुरू झालें; हें चालू असतां रणशूर सरदार मार्लबरो यानें जे मोठे जय मिळविले ते सर्वास महशूर आहेत. हें सन १७०२ पासून १७१३ पर्यंत सुमारें अकरा वर्षें चालू होतें. ह्यानंतर दुसरें एक मोठें युद्ध झालें, परंतु ह्याचें आतां कोणास फारसें स्मरण नाहीं; कारण, त्याजमध्यें कोणी मोठा योद्धा प्रसिद्धीस आला नसून त्याचा विशिष्ट परिणामही घडून आलेला दिसला नाहीं, तरी

मध्यें घडला. ह्या नेदर्लंडांतील लढाईच्या दोन मुख्य गोष्टी ह्मणजे स्टीन्कर्कची लढाई व नामुअरच्या किल्ल्याचा हल्ला ह्या होत. लुईनें नामुअरचा किल्ला घेतला व स्टीन्कर्क येथें त्यानें वुइल्यमचा पराभव केला (१६९२). ह्यानें इंग्लंडाचे लोक अगदीं नाखुष झाले. पुढील सालीं जी मोहीम वइल्यमानें केली तींतसुद्धां त्यास सर्वत्र अपयशच आलें. ह्या सालाच्या मुख्य गोष्टी ह्मणजे लांडनची लढाई व स्मर्ना तारवाचा नाश ह्या होत. लांडन मुकामीं फारच भयंकर लढाई झाली. तींत वुइल्यमाचा पुरा पाडाव झाला. स्मर्ना आरमारांत ४०० तारूं होतें. त्यांत एक वर्षाचा पूर्वेच्या व्यापाराचा पुरवठा होता. तें आरमार लंडनहून जिब्राल्टरच्या आखातांतून जावयाचें होतें. ह्या व्यापारी आरमाराबरोबर रक्षणार्थ रूकच्या हाताखालीं एक लहानसेंच आरमार होतें. तें सेंट व्हिन्सेंटच्या पलीकडे जातें न जातें तोंच फ्रेंच आरमारानें त्याजवर छापा घातला आणि सर्व आरमार लुटून फस्त केलें. १६९४ सालीं, इंग्रजांना समुद्रावर व जमीनीवर बरेंच यश मिळालें. १६९५ सालची मोहीम थोडी आवेशाची होती. लढाईचें स्थान फ्लांडर्समध्यें होतें. फ्रेंचाकडे विलेराय, बोफ्लर्स वगैरे सेनापती होते. वुइल्यमचा डोळा नामुअरच्या किल्ल्यावर होता. त्यानें हजार खटपटी करून त्या किल्ल्यावर हल्ला केला. फ्रेंचांकडला सरदार बोफ्लर्स ह्यानें आपलेकडून शर्थ केली. परंतु शेवटीं थकून त्यानें किल्ला स्वाधीन केला. १६९६ सालीं फारशी लढाई झाली नाहीं. फ्रेंचांचा पैशांचा पुरवठा संपला होता, ह्मणून त्यांनीं तहाचें बोलणें लाविलें. इंग्लंडांत पैसा होता, परंतु वुइल्यमाला तो पार्लमेंटाकडून काढतांना पंचाईत फार पडूं लागली. तेव्हां तोही तहाचें बोलणें ऐकण्यास राजी झाला. लुईनें समजुतीचें बोलणें चालविलें. परंतु वुइल्यमचे सहायांना तें मान्य होईना. पुढें होतां होतां, सर्व मुत्सद्दी रिझविक (हालंड) मुक्कामीं येऊन बसले आणि शर्ती ठरवूं लागले. तो तह १६९७ त सप्टेंबरच्या १० तारखेस फ्रान्स, हालंड, स्पेन व इंग्लंड ह्यांचे दरम्यान ठरला. त्यांतील मुख्य शर्ती अशा कीं, लुईनें दक्षिणदेशांतील सर्व किल्ले हालंडच्या स्वाधीन करावे, वुइल्यम इंग्लंडाचा राजा आहे असें कबूल करावें, व जेम्सला मदत देण्याचें बंद करावें. येणेंप्रमाणें ह्या तहानें ही आठ वर्षें चाललेली लढाई बंद झाली.

"जेंकिन्सच्या*कानाची कल्पित गोष्ट" पुष्कळांस माहीत आहे. तसेंच डे-टिंजेन† व फांटेनाय‡ येथील लढायाही पुष्कळांस अवगत आहेत. तथापि

*जेंकिन्सच्या कानाची गोष्ट.—सन १७२१ पासून १७४२ पर्यंत, वाल्पोल हा मुख्य अमात्य होता. ह्याची राज्यरीति शांततेची होती. ह्यास लढाई नको असे. त्याप्रमाणें त्यानें युरोपाशीं इंग्लंडाचा संबंध शांततेचा राखला होता. व्हिएना येथें सन १७३८ मध्यें तह जाहल्यावर वाल्पोल याजवर राजाविरुद्ध पक्ष निकरानें उठला. त्या पक्षाच्या मनांत त्याला अधिकारावरून काढावयाचें होतें. तेव्हां त्याच्यावर तुटून पडण्यास कांहीं तरी त्यांस साधन पाहिजे होतें. तें ह्या जेंकिन्सच्या गोष्टीनें त्यांस मिळालें. व्हियनाच्या तहांत स्पेनच्या संबंधानें कांहीं वादग्रस्त मुद्दे राहिलेले होते. त्यामुळें स्पेनचें इंग्लंडाशीं प्रसंगानुसार वैर किंवा स्नेह असे. इंग्रज व्यापारी मडळ्या तहाविरुद्ध पुष्कळ वागत. आणि स्पेनच्या वसाहतींतील अधिकारी, वसाहतींतील युरोपिअन लोकांना त्रासही फार देत. त्यांच्या जुलुमाच्या पुष्कळ गोष्टी विलायतेंत लोकांच्या कानावर आल्या होत्या. त्यांत फार प्रसिद्ध ह्मणजे ह्या जेंकिन्सची होय. जेंकिन्सनें जाहीर केलें कीं, "स्पेनच्या अधिकाऱ्यांनीं माझा कान कापला व तो आपल्या राजाकडे घेऊन जा असें मला त्यांनीं सांगितलें. नंतर मी ईश्वरावर भार घालून, माझी तरफदारी माझे देशबांधव करतील असा भरंवसा ठेवून, हा कापलेला कान घेऊन येथें आलों आहें." ह्या त्याच्या गोष्टीनें लोकांचा राग अनावर झाला. राजाच्या मनांतही लढाई करावयाचीच होती. त्यामुळें वाल्पोल याला आपल्या इच्छेविरुद्ध १७३९ त लढाई सुरू करावी लागली. ही लढाई १७४८ पर्यंत चालली.

† डेटिंजेनची लढाई ता. २७ जून १७४३ रोजीं झाली. ती इंग्लिश, हानोवेरियन्स, हेसियन्स आणि फ्रेंच यांच्यामध्यें झाली. इंग्लिशांकडे, राजा जार्ज, लार्ड स्टेयर, लार्ड कंबर्लंड, असे सेनापती होते; व फ्रेंचांचा सेनापति डयूक डि नोअलीस व त्याचा पुतण्या डयूक डी ग्रामांट हे होते. स्टेअर हा मूर्ख योद्धा होता. त्यानें इंग्लिशसैन्याचा नाशच करण्याचा वेळ आणला होता. आणि ग्रामांट यानें जर थोडीशी चूक केली नसती आणि त्या चुकीचा फायदा करून घेण्याइतकें कौशल्य जर जार्जमध्यें नसतें, तर इंग्लिशांचें नुकसानच झालें असतें. परंतु शेवटीं नोअलिसचा पराभव झाला. डेटिंजेन हा गांव मेन नदीवर, फ्रांक्फर्टपासून कांहीं अंतरावर, आहे.

‡ फांटेनायची लढाई ता. ११ मे सन १७४५ रोजीं झाली. फांटेनाय हें फ्लांडर्समध्यें आहे. फ्रेंच सेनापति मार्शल साक्स ह्यानें टूर्ने शहराला वेढा घातला होता. तो उठविण्यासाठीं इंग्लिशांकडील डयूक आफ कंबर्लंड व डचांकडील प्रिंस वाल्डेक व आस्ट्रियन सेनापति मार्शल कानिग्सेग झटत होते. तो उठवितांना फांटेनाय येथें

हें युद्ध कोणत्या कारणानें सुरू झालें व त्याचा परिणाम काय झाला, हें फारसें कोणास माहीत नाहीं. हें युद्ध सन १७३९ पासून १७४८ पर्यंत सुरू होतें. त्यानंतरचें दुसरें युद्ध 'सात वर्षांचें युद्ध' (सेव्हन इयर्स वार) ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्यांत फ्रेड्रिक राजानें जे पराक्रम गाजविले, ते सर्वांस माहीत आहेतच. ह्या युद्धाचा इंग्लंडाशीं जितका संबंध आहे, तितक्यापुरत्या मोठ्या लक्षांत ठेवण्याजोग्या गोष्टी ह्मणजे, आब्राहामचे डोंगरांतील लढाई,* सेनापति वुल्फ्* याचा मृत्यु,

---

चकमक उडाली. हींत प्रिंस वाल्डेक स्तंभासारखा बसला होता. त्यानें थोडी मदत केली असती, तर फ्रेंचांचा अगदीं पाडाव झाला असता. टूर्ने शत्रूच्या स्वाधीन झालें.

* वुल्फ हा एक मोठा योद्धा होता. हा १७२६ त जन्मला, व चवदा वर्षांचा असतांना त्यानें सैन्यांत शिपायाची नोकरी पतकरिली. तो पुष्कळ लढायांत हजर होता, परंतु कांहीं वेळपर्यंत प्रसिद्धीस आला नाहीं. १७५७ सालीं जेव्हां सात वर्षांचें युद्ध सुरू झालें, तेव्हां त्याचा उदयकाल आला. ह्या लढाईचें सूत्र मुख्य प्रधान वडील पिट लॉर्ड चाथाम याच्या हातांत होतें. त्याला माणसांची पारख चांगली होती. १७५७ सालचा लढाईचा वृत्तांत अगदीं वाईट होता. फ्रान्सांतील बंदर राश्फर्ट याजवर समुद्रांतून स्वारी करण्यांत आली असून तिचें आधिपत्य अॅडमिरल हॉक व जनरल मॉर्डांट ह्यांजकडेस होतें. मॉर्डांट यानें मोहीमेची नासाडी केली. त्या वेळीं वुल्फ यानें असें सांगितलें कीं, "मजजवळ ५०० लोक द्याल तर मी राश्फर्ट तत्काळ सर करतों." पण त्याचें कोणीं ऐकिलें नाहीं. ह्या व आणखी दुसऱ्या बऱ्याच वेळां पूर्वीं त्यानें आपला धाडसपणा दाखविला होता. १७५७ सालीं जेव्हां जिकडे तिकडे पराभव झाला, तेव्हां १७५८ मध्यें सेनापतींमध्यें फेरफार करण्यांत आला. लॉर्ड लौडन हा १७५७ या वर्षीं अमेरिकेंत लढत होता. त्यास बदलून त्याचे जागीं लार्ड आम्हर्स्ट व वुल्फ ह्यांची योजना झाली. लागलींच त्यास कामगिरीही मिळाली. अमेरिकेंत फ्रेंचांवर तीन बाजूनीं हल्ला करावयाचा होता. पैकीं एका बाजूवर वुल्फ, आम्हर्स्ट व बोस्कावन ह्यांची नेमणूक झाली. तिकडेही फत्ते झाली, व दुसऱ्या दोन्हीं ठिकाणीं तशीच झाली, त्यामुळें कानडा व मिसिसिप्पी ह्यांमधील जमीनीचा फ्रेंचांचा बांध फोडला गेला. पुढें वुल्फ यानें जी लढाई मारली, ती क्वेबेकची होय. ह्यावेळीं सेनापति आम्हर्स्ट होता. परंतु त्याचे हाताखालचे लोक चांगले नव्हते. राश्फर्टच्या हल्ल्याच्या वेळीं व लुइबर्ग घेतांना वुल्फचें शौर्य पिट यानें लक्षांत ठेवलें होतें. तेव्हां त्याचेवर दुसरे लोक असतांही त्यांना डावलून देऊन क्वेबेकच्या हल्ल्यांत त्याचेकडेस अधि-

व तत्परिणामीं कानडादेश हस्तगत* होणें, ह्या होत. इतक्या महत्त्वाच्या गोष्टी घडल्या असतांही, ह्या लढाईच्या संबंधानें अठराव्या शतकाचे इतिहास लोकांस फारसे प्रिय वाटत नाहींत. ह्या वरील लढाईंत असा जबरदस्त जय इंग्लिश राष्ट्राला प्राप्त झाला कीं, त्याची वार्ता तत्कालीन लोकांस निवळ काल्पनिक वाटली. ह्या जयाचे योगानें सर्व इंग्लिश राष्ट्राला माद उत्पन्न होऊन, प्रागप्राप्त अशा वैभवोत्तुंग शिखरस्थानापन्न इंग्लंड देश झाला. परंतु त्या सर्व गोष्टींचें स्मरणही कोणास होत नाहीं. या दोन तीन वर्षांबद्दल सर्व लोकांस अतिशय अभिमान वाटत

पत्य दिलें. वुल्फच्या सामन्याला फार शूर फ्रेंच योद्धा मार्किस डी मांटकाम होता. क्वेबेक सेंट लॉरेन्सच्या उत्तर किनाऱ्याला एका टेंकाडावर आहे. मांटकामचा तळ असा होता कीं, क्वेबेकवर हल्ला अब्राहामच्या टेकडीवर चढूनच केला पाहिजे होता. आणि हें टेंकाड तर चढण्यास फार कठिण होतें. मांटकामला आपला तळ सोडायाला लावून त्याला लढाई करण्यास भाग पाडणें जरूर होतें. परंतु मांटकाम आपला तळ सोडीना. तव्हां वुल्फ यानें अगदीं निराशेचा असा ता० १२ सप्टेंबर १७५९ रोजीं एक खलिता लिहिला. पण त्यानंतर आठच दिवसांत बहादुरानें क्वेबेक सर केलें ! त्याला अब्राहामची टेंकडी चढून जाण्याची युक्ति सुचली. तिजप्रमाणें ता० १३ सप्टेंबर रोजीं सकाळीं त्यानें ती चढण्यास प्रारंभ केला. चढण कठिण होती. कोठें कोठें फक्त एक मनुष्य जाण्यापुरतीच वाट होती; पण असें करून तो चढला, तों उजाडलें. मांटकामला हलणें भाग पडलें. लढाई सुरू झाल्यावर थोडक्याच अवकाशांत वुल्फ जखमी झाला. परंतु मरण्यापूर्वीं जय आपला झाला असें त्यास कळलें. पुढें पांच दिवसांनीं क्वेबेक हातीं आलें. अब्राहामच्या टेंकडीवर खरी लढाई झाली व क्वेबेक हातीं आलें, म्हणून या लढाईत अब्राहामच्या टेंकडीवरची लढाई असें नांव पडलें. ह्याप्रमाणें ह्या शूर पुरुषाचा रणांत अंत झाला. हा साधा व भिडस्त असे. त्याचे स्वरूपावरून त्याच्या गुणांची पारख कधींही होत नसे. त्याचा शरीरबांधा अशक्त होता. त्याचे विचार, अक्कल, हुशारी, शौर्य, धाडस ह्यामुळें त्याची बढती झाली. परंतु त्याचे गुणांची पारख पिट्ट साहेबालाच झाली, व पारख झाल्यावर त्या गुणांचें योग्य चीजही त्यानेंच केलं. ह्याबद्दल पिट्टचीच स्तुति करणें जरूर आहे.

*वुल्फची नोट पहावी.

† वाल्पोल ह्मणून त्या वेळीं इंग्लंडांत मुख्य प्रधान होता. तो जात्या शांतताप्रिय व अनुत्साहिक असून अशा वैभवाची त्यास फारशी किंमत वाटणारी नव्हती.

असे, इतका कीं, जणूंकाय असें वैभव पुनरपि प्राप्त होणेंच अशक्य, असें त्यांस वाटे. आपण कोणती भाषा बोलतों व आपल्या अंतःकरणांत कोणता अभिमान वास करीत आहे, हें कळविण्याचा प्रसंग आला असतां "ज्या भाषेच्या उपयोगानें लॉर्ड चाथाम* ह्यानें ह्या लढाईंत स्वदेशास एवढें मोठें वैभव प्राप्त करून दिलें, तीच इंग्रजी भाषा मी बोलतों, व या लढाईचा मुख्य सेनापति वुल्फ् याच्या उदार अंतःकरणांत जो अभिमान वास करीत होता, तोच माझ्या अंतःकरणांत वास करीत आहे" अशा प्रकारची असदृश गर्वोक्ति प्रत्येक इंग्लिश गृहस्थ आजपर्यंत वापरीत आहे.

हें चवथ्या युद्धाविषयीं झालें. ह्या चवथ्या व पुढील पांचव्या युद्धामध्यें महदंतर आहे. ह्या पांचव्या लढाईचें नांव सुद्धां काढणें कोणास

त्यानें, या दोन तीन वर्षांविषयीं, खालीं लिहिल्याप्रमाणें मजकूर लिहून ठेविला आहेः—"ह्या वेळीं पार्लमेंटांत अगर मंत्रिमंडळांत गुप्त बेत वगैरे कांहीं एक चालू नव्हते. आपल्यास यश मिळालें, ह्याचाच सर्वांस अतोनात हर्ष झाला होता. जे लोक राज्यव्यवस्थेस कधांही नांवें ठेवण्यास चुकणारे नव्हते, त्यांनींसुद्धां त्या वेळच्या राज्यपद्धतीची फार तारीफ केली.कारण त्या वेळीं त्यांच्या अमर्याद इच्छेच्याही बाहेरचें असें यश त्यांस प्राप्त झालें होतें. ह्मणून जे लोक राज्यव्यवस्थेसंबंधानें एकमेकांचीं उणीव काढण्यांत नेहमीं तत्पर असावयाचे, त्यांस तसें करण्याची फारच लाज वाटूं लागली होती. बरोबरीच हीं सर्व अचंबा वाटण्याचीं कृत्यें घडत असतां, त्यांत असा एक प्रकार घडून आला कीं, तो कल्पित कथेंतील नायकाच्या सर्वगुणसंपन्नतेला शोभणारा नव्हता. ह्मणूनच ह्या लढाईच्या हकीगतीच्या काल्पनिक स्वरूपास थोडेंसें भिन्नत्व प्राप्त झालें; व मानवी स्वभावास अननुचित अशा मनोभावांचा या वरील प्रकारांत प्रादुर्भाव झाला, एवढ्याचमुळें, पुढें आलीं देत असलेल्या हकीकतीच्या सत्यतेबद्दल भावी लोकांची खातरी होणारी आहे. नाहीं तर तींत वर्णन केलेलीं अजरामर कृत्यें करणारे प्राणी कल्पित कादंबरींतील पात्रेंच आहेत, असें त्यांस वाटलें असतें."

* वुइल्यम् पिट, अर्ल आफ् चाथाम् (१७०८–१७७८) हा इंग्लंडांत एक प्रसिद्ध मुत्सद्दी होऊन गेला. हा मोठा वक्ता होता. त्याची फार प्रसिद्ध कारकीर्द ह्मणजे सन १७५६ पासून १७६१ पर्यंत होय. ज्या सात वर्षांचे युद्धानें इंग्लंडास मोठें वैभव प्राप्त झालें, तें ह्याच्याच शहाणपणाच्या वक्तृत्वाच्या जोरावर मिळालें होतें. हा कांहीं काळपर्यंत इंग्लंडचा मुख्य प्रधानही होता.

आवडत नाहीं. हीच अमेरिकेंतली लढाई होय. प्रथम भांडणें सुरू झाल्यापासून तों पारीस येथील तहापर्यंत ह्मणजे सुमारें १७७५ पासून १७८३ पर्यंत ८ वर्षेपर्यंत ही चालू होती. या लढाईत अमेरिकेंत तर इंग्रजांची पुरतीच फजिती झाली, परंतु शेवटीं ही लढाई समुद्रावर चालू होऊन मोठ्या निकरानें इतर सर्व राष्ट्रांविरुद्ध इंग्लिशांनीं आपला टिकाव धरिला व रॉडने* यास कांहींसा जय प्राप्त झाल्यामुळें या लढाईचा परिणाम इंग्रजांस अगदींच अनिष्ट झाला नाहीं. सहावें आणि सातवें, हीं युद्धें ह्मणजे फ्रान्स येथें राज्यक्रांति झाल्यावर त्या देशाशीं झालीं. जरी हीं युद्धें एकमेकांपासून जास्त अलिप्त ठेवणें जरूर आहे, तरी यांची

* राडने (लार्ड ब्रिजिस १७१८–१७९२). सन१७५९ त क्वेबकची लढाई होण्यापूर्वीं युरोपांत फ्रेंच बंदरांवर इंग्लिश आरमारांनीं मोर्चे धरून ठेवले होते. त्यांत हावर नामक एका ठिकाणीं राडने हा होता. हावर येथें फ्रेंच तारवें बांधलीं जात होतीं. ह्यानें आपलें तारूं त्या बंदरांत नेऊन सुमारें ५० तास त्या बंदरावर तोफांची सरबत्ती ठेवून फ्रेंच तारवांचें नुकसान केलें. ह्याच युद्धाची समाप्ति होण्यापूर्वीं राडनें ह्यानें अजिंक्य मार्टिनिक बेट, व ग्रेनडा, सेंट ल्यूशिया, व सेंट व्हिंसेंट हे प्रांत सर केले. पुढें अमेरिकन युद्धांतही ह्यानें जय मिळविला. १७८० च्या प्रारंभीं राडने ह्याला एका आरमारानिशीं वेस्ट इंदीज बेटांवर पाठविण्यांत आलें. वाटेवर बरेच दिवस स्पेनकडून जिब्राल्टरला वेढा पडला होता तो उठवून लावण्यास त्यास हुकूम झाला होता. तें करण्यास जातांना, ह्याच्या व स्पानिश आरमाराची गांठ सेंट व्हिंसेंटच्या पलीकडे पडली. थोडी चकमक उडून त्यानें स्पेनचा पाडाव केला. नंतर त्यानें जिब्राल्टरचा वेढा उठविला, व मिनोरका बेट हस्तगत केलें. येणेंप्रमाणें इंग्रज भूमध्य समुद्राचे मालक बनले. पुढें तो वेस्ट इंडिज बेटावर गेला. तेथें त्यानें कांहीं लढाया मारल्या. ह्या वेळेला डच लोक इंग्लंडच्या विरुद्ध झाले होते. त्यांचें फार सधन बेट सेंट युस्टेशिया हें त्यानें १७८१ च्या प्रारंभाला घेतलें. पुढें टोबेगो बेटाचें रक्षण करीत असतां हवेच्या योगानें त्यास कांहीं आजार झाला, तेव्हां त्यास विलायतेस परत यावेंच लागलें. १७८२ मध्यें जमेका बेटाचें त्यानें रक्षण केलें. ह्या लढाईत समुद्रावर लढाई करण्याच्या पूर्वींच्या पद्धतींत त्यानें फेरफार केला. तो असा कीं, शत्रूच्या आरमाराची फळी फोडून जाऊन एका भागाला घेढून प्रथम तेवढ्याचाच पाडाव करावा, नंतर दुसऱ्या भागाचा करावयाचा. ह्याला पुढें लार्ड करण्यांत येऊन २००० पौंड पेन्शन मिळालें.

अगदींच विस्मृति कोणासही होणार नाहीं. पहिलें सन १७९३ पासून सन १८०२ पर्यंत चालू होतें व दुसरें सन १८०३ पासून सन १८१९ पर्यंत चालू होतें.

आतां ह्या सर्व युद्धांमध्यें एकीकरणसंबंध कोणता आहे, व कोणत्या हेतूनें या लढाया करण्यांत आल्या असाव्या, याचा बहुतकरून फारसा कोणीं विचार केलेला दिसत नाहीं; व असा विचार मनांत करूं लागलें असतां कदाचित् आरंभींच आपण घोटाळ्यांत पडण्याचा संभव आहे. स्पेनच्या गादीस कोण वारस व्हावा, या प्रश्नावरून एक लढाई सुरू झाल्याचें दिसतें. दुसरीमध्यें आस्ट्रिया व जर्मनी येथील गाद्यांना कोण वारस व्हावा, हा प्रश्न होता. ह्मणून ह्या दोन लढायांमध्यें साम्य इतकेंच दिसतें कीं, दोहोंतही एकजातीयच प्रश्न आहेत. त्या वेळीं स्पेनचे लोक स्पेनच्या आसपासच्या सर्व समुद्रांत चालत असलेल्या व्यवहारांचा तपास करण्याचा आपणांस हक्क आहे, अशाविषयीं भांडत होते. तर याचा व वरील वारसासंबंधी प्रश्नाचा संबंध काय आहे बरें ? तसेंच आकेडी* येथील सरहद्दीसंबंधींच्या वादाचा, व फ्रान्सांतील राज्यक्रांतिविषयक घडामोडींचा व ह्या वरील प्रश्नांचा अर्थार्थी संबंध काय असावा बरें ? ह्या लढायांचीं कारणें केवळ आकस्मिक दिसत असल्यामुळें त्या लढायांचें खरें स्वरूपसुद्धां आकस्मिक, अनियमित, घोटाळ्याचें, असें लोकांस दिसतें. हालंड, बेलजियम किंवा जर्मनीचे मध्य भागांत तंटे सुरू होतात, आणि त्यासंबंधीं लढाया सुरू होतात. पाहिजे तिकडे, किंवा जिकडे तिकडे,—मद्रासेंत, किंवा सेन्ट लारेन्स† नदीच्या मुखाजवळ, किंवा ओहिओ† नदीच्या कांठावर. फ्रेडरीक यानें जी सायले-

* आकेडी हा अमेरिकेंत एक प्रांत आहे.

† उत्तर अमेरिकेंत आहेत.

शिया प्रांतावर स्वारी केली, तिचें वर्णन करितांना मेकाले साहेबांनीं असें लिहून ठेविलें आहे कीं, " ज्या आपल्या साथीदारास मदत करण्याचें त्यानें (फ्रेड्रिकानें) कबूल केलें होतें, त्याचेच प्रांत हिरावून घेतां यावे ह्मणून, हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर काळे लोक व उत्तर अमेरिकेंत मोठमोठ्या सरोवरांच्या आसपास तांबडे इंडियन लोक निकरानें लढत होते. " अशा प्रकारचें घोटाळ्याचें स्वरूप या लढायांचें प्रथम दर्शनीं दिसून येतें.

परंतु सूक्ष्म दृष्टीनें पाहूं गेलें तर सरशेवटीं या सर्वांमध्यें कांहीं तरी एक साधारण हेतु दृष्टोत्पत्तीस येईल. उदाहरणार्थ, वरील सातही लढायांपैकीं पहिल्या पांच तर अगदीं आरंभापासून फ्रान्सबरोबरच झाल्या आहेत. आणि बाकीच्या दोहोंमध्येंसुद्धां, आरंभीं जरी एकीमध्यें लढाई सुरू करण्याचें श्रेय स्पेनकडे आहे, आणि दुसरीमध्यें तें श्रेय इंग्लंडच्या वसाहतींचें आहे, तरी थोड्याच वेळांत या लढायासुद्धां पर्यवसानीं फ्रान्सबरोबरच जुंपल्या.

या ठिकाणीं आपण जो मुद्दा शोधून काढण्याच्या खटपटींत आहों, त्यासंबंधीं एक गोष्ट दिसून येते, ती अशीः—अठराव्या शतकाच्या बहुतेक मधल्या भागाचें लोकांस विस्मरण झालें असल्यामुळें वरील गोष्टींचें पूर्ण स्वरूप कोणाचे लक्षांत येत नाहीं. अठरावें शतक संपून एकुणविसावें शतक सुरू होतांच फ्रान्सबरोबर दोन मोठ्या लढाया झाल्या. त्या आपण विसरलो नाहीं. तद्वतच सत्रावें शतक संपून अठरावें लागतांना तरसुद्धां दोन मोठ्या लढाया फ्रान्सबरोबर झाल्या, त्याही आमच्या लक्षांत आहेत. परंतु अठराव्या शतकाच्या मध्याचे सुमारास जी मोठी लढाई फ्रान्सबरोबर झाली, तिचा आपणास बराच विसर पडला आहे. ह्याच लढाईचा उपक्रम व उपसंहार ह्या क्रमानें दुसऱ्या आणखी दोन लढाया झाल्या,

एक स्पेनबरोबर व दुसरी अमेरिकेंतील वसाहतींबरोबर. ह्या दोन्ही लढाया शेवटीं फ्रान्सबरोबरच सुरू होऊन त्यांचें पर्यवसान फ्रान्साशींच झालें. वास्तवीक पाहिलें तर ह्या सर्व लढायांची एक व्यवस्थेशीर रांग दिसून येते. तसेंच ह्या लढाया चालू असलेल्या सर्व काळांत इंग्लंड व फ्रान्स यांजमध्यें जबरदस्त हाडवैर होतें असें दिसतें. ह्या सर्व काळास दुसरें 'शंभर वर्षांचें युद्ध' असें ह्मणण्यास हरकत नाहीं. इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यामध्यें पूर्वापार सदोदित भांडणें सुरू असल्यामुळें तीं अगदीं स्वाभाविक वाटत जाऊन त्यांचें लोकांस महत्व वाटत नाहीं. क्रेसी, पायेटीयर्स, अजिकोर येथील लढायांचें स्मरण व हल्लींचे लढायांचें स्मरण झालें ह्मणजे असें मनांत बिंबून जातें कीं, इंग्लंड आणि फ्रान्स यांचे तंटे चिरंतन असून ते नेहमीं तसेच सुरू राहणार. परंतु ही मोठी चुकी होय. सोळाव्या आणि सत्राव्या शतकांमध्यें इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांचें परस्परांशीं फारसें वैमनस्य नव्हतें. पुष्कळ प्रसंगीं स्पेनच्या विरुद्ध इंग्लंड आणि फ्रान्स यांचें सख्य होत असे. सत्राव्या शतकामध्यें त्यांचें बरेंच सख्य होतें. इंग्लंडची राणी एलिझाबेथ व फ्रान्सचा राजा चवथा हेनरी हे स्नेही होते. इंग्लंडचा पहिला चार्लस याची राणी फ्रान्सच्या राजघराण्यांतली होती. इंग्लंडांतील प्रसिद्ध आलिव्हर क्रामवेल हा फ्रेंच मुत्सद्दी माझारीन याच्या संमतीनें वागत असे. इंग्लंडचे राजे—दुसरा चार्लस आणि दुसरा जेम्स यांची प्रसंगोपात्त भिस्त नेहमीं फ्रान्सचा बलाढ्य राजा चौदावा लुई ह्याजवरच असे.

परंतु इंग्लंड आणि फ्रान्स अगदीं एकमेकांच्या लगत असल्यामुळें एकमेकांचे तंटे उपस्थित होण्याचे प्रसंग साहजिक वारंवार येण्याचा संभव असे; ह्मणून ह्या ज्या त्यांच्यांत वारंवार लढाया सुरू होत त्या केवळ आकस्मिक व असद्धेतुक नसतील कशावरून? सूक्ष्मदृष्टीच्या पाहूं

गेलें तर ह्या लढाया केवळ आकास्मिक नसून ज्याप्रमाणें त्या कालानुक्रमास पूर्ण अनुसरून आहेत, त्याचप्रमाणें त्या कार्यकारणभावासही पूर्णपणें अनुसरून आहेत. या लढाया चालू असणें ही गोष्ट आकास्मिक नाहीं; तर उलट त्या लढायांचें वारंवार बंद पडणें हेंच आकास्मिक आहे. कारण या दोन देशांमध्यें सतत लढाई सुरू असणें हें कार्यकारणभावानें अगदीं स्वाभाविक आहे. युट्रेक्ट येथें तह झाल्यानंतर पुष्कळ दिवसपर्यंत ह्मणजे सत्तावीस वर्षें ह्या दोन राष्ट्रांची लढाई तहकूब होती, व ती तहकूब असण्याचें कारण असें आहे कीं, स्पेनच्या वारसासंबंधीं झालेल्या लढाईमुळें, यूरोपांतील सर्व राष्ट्रें अगदीं थकून निर्बळ झालीं होतीं. यूरोपीय राष्ट्रांच्या त्या वेळच्या शक्तीच्या मानानें ही स्पेनच्या वारसासंबंधीं लढाई सामान्य नव्हती, तर पुढें नेपोलियनबरोबर जें मोठें युद्ध झालें, त्याच्याच तोडीची ही लढाई होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हा सत्तावीस वर्षांचा तह संपल्यानंतर पुढें जीं युद्धें झालीं, तीं सर्व एकाच प्रकारचीं होतीं, किंबहुना तीं सर्व मिळून एकच युद्ध होतें, असें ह्मणणें चुकीचें होणार नाहीं. कधींकधीं थोडावेळपर्यंत हीं तहकूब असत खरीं; तथापि कसेंही असलें तरी इसवी सन १७४० व सन १७८३ यांचे दरम्यान झालेलीं जीं तीन युद्धें* ह्मणजे "आस्ट्रियाच्या गादीच्या वारसाबद्दल झालेलें युद्ध", "सात वर्षांचें युद्ध", आणि "अमेरिकेंतील युद्ध", हीं फ्रान्स आणि इंग्लंड ह्यांच्या संबंधानें तरी तिन्ही मिळून एकच युद्ध, असें मानणें रास्त होईल. हीं तीन युद्धें एकाच वैरभावाचे तीन पृथक् भाग, वस्तुतः सर्व मिळून एकाच वस्तुस्थितीचीं अंगें होत. हीच गोष्ट सर्वांनीं ध्यानांत ठेवण्याजोगी आहे; कारण ह्या तीनही युद्धांचे हेतु व परिणाम एकच दिसत असल्यामुळें, त्यावेळीं जें एकीकरण दृष्टीस

* हीं तीनही युद्धें पुढें क्रमाक्रमानें देण्यांत आलीं आहेत.

पडत नव्हतें, तें आतां पुढें स्पष्ट दिसूं लागतें. आपलें लक्ष क्षुल्लक घरगुती गोष्टींकडे, पार्लमेंटांतील वादविवादांकडे, निरनिराळ्या पक्षांच्या भांडणाकडे व राजकीय गप्पांकडे अगदीं गढून गेल्यामुळें त्याचवेळीं दुसरीकडे घडत असलेल्या विषयांकडे दुर्लक्ष होऊन, त्यांच्यासंबंधानें आमचे विचार अगदीं विपरीत होतात; व त्यांचें इतिहासांत खरें महत्व किती आहे, याचें कोणास भान राहत नाहीं. ह्या काळाच्या मध्यंतरींच तिसरा जार्ज गादीवर आला आणि ऐतिहासिक गोष्टींची जुळणी करण्याची आमची पद्धत अगदीं कोती असल्यामुळें ह्याच ठिकाणीं आम्ही ऐतिहासिक विषयांचा भाग पाडतों. वास्तविक पाहिलें असतां, तिसरा जार्ज गादीवर येण्यापूर्वीच्या व नंतरच्या गोष्टी मुळींच तुटलेल्या नसून उलट एकमेकींशीं अगदीं उघडपणें संयुक्त आहेत. तिसरा जार्ज गादीवर आल्यानें पार्लमेंट व इतर घरगुती राजकीय विषय ह्यांच्यामध्यें पुष्कळ फेर पडला खरा; परंतु इतिहासकारांस एका देशाचा व राष्ट्राचा इतिहास न लिहितां केवळ पार्लमेंटाचाच इतिहास लिहून समाधान वाटत असल्यामुळें वाचकांच्या शोधक बुद्धीची दिशा अगदीं चुकत जाऊन, त्यावेळची अतिशय महत्वाची गोष्ट काय आहे, ती त्यांस बिलकुल समजून येत नाहीं. आमचें असें म्हणणें आहे कीं, ह्या ज्या वर लढाया सांगितल्या त्यांच्या योगानें इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांजमध्यें एक अतीशय विलक्षण कलह चालत आल्याचें दिसून येत आहे; व ह्या कलहाचा परिणामही बिलकुल संशयात्मक नाहीं. ह्याच्या प्रत्यंतराकरितां त्यावेळीं ज्या गोष्टी घडून आल्या त्या आपण पाहूं. बाह्यतः ह्या तीन युद्धांपैकीं पहिलीचा शेवट एलाशापेल*

*१७३९-४८पर्यंतचें युद्धः—हें युद्ध स्पेनबरोबर झालें. तें असें.—दुसरा जार्ज इंग्लंडचे गादीवर आल्यापासून शांतताच होती. स्पानिश लोकांच्या दक्षिण अमेरिकेंत मोठया वसाहती होत्या, आणि ते इंग्लिश लोकांचा व्यापार करण्याला फारच अडचणी आणूं लागले. ब्रिटिश लोकांनीं एक हरकत घेतली ती अशी कीं, ते स्पानि-

येथील सन १७४८ च्या तहानें झाला. ह्या तहानंतर इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांच्यामध्यें आठ वर्षेपर्यंत बाह्यतः विरोध नव्हता; परंतु खरोखरी स्थिति अशी नव्हती. एलाशापेलच्या तहानें त्या लढाईत असलेल्या इतर यूरोपीय राष्ट्रांचीं भांडणें कितीही मिटलीं असलीं, तरी फ्रान्स आणि इंग्लंड

शांच्या वसाहतींजवळ सांपडलेल्या इंग्लिश तारवांची तपासणी करूं देइनात. स्पानिश लोक तर तपासणी करण्याचा हट्ट घेऊन बसले. वाल्पोल ह्यानें कांहीं तडजोडीची खटपट केली, पण युद्धास लोक अगदीं तयार झाले होते; राजाही तयार होता, प्रधानमंडळास मात्र तें नाकबूल होतें. ह्यांत प्रधानाची चुक होती. इंग्लंडाला आपलें वर्चस्व कायम राखावयाचें तर लढाई केलीच पाहिजे अशी युरोपांत स्थिति होती. आणि मुख्य प्रधान वाल्पोल हा देशाचें नुकसान करूनही शांतता राखण्यास तयार होता. ह्याचें एक कारण असें कीं, तो आपल्या देशापेक्षां स्वपक्षाचें हित नेहमीं जास्त पहात असे. ह्याला अनुसरूनच त्यानें स्पेन देशाशीं तडजोडीचें बोलणें लाविलें व इंग्लंडाची नापत करण्यासारख्या कांहीं शर्ती त्यानें कबल करून घेतल्या. ह्याचा लोकांना फार राग आला व ते अगदीं ऐकेनात, तेव्हां त्याला आपले इच्छेविरुद्ध लढाई करणें भागच पडलें. परंतु वाल्पोला यानें भविष्य केलें कीं, ह्या लढाईंत इंग्लंडचें नुकसान होईल. त्याप्रमाणें तर प्रथम झालेंच. जकोबाईट लोकांची त्या लढाइबरोबरच देशांत चळवळ सुरू झाली, व स्पेनवरील स्वारींतही इंग्रजांचा मोड झाला. पुढें आस्ट्रियाचा बादशाहा साहावा चार्लस हा १७४० त मरण पावला आणि स्पेनशीं चालू असलेली लढाई बंद होण्यापूर्वीं आस्ट्रियाच्या गादीच्या भांडणास सुरवात झाली. तें युद्ध १७४१–८ चाललें. चार्लसानें आपल्या मृत्युपत्रांत आपल्या बादशाही राज्याला आपली मुलगी मराया टेरेसा हिला वारसदार करून ठेवलें. इलेक्टर आफ् बव्हेरिया ह्याला हंगेरीचें राज्य तिच्या जवळून घ्यावयाचें होतें, तेव्हां तें मृत्युपत्र तो कबूल करीना. प्रशियाचा राजा फ्रेडारिक धि ग्रेट ह्यानें सायलीशियावर आधींच झडप घालून तो प्रांत गट्ट केला होता. आणि फ्रान्साचा राजा तर टेरैसाला गादीला कांहींच हक्क नाहीं असें ह्मणूं लागला. इंग्लंडनें आस्ट्रियाचा ह्मणजे मरायाचा पक्ष धरिला होता. इंग्लंडाची स्पेनशीं लढाई सुरूच होती. ती पुढ ह्यासंबंधानें आणखी चालू झाली. सन १७४३ त व १७४५ त डेटिंजन व फांटेनाय अशा अनुक्रमें दोन लढाया झाल्या, त्यांचें वर्णन मागें दिलेंच आहे. डेटिंजनच्या लढाईंत इंग्लिशांचा जय झाला, व फ्रेंचांना बव्हेरियामधून हाकलून लावलें. पुढें तहाचें बोलणें सुरू झालें. प्रशियाचा हेतु साधला होता. फ्रेंचांची मध्यस्थी निरुपयोगी झाली होती, व आस्ट्रियन गादीचा निकाल झाला होता; तेव्हां जार्ज व कार्टरेट ह्यांनीं एक उत्तम तहनामा करून

ह्यांचा कलह एक क्षणभरही थांबला नाहीं. इतकेंच नाहीं, तर तो थांबला असें लोकांस दिसलेंही नाहीं. कारण अमेरिकेंत ॲकेडी, क्यानडा वगैरे ठिकाणीं ज्या इंग्रजांच्या आणि फ्रेंचांच्या वसाहती होत्या त्यांच्या सरहद्दीच्या संबंधाचा प्रश्न फार दिवस घोटाळत होता, व त्याजविषयींचे

टाकण्याचा घाट घातला. हा तह झाला असता तर जार्जाचें वर्चस्व फार वाढलें असतें, पण इंग्लडाला फ्रेंचांशीं लढाई पाहिजे होती. जर्मन राजांना पैसे द्यावयाचे त्यांना नको होतें. आणि आस्ट्रियाशीं सख्य कायम ठेवावें, असा त्यांचा इरादा होता. तेव्हां इंग्लंडानें १७४३ मध्यें वर्मूस्चा तह नामक निराळाच तह आधीं करून घेतला. त्याप्रमाणें इंग्लंड, हालंड, आस्ट्रिया, साक्सनी व सार्डीनिया हे एकत्र झाले. लागलीच फ्रान्स व प्रशिया हे एकत्र होऊन त्यांनीं आपसांत फ्रांकफर्ट येथें १७४४ त आपलें सख्य ठरविलें. तेव्हांपासून युरोपीयन युद्धाला योग्य स्वरूप आलें; इंग्लंड व फ्रान्स पूर्वीं स्नेही होते, ते आतां एकमेकाविरुद्ध झाले, व इंग्लंडनें एका जूटीचें प्रमुखत्व व फ्रान्सानें दुसऱ्या जुटीचें प्रमुखत्व ग्रहण केलें. ह्याच संधीला प्रिटेंडरला इंग्लंडवर स्वारी करण्याची मदत फ्रान्सानें केली, व इंग्लंडावर स्वारीही करण्यांत आली, परंतु नेहेमींप्रमाणें वादळानें फ्रान्साच्या तारवांची दाणादाण उडून इंग्लंडचा बचाव झाला. इकडे युरोपांत लढाई चाललीच होती. पुढें १७४५ त 'फयुइस्सनचा तह' झाला. त्यांत मराया टेरेसाचा नवरा पहिला फ्रान्सिस ह्याचा आस्ट्रियाच्या गादीचा हक्क कबूल करण्यांत आला. पुढें लढाई चालली असतांना मुख्य लढाई फ्लांडर्समध्यें फांटेनाय येथें झाली, तींत इंग्रजांचा मोड झाला, इतक्यांत चार्लस प्रिटेंडर ह्यानें इंग्लंडावर स्वारी करण्याची सुरवात केली. त्या स्वारीनें इंग्लंडांत पुष्कळ चळवळ उडवून दिली. त्या त्याच्या स्वारीचा युरोपीय युद्धावर पुष्कळ परिणाम घडला. पुढें होतां होतां लढाई संपली. पेल्हाम त्या वेळचा अमात्य आतां स्वस्थता करूं लागला होता. तेव्हां १७४८ मार्च तारीख ३० ला एलाशापेल येथें इंग्लंड, हालंड व फ्रान्स ह्यांच्या दरम्यान तह झाला. त्यांतील मुख्य शर्त अशी होती कीं, लढाईपूर्वीं सर्वांची जी सरहद्द होती तीच कायम राहावी. थोडासा कांहीं फरक झाला तो असाः—पार्मा प्रांत डान कॉर्लास ह्याला द्यावा, आस्ट्रियानें जे कांहीं प्रांत प्रशिया व सार्डिनिया यांना दिले होते ते कायम करावे, स्पेननें असिंटोची देणगी इंग्लंडला पुन्हा द्यावी, डंकर्कचा किल्ला मोडून टाकावा. आस्ट्रियाचें जें नुकसान झालें त्याबद्दल मराया टेरेसाचा त्या गादीवर वारसा सर्वांनीं कबूल केला. व तिच्या नवऱ्याचा बादशाहीचा हक्क सर्वांनीं कबूल केला. हे प्रांत परत देणें हिंदुस्थानांतसुद्धां घडून आलें. एकंदरीनें लढाईची गोळाबेरीज अशी झाली. हालंड हें पूर्वीं फार मोठें राष्ट्र होतें, परंतु

वादविवाद जितक्या जोरानें वरील तहाच्या पूर्वी चालू होते तितक्या जोरानें त्या तहानंतरही चालू राहिले; आणि हे कलह फक्त शाब्दिक नसून निवळ शस्त्रापर्यंत येऊन पोंचले होते; जणुंकाय त्या दोन राष्ट्रांतील लढाई कधींही बंद झाली नव्हती. आणखी अमेरिकेच्या सरहद्दीबद्दलच्या तंट्याविषयीं जें आम्हीं इतका वेळ सांगितलें, तीच स्थिति दुसऱ्या एका सरहद्दीचीही याच वेळीं होती. म्हणजे हिंदुस्थानामध्यें इंग्रज आणि फ्रेंच यांचीं भांडणें चालू होतीं. ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष्य कसें झालें असेल तें असो; परंतु ती इतकी महत्वाची आहे कीं, इंग्रज आणि फ्रेंच यांच्यामध्यें पुष्कळ वर्षेंपर्यंत हें वैमनस्य चालू असतां, त्यांच्यांत विशेष ध्यानांत ठेवण्याजोग्या ज्या कांहीं झटापटी झाल्या त्या ह्याच आठ वर्षांत म्हणजे बाह्यतः इंग्लंड आणि फ्रान्स यांचा तह चालू असतां घडून आल्या आहेत. ह्या झटापटी लहानसाहान नाहींत; केवळ पुराणांतरीं वर्णन करण्यासच त्या योग्य आहेत. फ्रेंच लोकांनीं ओहिओ नदीवर डयूकीन नांवाचा किल्ला* बांधिला. त्यावेळीं व्हर्जिनिया येथून इंग्रज लोकांकडून

आतां त्याचें महत्व अगदीं नाहींसें झालें. तें राष्ट्र इतकें दुर्बल झालें कीं, फ्रान्सापासून आपलें रक्षण करण्याची त्याची शक्ति नाहींशी झाली; आस्ट्रियाच्या हातांतून सायलीशिया प्रांत गेला खरा, परंतु त्या देशाच्या पूर्वेकडील प्रांतांतून त्यास चांगली बळकटी येणार होती, हें त्यास कळलें. प्रशियाचें बल वाढलें व तें युरोपांत एक बलाढ्य राज्य झालें. इंग्लंडचें समुद्रावरील वर्चस्व पूर्णपणें ठरून गेलें. फ्रान्साची दुर्बलता वाढत गेली ती सहज दृष्टीस येऊं लागली.

ह्या नऊ वर्षांतील इंग्लंडचे प्रधानः–१७४२ पर्यंत वाल्पोल. अर्ल् आफ् वुइल्मिग्टन १७४३ पर्यंत. सर हेन्री पेल्हाम व डयूक आफ न्यूकासल १७४३–५४ पर्यंत. १७५४ त पेल्हाम मेल्यावर डयूक आफ् न्यूकासल १७५४ पासून १७६० पर्यंत, परंतु पिट, अर्ल आफ चाथम, हाच ह्या सर्वांत वास्तविक काम पहात होता.

* डयूकीन किल्लाः—अमेरिकेंत फ्रेंचांचा मुख्य हेतु असा होता कीं, मिसिसिप्पी नदीच्या खिंडींतील प्रदेश घ्यावा, व कानडांतील वसाहती व मेक्सिकोच्या आखातावरील वसाहती ह्यांच्याशीं तो प्रदेश जोडून एक सबंध पट्टी आपलेकडे ठेवावी.

जार्ज वाशिंग्टन (हा त्यावेळीं अगदीं लहान असून इंग्लंडचे पक्षाचा होता.) याच्या हाताखालीं ४०० लोक लढाईस येऊन त्यांणीं त्या किल्यावर हल्ला केला; तथापि वाशिंग्टनचा त्यामध्यें पराभव होऊन त्याला फ्रेंचांस शरण जावें लागलें. ही हकीकत सर्वत्रांच्या कानावरून गेलेली आहे. ह्याच प्रदेशांत जनरल ब्राडाक ह्याचा पराभव होऊन तो मरण पावला; हेंही सर्वांस माहीत आहे. डुप्ली आणि क्लाइव्ह यांच्यामध्यें हिंदुस्थानांत लढाई चालू होती. क्लाइव्ह यानें अर्काटचें संरक्षण करून जे आणखी कित्येक पराक्रम गाजविले व हिंदुस्थानच्या राज्याचा पाया घातला, तें सर्वांस महशूर आहेच. ह्या सर्व गोष्टी इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यामध्यें वसाहतींच्या स्वामित्वाबद्दल जीं मोठीं निकराचीं भांडणें चालू होतीं त्यांपैकींच होत व त्या बहुतेक गोष्टी सन १७४८ या वर्षी, एलाशापेलचा तह झाल्यानंतर व सन १७५६ त दुसरी लढाई सुरू होण्याच्यापूर्वी घडून आल्या आहेत.*

ह्मणजे इंग्लिशांना अलीघानी पर्वत व समुद्र ह्यांच्या दरम्यानच्या जमिनीच्या पलीकडे जातां येऊं नये. हा हेतु साधण्यासाठीं ओहिओ नदीवर किल्ले बांधण्याची सुरवात फ्रेंचांनीं केली. ड्यूकीन हा किल्ला तेव्हांच ह्मणजे सुमारें १७५४ त बांधला गेला. तेव्हां अमेरिकेंत फ्रेंच व अमेरिकन इंग्रज ह्यांची लढाई सुरू झाली. तींत इंग्रज सरकारास मध्यें पडावें लागलें. त्यांनीं ब्राडाक ह्मणून एक सेनापति ड्यूकीन किल्ला घेण्यास पाठविला. परंतु त्यानें मूर्खपणानें वागून आपला व आपल्या सैन्याचा नाश करून घेतला. ह्या प्रांतिक लढाईंत फ्रेंचांची सरशी पुष्कळ झाली.

* १७४८ मधील एलाशपलचा तह होण्यापूर्वीं डुप्ली व लाबरदोनीस ह्या फ्रेंच गव्हर्नरांनीं हिंदुस्थानांत इंग्रजांना फार जेरीस आणलें होतें. परंतु लढाई संपली. फ्रान्स व इंग्लंड ह्यांचा तह झाला. तरी हिंदुस्थानांत इंग्लिश व फ्रेंच ह्यांचें भांडण चालूच होतें. त्याचीं दोन कारणें, एक दोन्हीं राज्यें हिंदुस्थानांत हिंदुराजांना निरनिराळ्या तऱ्हेनें व प्रसंगानें मदत करीत, त्यामुळें त्या दोघांमध्यें भांडणाचा व वैमनस्याचा प्रसंग येई. दुसरें, फ्रेंचांना आपले प्रांत हिंदुस्थानांत वाढवावयाचे होते; व इंग्रजांना स्वतःचें रक्षण करणें असून प्रदेश वाढविण्याचीही त्यांची इच्छा असे.

ह्यावरून असें दिसून येईल कीं, सन १७४४ किंवा त्यापूर्वी थोड्या वेळापासून तों सन १७६३ च्या प्यारीस* येथील तहापर्यंत म्हणजे सुमारें २० वर्षें एक मोठें युद्ध चाललेलें होतें. ह्या युद्धाचा परिणाम फ्रान्स देशाला फार अनर्थकारक आला; सन १८७० सालचा प्रसंग खेरीज करून अर्वाचीन काळीं फ्रान्स देशाला इतका नुकसानीचा दुसरा प्रसंग

---

* सात वर्षांचें युद्धः–इ० सन १७५७ पासून १७६३ पर्यंत चाललें. जर्मनी व इंग्लंड एक बाजूस व फ्रान्स दुसरे बाजूस, अशी ही लढाई होती. प्रथमतः ही लढाई इंग्लंडबरोबर सुरू होती, व समुद्रावर कांहीं वेळपर्यंत चालली. यावेळपर्यंत समुद्रावर फ्रेंचांचा वचक लोकांस वाटत असे, व त्याजबद्दल इंग्लंडासही फार भीति होती. फ्रान्सावर यावेळीं पधरावा लुई राजा राज्य करीत होता. तो आपल्या मुत्सद्यांच्या केवळ मुठींत असे; परंतु मुत्सद्दी शहाणपणानें वागले नाहींत. लढाइचे आरंभीं फ्रेंचांस पुष्कळ जय मिळाला. जिब्राल्टरप्रमाणेंच मिनोर्का बेट हें भूमध्य समुद्रांत दुसरें नाकें होतें, तें घेण्याचा इंग्रजांचा इरादा होता. इंग्रजांचे आरमाराचा मुख्य सरदार बिंग ह्मणून होता. त्याचा त्या ठिकाणीं पराभव झाला. यामुळें इंग्लंडांतील लोकांस इतका त्वेष आला कीं, त्यांनीं त्यास माघारें बोलावून गोळी घालून ठार मारिलें, व प्रसिद्ध पिट्ट साहेब इंग्लंडांत मुख्य प्रधान झाला, व सर्व राज्यकारभारावर तो नजर ठेवूं लागला. परंतु या संधीचा फ्रेंच लोकांनीं उपयोग केला नाहीं. त्यांनीं आपलें लक्ष समुद्र, वसाहती व व्यापार इकडून काढून यूरोपीय तंट्याकडे लाविलें, हेंच त्यांच्या नाशाचें कारण असें जे, प्रस्तुत ग्रंथकार पुढें ह्मणतात, त्याचा हा दाखला येथें आहे. यावेळीं समुद्रावरील लढाई फ्रेंचांनीं बंद ठेविली व इकडे विनाकारण कुरापत काढून जर्मनीवर हल्ला केला. जर्मनीमध्यें प्रसिद्ध फ्रेडरिक धि ग्रेट राजा राज्य करीत होता. त्यास इंग्रज लोक मिळाले. तरी या ठिकाणींही प्रथमतः फ्रेंचांस यश आलें. बरें जय मिळाल्यावर पुढील उद्योगास लागण्याचें सोडून ते स्वस्थ बसून चैन करूं लागले. तेव्हां मात्र त्यांचें दुर्दैव पक्कें ओढवलें, असें ह्मणावें लागतें. या युद्धांत आस्ट्रिया, साक्सनी वगैरे पुष्कळ राष्ट्रांचें अंग होतें. हें युद्ध सतत इ. स. १७६३ पर्यंत चाललें. व अखेरीस फ्रान्सचे फारच पराजय होत गेले. हें युद्ध यूरोप, अमेरिका व हिंदुस्थान ह्या तीन ठिकाणीं चालू होते. १७५७ सालची प्रसिद्ध प्लासीची लढाई ह्यांतच गणली जाते. अमेरिकेंतील १७५९ सालची प्रसिद्ध क्वेबेकची लढाई (टीप मागें देण्यांत आली आहे.) तींत जनरल वुल्फ हा मेला. युरोपांत मिंडन येथें लढाई होऊन फ्रेंचांचाच पराभव झाला. ह्या युद्धाचें सर्व श्रेय लार्ड चाथाम यांस आहे. (टीप पान ७५ पहा.)

कधीं प्राप्त झाला नव्हता. याजमुळें बुर्बों* राजघराण्याची कंबर पुरी खचली. परंतु पुढें पंधरा वर्षांनीं म्हणजे ज्या मुत्सद्याच्या शहाणपणानें इंग्रजांस वरील जय प्राप्त झाले, तो मुत्सद्दी† जिवंत असतांनाच इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांचें पुनः युद्ध झालें. इंग्रज लोकांच्या विरुद्ध ज्या वसाहती उठत, त्यांचा पक्ष घेऊन फ्रेंच लोकांनीं इंग्लंडबरोबर भांडण्यास आरंभ केला; ह्या वसाहती स्वतंत्र‡ राष्ट्र आहे, हें कबूल करून त्यांच्या मदतीस त्यांनीं आपलें सैन्यही पाठविलें. पुनः इंग्लंड आणि फ्रान्स यांजमध्यें सुमारें ९ वर्षांनंतर जमीन आणि समुद्र, या दोहोंकडे लढाई चालू झाली.‡

ह्या युद्धानें फ्रेंचांची फारच हानि झाली, व शेवटीं शत्रू सांगतील तसा तह कबूल करणं भाग पडलें. तो तह "पारिसचा तह," या नांवानें प्रसिद्ध आहे. तो. असाः—

पारीस येथील तह—(इ. स. १७६३) ह्या तहानें अमेरिकेंतील पुष्कळ प्रांत इंग्रजांचे ताब्यांत आले. तसेच व्यापार करण्याचे हक्कही फ्रेंचांचे नाहींसे झाले. फक्त हिंदुस्थानांत पाँडिचेरी मात्र फ्रेंचांस मिळालें. मिनोर्का बेटही त्यांजकडून गेलें "राजकुळ सख्य" ह्मणून जें पुढें सांगितलें आहे, तें किती निरर्थक होतें, हें या तहावरून चांगलें व्यक्त होतें.

* बुर्बों:—हें एका अति प्रसिद्ध युरोपांतील राजघराण्याचें नांव आहे. ह्या घराण्याचा मूळ पुरुष ह्यू कॅपेट होता. ह्यानें ९८७ त तिसऱ्या फ्रेंच राजघराण्याची स्थापना केली. बुर्बों घराण्याचे आज आपणांस पांच भाग करितां येतील. १ वडील घराणें.– ह्या घराण्यांतील आठ पुरुषांनीं फ्रान्सवर राज्य केलें. २ आर्लीन्स घराणें.– ह्याचा मूळ पुरुष १६ व्या लुईचा भाऊ होय. ३ स्पेनचे बुर्बों राजे.– ह्यांचा मूळ पुरुष फ्रान्सचा राजा १४ वा लुई होय. ४ इटलीचे बुर्बों राजे.– ह्यांचा मूळ पुरुष स्पेनचा राजा पांचवा फिलिप होय. ह्याच फिलिपाचे वंशज पार्माचे (इटली) बुर्बों राजे होत.

† पृष्ट ४३ टीप पहा.

‡ अमेरिकन युद्धः—(१७७५–१७८३) सात वर्षांचे युद्धानंतर जो तह झाला त्याअन्वयें उत्तर अमेरिकेचा बराच भाग इंग्लंडचे ताब्यांत आला. हे प्रांत इंग्लंडचे ताब्यांत आल्यावर त्यांचें इंग्लंडशींच भांडण सुरू झालें, व त्याचा सरते शेवटीं निकाल असा झाला कीं, हे प्रांत इंग्लंडच्या ताब्यांतून जाऊन स्वतंत्र झाले. 'सात वर्षांचें युद्ध' अमेरिकेच्या संबंधानें चाललें असून त्याचे योगानें इंग्लंड देशावरचा कर्जाचा बोजा फार वाढला. त्यावेळीं तिसरा जार्ज राजा इंग्लंडचे गादीवर होता व

परंतु ही लढाई नवीनच सुरू झाली, किंवा नुकतीच जी बंद पडली होती तिचाच हा उत्तर भाग होता, हें पाहिलें पाहिजे. ह्या वेळीं इंग्रज लोकांची बाजू पडती असल्यामुळें पूर्वी आपल्यास झालेल्या नुकसानीबद्दल फ्रेंच लोकांनीं त्यांचा सूड घेण्याची ही चांगली संधि साधली, हें सर्वांस कबूल आहे. कानडा देश आपल्या ताब्यांतून गेला, त्याचेऐवजीं त्यांनीं युनायटेड स्टेट्सचें राज्य स्थापन करून, फ्रेंचांनीं इंग्लंडचा

ग्रेनव्हिल् मुख्य प्रधान होता. तेव्हां वसाहतींवर कर वगैरे बसवून कर्ज भरून काढावें असें राजास वाटलें; व तदनुसार त्यांनीं ' स्टांप आक्ट ' ह्मणून एक कायदा इ. स. १७६६ या वर्षी पसार केला. ह्या कायद्यानें असें ठरलें होतें कीं, वसाहतींत सर्व खतें, पावत्या, व इतर सर्व कायदेशीर ठराव भारी किंमतीच्या सरकारी स्टांप कागदावर लिहिले जावे. ह्याजवर अमेरिकेंतील लोकांनीं असें उत्तर दिलें कीं, आह्मी कर देण्यास तयार आहों; परंतु तो आह्मी आपले खुषीनें देऊं; व जोंपर्यंत अमेरिकेचे तर्फे इंग्लंडांतील पार्लमेंटांत सभासद घेतले जात नाहींत तोंपर्यंत ब्रिटीश सरकारास अमेरिकेवर कर बसविण्याचा अधिकार नाहीं. लार्ड चाथाम यानें पार्लमेंटांत एक मोठें भाषण केलें. त्यानें ह्या ह्मणण्यास रुकार दिला. कर बसविणें व पार्लमेंटांत लोकांच्या वतीनें सभासद न घेणें ह्या दोन गोष्टी फार विरुद्ध आहेत, असें त्यानें साफ सांगितलें. पुढें ग्रेनव्हिल याचें भाषण होऊन, नंतर स्टांप आक्ट मोडण्याविषयीं सूचना आली व ती पास झाली. यणेंप्रमाणें वसाहतींचें भांडण कांहीं वेळ तहकूब झालें.

परंतु इंग्लिश अधिकाऱ्यांनीं आपलें ह्मणणें सोडिलें नव्हतें. बरेच दिवस त्यांची कुरकुर सुरू होती. आणि त्यांनीं वसाहतींवर आपला कर बसविण्याचा हक्क स्थापित करण्याकरितां इतर पुष्कळ कर कमी केले. परंतु चहा, सिसें, कांच वगैरे अमेरिकेंत जाणाऱ्या पदार्थांवर त्यांनीं थोडा कर बसविला. सदर मालानें भरलेलीं गलबतें बोस्टन बंदरांत येतांच कित्येक लोकांनीं दांडगाई करून वरील कांहीं माल समुद्रांत लोटून दिला. ह्यावेळीं लार्ड नार्थ ह्मणून इंग्लंडांत मुख्य प्रधान होता. तो राजाचे ह्मणण्यास पाहिजे तसा रुकार देई. वरील गोष्टीचा राजास फार राग आला, ह्मणून त्यानें असा ठराव केला कीं, बोस्टन बंदरचा सर्व व्यापार बंद रहावा. ह्या कायद्यास ' बोस्टन पोर्ट बिल ' असें नांव आहे. हा सन १७७४ या वर्षी बाहेर पडला. तसेंच दुसरा एक ठराव अमलांत येऊन त्याचे योगानें मासाचूसेट्स् नामक वसाहतीच्या कारभाराची सनद मोडण्यांत आली. ह्या दोन गोष्टींनीं सर्व वसाह-

सूड उगविला. " जुन्या महाद्वीपांत जे प्रांत फ्रान्सच्या ताब्यांतून गेले, ते भरून काढण्याकरितां अमेरिकेंत फ्रेंचांनीं नवीन राज्य-स्थापना केली, " हें ह्मणणें पुढें सर्वतोमुखीं झालें. तेंच ह्याही गोष्टीस लागू पडण्यासारखें आहे.

ह्यावरून ह्या वरील तीन लढायांचा संबंध एकमेकींशीं लोक समजतात, त्यापेक्षां जास्त निकट आहे, हें वाचकांचे ध्यानीं येईल. परंतु ह्या लढाया होण्याचें कारण काय ? व सर्वांमध्यें एकच कारण दृष्टोत्प-

---

तांत माठा अनर्थ गुदरला. सर्व वसाहतींनीं आपल्या तर्फे मुखत्यार नेमून एक सभा भरविली. तींत वसाहतींचे खरे हक्क ठरविण्यांत आले. किल्ले वगैरे दुरुस्त करून लष्करची तयारी चालली. तंटा मिटविण्याचे प्रयत्न व्यर्थ गेले. लार्ड नार्थ यानेंही इतर कर कमी करविण्याविषयीं सूचना केल्या; परंतु त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. इंग्लंडचेंही सैन्य तयार झालें. चाथाम शिवाय करून वसाहतींबद्दल कोणासही कळवळा नव्हता; त्यानें मात्र वरील सर्व कर एकदम बंद करण्याविषयीं जबर प्रयत्न केले परंतु सफल झाले नाहींत. पुढें उभयतांची लढाई जुंपली (१७७५). इंग्लिशांचे सेनापति जनरल गेज व हो होते. तसेंच जार्ज वाशिंग्टन हा प्रसिद्ध योद्धा वसाहतींकडे होता. हा फार जबरदस्त मनुष्य असून पूर्वीच्या लढाईंत ह्यानें इंग्लिशांकरितां चांगले पराक्रम गाजविले होते. सन १७७५ व १७७६ या वर्षीं इंग्लिशांचा पराभव झाला. तेव्हां १७७६ या वर्षाच्या जुलई महिन्यांत वसाहतींच्या मुखत्यारांची सभा भरली, व त्यांनीं "स्वातंत्र्याचा प्रसिद्ध जाहिरनामा" पसार केला. त्यांत असें जाहीर केलें होतें कीं, वसाहती ह्या एक स्वतंत्र राष्ट्र आहेत; इंग्लंडचे राजाचा त्यांजवर कांहीं एक हक्क नाहीं. त्यानंतर लवकरच लढाई झाली, तींत इंग्लिशांस जय मिळाला. सन १७७७ यावर्षी फ्रेंचांकडून वसाहतींस मदत आली. पुढें साराटोगा येथें जनरल बरगायन याचा वसाहतींचें सैन्यानें पूर्णपणें पराभव केला. १७७८ यावर्षीही इंग्लिशांस जय आला नाहीं. लार्ड चाथाम वसाहतींस स्वतंत्रता देण्याविषयीं भाषण करीत असतां बेशुद्ध होऊन पडला तो पुनरपि उठला नाहीं. पुढें उभय राष्ट्रांची गोडी करण्याकरितां लार्ड नार्थ यानें तडजोडीचें बिल ह्मणून एक तयार केलें. त्यांत स्वतंत्रतेशिवाय इतर सर्व गोष्टी वसाहतींस देण्याची कबुली प्रदर्शित करण्यांत आली होती. परंतु ह्याचाही फारसा उपयोग झाला नाहीं. सन १७८०-८१ या वर्षींही इंग्लिशांस जय आले नाहींत. १७८१ त लार्ड कार्नवालिस ह्यास तर ७००० लोकांसह शत्रूंच्या स्वाधीन व्हावें लागलें. तेव्हां इंग्लंडची सर्व निराशा झाली.

त्तीस येतें कीं काय ? हें समजल्याशिवाय वरील संबंध किती निकट आहे, हें समजावयाचें नाहीं. प्रथम दर्शनीं सर्वांचें कारण एक नव्हतें असें वाटेल. कारण इंग्लंड आणि फ्रान्स यांची लढाई पृथक्पणें अशी कधींही दृष्टोत्पत्तीस आलेली नाहीं. तर इतर राष्ट्रांच्या ज्या लढाया चालत असत, त्यांतच ती गुंतून गेलेली दिसे. अठराव्या शतकाचें विशेष स्वरूप ह्मणजे अशा लढाया एकमेकींशीं गुंतून जाऊन घोंटाळ्याच्या दिसणें हेंच होय. उदाहरणार्थ, सायलेशिया प्रांताकरितां मराया टेरेसा*

इ० स० १७८३ यावर्षी राजा पार्लमेटांत गेला, व 'व्हर्सेल्सचा तह' या नांवाचा कागद त्यानें सभेंत वाचिला. त्यांत असें होतें कीं, अमेरिकेंतील तेरा संस्थानें 'युनायटेड स्टेट्स्' ह्या नांवानें आतां स्वतंत्र राष्ट्र समजलीं जातील. जार्ज वाशिंग्टन ह्या नवीन राष्ट्राचा पाहिला प्रेसिडेंट झाला. हें काम ह्यानें १७९७ पर्यंत केलें. ह्याचा कारभार रयतेस अत्यंत सुखावह झाला. ह्याचा जन्म १७३२ व मृत्यु १७७९ त.

* मराया टेरेसाः—जर्मनीचा बादशहा सहावा चार्लस ह्याची ही मुलगी होती. ही हंगेरी, बोहेमिया प्रांतांची राणी व जर्मनीची बादशाहीण होती. हिला भाऊ नसल्यामुळें हिच्या बापानें हिलाच आपल्या राज्याची वारस करून ठेविली होती. परंतु हिला शत्रू पुष्कळ होते. हिचा बाप १७४० त वारल्यावर आस्ट्रिया व जर्मनी येथील गादीसंबंधानें सर्व युरोपांत युद्ध माजलें. इतक्यांत प्रशियाचा राजा फ्रेडरिक याणें मराया हिच्या ताब्यांतल्या सायलीशिया प्रांतावर स्वारी करून तो हस्तगत केला. फ्रेडरिकानें अशी अट घातली कीं, जर सायलिशिया मजकडे ठेवला तर मी मरायाला तिच्या इतर हक्कदारांविरुद्ध मदत करीन. प्रथम ती कबुल होईना. पण मागून झाली. तिला इंग्लंडाचें साह्य होतें. तिचा नवरा फ्रांन्सिस स्टीफन आफ लोरेन ह्यास १७४५ त बादशहाची गादी मिळाली. १७४८ च्या एलाशापेलच्या तहाप्रमाणें मरायाचे हक्क सर्वांनीं कबूल केले. स्वस्थतेच्या दिवसांत तिनें आपली देशस्थिति सुधारण्याची फार खटपट केली. १७५६ मध्यें फ्रेडरिकानें बिनाकारण आस्ट्रियाच्या कांहीं प्रांतांवर स्वारी केली. ह्मणून त्यावर्षींचे युद्ध सुरू झालें. १७६५ त तिचा नवरा मरण पावला. १७७२ त पोलंडाचे तुकडे करण्याच्या दुष्कृत्यांत प्रशियाचा राजा फ्रेडरिक याला तिनें मदत करून आपले नांवाला काळिमा आणला. ती आपले प्रजेचा फार ममतेनें सांभाळ करी. ह्मणून आपल्या देशाची आई ही संज्ञा तिला मिळाली. तिचा जन्म व्हिएना येथें इ. स. १७१७ त होऊन मृत्यु तेथेंच १७८० त झाला.

आणि फ्रेडरिक* यांची जी लढाई चालू होती, तिचा आणि केबेक काबीज करण्याचा काय संबंध असेल बरें ? असा घोंटाळा झाला असतां इतिहास लिहिण्यांत चुका होणें, किंवा पूर्ण विचार न करितां सर्व सामान्य नियम बांधले जाणें, हें साहजीक आहे. खरोखर तंटा काय आहे, तो सहजीं लक्षांतून चुकून जातो. उदाहरणार्थ " सात वर्षांचें युद्ध " चालू असतां प्रातेस्तंत धर्माचीं सर्व राष्ट्रें, एका पक्षाचीं होतीं, अशा ह्मणण्याचा अर्थ, जर क्यानडामध्यें किंवा हिंदुस्थानामध्यें क्याथोलिक धर्मावर प्रातेस्तंत धर्माचा पगडा बसत चालला होता, असा कोणीं केला तर केवढी चूक होईल बरें ?

आह्मीं मागें सांगितलेंच आहे कीं, अमेरिका आणि आशिया खंडांमध्यें इंग्लंडचा विस्तार होणें, हेंच अठराव्या शतकांतील इंग्लंडच्या

* दुसरा फ्रेडरिक हा पहिला विलियम फ्रेडरिक याचा मुलगा होता. ह्याला 'ग्रेट ' (मोठा) ही संज्ञा होती. ह्याला लहानपणीं बापानें दुर्वर्तनासाठीं कैदेंत ठेविलें होतें. १७३३ त ह्याचें लग्न झालें. १७४० त हा प्रशियाच्या गादीवर बसला. सायालिशिया हा ह्यावेळीं मरायाच्या ताब्यांतला प्रांत होता. परंतु ह्या प्रांतावर प्रशियाचा कांहीं पूर्वींचा हक्क होता. त्यावरून मराया थोडी एकटी असतां फ्रेडरिकानें एकदम त्यावर हल्ला केला. आणि तो हस्तगत केला. त्यानें मग अशी अट केली कीं, हा प्रांत आपले जवळ राहूं द्यावा आणि मग आपण मरायाचे हक्कासाठीं भांडण्याचें पतकरूं. त्याप्रमाणें ठरलें. १७४४ त त्यानें पुन्हा मरायाशीं भांडण सुरू केलें. १७४५ त ड्रेस्डेन शहरावर जबर छापा घातला. तेव्हां तह झाला. सायालिशिया त्याजकडे ठेवण्याचे ठरलें. आणि दुसरी सायालिशियन लढाई संपली. १७५६-७ मध्यें फ्रेडरिकानें सात वर्षांचें युद्ध केलें. त्यांत त्याचें फार नुकसान झालें. पण त्यानें फार निकराच्या लढाया मारल्या. पुढें त्यास अनुकूल असा तह झाला. १७७२ त्यानें पोलंडची वांटणी केली. १७८६ त त्यानें अमेरिकेशीं स्नेह केला. फ्रेडरिक विद्वान होता. त्यानें पुष्कळ पुस्तकें लिहिलीं. त्यानें कायदे केले. त्याला आपली भाषा आवडत नसे. फ्रेंच ह्मणून जितकें तितकें याला प्रिय होतें. तो चाणाक्ष मुत्सद्दी होता. तो पहिल्या प्रतीचा योद्धा व सेनापति होता. तो अतिशय महत्वाकांक्षी होता. त्याला संतति नव्हती. त्याचा जन्म १७१२ त होऊन त्याचें मरण १७८६ त झालें.

इतिहासाचें, थोडक्यांत स्वरूप होय. आतां असें सांगावयाचें आहे कीं, वर सांगितलेली जी तीन प्रकारची लढाई अठराव्या शतकाच्या मध्यभागीं झाली, ती केवळ इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांच्यामध्यें अमेरिका खंडाच्या मालकीविषयीं झाली. अशा दृष्टीनें हा प्रकार लोकांसमोर न आल्यामुळें, तो कोणाच्या लक्षांत नाहीं. तरी सर्व अठराव्या शतकभर इंग्लंड आणि फ्रान्स, ह्यांच्यामध्यें हें जें दुसरें शंभर वर्षांचें युद्ध चालू होतें, त्याचा हेतु ह्या दोन राष्ट्रांनीं नवीन मुलूख काबीज करणें इतकाच होता, व त्या शतकाच्या मध्यभागीं ही जी तीन हप्त्यांची लढाई झाली तिच्या योगानें अमेरिकेविषयीं ह्या उभय राष्ट्रांच्या तंट्याचा शेवटचा निकाल झाला.

अमेरिकेंतील मुलुख आपल्या ताब्यांत इंग्रजांनीं घेतला तो केवळ त्यांजला रिकामा किंवा ओसाड सांपडला, ह्मणून नव्हे; अगर तेथें वसाहत करणाऱ्या लोकांस यूरोपांतून तिकडे नेण्याकरितां इतर राष्ट्रांपेक्षां त्यांच्याजवळ गलबतें पुष्कळ होतीं, ह्मणून नव्हे; तसेंच दुसऱ्या एका राष्ट्राच्या ताब्यांत तो प्रदेश होता, त्याजकडून तो इंग्रजांनीं जिंकून घेतला, असेंही नव्हे. तर तेथें जाऊन वसाहत करण्याच्या संबंधानें इंग्रजांस जबरदस्त प्रतिस्पर्धी होते; ह्या प्रतिस्पर्ध्यांनीं प्रथमारंभीं तेथें त्यांच्यापेक्षां जास्त सत्ता स्थापन केली होती. हे प्रतिस्पर्धी ह्मटले ह्मणजे फ्रेंच लोक होत.

उत्तर अमेरिकेविषयीं विशेष गोष्ट अशी आहे कीं, पहिला जेम्स राजा जेव्हां व्हर्जिनिया आणि न्यु इंग्लंड यांजमध्यें वसाहती करण्याच्या संबंधानें सनदा वगैरे देऊं लागला, त्याच वेळीं फ्रेंच लोकसुद्धां अगदीं उत्तरेकडे कानडा, व अकेडी येथें वसाहती स्थापन करीत होते. तसेंच पेन्सिल्व्हानिया येथें वसाहत करण्याविषयीं वुइल्यम पेन यानें दुसऱ्या

चार्लस राजापासून सनद मिळविली. त्याच सुमारास लासेल नांवाच्या फ्रेंच गृहस्थानें आपल्या तीव्र शोधक शक्तीनें उत्तर अमेरिकेंतील मोठ्या सरोवरांतून मिसिसिप्पी नदीच्या उगमापर्यंत सर्व प्रदेशाचा शोध लाविला, आणि होड्यांतून मेक्सिकोच्या आखातापर्यंत त्या नदींतूनच तो येऊन पोंचला. यामुळें ज्या मोठ्या प्रांताचा शोध लागला, त्याला लुसियाना, हें नांव देऊन तेथें फ्रेंचांनीं वसाहत केली. ह्याप्रमाणें इसवी सन १६८८ तील राज्यक्रांतीमुळें जें दुसरें शंभर वर्षांचें युद्ध, इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांच्यामध्यें चालू झालें ह्मणून सांगितलें आहे, तें सुरू होण्याच्या सुमारास उत्तर अमेरिकेमध्यें ह्या दोन राष्ट्रांचा बराच संबंध होता. उत्तरेकडून दक्षिणेकडे पूर्व किनाऱ्याच्या बाजूनें इंग्लंडच्या भरभराटीस आलेल्या अशा पुष्कळ वसाहती होत्या, व फ्रान्सच्या ताब्यांत सेंट लारेन्स आणि मिसिसिप्पी ह्या दोन मोठ्या नद्या होत्या. राज्यक्रांतीच्या वेळेस आणि त्यानंतर कांहीं काळपर्यंत वसाहती करणाऱ्या ह्या दोन राष्ट्रांची जी स्थिति होती, तिजवरून जर कोणी एखादा मुत्सद्दी, पुढील भाकीत करूं लागला असता तर, ह्या दोन नद्या फ्रान्सच्या ताब्यांत असल्यामुळें त्यास असें खचित वाटून आलें असतें कीं, कांहीं काळानें सर्व उत्तर अमेरिका, इंग्लिशांकडून फ्रेंचांच्याच ताब्यांत जाईल.

दुसरी एक महत्वाची गोष्ट सांगावयाची आहे, ती ही कीं, ह्याच वेळेच्या सुमारास इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांचें पाऊल अमेरिकेंतच पुढें पडत होतें असें नाहीं, तर एशियामध्यें देखील ते एका पाठीमागून एक अशा वसाहती स्थापन करीत चालले होते. थोड्याशा इंग्लिश व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थान देश काबीज करावा, ही गोष्ट इतकी विचित्र आहे कीं, अशी गोष्ट दुसरीकडे कोठें आढळून येणें नाहीं. परंतु हिंदुस्थान जिंकणें शक्य

आहे, ही कल्पना मूळ इंग्रजांनींच काढिली अथवा त्या कल्पनेप्रमाणें तो जिंकण्याचे कामास इंग्रजांचीच हिंमत प्रथमतः पुढें झळकली, असा कोणाचा समज असेल, तर तो फार चुकीचा आहे. खरोखर विचारपूर्वकच हिंदुस्थान देश जिंकण्याची कल्पना जर कोणीं काढिली असेल तर ती फ्रेंचांनींच होय. हिंदुस्थान देश जिंकणें शक्य आहे, असें प्रथम फ्रेंचांना वाटलें; तें कसें तडीस जाईल याजबद्दल विचारही प्रथम फ्रेंचांनींच केला; त्या विचाराप्रमाणें उद्योग करण्यासही प्रथमतः फ्रेंच लोकांनींच सुरुवात केली, व कांहीं वेळ त्यांच्या उद्योगास यशही आलें. उत्तर अमेरिकेपेक्षां हिंदुस्थानांत ते नवीन मुलूख जिंकण्याच्या कामामध्यें इंग्रजांपेक्षां बरेच पुढें सरसावले होते. हिंदुस्थानामध्यें प्रथमारंभीं फ्रेंच लोकांचें प्राबल्य आपल्यापेक्षां जास्त आहे, असें मानूनच इंग्रज लोक चालले होते. आणि फ्रेंचांशीं त्यांच्या लढाया झाल्या त्या केवळ निराशा होऊन स्वसंरक्षण करण्या पुरत्याच झाल्या. हिंदुस्थान देश इंग्रजांनीं कसा जिंकला, ह्याजबद्दल नीट विचार केला असतां, आम्हांस असें वाटतें कीं, मुलूख जिंकण्याच्या इच्छेनें अथवा व्यापारवृद्धि करण्याचे इच्छेनें ते तो देश जिंकण्यास प्रवृत्त झाले नाहींत. तर अवल पासून अखेरपावेतों म्हणजे लार्ड क्लाइव्ह प्रथम खटपट करण्यास लागल्यापासून तों लार्ड वेल्स्ली, लार्ड मिन्टो आणि लार्ड हेस्टिंग्स् ह्या पुरुषांनीं ह्या सर्व मोठ्या महाद्वीपावर इंग्रजांची सत्ता स्थापन केली, तोंपर्यंत त्यांचे सर्व प्रयत्न फ्रेंचांशीं त्यांच्या वैरभावाचेच परिणाम होते. हिंदुस्थानांतल्या एखाद्या राजाकडून जेव्हां कांहीं चळवळ सुरू होई, तेव्हां असें दिसून येई कीं, त्या राजाबरोबर फ्रेंचांचे गुप्त बेत चालत असून त्यास पैशाची मदतही फ्रेंचांकडूनच मिळे. तसेंच त्याच्या वर्तनांतलें औत्सुक्य सुद्धां फ्रेंचांनींच प्रेरलेलें आहे असें दिसे. डुप्ली आणि लाबरदोनीस ह्यांच्या वेळेपासून इंग्रजांचा असा समज

झाला होता कीं फ्रेंच लोक आपल्यास हिंदुस्थानांतून हांकून देणार आहेत. हा त्यांचा समज सर्व हिंदुस्थान देश त्यांच्या ताब्यांत पूर्णपणें येईपर्यंत त्यांच्या मनांतून कधींही गेला नाहीं.

तेव्हां आतां इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांजमध्यें हें दुसरें १०० वर्षांचें युद्ध कोणत्या कारणानें चालू होतें हें वरील हकीकतीवरून व्यक्त होईल. ह्या लढाईचें कारण म्हटलें म्हणजे एशिया आणि अमेरिका ह्या दोन्ही खंडांमध्यें फारच अमोल्य जिंदगीबद्दल फ्रान्सबरोबर इंग्लंडची सतत प्रतिस्पर्धा चालू होती हें होय. हें खरोखरी मूळचें कारण आहे; परंतु हें खरोखरचें मूळ कारण, प्रत्यक्ष त्या उभय राष्ट्रांसही त्यावेळीं माहीत नव्हतें. मग इतर लोकांना माहीत नसेल ह्यांत नवल नाहीं. कारण, पूर्वीप्रमाणें ह्यावेळींही हीं दोन राष्ट्रें अगदीं एकमेकांस लागून असल्यामुळें त्यांजमध्यें वेळोवेळीं लहानसहान तंटे उत्पन्न होणें हें अगदीं साहजिक असें वाटे, व असे तंटे दोघांमध्यें लढाई उत्पन्न करण्यास असमर्थ नसतात. तथापि, अठराव्या शतकाच्या मध्यभागीं जीं तीन मोठीं युद्धें झाल्याचें वर सांगितलें, त्यांजमध्येंमात्र नवीन मुलूख जिंकण्यासंबंधाचें खरें कारण, अगदीं व्यक्त दिसत होतें. अठराव्या शतकाच्या आरंभीं तिसरा वुईल्यम आणि अॅन ह्यांच्या कारकीर्दींत ज्या लढाया झाल्या त्यांमध्यें वरील कारणाप्रमाणेंच इतर कित्येक कारणेंही चांगलीं व्यक्त होत होतीं. कारण, नवीन वसाहतीसंबंधीचे तंटे त्यावेळीं इतके परिपक्व झाले नव्हते. तसेंच अठराव्या शतकाच्या अंतीं ह्मणजे फ्रान्सांतील मोठ्या राज्यक्रांतीमुळें ज्या लढाया झाल्या, त्यांजमध्यें देशवृद्धीचें कारण पुन्हा मागें पडलेलें दिसे; कारण, त्यावेळीं हिंदुस्थान आणि अमेरिका या दोहोंमध्येंही फ्रेंचांचें प्राबल्य अगदीं नाहींसारखें झालें होतें; व तें पुन्हा परत मिळविण्याचे प्रयत्न करण्याचें सामर्थ्यही त्यांना फारसें राहिलें नव्हतें. परंतु सन १७४० पासून सन

१७८३ पर्यंत जीं तीन मोठीं युद्धें इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांच्यामध्यें झालीं, तीं तर केवळ नवीन मुलूख काबीज करण्याकरितांच झालीं. पहिल्या लढाईचा परिणाम फारसा व्यक्त झाला नाहीं, कारण तींत दोघांची सारखीच सरशी झाली. दुसऱ्या लढाईमध्यें फ्रेंचांचा फार अनर्थकारक पराभव झाला. आणि तिसरीमध्यें त्यांनीं आपल्यावरील पराभवाबद्दल इंग्रजांचा चांगला सूड उगविला. इंग्लिश राष्ट्रविस्ताराच्या इतिहासामध्यें ह्या लढाईचें फार महत्व आहे; कारण, सर्व इंग्लिश राष्ट्रानें पुढारीपणा घेतला अशी हीच पहिली लढाई होय. पूर्वीं असें होत असे कीं, इंग्लंड आणि फ्रान्स हे देश लढूं लागले ह्मणजे त्यांच्यामागून त्यांच्या वसाहतींहि कलह करूं लागत; तरी प्रत्यक्ष पुढारीपणा वसाहती आपण होऊन असा कधीं घेत नसत, तो त्यांनीं ह्या युद्धांत प्रथमतः घेतला. अठराव्या शतकांत घडून आलेल्या मुख्य मुख्य गोष्टींच्या यादींत ही वरील गोष्ट अगदीं ठळक अक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखी आहे. ह्या प्रसंगींच्या मोठमोठ्या ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी दुसऱ्या जार्जाच्या कारकीर्दीच्या अखेरीच्या वेळीं घडून आलेल्या आहेत.

परंतु पूर्वीं चौदाव्या लुईबरोबर इंग्रजांच्या ज्या लढाया चालू होत्या त्यांजमध्यें आणि पुढें फ्रेंच राज्यक्रांतीनंतर ज्या लढाया झाल्या त्यांजमध्यें भांडणाचें खरोखर कारण ह्मटलें ह्मणजे अमेरिकेंत वसाहत करणें, हें होतें, असेंच विचाराअंतीं दिसून येईल. ज्याप्रमाणें धर्मसंबंधीं भांडणें सतराव्या शतकामध्यें मागें मागें पडत चाललीं होतीं, त्याप्रमाणें वसाहती करण्यासंबंधाचीं भांडणें त्याच शतकामध्यें जास्त महत्वाचीं होत चाललीं होतीं. ह्मणूनच स्पेनबरोबर क्रामवेल ह्यानें जें युद्ध केलें तें स्पेन देश क्याथोलिक धर्माचा होता ह्मणून केलें, किंवा स्पॅनिश लोक अमेरिकेंत बहुतेक [illegible]ून बसले होते, ह्मणून केलें, ह्याचा निर्णय करणें कठिण

आहे. ख्रिस्ती धर्मामध्यें क्याथोलिक आणि प्राटेस्टंट असे दोन पंथ असत व ह्याच दोन पंथांमध्यें नेहमीं तंटे चालू होते.

ह्याच वेळेस इंग्लंड आणि हालंड ह्या दोन देशांमध्यें एक मोठें युद्ध चाललें होतें. हे दोनही देश प्राटेस्टंट पंथाचे होते, ह्मणून ही लढाई धर्मसंबंधाची असती तर त्यांचा ऐक्यभाव झाला असता, व तो झाला नाहीं ह्मणून युद्धाचें कारण दुसरेंच असलें पाहिजे. नवीन मुलूख काबीज करण्याच्या कामामध्यें हीं दोन्ही राष्ट्रें एकमेकांची फार स्पर्धा करीत होतीं; ह्मणूनच ह्या युद्धाचा प्रसंग प्राप्त झाला. वसाहत करण्याच्या कामीं फ्रेंच लोक पुढें येण्याचें कारण इसवी सन १६८३ ह्या वर्षी लुसियाना प्रांत शोधून काढून तो त्यांनीं वसविला, हें होय. ही वसाहत झाल्यानंतर सहा वर्षांच्या आंतच इंग्लंड व फ्रान्स यांजमध्यें आह्मी ह्मणतों तें दुसरें शंभर वर्षांचें युद्ध सुरू झालें.

ह्या एकंदर युद्धांतलें पहिलें युद्ध दोन भिन्न राष्ट्रांच्या वसाहतींमधील आपसांतलें युद्ध ह्या नात्यानें उत्तर अमेरिकेच्या इतिहासांत जरी महत्वाचें आहे, तरी त्यांच्यांत हा वसाहतीचा प्रश्न फारसा पुढें आलेला दिसत नाहीं. तो दुसऱ्या युद्धांत विशेष पुढें आला. ह्याला "स्पेनच्या वारसासंबंधाचें युद्ध*" असें नांव आहे. ह्या नांवावरून लढाईच्या

* स्पेनच्या गादीच्या वारसासंबंधाचें युद्धः—इ. स. १६९७ त रिझ्विकचा तह झाला. आणि मुत्सद्यांचें लक्ष लागलेंच स्पेनच्या गादीकडे लागलें. ह्या वेळीं दुसरा चार्लस राजा स्पेनच्या गादीवर होता, व तो अगदीं मरणास टेंकला होता. तो मेल्यावर त्याच्या गादीबद्दल भांडणें होणार होतीं. त्या गादीला वारस तीन होते. त्यांत फ्रान्साचा राजा चवदावा लुई ह्याचा मुलगा डाफीन हा एक, जर्मनीचा बादशहा लिओपोल्ड ह्याच्या पहिल्या बायकोच्या संबंधाचा नातु, प्रिन्स आफ बव्हेरिया, हा दुसरा, व लिओपोल्डच्या दुसऱ्या बायकोचा दुसरा मुलगा आर्च ड्यूक चार्लस हा तिसरा, असे तीन वारसदार होते. जे मुत्सद्दी ह्या खटाटोपींत पडले त्यांत अग्रणी इंग्लंडचा राजा तिसरा वुइल्यम होता. त्यांचा मूळ कटाक्ष फ्रान्सावर होता. फ्रान्सा-

खऱ्या कारणासंबंधीं आपण आपला समज चुकीचा होऊं देतां नये. पुष्कळांनीं या युद्धाबद्दल असें लिहून ठेविलें आहे कीं, हें चालू असतां इंग्रजांनीं पैशाचा व जिवाचा निष्ठुरपणानें दुर्व्यय केला; ह्याचा सर्व दोष त्यांच्या माथीं आहे; जरूर नसतां ते स्पेन देशाच्या अंतर्व्यवहारांत पडले; तसेंच फ्रेंच लोक आपल्यापेक्षां प्रबल होत चालले आहेत, अशी मनाची खोटी समजूत करून घेऊन त्यांनीं विनाकारण आपल्यास भीति घालून घेतली व त्या भीतीच्या निरसनार्थ ह्या युद्धांत ते पडले; अशा निरर्थक भानगडींत न पडतां जर व्यापार वगैरे सुधारण्याचे प्रयत्न त्यांनीं केले असते, तर सर्व राष्ट्रांचें पुष्कळ हित झालें असतें; असें पुष्कळांचें ह्मणणें आहे. परंतु खरी गोष्ट अशी नव्हती. लढाईचें खरें कारण काय

ह्या राजाचा मुलगा स्पेनच्या गादीवर बसला तर एका छत्राखालीं दोन राज्यें होऊन फ्रान्सचें वैभव व राज्यविस्तार व त्यामुळें त्याचें बल फार वाढेल, अशी भीति वुइल्यमला होती. तेव्हां डाफिनकडे तें राज्य जाऊं नये, अशी सर्व खटपट होती. एवढ्यासाठीं लुई व वुइल्यम ह्यांनीं आपसांत ठरविलें कीं, बव्हेरियाच्या प्रिन्सला मूळ गादी द्यावयाची व नेदर्लंड व इटली वगैरेकडील स्पेनचीं ठिकाणें फ्रान्स व आर्चड्यूक ह्यांच्यांत वांटून टाकावयाचीं. पुढें बव्हेरियाचा प्रिन्स मरण पावला. तेव्हां दोनच वारस राहिले. पुन्हा ह्या दोन राजांनीं ठरविलें कीं, आर्चडयूकाला मुख्य राज्य द्यावें, व बाकीचीं ठिकाणें डाफिन याला द्यावीं. हें करणें स्पेनच्या राजाला नापसंत होऊन त्यानें आपल्या मृत्युपत्रांत आपलें सर्व राज्य डाफीन ह्मणजे लुईचा मुलगा ह्यास देऊन टाकलें. तेव्हां हें करणें इंग्लंडच्या लोकांना आवडलें नाहीं. पुढें चार्लस मेला आणि लुई इंग्लंडशीं केलेला ठराव झुगारून देऊन चार्लसच्या मृत्युपत्राप्रमाणें स्पेनची गादी बळकावून बसला. लागलेंच कांहीं दिवसांनीं इंग्लंडचा पूर्वींचा राजा दुसरा जेम्स हा फ्रान्समध्यें लुईच्या आश्रयाला होता तो मरण पावला. मरतेसमयीं त्यास लुईनें वचन दिलें कीं, मी तुझ्या मुलाला इंग्लंडचें राज्य मिळवून देण्यास खटपट करीन. ह्या दोन गोष्टी समजल्याबरोबर इंग्लंडांतील लोक खवळले व लढाई करण्यास उद्युक्त झाले. इतक्यांत वुइल्यम मरण पावला, व आन राणी गादीवर आली. तिच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं मार्लबरो हा मुत्सद्दी असून योद्धा होता. त्याचीं मतें वुइल्यमसारखींच होतीं. त्यानें लागलाच लढाईस प्रारंभ केला. ती १७०२ पासून तों १७१३ पर्यंत चालली. ही लढाई एकाच ठिकाणीं झाली नाहीं, तर फ्रान्स, स्पेन, नेदर्लंड,

हें रांके* ह्यानें केलेला इतिहास वाचला तर समजेल.† तो असें ह्मणतो कीं, ही लढाई होण्याचें कारण व्यापारच होय. फ्रेंच लोकांनीं स्पेन देशांत आपलें वजन स्थापन करून दोघांनीं मिळून सर्व अमेरिकेचा पूर्ण धनीपणा आपल्याकडेसच घेऊन, इंग्रजांचा त्यांत मुळींच शिरकाव होऊं द्यावयाचा नाहीं, असा घाट घातला होता. ह्याच भीतीस्तव स्पेनच्या भानगडींत, इंग्रजांस पडावें लागलें. ह्मणूनच ह्या लढाईचा एक विशेष परिणाम असा झाला कीं, इंग्रजांनीं आकेडी प्रांत काबीज करून घेतला, व 'आसिएन्टो'‡ ठरावाअन्वयें इंग्लंड देशाचा गलामांचा व्यापार प्रथमतः जारीनें सुरू झाला.

इटली इत्यादि ठिकाणीं ती चालू होती. इतके देश त्या लढाईंत गुंतले होते, व समुद्रावर लढाई चालत असे ती निराळीच. ह्या युद्धांतील मुख्य लढाया झालेल्या ह्मणजे ब्लेन्हीमवर स्वारी करतांना डोनावर्थ येथें, खुद्द डान्यूब नदीवरील ब्लेन्हीम येथें (१७०४), फ्लांडर्समध्यें घीट नदीवर रामिलीस येथें (१७०६), शेल्ड नदीवर उडनार येथें (१७०८), मॉन्सजवळ माल्प्लाके येथें (१७०९), झाल्या. त्या सर्वांत इंग्लिशांचा जय झाला. १७०३ व १७०७ मध्यें मात्र इंग्लिशांना अपजय बरेच आले. बाकी इतर सर्व सालीं मार्लबरो याला जयच येत गेला. १७१० त लुईनें तहाचें बोलणें लावलें. सन १७११ व १२ ह्या सालीं थोडथोडी लढाई सुरू होती, परंतु तहाचें बोलणें सुरूच होतें. तें होतां होतां सन १७१३ ता. ३१ मार्च रोजीं युट्रेक्ट येथें तहनाम्यावर सह्या झाल्या. त्यांत मुख्य मुद्याची गोष्ट ही कीं, डाफीनला स्पेनची गादी मिळाली, परंतु फ्रान्सच्या गादीवरील आपला हक्क त्याला सोडून द्यावा लागला. जिब्राल्टर, मिनोर्का व न्यू फौंड्लंड हे प्रांत इंग्लंडला मिळाले. डंकर्क् उध्वस्त करून टाकावें, इंग्लंडची राणी ॲन व इतर प्राटेस्टंट राजे लुईनें कबूल करावे, प्रिटेंडरला घालवून द्यावें, अमेरिकेचा गुलामांचा व्यापार इंग्लंडकडे द्यावा, नेदर्लंडाचे सरहद्दीचे किल्ले डच लोकांच्या स्वाधीन रहावे, येणेंप्रमाणे ठरलें.

* रांके हा प्रसिद्ध जर्मन इतिहासकार होय. ह्याचा जन्म १७९५ त झाला.

† नूर्डेन ह्मणून एका जर्मन ग्रंथकारानें ह्या वेळीं युरोपीयन राष्ट्रांच्या व्यवहाराची दिशा कशी बदलत चालली होती, याचें सविस्तर वर्णन रांकेपेक्षांही चांगलें केलें आहे. ग्रं. क.

‡ आसिएन्टो ह्मणजे अमेरिकेशीं गुलामांचा व्यापार करण्याची देणगी. ही

ज्याप्रमाणें वरील युद्धाचें एक कारण अमेरिकेच्या स्वामित्वासंबंधीं होतें, त्याचप्रमाणें फ्रेंच राज्यक्रांती* नंतरच्या व नेपोलियनबरोबरच्या लढायांचेंही तेंच कारण होतें. अमेरिकेंतली लढाई झाली, तेव्हां जसा फ्रेंचांनीं इंग्रजांचा सूड घेतला, तसेंच नेपोलियनाच्या वेळींही आपली गेलेली कीर्ति फिरून मिळविण्याचे त्यांनीं भगीरथ प्रयत्न केले. इंग्लंडच्यासंबंधानेंतरी नेपोलियनचा उद्देश हाच होता. इंग्लंड एक बेट

प्रथम स्पेन देशाकडून फ्रान्साला दण्यांत आली होती. पण पुढें १७११ मध्यें जें तहाचें बोलणें चाललें, त्याप्रमाणें ती इंग्लंडकडे आली.

* फ्रान्सची राज्यक्रांतिः—जगाच्या इतिहासांत १७८९ हें साल फारच महत्वाचें आहे, व त्याचा वृत्तांत साधारणपणें सर्वश्रुत आहे. ह्या वर्षी फ्रान्स देशांत एक मोठी राज्यक्रांति घडून आली. ह्या क्रांतीच्या वेळीं फ्रान्साचा राजा सोळावा लुई राज्य करीत होता. तो दयाळू असे, प्रजेच्या तर्फेचा असे, पण निश्चयी नव्हता, व कामाचा हलका होता. त्यामुळें राज्यक्रांतीला प्रतिबंध कांहींच झाला नाहीं. ह्या क्रांतीचीं कारणें थोडक्यांत अशीं होतः-इंग्लंडांत जशी पार्लमेंट तशी फ्रान्समध्यें स्टेट्स् जनरल नामक सभा असे. ती १७८९ च्या मेच्या ५ व्या तारखेस भरविण्यांत आली. ती सभा १६१४ पासून सुमारें पावणे दोनशें वर्षांत भरवलीच नव्हती. ही तेव्हांपासून कां भरवली नाहीं व ह्याच वर्षी कां भरवली ह्याचीं कारणें फार खोल आहेत. चौदावा लुई (१६३८-१७१५) ह्यानें एकछत्री राज्यसूत्राची राज्यनीति पूर्णतेला जेव्हां आणली, तेव्हां ती पक्व झाली; तेव्हांपासूनच राज्यक्रांतीला प्रारंभ झाला असें ह्मटल्यास चालेल. त्या राज्यनीतीनें राजसत्ता वाढली खरी, पण राज्यरक्षक जीं दुसरीं अंगें आहेत त्यांचा बीमोड झाला. बडे मानकरी ह्यांची सत्ता नाहींशी होऊन ती राजाकडे गेली, पण त्यांचा डामडौल कांहीं कमी झाला नाहीं. त्यांच्यावर कराचा बोजा कांहीं नसे, व आपल्या कुळांकडून लष्करी नोकरी घेण्याचें त्यांनीं बंद पाडलें होतें. न्यायमंडळ न्यायासनीं केवळ पैसे भरून येई. त्यांच्यांत ज्ञानाचा अंधःकारच असे. वरिष्ठ उपदेशक, शास्त्रीमंडळ फारच डामडौलानें राही, व त्यांच्याच वर्गाचे पण कनिष्ठ दर्जाचे लोक अन्नान्न करीत असत. लोकसमाज जुलुमानें, व अन्यायाच्या कारांनीं त्रासला होता. आपल्या पुढाऱ्यांनीं, आपणांस टाकून दिलें, श्रम करणार आपण व त्याचें फळ घ्यावें दुसऱ्यांनीं, हें त्यांना कळून आलें. त्यांची स्थिति विशेष निकृष्ट झाली होती ती अशी. दुष्काळ वारंवार पडत. त्यांत धान्याच्या व्यापाराची अशी कांहीं व्यवस्था मोठ्या लोकांनीं करावी कीं, धान्याची टंचाईच पडे. ही हृदयद्रावक स्थिति पाहून मन कळवळून वरच्या प्रतीचे लोक ह्या दीनांच्या तर्फेनें

आहे, किंवा युरोपांतील एक राष्ट्र आहे, असें त्यास कधींच वाटलें नाहीं. तर इंग्लंड ह्मणजे एक सार्वभौम महाराष्ट्र आहे, त्याच्या ताब्यांत गुंतून गेलेले शेंकडों इतर प्रांत आहेत, सर्व पृथ्वीभर त्यांचे ताब्यांत वसाहती आहेत, प्रत्येक समुद्रांत कांहींनाकांहीं बेटें त्यांचे अंमलाखालीं आहेत, (अशा बेटांपैकींच एकांत सरते शेवटीं नेपोलियन ह्मास कैदेंत राहून मरावें लागलें.) अशा प्रकारची इंग्लंडची स्थिति नेपोलियन ह्यास दिसली. ह्मणूनच सन

उठतील, तरच हे दीन लोक पुढें व्हावयाचे, नाहींतर ते आपली दैना नेहमीं सोसून रहावयाचे, कधीं आपण होऊन बेबंद होतील असें व्हावयाचें नाहीं. ही सर्वत्र रीत आहे, त्याप्रमाणेंच येथें झालें. वरचा वर्ग ह्मणजे साधारण मध्यम प्रतीचा व शिकलेला होय. त्यांना ही दैना पाहवेना. ही असहतावृत्ति व्होल्टेर वगैरे लोकांत उत्पन्न झाली व त्यांनीं ती प्रकट केली. मांटेस्क ह्यानें कांहीं राजकीय प्रश्नांचा ऊहापोह केला. रूसो व व्होल्टेर ह्यांनीं सामाजिक व धर्मसंबंधीं विषयांवर नवीनच मतें स्थापित केलीं. त्या वेळची स्थिति त्यांच्या लेखांवरून स्पष्ट होते. देशांतील संस्था अगदीं बाईट होत्या. त्यांवर अतिखरमरीत टीका ह्या सुशिक्षित लोकांनीं केल्या व त्या सुधारतां येतील अशी लोकांची खात्री करण्याची त्यांनीं खटपट केली. ह्या टीका बंद करण्याचें सामर्थ्य सरकारांत नव्हतें. वसुलांत फार गोंधळ होता. सोळाव्या लुईनें अशी आशा लोकांत उत्पन्न केली होती कीं, चालू पद्धतींत फरक करितां येईल. टर्गो हा मुख्य प्रधान होता. त्याचे प्रयत्न तसेच होते. परंतु त्याच्या करांच्या वगैरे सुधारणेला यश आलें नाहीं, व प्रत्येक सुधारणेची हीच स्थिति झाली. वारंवार प्रधान बदलत, परंतु कांहीं जमेना. क्रुग्नी, नेकर, कॅलॉन हे एकामागून एक प्रधान होऊन आले. शेवटीं १७८७ त कार्डिनल लामेनी डि ब्रिनि हा प्रधान झाला. त्यानें कर वाढविण्याचा विचार केला. त्याबरोबर वडे लोक व न्यायाधीश त्याजवर उठले. त्यांनीं लोकपक्ष घेतला व कर बसविण्याचा हक्क स्टेट्स् जनरलचा आहे असें भांडूं लागले. ह्या सभेचें नांव काढण्याबरोबर लोक सभेशिवाय दुसरें कांहींच ऐकेनात. तेव्हां नाइलाजानें १७८९ च्या मेच्या पांचव्या तारखेस त्यानें सभा भरविली. येथें बंडाचा प्रारंभ झाला. सनदी वडे लोक व इतर लोक ह्यांचें ह्या वेळेपासून भांडण सुरू झालें. आग्नि पेटला तो एकदम भडकला. टीयर्स इटाट हें उपपद धारण करणारे मध्यम प्रतीचे लोक ह्यांनीं आपणांला राष्ट्रीय सभा असें नांव घेतलें. इतक्यांत लष्कराच्या जोरावर त्यांचे पाय मोडून टाकण्याचा प्रयत्न सरकारतर्फे झाला; त्याबरोबर लोक चवताळले. लोकांनीं बास्टिल नामक कैदखाना

१७९८ ह्या वर्षी इंग्लंडशीं लढाई* करण्याचें काम जेव्हां त्याजकडेसच सोंपलें गेलें, तेव्हां लढाई सुरू करण्याचेपूर्वी इंग्लिश खाडीची त्यानें फार बारकाईनें तपासणी केली. तसेंच ऐर्लंडकडेसुद्धां त्यानें नजर फेंकली. पुढें थोड्याच महिन्यांनीं ऐरिश लोकांनीं बंड केलें, त्यावेळेस जर नेपोलियन, सैन्य घेऊन ऐरिश लोकांना मदत करण्यास निघता, तर खरोखरच आजपर्यंत अननुभूत असा त्यावेळीं इंग्लंडचा पराभव झाला असता; तरी अशा व इतर गोष्टींनीं तो अगदीं भुलून गेला नाहीं. त्याच्या मनांत

स्वाधीन करून घेतला, व त्यांतील कैदी सोडून दिले. लोकांचे हातीं तरवारीची सत्ता गेली. राष्ट्रीय फौज उभी झाली. सहाव्या अक्टोबरला भुकेल्या बाया व ह्या राष्ट्रीय फौजेपैकीं कांहीं लोक जमून व्हर्सेल्स मुक्कामीं जाऊन राजाला धरून पारिसला घेऊन आले. ह्यावेळेपासून बंडवाल्यांनीं नासधूस करण्याची सुरुवात केली. राजकीय, धर्मसंबंधीं वगैरे सर्व संस्था उलथ्या पालथ्या करण्याची सुरवात झाली. राजाच्या तर्फेनें मिराबो नांवाच्या मनुष्यानें फारच एक उत्तम कल्पना काढली असती. पण तो १७९१ त मरण पावला. तेव्हां मग राजाला चांगला मंत्री कोणीच राहिला नाहीं. राजानें पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण त्यास वारेन्स येथें पकडला, व त्याला नांवाचा राजा केला. नवीन प्रधानमंडळानें आस्ट्रियाशीं युद्धाची प्रसिद्धपणें तयारी केली. पुढें १७९२ च्या जूनमध्यें दुसरें प्रधानमंडळ आलें. आगस्टच्या १० ला बंड सुरू झालें. राजा पदच्युत झाला. कायदे करणाऱ्या सभेचें जीवित्व सप्टेंबरमध्यें संपलें. आगष्ट १० पासून तों सप्टेंबर २१ पर्यंत फारच भयंकर कृत्यें झालीं, त्यांत राजपुरुष कैदी मारले गेले. १७९२ च्या सप्टेंबरच्या २१ ला प्रजासत्ताकराज्याची स्थापना झाली. येथपर्यंत बंडाचा उद्भव झाला. लढाईला सुरवात झाली. इंग्रज लोकांना फ्रान्साशीं लढाई करण्याची इच्छा होती त्याप्रमाणें त्यांनीं कांहीं उपाय योजले. लढाई अजून सुरू झाली नव्हती. अशी स्थिति असतांना १७९३ च्या जानेवारीच्या २१ तारखेस सोळाव्या लुईला लोकांनीं फांशीं दिलें. त्याचप्रमाणें राणी व मुलेंसुद्धां मारलीं गेलीं. ह्या गोष्टीनें सर्व युरोपांतील लोकांना अगदीं चरका बसला. आणि ह्या गोष्टीपासून लढाईची सिद्धता कायम झाली. इंग्लंडमध्यें लढाई करूं नये असें ह्मणणारा पक्ष होता, व त्याचें ह्मणणें बरोबर होतें. परंतु लढाई करावी ह्मणणारांचेंच मत प्रबळ होतें, तेव्हां शेवटीं लढाई करण्याचें ठरलें.

* फ्रेंच राज्यक्रांतीसंबंधींचें पहिलें युद्ध:—(१७९३–१८०२) ग्रेट ब्रिटन, स्पेन, हालंड, आस्ट्रिया, प्रशिया वगैरे राज्यें एके ठिकाणीं झालीं व त्यांनीं फ्रान्साशीं

अगदीं निराळेच विचार होते. पूर्वी फ्रेंच लोक हिंदुस्थान देश काबीज करण्याचे बेतांत होते, व ह्या कृत्यास इंग्रजांकडून हरकत झाली, हें तो विसरला नाहीं. ह्मणूनच टिपू सुलतान ह्यास हिंदुस्थानामध्यें इंग्लिशांशीं लढाई करण्यास लावणें व स्वतः आपण जाऊन इजिप्ट देश काबीज करणें, हाच इंग्लंडबरोबर सामना करण्याचा उत्तम मार्ग, अशी त्याच्या मनाची खात्री होऊन त्याप्रमाणें त्यानें फ्रेंच सरकारची समजूत पाडली व हाच बेत त्यानें तडीस नेला. यामुळें ह्या दोन राष्ट्रांची लढाई जी इंग्लिश

लढाई सुरू केली. इंग्लिशांचा समुद्रावर ईस्ट व वेस्ट इंडीजमध्यें जय झाला. परंतु खुद्द फ्रान्सांत त्यांचा पराभव झाला. हें वर्तमान १७९३–९४–९५ सालीं घडलें. १७९५ त हालंड, प्रशिया, स्पेन हे देश पूर्वींचा पक्ष सोडून फ्रान्साला मिळाले. १७९६ सालीं पिट्नें दोनदां तहाची खटपट केली, पण ती जमली नाहीं. १७९७ त इंग्लंडवर स्वारी करण्याची तयारी फ्रान्सकडून झाली. फ्रेंच, स्पानियर्ड्स् व डच ह्यांच्या मतें इंग्लंडची समुद्रावरील सत्ता कमी करावी असें होतें. त्यावेळीं इंग्लंड फार हवालदिल झालें. ह्याच वेळीं इंग्लंडांत रोकड पैसे देण्याचें अजी बंद होऊन बारीक सारीक कामाला देखील कागदाचे कपटे अमलांत आले. अशी पैशाची टंचाई होती तरी लोकांनीं भराभर वर्गण्या देऊन रकम तयार केली, आणि लढाईची तयारी झाली. सेंट व्हिसेंटच्या लढाईंत स्पानियर्ड लोकांचा पराभव झाला. त्यांत इंग्लिशांकडे नेल्सन व जर्व्हिस हे योद्धे होते. पुढें कांहीं दिवसांनीं डच तारवांचा हालंडमध्यें कांपडौन येथें ॲडमिरल डंकन ह्यानें पराभव केला, त्यामुळें फ्रेंचांची फौज आयर्लंडांत बंडाला मदत करण्यास येणार होती ती थांबली. कांपडौनच्या लढाईनंतर सहा दिवसांनीं कांपो फोर्मियो येथें तह झाला.

ह्या वेळीं प्रसिद्ध नेपोलियन बोनापार्ट हा सेनापति झाला होता. त्याचा विचार असा होता कीं, हिंदुस्थानावर स्वारी करून इंग्लंडची सत्ता कमी करावी. हिंदुस्थानाला अगदीं जवळचा रस्ता ईजिप्टमधून व तांबड्या समुद्रांतून होता. मोठें सैन्य व आरमार घेऊन तो अलेक्झांड्रियाकडे निघाला. रस्त्यावर एकसुद्धां बंदुक न झाडतां त्यानें माल्टा बेट सर केलें. ईजिप्टमध्यें आल्यावर त्यानें ईजिप्ट लोकांचा नाईल नदीवर केरो शहराजवळ पिरमीडच्या लढाईंत १७९८ त पराभव केला. नेपोलियन हा फ्रेंचांचा अति विलक्षण योद्धा खरा, परंतु त्याला जोडीला जो इंग्रजी खलाशी मिळाला तोही जबरदस्त होता. त्याचें नांव आड्मिरल नेल्सन होय. नेल्सन हा फ्रेंचांचा पाठलाग करीत ईजिप्टमध्यें पोंचला, व नाईल नदीच्या मुखाजवळ अबुकिर आखातांत त्यानें फ्रेंच आरमाराचा अगदीं पाडाव केला. नेल्सनला लढाईंत

स्वारींत झाली असती, ती बंद होऊन त्या उभय राष्ट्रांच्या ताब्यांतील अफाट प्रदेशांत होऊं लागली. नेपोलियन स्वतः आपल्या मदतीस येईल अशा आशेवर ऐरिश लोकांनीं पुढें बंड केलें, त्यावेळीं नेपोलियन वरील लढाईंत गुंतल्यामुळें, त्यास स्वतः त्यांचे मदतीस जाणें शक्यच नव्हतें, ह्मणून, जनरल हंबर्ट ह्यास ११०० लोकांनिशीं ऐरिश लोकांच्या मदतीस पाठवून त्यांची त्यास समजूत करावी लागली.

थोडी जखम लागली पण ती बरी झाली. आपल्या आरमाराचा पाडाव झालेला पाहून नेपोलियन इजिप्टांतून सीरिया देशांत गेला. तेथें त्यास तोंड देण्यास तुर्क लोकांची फौज जमली होती. त्यानें एकर शहरावर हल्ला केला. परंतु तुर्क लोकांनीं सर सिडने स्मिथ ह्यांच्या हाताखालील फौजेच्या कुमकेनें फ्रेंचांना परत घालाविलें. नंतर नेपोलियन फ्रान्सांत परत आला. तेथें तो प्रजासत्ताक सभेचा अध्यक्ष नेमण्यांत आला. पुढें १८०१ मध्यें ह्याच्या सैन्याचा अलेक्झांड्रिया येथें पाडाव झाला. त्या लढाईंत ब्रिटिश सैन्याचा प्रमुख योद्धा सर राल्फ आबरक्रांबी हा पडला.

पुढें नेपोलियन यानें आस्ट्रियावर चाल करून १८०० मध्यें मारेंगो व होहेनलिंडन ह्या दोन्ही ठिकाणीं आस्ट्रियाचा पराभव केला. उत्तरेकडील देशांचें ह्याच वेळेस ऐक्य झालें. त्यांत रशिया, प्रशिया, स्वीडन व डेन्मार्क हे देश होते. ह्या सर्वांनीं फ्रान्साचा पक्ष घेतला, व इंग्लंडला एकटेंच फ्रांसाशीं लढावें लागलें. बाल्टिक समुद्रांतील लढाईच्या वेळीं कोपेनहागेन ह्यावर जी तोफांची सरबत्ती इंग्लिशांनीं लावली त्या योगानें डेन्स लोक शरण येऊन त्यांनीं वरील कट सोडून दिला. डेन्सांचा पराजय व रशियाच्या बादशहाचा मृत्यु ह्यांमुळें उत्तर देशांचा हा कट मोडला व तहाचें बोलणें सुरू झालें. सन १८०२ मध्यें एमिएन्स (काले व पारिस यांच्या दरम्यानचें शहर) येथें तह झाला. ह्यांत इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, व हालंड इतक्यांचा संबंध होता. त्यांत मुख्य गोष्ट माल्टाबद्दल होती. तें बेट इंग्रजांकडेस राहिलें.

ह्या सर्व वरील कृत्यांत नेपोलियनचा हेतु काय होता हें उघड दिसत आहे. हिंदुस्थानावर स्वारी करण्याच्या इरादानें त्यानें इजिप्त, सिरिया वगैरेकडे चाल केली. तींत मोड होऊन तो परत आल्यावर स्वतःचें राज्य जास्त बळकट करून नंतर इंग्लंडकडे नजर द्यावी असें त्यास वाटलें. ह्मणून आस्ट्रिया, प्रश्या, हालंड, स्पेन वगैरे राष्ट्रें त्यानें स्वपराक्रमानें आपलींशीं करून घेतलीं. परंतु ह्या सर्व गोष्टींत युरोपीय राष्ट्रें

एमियन्स येथें इसवी सन १८०२ या वर्षी तह होऊन हें युद्ध संपलें. त्याचे परिणाम विस्तृत इंग्लिश राष्ट्राचे इतिहासांत फारच महत्वाचे आहेत. फ्रेंच लोकांना ईजिप्ट देश सोडावा लागला, ह्मणजे हिंदुस्थानच्या राज्यावर हल्ला करण्याचा जो त्यांचा प्रचंड बेत तो अगदीं फसला. त्याचा साथी टिपू सुलतान याचा पराभव होऊन तो मारला गेला; व त्या लढाईतील इंग्रज सरदार जनरल बेर्ड हा जनरल हचिन्सन यास मदत करून इजिप्ट देशांतून फ्रेंच लोकांस घालविण्यासाठीं स्वसैन्यानिशीं तांबड्या समुद्रांतून आला. तसेंच सिलोन आणि ट्रिनीडाड हीं जास्त ठिकाणें इंग्रजांचे ताब्यांत आलीं. शेवटचें युद्ध* इ. स. १८०३ पासून इ. स.

जिंकून त्यांची बादशाही आपण मिळवावी, असा त्याचा हेतु नव्हता; कारण, तसा हेतु असता, तर ते देश जिंकून तो स्वस्थ बसला असता. बरें, इंग्लंडवर तरी त्याची इतकी करडी नजर असण्याचें कारण अमेरिका, हिंदुस्थान वगैरे ठिकाणीं इंग्रजांची सरशी होत चालली होती हेंच होय. माल्टा बेटाविषयीं तंटा ह्याचमुळें झाला, व तें नाक्यावरचें बेट असल्यामुळें तें इंग्रजांनीं तहाच्या वेळीं आपल्या हातांतून जाऊं दिलें नाहीं.

नेपोलियनच्याबरोबर इंग्लिश राष्ट्र लढत असतां त्यांचे मुख्य प्रधान कोण होते व इंग्लंडची बाजू कोणीं सांभाळली हें कळण्याकरितां येथें इंग्लंडचे मुख्य प्रधानांची यादी देणें अवश्य वाटतें. इतके दिवस (१७८४–१८०१) इंग्लंडांत छोटे पिट्ट ह्यांची प्रधानकी होती. १८०१ मध्यें त्यांनीं ती सोडून दिली, व ॲडिंग्टन प्रधान झाले. ॲडिंग्टन ह्यानें ती १८०४ मध्यें सोडली, व पुन्हा पिट्टनें पतकरली. फ्रेंच राज्यक्रांतीपासून साधारणपणें प्रधानकी बरींच वर्षें राजपक्षीयांकडे होती. १८०४ पासून १८०६ पर्यंत पिट्टनें पुन्हा प्रधानकी केली. १८०६ त पिट्ट मरण पावल्यावर ग्रेनव्हिल प्रधान झाला, त्या मंडळांत फाक्स हा खरोखरी प्रमुख होता. १८०६ त पिट्ट नंतर कांहीं दिवसांनीं फाक्स मेल्यावर ग्रेनव्हिल प्रधानकी १८०७ मध्यें संपली. नंतर पर्सीव्हल प्रधान झाला. त्याची प्रधानकी १८१२ पर्यंत चालली. पुढें लिव्हरपूल प्रधान झाला, तो १८२० पर्यंत होता.

* राज्यक्रान्तीसंबंधाचें दुसरें युद्ध (१८०२–१८१५) पूर्वभागः—१८०२ मध्यें एमियन्सचा तह झाला खरा परंतु लढाई थांबली नाहीं. इंग्लिश लोक माल्टा सोडीनात, व नेपोलियन इंग्लिशांना फारच कडक नियमांनीं बांधण्याचा प्रयत्न करूं लागला,

१८१९ पर्यंत चाललें. त्याचा हेतुमुद्धां अमेरिकेचे स्वामित्वासंबंधींच होता किंवा नाहीं, हें पाहूं. प्रथमदर्शनीं हा हेतु बाकींच्यासारखा होता असें दिसत नाहीं; याचें कारण उघड आहे कीं, यावेळीं दर्यावर्दीपणामध्यें इंग्रज लोक इतके प्रमुख होते कीं, नेपोलियन यास अमेरिकेकडे जलमार्गानें जाणें अगदीं अशक्य होतें, तरी नेपोलियन ह्यास ह्या लढाईचा खरा हेतु अवगत होता, असें दिसतें. ह्या लढाईस प्रारंभ कसा झाला पहा. माल्टा बेटाबद्दल प्रथम कलह सुरू झाला. एमियन्स येथील तहाअन्वयें इंग्रज लोकांनीं, माल्टा बेट अमुक एक वेळांत सोडून दिलें पाहिजे होतें. परंतु पुढें कांहीं कारणानें ही गोष्ट इंग्लिश लोक कबूल

तेव्हां लढाई सुरू झाली. १८०४ मध्यें नेपोलियन याला फ्रेंचांचा बादशहा केलें, व पहिला नेपोलियन अशी पदवी त्याला दिली. नेपोलियन हा फार बलाढ्य झाला होता. त्याच्याविरुद्ध ग्रेटब्रिटन, रशिया, आस्ट्रिया, स्वीडन ह्यांची एकी झाली व फ्रान्स व स्पेन एकत्र झाले. नेपोलियनच्या मनांत इंग्लंडवर स्वारी करावी असें होतें. तेव्हां इंग्लिश खाडींतून नेल्सन याला दूर नेण्यासाठीं नेपोलियननें आट्लांटिक समुद्रांत तारवें घातलीं व वेस्ट इंडीजवर स्वारी करण्याची हूल उठवली. नेल्सनानें त्याचा पाठलाग केला. पण फ्रेंच लोक कोठें दृष्टीस पडलेच नाहींत. त्यांनीं नंतर केडिज मुक्कामीं स्पानिश आरमाराला गांठलें. नेल्सन वेस्ट इंडीजमधून इंग्लंडला परत आला. परंतु तें आरमारद्वय कोठें आहे हें कळतांच तो तिकडे गेला. तिकडे आडमिरल कॉलिंगवुड हा त्याची वाट पहातच होता. फ्रेंच व स्पानिश आरमारें केडिज बंदरांतून निघालीं आणि १८०५ च्या आक्टोबरच्या २१ व्या तारखेस त्यांची व नेल्सनची केप ट्राफल्गारच्या पलीकडे गांठ पडली. लढाईपूर्वीं नेल्सननें सर्वांचीं मनें उत्तेजित केलीं. त्यानें "प्रत्येक इंग्लिश आपलें कर्तव्य करील अशी इंग्लंडची आशा आहे," हे शब्द बोलून सर्वांस धीर दिला. ते शब्द आजपर्यंत सर्वांचा देशाभिमान जागृत करीत आहेत. लढाई चालली असतां नेल्सन गोळी लागून अति जखमी झाला. पुढें तीन दिवसांनीं तो मरण पावला. पण मरण्यापूर्वीं लढाईंत जय झाल्याची समाधानकारक बातमी त्याला गेली. त्याचे मरणाचे वेळचे शब्द येणेंप्रमाणें होते. "मी ईश्वराचे आभार मानितों कीं, मीं आपलें कर्तव्य केलें." ह्याचें प्रेत इंग्लंडांत नेऊन लंडनमध्यें सेंट काथीड्रल देवळांत पुरलें गेलें, त्याच्या मरणानें सगळें राष्ट्र कष्टी झालें. ट्राफल्गारच्या लढाईमुळें इंग्लंडवर स्वारी येण्याची भीति राहिली नाहीं. फ्रान्साच्या आरमाराचा मोड झाला इत-

करीनात; त्या कारणांचा येथें विचार करित बसण्याचें प्रयोजन नाहीं. तथापि, माल्टा बेट इंग्रजांचे ताब्यांत नसावें, असें नेपोलियन ह्यास कां

केंच नाहीं, तर अगदीं नाश झाला. पुन्हा स्वारी करण्याला, त्यांना नवीं तारवें बांधलीं पाहिजेत, नवीन शूर खलाशी उत्पन्न झाले पाहिजेत. ती गोष्ट लांब होती. समुद्रावर ग्रेट ब्रिटनचा जय झाला, व जमीनीवर नेपोलियननें लढाया मारल्या. १८०५ मध्यें अल्म येथें आस्ट्रियन फौजेस दांतांत तृण धरण्यास लावलें, व आस्टर्लिट्झ् येथें रशिया व आस्ट्रिया ह्यांच्या सामाईक फौजेची दाणादाग उडवली. ह्या अपजयामुळें पिट्टनें जें रशिया, आस्ट्रिया व स्वीडन ह्यांच्याशीं सख्य केलें होतें, तें फुकट गेलें. सख्य मोडल्याच्या ह्या बातमीनें पि.चें हृदय भेदून जाऊन त्याचा अंतच झाला. ग्रेट ब्रिटननें पुन्हां एकवार फ्रान्सच्या विरुद्ध रशिया, प्रश्या, साक्सनी, यांच्याशीं जूट बनवली. नेपोलियनानें पहिला तडाका प्रश्यावर केला. जीना येथें त्यानें मोठी निकराची लढाई मारली. त्यामुळें प्रश्याचा बराच भाग त्याचे हातांत आला. १८०७ मध्यें रशिया व ग्रेट ब्रिटन खेरीज करून सर्व यूरोप नेपोलियनच्या पूर्ण कबजांत आलें. रशिया व इंग्लंड यांजवर मात्र त्याची कांहीं मात्रा चालेना. तेव्हां त्यानें बर्लिनमध्यें एक ठराव काढला तो असा कीं, ग्रेट ब्रिटनशीं बाकीच्या युरोपियन राष्ट्रांनीं कोणताही व्यापार करूं नये, फ्रान्सच्या ताब्यांत असलेल्या राष्ट्रांत इंग्लिश लोक असतील ते फ्रेंचांचे कैदी समजावे. येणेंप्रमाणें ज्याला "कांटिनेंटल सिस्टिम" ह्मणतात तिची स्थापना झाली. हा ठराव बाहेर पडतांच इंग्लंडनें कौंसिलच हुकूम काढले, त्यांत त्यांनीं फ्रान्स व त्याचे स्नेही ह्यांच्याशीं इंग्लंडानें व्यापार करूं नये असें ठरवलें. ह्या ठरावापासून अमेरिकेच्या व्यापाराचें फार नुकसान झालें. त्याचा परिणाम पुढें अमेरिका व इंग्लंड ह्यांच्यामध्यें लढाई उत्पन्न झाली. एकचक्री पश्चिम युरोपीयन बादशाही स्थापन करण्यासाठीं रशिया देश जिंकला पाहिजे होता. त्यासाठीं लढाईला कारण उकरून काढणें जरूर होतें. तेव्हां पोलंड देशाला स्वातंत्र्य परत मिळवून देण्याचा घाट नेपोलियनानें घातला. रशियाची व त्याची कानिग्स्बर्ग जवळ एलो येथें जबर लढाई झाली (ता. ७ फेब्रुवारी १८०७). तींत फ्रेंचांचा मोड झाला. परंतु पुढें फ्रीड्लंडच्या लढाईंत रशियाचा मोड झाला. तेव्हां इंग्रजांनीं त्यांस मदत केली नाहीं, ह्मणून त्यांस राग आला. इकडे नेपोलियनलाही वाटूं लागलें कीं, रशिया जिंकणें सोपें नाहीं, तेव्हां तूर्त त्याच्याशीं स्नेह करावा. त्याप्रमाणें टिल्झिट मुक्कामीं १८०७ च्या जुलैच्या ७ वीला दोघांत तह झाला. तो बहुतेक फ्रेंचांना फायदेशीर असा होता, व त्यांत प्रश्याचें अतिनुकसान होणार होतें. बर्लिन डिक्री पाळण्याचें व इंग्लंडचा व्यापार बुडविण्याचें त्यांत ठरलें.

ह्या युद्धाचा उत्तरभागः—ह्यानंतर पोर्तुगाल देशाशीं नेपोलियनची लढाई सुरू

वाटलें, व ती गोष्ट ठरली असून इंग्रजांनीं कां केली नाहीं? ह्याचें कारण इतकेंच कीं, माल्टा बेट हें इजिप्ट देशाचें अगदीं नाकें होतें, आणि इंग्लिश

झाली. तीस द्वीपकल्पांतील युद्ध असें नांव आहे. पोर्चुगालाचें ग्रेट ब्रिटनशीं नेहेमीं सख्य असे. ह्मणून नेपोलियनच्या बर्लिनच्या ठरावास पोर्चुगाल देश सामील होईना. तेव्हां नेपोलियननें जनरल जूनो बरोबर ३०,००० फौज देऊन लिस्बन शहर घेण्यास पाठविलें. तेव्हां राजघराण्यांतील पुरुष आपल्या दक्षिण अमेरिकेंतील ब्राझील नामक वसाहतींत पळून गेले. जूनोनें नेपोलियनच्या नांवानें पोर्चुगालावर अमल करण्याचें सुरू केलें. ह्याप्रमाणें ह्या लढाईस १८०७ त प्रारंभ झाला. हें युद्ध स्पेन व पोर्चुगालमध्यें झालें. स्पेन व पोर्चुगाल मिळून फ्रान्साच्या नैर्ऋत्येस एक द्वीपकल्प आहे, ह्मणून त्यास इंग्रजींत 'द्वीपकल्पांतील युद्ध' असें ह्मणतात. पुढें स्पेनचा राजा आपल्या ज्येष्ठ चिरंजीवाशीं भांडूं लागला, व नेपोलियनचा विचार काय आहे हें विचारूं लागला. तेव्हां नेपोलियनानें दोघां बापलेकांस बोलावून आणलें व त्या राजास राज्यपद सोडावयास लावून मुलास फ्रान्समध्यें कैद करून ठेवलें. नंतर आपला भाऊ जोसेफ् ह्यास स्पेनचा राजा केलें. ह्याला पूर्वी नेपल्सचें राज्य मिळालेंच होतें. हें ऐकतांच स्पानियर्ड लोक तरवार घेऊन उठले व ग्रेटब्रिटनजवळ मदत मागूं लागले. सन १८०८ सालीं सर आर्थर वेल्सली, ज्यास पुढें ड्यूक आफ् वेलिंग्टन हा किताब मिळाला, त्यास पोर्चुगालमध्यें १०,००० फौजेनिशीं पाठविलें. तो पोर्चुगालमध्यें उतरला व फ्रेंचांची व त्याची लिस्बनच्या उत्तरेस व्हिमीरा येथें लढाई झाली. तींत फ्रेंचांचा मोड झाला. नंतर वेलस्लीस परत बोलावून त्याचे जागीं सर ह्यू डार्लिंपल् ह्यास पाठविलें. त्यानें लिस्बनजवळ सिंट्रा ह्मणून लहान गांव आहे, तेथें फ्रेंचांशीं तह करून त्यांस हत्यारें व युद्धसामुग्रीनिशीं पोर्चुगाल सोडून जाऊं दिलें. ह्या त्याच्या कृत्यासाठीं त्याला परत बोलावला व त्याच्या जागेवर सर जॉन मूर ह्याला नेमलें. पुढें स्पानियर्ड लोकांनीं फ्रेंचांची एक तुकडी कैद केली, ह्मणून नेपोलियनानें स्पेनवर दुसरी फौज पाठविली, व स्पानिश लोकांना मारीत, तो माड्रिड्मध्यें शिरला. मूर हा स्पानिश लोक कुमकेस येतील ह्या आशेवर स्पेनमध्यें गेला, परंतु स्पानिशांनीं त्यास मदत आणली नाहीं. तेव्हां त्यास मागें जावें लागलें. फ्रेंचांचा सरदार मार्शल सौल्ट हा त्याच्या पाठीस लागत आला. मूर स्पेनच्या वायव्य दिशेस कारन्ना येथें जाऊन पोंचला. परंतु त्या सैन्यास घेऊन जाण्यासाठीं यावयाचीं तारवें कांहीं आलीं नव्हतीं. फ्रेंच लोक अगदीं त्याच्या पाठीवरच होते, तेव्हां उलट खाऊन लढण्याखेरीज इंग्लिशांना दुसरा मार्गच राहिला नव्हता. फ्रेंचांचा मोड तर झालाच, परंतु मूर मात्र ह्या लढाईंत पडला (१८०९). त्याचें प्रेत फार घाईघाईनें रणांत रात्रीं पुरलें. त्यावेळचें वर्णन वुल्फनें आपल्या एका कवितेंत दिलें आहे, तें फारच हृदयद्रावक आहे, ह्मणून येथें देतोंः—

लोकांस अशी भीति होती कीं, माल्टाबेट सोडून दिलें असतां नेपोलियन ईजिप्ट देशांत तेव्हांच प्रवेश करूं शकेल व हिंदुस्थानाविषयीं त्याचें भांडण

"We buried him darkly at dead of night,
The sods with our bayonets turning,
By the struggling moon-beam's misty light,
And the lantern dimly burning.
No useless coffin enclosed his breast,
Nor in sheet nor in shroud we wound him;
But he lay like a warior taking his rest,
With his martial cloak around him."

नंतर वेलस्लीची पुनः पोर्चुगालमध्यें नेमणूक झाली. त्यानें डूरो नदीच्या मुखाजवळच्या ओपोर्टो गांवाच्या बाहेर फ्रेंचांना घालवलें व पुढें माड्रिड्‌कडे चाल केली. वाटेवर टलेवेरा येथें फ्रेंचांचा त्यानें मोड केला. ह्याजवर त्याला ड्यूकची पदवी मिळाली. माड्रिड शहरीं फ्रेंच सैन्य फार होतें ह्मणून वेलिंग्टन याला तेथें पोंचतां येईना, तेव्हां तो पोर्चुगालांत परत गेला. फ्रेंचांनीं इंग्लिशांना घालविण्याचा प्रयत्न केला, परंतु १८१० तील बुसाकोच्या लढाईंत फ्रेंचांचा पुरा पाडाव झाला. वेलिंग्टन पुढें टारेस वेड्रासला परत आला. तेथें त्यानें टेगस नदीपासून तों आट्लांटिक समुद्रापावेतों तटबंदी केली. तेव्हां फ्रेंच लोक स्पेनमध्यें परत गेले. १८१२ त वेलिंग्टननें स्पेनवर स्वारी केली. स्पेन व पोर्चुगाल ह्यांच्या परस्पर सरहद्दीवर थिउडाड रॉड्रिगो व बॅडॅहॉस नांवाचे दोन जंगी किल्ले आहेत. त्यानें ते दोन्ही एकदम घेतले. पुढें सालामोंका येथील निकराच्या लढाईंत फ्रेंचांचा मोड करून त्यानें माड्रिड्‌चा रस्ता मोकळा करून घेतला. १८१३ त वेलिंग्टननें फ्रेंचांचा व्हिटोरिया येथें पुन्हा पराभव केला आणि त्यांना स्पेनमधून पिरिनीझ पर्वतापलीकडे हांकलून लावलें. त्यांचा पाठलाग करीत तो फ्रान्समध्यें गेला व १८१४ मध्यें त्यांची टुलौस येथें दाणादाण करून सोडली. इकडे ही लढाई चालू असतां १८१२ त नेपोलियन हा प्रचंड सैन्य घेऊन रशियांत गेला. तेथें मास्को येथें दुर्भिक्षा, थंडी, बर्फाचा सपाटा ह्यांच्या योगानें नेपोलियनच्या सैन्याचा फन्ना उडाला. येणेंप्रमाणें द्वीपकल्पांत व रशियांत असा पूर्ण मोड झाल्यावर त्याला आपलें स्वतःचें बादशाही सिंहासन संभाळण्याचीच फिकीर पडली. त्यानें आज कित्येक वर्षें सर्व युरोपाला नाहक लढाईंत गुंतविलें होतें, व लाखों गणती द्रव्याचा व माणसांचा नाश झाला होता. सगळें युरोपखंड त्याचेवर खवळलेलें होतें. रशिया, प्रशिया, आस्ट्रिया, स्वीडन ह्या देशांनीं आपल्या फौजा एकत्र करून लिप्झिग् येथें त्याचा सामना केला. तींत नेपोलियनचा पूर्ण

पुनरपि सुरू होईल. ह्मणून " तिसऱ्या सख्यत्वाच्या तहांत* " ठरल्याप्रमाणे जरी हें युद्ध जर्मनीमध्यें जुंपलें तरी त्याचा मूळ हेतु हिंदुस्थानच

पराभव होऊन सर्व फौजा त्याचा पाठलाग करीत पारिस शहरावर आल्या. ह्या ठिकाणीं तह झाला. त्याप्रमाणें त्यानें आपली गादी सोडण्याचें कबूल केलें. त्याला भूमध्यसमुद्रांत एल्बा बेटाचा राजा करून ठेवलें. वेलिंग्टनला ह्या त्याच्या नोकरीबद्दल चार लाख पौंडांचें बक्षिस मिळालें. (१८१४)

नेपोलियनची अशी व्यवस्था केल्यावर ह्या युद्धामुळें युरोपांत जो गोंधळ उडाला होता तो मोडून व्यवस्था करण्यासाठीं व्हिएना शहरीं एक राष्ट्रीय सभा भरली असतांना अशी बातमी आली कीं, नेपोलियन हा एल्बा बेटांतून सुटून पारिसच्या मार्गावर आलेला आहे. वीस दिवसांनीं तो पुन्हां फ्रान्साचा बादशहाही झाला. (१८१५) ही बातमी समजतांच सर्व युरोपभर क्रोधाग्नि पेटला. इंग्लंडानें नऊ कोट रुपये लढाईसाठीं काढले. वेलिंग्टनच्या हाताखालीं ८०,००० लोक दिले. प्रशियानें १,१०,००० लोक तयार केले. वेलिंग्टनचा बेत प्रशियाचे सैन्याशीं मिळून एकदम पारिसवर जावयाचा होता. नेपोलियन याला त्यांना मिळूं द्यावयाचें नव्हतें. इंग्लिश ब्रुसल्स येथें व प्रशियन्स लिग्नि येथें असतां तो बेलजममध्यें शिरला. दोघांनीं आपापले बेत तडीस नेण्याची खूप खटपट केली. तीन क्वाटर ब्रास गांवीं फ्रेंचांचा सरदार मार्शल नें ह्याचा पराभव झाला, व लिग्नी येथें प्रश्यन लोकांचा झाला. शेवटीं वाटर्लू मुक्कामीं मोठी व शेवटली लढाई झाली (ता. १८ जून १८१५). वेलिंग्टनची ७०,००० फौज होती व नेपोलियनची ८०,००० होती. दोन्ही सैन्यें दोन टेंकड्यांवर उभीं राहिलीं व फारच निकराची लढाई झाली. लढाई सकाळीं अकरा वाजतां सुरू झाली, ती संध्याकाळपर्यंत चालली. दोहों पक्षांनीं आपली शर्थ केली. नेपोलियननें जें सकाळा ठाणें धरलें तें संध्याकाळपर्यंत सोडलें नाहीं. संध्याकाळीं त्याचें तोंड काळें ठिक्कर पडलें; कारण, त्याचें सैन्य मागें हटत चाललें, नंतर तो पळून गेला; पण परत येऊन तो आपण होऊन इंग्लिशांच्या स्वाधीन झाला. त्यांनीं त्याला आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील सेंट हेलिना बेटांत कैद करून ठेविलें. तेथें तो सहा वर्षें होता. त्याचा मृत्यु १८२१ त झाला. येणेंप्रमाणें ही कितीएक वर्षें चाललेली लढाई एकदांची संपली. त्या वेळेस पुढें पारिस येथें दुसरा तह झाला. त्यांतील शर्तींसाठीं. टीप पान ३३ पहा.

* सख्यत्वाचे तहः–असे तह निरनिराळ्या राष्ट्रांमध्यें पुष्कळ वेळां झाले. सर्वांनीं मिळून नेपोलियनचा पराभव करावयाचा, हा त्यांचा उद्देश होता. हा तिसरा तह इ. स. १८०४ या वर्षीं रशिया, इंग्लंड, आस्ट्रिया व स्वीडन यांजमध्यें होऊन स्पेन व फ्रान्स यांच्याविरुद्ध झाला.

होय. माल्टा बेट सोडून न देतां, प्रस्तुत प्रसंग जरी एकदांचा इंग्रजांस टाळतां आला, तरी त्याजमुळें इंग्रजांस खरोखर फायदा किती झाला, हें त्यांचें त्यांसच त्यावेळीं कळलें नाहीं. कारण, फ्रेंचांची त्यांस फारच धास्ती पडली होती. हिंदुस्थानांत जिकडेतिकडे फ्रेंचांचे गुप्त बेत चालू आहेत, असें त्यांस वाटे. मराठे सरदार, अफगाण लोक, इराणचा बादशहा, या सर्वांचे सैन्यांत फ्रेंच लोक नोकरीस असत. ह्यामुळें त्या सर्वांशीं फ्रेंचांचें सख्य आहे, असें इंग्रजांस वाटणें साहजिक होतें. सन १८०३ मध्यें हिंदुस्थानांत इंग्रजांची मराठ्यांशीं लढाई चालली होती, ती फ्रान्स बराबरच्या लढाईचा एक भागच, असें इंग्रजांचा सरदार लॉर्ड वेलस्ली यास बहुतकरून वाटलें असावें, व आर्थर वेलस्ली यानें ज्याप्रमाणें पुढें सॉलामांका व वाटर्लू येथील लढाईंत, नेपोलियनचा पराभव केला, त्याचप्रमाणें आसई* आणि अरगांव,* येथील लढाईंत आपण फ्रेंचांचाच पराभव केला, असें त्या सरदारास बहुतकरून वाटलें असावें. ह्या ठि-

---

* दुसरा बाजिराव पेशवा हा गादीवर फार प्रयासानें आला. त्याच वर्षी यशवंतराव होळकरही इंदुरीं आपल्या गादीवर बसला. त्यानें दौलतराव शिंदे आणि पेशवा यांच्याशीं फार निकराच्या लढाया मारून पेशव्याला इंग्रजांस शरण जाण्यास भाग पाडलें. त्याप्रमाणें पेशव्यानें १८०२ सालीं वसई मुक्कामीं एक तह केला. त्या तहनाम्यांत मुख्य शर्त इंग्रजांशीं त्यानें विश्वासानें वागावें अशी होती. येणेंप्रमाणें मराठ्याबरोबरचें पहिलें युद्ध संपलें. यानंतर मराठ्यांशीं दुसरें व तिसरें युद्ध १८०३–४ व १८०४–५ अनुक्रमें झालीं. हें १८०३ मध्यें दुसरें युद्ध, एका बाजूला इंग्रज व दुसऱ्या बाजूला दौलतराव शिंदे व रघोजी भोंसले यांचे दरम्यान झालें. या युद्धांत इंग्लिशांचे सरदार जनरल वेलस्ली, ते पुढें लार्ड वेलिंगटन या नांवानें प्रसिद्ध झाले, ते व लार्ड लेक असे होते. या युद्धांत मुख्य लढाई वसई मुक्कामीं झाली. शिंदे व भोंसले यांनीं रणांतून पळ काढला. पुढें बारीकसारीक शहरें व किल्ले इंग्रजांनीं पुष्कळ घेतले. त्यांत दिल्ली व लासवारी येथें लार्ड लेक यानें मोठ्या लढाया जिंकिल्या. शेवटीं शिंदे व भोंसले हे इंग्लिशांना शरण आले. व त्यांनीं आपल्या मुलखाचा बराच भाग इंग्लिशांना दिला. तिसरें युद्ध यशवंतराव होळकर व भरतपुरचा राजा यांचेबरोबर होऊन त्यामध्यें मराठ्यांची सत्ता समूळ मोडली.

काणीं असें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, समुद्रावर लढाई करून इंग्रजांचा पराभव करण्याचा जो नेपोलियन ह्याचा बेत, तो अगदींच फसल्यामुळें व जर्मनींतील स्वारींत त्यास अगदीं अदृष्टपूर्व असा जय प्राप्त जाहल्यामुळें त्याचा ती लढाई करण्यांत मूळ हेतु काय असावा, हें कोणाच्या लक्षांत राहत नाहीं. ज्या दिशेनें त्यास जाण्याचें नव्हतें, त्या दिशेनें तो चालला होता; तरी त्या वेळच्या फ्रान्सच्या ताब्यांतल्या सर्व युरोपिअन राष्ट्रांचें इंग्लिश बेटाशीं हरयेक प्रकारें दळणवळण त्यानें कायद्यानें बंद केलें* ह्मणून, व अमेरिकेंत त्यावेळीं पुष्कळ वसाहती असलेलीं राष्ट्रें, पोर्चुगाल आणि स्पेन, तीं त्यानें एकाएकीं जिंकून घेतल्यावरून, हीं सर्व कृत्यें करण्यांत तो आपला मूळचा हेतु विसरला नाहीं, हें स्पष्ट दिसतें. आणखी कर्नल मालेसन याणें "पूर्वेकडील फ्रेंचांच्या अखेरच्या लढाया," (लेटर स्ट्रगल्स् आफ् फ्रान्स् इन् दि ईस्ट) या नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत तो असें लिहितो कीं, ट्राफल्गार येथें फ्रेंचांचे आरमाराचा पूर्णपणें पराभव होऊन समुद्रावर लढाई चालविण्याचें त्यांचें सामर्थ्य अगदीं नाहींसें झालें होतें; तरी मारिशस बेट त्यांच्या ताब्यांत होतें. त्या ठिकाणीं खासगी गलबतांना परवाने देऊन, त्यांनीं एक आरमार तयार करविलें, व ट्राफल्गारचे पराभवानंतर पुढें पुष्कळ दिवसपर्यंत हिंदीमहासागरांत त्यांनीं फार निकराची लढाई चालविली होती. नंतर हें बेट इंग्रजांनीं जिंकून घेतलें, व पुढें झालेल्या तहांत तें त्यांनीं आपल्याकडेसच ठेविलें, ह्मणूनच अमेरिकेंतील मुलूख काबीज करण्याचे उद्देशानें सतत चालू ठेविलेल्या ह्या "दुसऱ्या शंभर वर्षांचे युद्धाचा" शेवट झाला.

अठराव्या शतकांतील इंग्लिश इतिहासाचें थोडक्यांत स्वरूप ह्मणजे

* ह्या कृत्यास कांटिनेंटल सिस्टिम हें नांव आहे. टीप १—पान ६९ पहा.

त्या देशाचा त्या वेळीं विस्तार झाला, हें होय; परंतु ह्या ह्मणण्याचा अर्थ किती व्यापक आहे, हें त्या वेळच्या लढायांविषयीं वर सांगितलेली सामान्य हकीकत लक्षांत घेतली ह्मणजे स्पष्टपणें दिसून येईल. ह्या वरील ह्मणण्याचा प्रथमारंभीं अर्थ इतकाच दिसेल कीं, हिंदुस्थान, क्यानडा, दक्षिण-आफ्रिका, हे देश इंग्रजांनीं जिंकले. प्रस्तुत ह्या गोष्टींचें अंतस्थ महत्व जास्त असून युरोपामध्यें मार्लबरोनें मारलेली लढाई, ब्रन्स्विक* घराण्याकडे इंग्लंडचें राज्यपद जाणें, ज्याकोबाईट† लोकांचें बंड किंवा फ्रान्स राज्यक्रांतीच्या संबंधानें झालेल्या लढाया, ह्या गोष्टी तितक्या महत्वाच्या नाहींत व त्यांच्याशीं पहिलीचा फारसा संबंधही नाहीं. परंतु वास्तविक वरील आमचें विवेचन ध्यानांत ठेवून पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, ह्या दुसऱ्या गोष्टींचा इंग्लंडच्या राष्ट्राची वृद्धि होण्याशीं जरी कांहीं संबंध प्रथम दर्शनीं दिसून येत नाहीं, तरी त्यांचा त्या गोष्टीशीं अत्यंत निकट संबंध असून, त्या दोनही प्रकारच्या गोष्टी एकाच कारणाचे परिणाम असून, एकाच जबरदस्त घडामोडीचे मागचे पुढचे भाग होत. प्रथम दर्शनीं असें वाटेल कीं, राष्ट्रवृद्धि करण्याचे कामांत अठराव्या शतकांत इंग्रज लोकांनीं ज्या कांहीं गोष्टी केल्या त्या मोठ्या महत्वाच्या

* राणी ॲनः—हिला मुलबाळ कांहीं नव्हतें, त्यामुळें तिच्या मरणानंतर इंग्लंडदेशच्या राज्यावर कोणास बसवावयाचें, हा प्रश्न तिच्या हयातींत निघालेला होता. त्या वेळीं असें ठरलें कीं, इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याची एलिझाबेथ नांवाची एक मुलगी होती तिचें लग्न इलेक्टर पालेटाईन फ्रेडरिक याच्याशीं झालेलें होतें. या जोडप्याची कनिष्ठ कन्या सोफाया हिचें अर्नेस्ट आगस्टस, ड्यूक आफ ब्रन्स्विक ल्यूनिबर्ग, आणि इलेक्टर आफ हानोवर, याच्याशीं लग्न झालेलें होतें. त्यांना जार्ज नांवाचें अपत्य झालें. याला इंग्लडदेशच्या गादीवर आणून ठेवावा असा निकाल करण्यांत आला असल्यावरून १७१४ मध्यें ॲन राणी मरण पावल्यावर त्यास गादीवर बसविलें. येणेंप्रमाणें हें ब्रन्सविक घराणें या जार्जाच्या कारकीर्दीपासून ह्मणजे इ. स. १७१४ पासून सुरू झालें तेंच आजपर्यंत चालू आहे.

† टीप.*—पान ३४ पहा.

असून, त्या लोकांचे युरोपांतील इतर राष्ट्रांशीं त्याचवेळीं झालेले व्यवहार तितके महत्वाचे नाहींत. परंतु हे व्यवहार आणि राष्ट्रवृद्धीचे कामांत इंग्रजांकडून घडलेल्या गोष्टी, हीं दोन भिन्न नसून एकाच राष्ट्रीय वृत्तीचे दिसण्यांत दोन प्रकार आहेत. ह्याहीपेक्षां जास्त गर्भित अर्थ आह्मांस अद्यापि दाखविणें आहे. ह्या सर्व विषयांची एकवाक्यता पूर्णपणें लक्षांत असली ह्मणजे, वर सांगितल्याप्रमाणें युरोपांतील, अंतस्थ व्यवहार व परदेशीं वसाहती करण्याचे प्रकार ह्यांचीच केवळ संगति लागेल इतकेंच नाहीं, तर शांतपणें सतत चालू असलेली देशवृद्धि, व व्यापार आणि उद्योग यांचे संबंधानें, पूर्वी कधींही न झालेली, अशी जी इंग्लंड देशाची उन्नति, यांचा अठराव्या शतकांतील सर्व लष्करी उलाढालीशीं किती निकट संबंध होता, हेंही आह्मांस पुढें दाखवितां येईल. हें समजण्यास दुसऱ्या एका गोष्टीची अवश्यकता आहे. अमेरिकेंत, इंग्रज लोकांनीं केलेल्या वसाहतींचें विशिष्ट स्वरूप काय होतें, हें प्रथम समजलें पाहिजे, ह्मणून ह्याच गोष्टीचा विचार पुढील प्रकरणीं करूं.

प्रकरण ३.

इंग्लिश साम्राज्य.

परदेशांतील वसाहतींस 'नवीन वसविलेलें साम्राज्य' असें नांव देणें साहजिक दिसतें. तथापि हे तीन शब्द एके ठिकाणीं आणल्यानें थोडासा चमत्कारिक अर्थभेद होतो. साम्राज्य या शब्दांत असा अर्थ ध्वनित होतो कीं, तें लष्करी जोरावर स्थापन झालें असून त्याजवर चालत असलेला अंमल अनियंत्रित आहे. परदेशांत जाऊन राहणारे लोक, प्रथम ज्या देशांत राहत होते, तेथून दुसऱ्या ठिकाणीं जाऊन राहिले, तरी त्यांचें मूळ देशाशीं नातें, मायलेकरांचे नात्यासारखें असतें, ह्मणून 'साम्राज्य' या शब्दाचे अर्थांत या नात्याचा समावेश होत नाहीं.

वसाहती करण्याचे अगदीं भिन्न असे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकाराला नैसर्गिक असें नांव देतां येईल; कारण, इतर सृष्टिक्रमास नैसर्गिक हा शब्द लावतांना जे धर्म ध्वनित होतात, ते याही प्रकारास लागू आहेत. टर्गो ह्मणून जो विख्यात मुत्सद्दी फ्रान्स देशांत होऊन गेला, तो असें ह्मणत असे कीं, 'फळें जशीं पक्क होईपर्यंतच झाडाला चिकटून राहतात, तद्वतच वसाहतींचीही स्थिति आहे.' आणि कित्येक असेंच ह्मणतात कीं, मधमाशा जशा कळप करून एके ठिकाणीं राहतात, व दुसऱ्या ठिकाणीं जाऊन तेथें सर्व सोई जमतांच पहिलें ठिकाण सोडून देतात, अगर मुलगा वयांत येऊन लग्न झाल्यावर जसा बापापासून विभक्त होऊन नवीन घर करून त्यांत जाऊन राहतो, तसाच प्रकार वसाहत करण्याचाही आहे. इतिहासांतही ह्या वसाहत करण्याच्या नैसर्गिक प्रकाराचीं उदाहरणें आहेत. प्राचीन काळीं लोक एका

ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाऊन वसाहती करीत, तेव्हां त्यांची अशीच स्थिति होती. त्या वेळच्या युरोपच्या इतिहासांत ग्रीक आणि इटली ह्या देशाच्या ज्या गोष्टी आपण वाचतों, त्यांवरून असें दिसतें कीं, आर्य नांवाचे लोक पूर्वेकडून पश्चिमेकडे पसरत गेले, व ते ग्रीस, इटली वगैरे देशांत जाऊन राहिले. त्याच ठिकाणीं ते पुढें अत्युत्तम वैभवास चढले. अशा प्रकारें नवीन देशांत येऊन राहणें एक प्रकारचें वसाहत करणेंच आहे, मात्र त्या वेळच्या वसाहतीसंबंधीं लोकांच्या कल्पना हल्लींपेक्षां अगदीं भिन्न होत्या. 'व्हर सेक्रम' ह्मणून एक कायदा या जुन्या लोकांमध्यें चालू असे. तो असा कीं, एका वसंत ऋतूंत जेवढीं मुलें जन्मलीं असतील, तेवढीं कोणा एका देवतेस अर्पण करावीं लागत. त्या देवतेस लोकांचे बळी घेणें आवडत नसून त्यांनीं एक देशाहून दुसऱ्या देशांत जाऊन राहणेंच आवडत असे. ह्मणून तिला अर्पण केलेले लोक, मोठे झाले, ह्मणजे त्यांना स्वदेश सोडून दुसऱ्या प्रदेशांत निघून जावें लागे. अशा प्रकारें जातांना रस्त्यांत कोणी जनावर वगैरे त्यांस यदृच्छया भेटे, तेव्हां हें जनावर आपल्यास ईश्वरानेंच मार्ग दाखविण्यास पाठविलें आहे, असें मानून तें ज्या ठिकाणीं सहजरीत्या उभें राही, त्या ठिकाणीं ते आपलें शहर स्थापन करीत. बोव्हिएनम्,* पायसीनम्* वगैरे प्राचीन शहरांचीं नांवें अशा प्रकारें पवित्र मानलेल्या प्राण्यांवरूनच पडलीं, असें सांगतात.

या वरील पद्धतीस नैसर्गिक असें ह्मणतां येईल. परंतु अशा पद्धतीनें नवीन राष्ट्र कधीं वसविलें जाणार नाहीं. ज्या ग्रीक शब्दाचा अर्थ हल्लीं वसाहत असा केला जातो, त्याचा मूळ अर्थ व हल्लींच्या वसाहत (कॉलनी) या शब्दाचा अर्थ, यांत फार भेद आहे. हल्लींच्या वसाहत

* हीं जुन्या काळचीं शहरें असावीं. हीं आतां अस्तित्वांत नाहींत.

या शब्दाचा अर्थ असा आहे कीं, एका देशांतील कांहीं लोकांनीं स्वदेशांतून निघून दुसऱ्या नवीन प्रदेशांत जाऊन राहणें. तेथें ते जाऊन राहिले ह्मणजे, मूळ देशाशीं त्यांचा संबंध तुटत नाहीं, इतकेंच नाहीं, तर ते नवीन देशांत गेल्यावर स्वतंत्र तेथें होत नसून, त्यांस मूळ देशाचा अंमल, राज्यपद्धति वगैरे सर्व पाळावी लागते. वरील ग्रीक शब्दाचा अर्थ असा नाहीं. ग्रीक लोक जेव्हां वसाहत करीत, तेव्हां ते नवीन ठिकाणीं स्वतंत्रच होत असत; मूळ देशाचा व ह्यांचा अर्थाअर्थी कांहींच संबंध राहत नसे. मात्र ते दोनही लोक मूळचे एकाच देशांतले असल्यामुळें उभयतांचें पुढें बहुतकरून सख्य सतत कायम राहत असे. तथापि हल्लींची अस्वतंत्र राहण्याची पद्धत ग्रीक लोकांस माहीत नव्हती, असें नाहीं. पुष्कळ नवीन प्रदेशांवर त्यांचा अंमल वाढत जात असे, तरी त्यावेळची वसाहत जशी मूळ देशाच्या ताब्यांतील मुलूख होऊं शकत नसे, तद्वतच त्यावेळीं नवीन ताब्यांत आलेला प्रदेशही वसाहत होऊं शकत नसे, ह्मणजे तो वसाहतीप्रमाणें स्वतंत्र होऊं शकत नसे.

लाटीन भाषेंत कलोनिया ह्मणून जो शब्द आहे, त्यांत परतंत्रतेचा अर्थ पुष्कळ आहे खरा, तथापि रोमन लोकांची पद्धत अगदीं वेगळीच होती. ह्मणजे नवीन मुलूख काबीज केल्यावर तो आपल्या ताब्यांतला आहे असें कसें तरी दाखविण्यासाठीं त्यांची अशी युक्ति होती कीं, ते तो जिंकलेला मुलूख आपल्या राज्यास जोडीत व त्यामुळें त्या नवीन जिंकलेल्या देशाच्या सुरक्षिततेसाठीं आपलें सैन्य वगैरे तेथें नेऊन ठेवण्याची आवश्यकता त्यांना पडत नसे. तथापि मूळ देशास नवीन मुलूख जोडणें, हाच प्रधानहेतु त्यांचा नव्हता. ह्मणून ह्या पद्धतीबद्दलही येथें विशेष विचार करण्याची जरूर नाहीं.

पूर्वीची ग्रीक लोकांची वसाहत करण्याची पद्धत हल्लीं अर्वाचीन

काळीं प्रचारांत नाहीं, ही एक महत्वाची गोष्ट चांगली ध्यानांत ठेविली पाहिजे. कोलंबस ह्यानें अमेरिकेचा शोध लाविल्यापासून, अथवा विशेषेंकरून इ. सन १४०४ ह्या वर्षी बेटंकूर* ह्यानें कनेरी बेट जिंकून घेतल्यापासून वसाहती करण्याचें काम फार सपाट्यानें चाललें आहे. पूर्वी ग्रीक लोकांनीं भूमध्य समुद्रांतील बेटांत ज्या वसाहती केल्या, त्यांजपेक्षां शंभरपट जास्त लोक हल्लींच्या वसाहतींत रहात आहेत. तरी हल्लींच्या कोणत्याही वसाहती पाहिल्या तरी त्या मूळ देशापासून कधींही स्वतंत्र झालेल्या दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. वसाहत करण्याच्या कामांत जे कोणी प्रथम पुढारी असतील, त्यांस कितीही मोकळीक दिलेली असली, अथवा लढाई, तह, वगैरे करण्याच्या कामांत ते कितीहि स्वतंत्रता वापरीत असले, तरी मुख्य सत्ता मूळ राष्ट्राच्याच ताब्यांत राहिल्याचें दिसतें. कोर्टेझ,†

---

* बेटंकूर.—जॉन डि बेटंकूर हा फ्रान्सांत नार्मंडींतील एक सरदार व फ्रान्सचा राजा सहावा चार्लस ह्याचा चिटणीस होता. ह्याचा इंग्लंडचा राजा पांचवा हेन्री ह्याच्याशीं झालेल्या युद्धांत फार नाश झाला. तेव्हां बाहेरदेशीं कांहीं आपलें नशीब उदयास येईल असें वाटून तो बाहेर पडला व १४०२ मध्यें त्यानें कनेरी बेटांवर पाय ठेवला. त्याची फौज अपुरी होती ह्मणून जय न पावून तो परत आला. पुढें त्याला, स्पेनमधील कास्टील प्रांताचा राजा तिसरा हेन्री ह्याची कुमक मिळाल्यावर त्याचा जय झाला, व १४०४ त लुई नांवानें तो तेथला राजा झाला. त्यानें कनेरी बेटांतील बहुतेक लोकांना खिस्ती केलें, व १४०५ त पोपकडून ह्या बेटाच्या बिशपाची पदवी मिळविली. १४०६ त नार्मंडीला तो परत आला व तेथेंच मरेपर्यंत राहिला. त्याचा मृत्यु १४२५ त झाला.

† कोर्टेझ.—हर्नान कोर्टेझ हा १४८५ त जन्मला, व १५४७ त मरण पावला. हा स्पेनचा राहणारा. ह्याचें घराणें गरीब पण खानदानीचें होतें. तो सालामांका येथें कायदे शिकला, पण पुढें धंदा सोडून त्यानें लष्करांत शिपायाची नोकरी धरली. सन १५११ त क्यूबा बेट घेण्यांत त्यानें इतकें शौर्य दाखविलें कीं, मेक्सिको देश जिंकण्यासाठीं त्याचीच नेमणूक स्पेन सरकाराकडून झाली. पुष्कळ लढाया वगैरे करून त्यानें मेक्सिको येथें स्पेनचें राज्य स्थापिलें. त्यानें स्वतःचें प्रभुत्व स्थापण्याचा प्रयत्न केला. पण ही बातमी स्वदेशीं कळल्यावर त्या वेळचा स्पेनचा राजा पांचवा चार्लस ह्यानें

पिझारो,* ईस्ट इंडिया कंपनी, हीं सर्व याच गोष्टींची साक्ष देतात. आतां नवीन गेलेले लोक बंड, लढाई वगैरे करून स्वपराक्रमावर स्वतंत्र झाले, तर गोष्ट निराळी. ग्रीस देशांतील कॉरींथ संस्थानाकडून सिसिली बेट घेतलें गेलें, तरी इतक्या अंतरावरील हा नवीन प्रदेश आपल्या ताब्यांत आपल्यास ठेवितां येईल, असें ज्याप्रमाणें कॉरिंथ सरकारास वाटलें नव्हतें, त्याचप्रमाणें दक्षिण अमेरिकेंतील विस्तृत मैदानांत अथवा पासिफिक महासागरांतील द्वीपसमूहांत जरी स्पेन, पोर्चुगाल, डच, फ्रेंच, अथवा इंग्रज यांच्या वसाहती होत्या, तरी त्या आपल्या ताब्यांतून जाऊन स्वतंत्र होतील, असें त्या राष्ट्रांस कधींही वाटलें नव्हतें.

'नैसर्गिक' ह्याचा अर्थ 'अंगस्वभावप्रेरित' असा केला असतां, हल्लींची वसाहत करण्याची पद्धत पूर्वींच्यापेक्षां कमी नैसर्गिक आहे, असें ह्मणतां येईल. परंतु नैसर्गिक याचा अर्थ वरच्याहून निराळा ह्मणजे 'योग्यायोग्यविचारसिद्ध' असा केला असतां, ही हल्लींची पद्धत वरच्या

त्यास परत बोलाविलें. तेव्हां तो भ्याला आणि क्षमा मागून, राजाची मनधरणी करून त्यानें मेक्सिकोचा गव्हर्नर आपणास करवून घेतलें. तो तेथील लोकांना फार क्रूरतेनें वागवी. १५३३ त्यानें कालिफोर्नियाचा शोध लाविला. पण ह्याबद्दल त्यास कांहीं शाबासकी मिळाली नाहीं. १५४१ नंतर तो स्वदेशास कंटाळला व सेविल जवळ त्यानें आपले शेवटले दिवस घालविले.

* पिझारो—फ्रान्सिको पिझारो हा प्रसिद्ध स्पेनचा राहणारा होता. ह्याचा जन्म १४७१ त झाला. तो फार धाडशी असे. त्याला नवीन शोधलेल्या ठिकाणीं जाण्याची उत्सुकता होऊन तो तिकडे गेला. १५२४ मध्यें त्यानें पनामा शोधून पांचव्या चार्लस राजानें त्याला त्याचा गव्हर्नर केला. कोर्टेझच्याबरोबर तो पेरू प्रांत शोधण्यास निघाला, व तो त्यानें शोधून काढला. हा तेथें सत्ता चालवूं लागला. परंतु तो फार क्रूरतेनें वागे. त्यामुळें १५४१ मध्यें एक बंड उठलें आणि त्याला बंडवाल्यांनीं ठार मारलें. स्पेनच्या लोकांनीं आरंभीं ज्या वसाहती अमेरिकेंत केल्या त्यांत कोर्टेझ आणि पिझारो यांचीं नांवें अग्रगण्य आहेत.

उदाहरणांतील मधमाशांप्रमाणें अथवा झाडझुडपांप्रमाणें नाहीं, एवढ्यावरच ती नैसर्गिक नाहीं, असें ह्मणणें बरोबर नाहीं. कित्येक गृहस्थांचें ह्मणणें असें आहे कीं, प्राचीन काळचे ग्रीक लोक मध्यकाळच्या गाथ* लोकांपेक्षां फार दयाळू व शहाणे होते. कारण ग्रीक लोकांपैकीं जे लोक नवीन वसाहती करीत, त्यांस ते स्वतंत्रतेनें राहूं देत असत. गाथ लोक जुलमी होते. त्यांचा अंमल फार कडक, व रानटी असे. कितीही अंतरावर त्यांच्यांतल्या लोकांनीं जाऊन वसाहती केल्या, तरी त्यांजवरील आपला तावा ते जाऊं देत नसत. परंतु ग्रीक लोक सालस व सृष्टिनियमांस अनुसरून वागणारे होते. त्यांस असें वाटे कीं, मुलगा मोठा झाल्यावर स्वतंत्रतेनें राहण्याचा त्यास अधिकार आहे. ह्मणून त्यास स्वसंतोषानें रजा देऊन स्वतंत्रतेचा उपभोग घेऊं देणें, यांतच ते भूषण मानीत. अशा प्रकारें करून दोन्ही पद्धतींची तुलना केल्यावर हल्लींच्या पद्धतीची केवळ निंदा करणें रास्त नाहीं.

प्राचीन काळच्या स्थितींत त्यावेळची वसाहत करण्याची पद्धत जितकी अपरिहार्य होती, तितकीच हल्लींची वसाहत करण्याची पद्धत ह्या स्थितीस अगदीं अपरिहार्यच आहे, असें हल्लींच्या पद्धतीचा सूक्ष्म विचार केला असतां आढळून येईल.

अफाट महासागराच्या दुसऱ्या बाजूस असलेली जमीन कांहीं

---

* गाथ (गोथी)–ह्या नांवानें प्रसिद्ध लोक जर्मनींतले राहणारे होत. त्यांचा धंदा लढाई करण्याचा असे. त्यांची सत्ता जगाच्या सर्व भागांवर झाली होती, परंतु विशेषेंकरून त्यांचा उद्योग रोमन लोकांचें राष्ट्र मोडण्याचा होता. त्यांनीं प्रथम आपला मोर्चा ग्रीस देशाच्या कांहीं प्रांतांवर फिरविला. परंतु त्यांना तेथून कान्स्टन्टाइन राजानें पिटाळून लावलें. पुढें सन ४१० च्या सुमारास त्यांनीं आलेरिक नांवाच्या आपल्या एका प्रसिद्ध राजाबरोबर रोम शहर लुटलें. त्यांचें शेवटचें कृत्य हें होतें कीं, त्यांनीं पश्चिम युरोपांत सर्वत्र अस्वस्थता, बेबंदशाई व बंडें उत्पन्न केलीं.

लोकांनीं जमून तेथें जाऊन आपल्या ताब्यांत घेणें ही गोष्ट निराळी, आणि एकाच देशचे लोक, हळुहळु थोडथोड्या अंतरावर अथवा फार तर लहानशा समुद्रापलीकडे पसरत जाणें ही गोष्ट निराळी. ही दुसरी गोष्ट घडून येण्यास कांहीं तरी थोडें कारण पुरतें, परंतु पहिली गोष्ट घडून येण्यास महाप्रयास पडतात. कोलंबसाचें चारित्र पाहिलें ह्मणजे, असें दिसून येईल कीं, स्वोद्देशसिद्धीसाठीं त्यास आपल्या राजाची मदत पावलोपावलीं लागत असे. त्याच्या सफरीची सर्व तयारी राजानेंच करून दिली असून, त्याचा सर्व खर्चसुद्धां त्याजकडूनच मिळाला होता. आणखी असें आहे कीं, नवीन मुलूख शोधून काढल्यावर-सुद्धां त्यांत एकदम जाऊन राहण्याविषयीं कितीहि जबरदस्त कारण असलें तरी लोकांचीं मनें सहसा प्रवृत्त होत नाहींत. ज्याप्रमाणें पाण्याचा बांध फोडिला ह्मणजे पाणी मोठ्या जोरानें वाहूं लागतें, त्याप्रमाणें नवीन प्रदेशांत जाऊन राहण्याचे दरवाजे त्यावेळीं खुले झाले असतांही लोकांचा प्रवाह तिकडे जाईना. ह्याचें कारण त्यावेळीं यूरोप खंडाची लोकसंख्या फाजील वाढली नव्हती. फार झालें तर, सोन्याच्या वगैरे आशेनें कोणी एखाद दुसरा पुरुष नवीन शोध करून आपला जीव धोक्यांत घालण्याचें धाडस करीत असे. नवीन प्रदेशाचा शोध लागला असतां त्यापासून राज्यास पुष्कळ द्रव्यलाभ होईल, अशी जेव्हां कोलंबसानें आपल्या राजाची खात्री केली, तेव्हांच त्यास त्याजकडून मदत मिळाली; अशी स्थिति असल्यामुळें व ह्या महत्कृत्यास सरकारचे मदतीची वेळोवेळीं जरूर लागत असल्यामुळें, नवीन मिळविलेल्या मुलुखावर मूळ देशाची मालकी ठेवणें, फारसें प्रयासाचें काम नसे.

पूर्वीचें ग्रीक लोकांचें राज्य व हल्लींचीं यूरोपांतील राज्यें, ह्या दोहोंची स्थिति एकमेकांपासून अगदीं भिन्न असल्यामुळें त्यावेळीं ज्या

वसाहती ग्रीक लोकांनीं केल्या, त्यांमध्यें व हल्लींच्या वसाहतींमध्यें महदंतर पडलें आहे. ग्रीक लोकांच्या राज्याचा समावेश लहानशा शहरांतच होत असे. राज्य ह्मणजे शहर, ह्यापलीकडे ते कांहीं मानीत नसत. ह्यास प्रमाण त्यांच्या भाषेत राज्य व शहर ह्यांस एकच शब्द आहे. आरिस्टाटल ह्मणून जो ग्रीस देशांत विख्यात तत्त्ववेत्ता झाला, त्यास मासिडोनिया व पार्शीया वगैरे मोठीं विस्तृत राज्यें माहित नव्हतीं असें नाहीं. तरी राजनीतिशास्त्रावर ग्रंथ लिहितांना त्यानें अशा प्रकारच्या राज्यांचा विचार केला नसून केवळ नगरराष्ट्रेंच त्याच्या विवेचनांत येतात. त्यानें आपल्या ग्रंथांत जे कांहीं नियम बांधिले आहेत, त्यांजवरून असें दिसतें कीं, पर्शियासारखीं राज्यें फार विस्तार पावलीं असून लहानशा शहरासारखीं नसल्यामुळें त्यांस राज्य हा शब्द लावणें त्यास संमत नाहीं. हल्लीं जो राज्य ह्या शब्दाचा अर्थ आहे, तो वरील अर्थापासून कसकसा निघत आला व तो निघण्यास किती काळ लागला, हें जरी थोड्यांसच माहीत आहे, तरी हल्लीं त्याचा अर्थ असा आहे कीं, एकजातीय लोक एकच भाषा बोलणारे असले ह्मणजे, ते एकाच राज्याखालीं मोडतात. त्यावरून असें दिसेल कीं, राज्य ह्या शब्दाचे अर्थ मूळपासून निरनिराळे होत आले असल्यामुळें, एका ठिकाणाहून वसाहतीकरितां लोक दुसरीकडे गेले ह्मणजे त्याचे काय परिणाम होतात, ह्याविषयीं लोकांच्या कल्पनाही भिन्न असाव्या, हें उघड आहे. जर राज्य ह्मणजे एक शहरच असलें तर शहराबाहेर गेलेला मनुष्य राज्याबाहेरच गेला, असें समजलें पाहिजे. ह्मणून वसाहत करण्याची ग्रीक लोकांची पद्धत त्यांच्या मताप्रमाणें नैसर्गिकच होती; कारण, जे लोक नवीन शहराची स्थापना करीत, ते नवीन राज्यच स्थापित असत. परंतु राज्य ह्मणजे एक शहर नसून अथवा एकच देश

नसून, एकजातीय व एका अंमलाखालीं राहणारे सर्व लोक, असें समजलें ह्मणजे हल्लींच्या ज्या नवीन वसाहती झाल्या, त्या निराळीं राज्यें ह्मणून समजलीं न जातां पूर्वराज्यालाच जोडून कायम राहिल्या, हें रास्त आहे. हल्लींच्या अर्थाप्रमाणें लोक दुसरीकडे गेले, ह्मणजे एका राज्याबाहेर गेले असें नसून, तेंच राज्य विस्तृत करीत गेले, असें ह्मणणें रास्त होईल. ह्याचा तात्पर्यार्थ इतकाच कीं, ज्या ज्या ठिकाणीं ह्मणून इंग्रज लोक आहेत, त्या त्या ठिकाणीं इंग्लंडचें राज्य आहे. ज्या ज्या ठिकाणीं फ्रेंच लोक आहेत, त्या त्या ठिकाणीं फ्रान्साचें राज्य आहे. ह्यालाच अनुसरून उत्तर अमेरिकेंत जीं फ्रेंच लोकांचीं ठिकाणें आहेत, त्यांस त्यांनीं "नवीन् फ्रान्स" हें नांव दिलें. तसेंच इंग्लंडच्या ताब्यांतील कांहीं वसाहतींना "नविन इंग्लंड" असेंच नांव आहे.

ह्या वरील लिहिण्यांतच पूर्वींच्या वसाहतींत व हल्लींच्या वसाहतींत एक महत्वाचा भेद व्यक्त होतो. तो असा कीं, हल्लींच्या वसाहती कितीही दूर देशांत जरी पसरल्या, तरी त्या सर्व मिळून पूर्वींचें एकच राज्य कायम राहतें. परंतु प्राचीन काळीं एकाच राज्याचा असा विस्तार होणें शक्य नसे. राज्य ह्या अर्थी जो ग्रीक शब्द आहे व ज्याचा अर्थ शहर असा होतो, तो शब्द मुलूख जास्त वाढला तर, त्यास लागण्यासारखा नव्हता. राजनीति ह्या विषयावर लिहित असतांना आरिस्टाटलनें जें लिहिलें आहे त्याचेंच वरील मत स्पष्ट करण्यास पुनरुच्चारण करणें अयोग्य होणार नाहीं. राजनीतिशास्त्राचें अध्ययन करणारांस तें फारच उपयुक्त आहे. त्याचें असें ह्मणणें आहे कीं, एका राज्यांतील लोकसंख्या बेताबाताचीच असली पाहिजे. कारण जर लोकसंख्या वाढली तर लढाईचे वगैरे प्रसंगीं पुष्कळ लोकांचें आधिपत्य स्वीकारण्यास कोण भजणार आहे? अथवा प्रत्यक्ष ईश्वराशिवाय सर्वांस एकदम ऐकं येईल. असें बोल-

णारा एकच वक्ता कोण मिळणार आहे? परंतु हल्लींची राज्यपद्धति वेगळी आहे. प्रथमतःच राज्य मोठें असतें, ह्मणजे एका लहानशा शहरापेक्षां अतोनात मोठें असतें ह्मणून अडचण पडल्याशिवाय तें जास्तही वाढवितां येतें. कारण, पूर्वीच्या शहराप्रमाणें हल्लीं राज्यकारभार पाहण्यास पुष्कळ देशांत लोकांच्या सभा नाहींत. उदाहरणार्थ, फ्रान्स आणि स्पेन, येथें राज्यकारभार पाहणारी लोकांची सभा नव्हती. बरें, इंग्लंडसारख्या देशांत अशी सभा आहे खरी, तरी अशी सभा बनविण्यास देशविस्तारामुळें प्राचीन काळीं येणारी अडचण, हल्लीं मोठ्या युक्तीनें दूर केलेली आहे. ह्मणजे सर्व देशभर पसरलेल्या लोकांस मुखत्यार निवडण्याचा हक्क दिलेला असून अशा प्रकारें लोकनियुक्त मुखत्यारांची एकच सभा एके ठिकाणीं बसून सर्व राज्याचा कारभार पाहत आहे.

इतका वेळ ह्या अर्वाचीन काळच्या वसाहतींची इतकी फोड करून सांगितल्यानें हल्लींचें इंग्लंडचें साम्राज्य ह्मणजे काय? व तें प्रस्तुतच्या स्थितीस कसकसें पावलें? हें चांगलें समजून येईल. इंग्लंडमधून इंग्रज लोक परदेशांत जाऊन त्यांनीं नवीन मुलूख हस्तगत करूनही तेथें इंग्लंडचें राज्य स्थापन न होणें फारसें कठिण नव्हतें. परंतु हल्लीं तसें झालेलें नाहीं. इंग्लिश राज्य विस्तृत झालें ह्मणजे इंग्रज लोक मात्र तिकडे पसरले, इतकाच केवळ अर्थ नाहीं; तर इंग्लंड देशाचा अंमलही तिकडे सुरू झाला. प्राचीन काळीं ग्रीक लोक, सिसिली, दक्षिण इटली आणि एशिया मायनरचा पश्चिम किनारा, ह्या ठिकाणीं जाऊन राहिले असतांही त्या ठिकाणीं ग्रीस देशाचें राज्य नव्हतें, ह्मणजे त्या नवीन प्रदेशावर अंमल ग्रीस देशाकडून होत नव्हता. अशा प्रकारचीं इंग्रज लोकांची स्थिति नाहीं. आस्ट्रेलिया, कानडा, ह्या ठिकाणी इंग्रज लोक राहतात, परंतु त्या ठिकाणीं इंग्लंडचा अंमल नाहीं, असा अर्थ समजावयाचा नाहीं.

ग्रीक लोकांची वर सांगितलेली वृद्धि केवळ लोकांची होती, राज्याची किंवा अंमलाची नव्हती. तशा प्रकारची वृद्धि झाली असतां मूळ राज्यास बळकटी बिलकूल येत नसे. ग्रीक लोकांवर मासिडोनियाहून परचक्र आलें, व ते जिंकले गेले, तेव्हां पूर्वी बाहेर गेलेल्या ग्रीक लोकांकडून त्यांस कांहींएक मदत झाली नाहीं. ह्याचप्रमाणें हल्लीं जर्मनीतून अमेरिकेंत पुष्कळ लोक जाऊन राहत आहेत. परंतु त्यांजमुळें जर्मन राज्याचा विस्तार मुळींच झालेला नाहीं. कारण, जे जर्मन लोक अमेरिकेंत जाऊन राहिले, ते जर्मन भाषा बोलले, किंवा जर्मनींतील मूळच्या रीतीभातीही त्यांनीं कायम ठेविल्या तरी युरोपांतील जर्मन सरकाराकडून त्यांच्यावर अंमल होत नाहीं. जर्मनीची अशी स्थिति होण्याचें कारण वेगळेंच आहे. वसाहती करण्याचे कामास ते फार उशिरां लागले. ह्मणजे त्यावेळीं अमेरिकेंतील सर्व भूमि अगोदरच इतर राष्ट्रांनीं आपापसांमध्यें वांटून घेतली होती. परंतु इंग्लंड देशाचा विस्तार जर्मनी सारखा नाहीं. दूर परदेशांत इंग्रज लोकच केवळ जाऊन राहिले असें नाहीं, तर त्या ठिकाणीं इंग्लिश राज्याचा अंमलही चालत आहे. चांगला शब्द मिळत नसल्यामुळें आपण या विस्तृत राज्यास साम्राज्य (एंपायर), असें ह्मणतों. प्राचीन काळीं जुन्या महाद्वीपांत रोम, पर्शिया, मासिडोनिया, टर्की वगैरे साम्राज्यें होऊन गेलीं. त्यांच्याशीं ह्या नवीन इंग्लिश साम्राज्याची साम्यता इतकीच आहे कीं, दोनही राज्यांमध्यें लहान लहान पोटभाग पुष्कळ असून सर्वत्रांवर अंमल मुख्य सरकारचा असे. ह्मणजे इतर सर्व प्रांतांचा कारभार मुख्य सरकाराकडून केला जात असे. निरनिराळ्या प्रांतांवर सुभेदार नेमून त्यांचे अधिकार ठरवून देण्याचें काम दोहोंतही मुख्य सरकारचेच हातांत असतें. परंतु त्या पूर्वीच्या साम्राज्यांत व हल्लींच्या इंग्लिश साम्राज्यांत अंतर इतकेंच आहे कीं, पूर्वींच्यांचा

विस्तार, राज्यकर्त्या पुरुषाचें शौर्य व तरवारीचा जोर, यांजमुळें होत असे. परंतु हल्लींच्या इंग्लिश साम्राज्याचा विस्तार तशा प्रकारचा नाहीं. तसेंच, पूर्वींच्या राज्यांत राहणारे लोक एकजातीय नसून राज्यकर्त्यांच्या जातीहून भिन्न जातीचे असत, परंतु हल्लींच्या इंग्लिश राज्याच्या सर्व प्रांतांत राहणारे लोक बहुतकरून इंग्रजच आहेत. दोनही प्रकारचीं राज्यें अतीव विस्तृत खरीं, तरी पूर्वींचीं राज्यें केवळ लष्करी पायांवर बांधलीं गेलीं असल्यामुळें तीं थोडे दिवस टिकून लौकरच लयास गेलीं. त्याप्रमाणें हल्लींच्या इंग्लिश साम्राज्याचा पाया लष्करी जोरावर रचलेला नाहीं; हें एक तें जास्त चिरस्थायी होण्याचें कारण आहे.

आतां इंग्लिश साम्राज्यास अशी स्थिति येण्यास काय काय कारणें झालीं; त्याचा आपण विचार करूं. वास्कोडिगामा* आणि कोलंबस† ह्यांनीं जेव्हां समुद्रांतरीं नवीन प्रदेशांचा शोध लाविला, तेव्हां त्या प्रदेशांत कित्येक पश्चिम यूरोपीय राष्ट्रांचा संबंध होऊन तेथें पुष्कळ नवीन राज्यें स्थापन झालीं. परंतु त्यांपैकीं विशेष विस्ता-

---

* वास्को डि गामा:—(१४६०–१५२४) हा पोर्टुगाल देशांत एक मोठा खलाशी होऊन गेला. हा युरोपियन गृहस्थ प्रथम हिंदुस्थानांत इ. स. १४९८ या वर्षीं आला. ह्यानें दुसऱ्या पुष्कळ प्रदेशांचा शोध लावला. हिंदुस्थानांत त्यानें पुष्कळ सफरी केल्या; व लढाऊ गलबतें आणून अंगावर कांटा उभा राहण्याजोगीं त्यानें अघोर कृत्यें हिंदुस्थानांत केलीं. हा कितीही दुष्ट स्वभावाचा असला तरी पोर्टुगाल देशावर त्यानें महदुपकार केले आहेत.

† कोलंबसः—(क्रिस्टोफर) हा जिनोआ येथील राहणारा. ह्याचा जन्म १४४० त झाला. ह्याचा बाप कोलंबो नांवाचा लोंकर साफ करणारा होता. कोलंबस फार विख्यात खलाशी होता. १४९२ त बहामा बेटांपैकीं एक बेट ह्यानें शोधून काढलें व त्याला सेंट साल्वेडर नांव दिलें. आणखी कांहीं बेटें त्याच सालांत त्यानें शोधून काढलीं. १४९३ तल्या सफरींत करीबी बेटें, पर्टोरिको व जमेका बेट, इतक्यांचा शोध त्यानें लावला. १४९८ च्या सफरींत ट्रिनिडाडचें बेट, ओरिनोको नदीचें मुख, पेरियाचा किनारा, मार्गारिटा व कुबागुआ बेटें त्यानें शोधून काढलीं. १५०२ च्या सफरींत डेरियनचा किनारा त्यानें शोधून काढिला.

राचें असें, आतां एकच टिकलें आहे; तेंच हें इंग्लिश साम्राज्य होय. नवीन मुलूख हस्तगत करण्यास ज्या ज्या गोष्टी इंग्रजांस कराव्या लागल्या, त्याच गोष्टी, स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स आणि हालंद ह्यांनींही केल्या होत्या. इंग्लंडच्या विस्तृत साम्राज्याप्रमाणेंच स्पेनचें विस्तृत साम्राज्य, पोर्तुगालचें विस्तृत साम्राज्य, फ्रान्सचें विस्तृत साम्राज्य, आणि हालंदचें विस्तृत साम्राज्य, अशीं आणखी चार साम्राज्यें प्रथम अमेरिकेंत स्थापन झालीं होतीं. परंतु कित्येक कारणांमुळें हीं पुढचीं चार राज्यें नाहींसारखीच झालीं आहेत. निदान त्यांचें हल्लीं अगदींच महत्व राहिलें नाहीं. स्पेनचें साम्राज्य पूर्वींच लयास गेलें. ज्याप्रमाणें इंग्लंडच्या हातांतील वसाहतींनीं स्वतंत्र होण्याकरितां इंग्लंडबरोबर युद्ध* केलें व युनायटेड् स्टेट्स् (संयुक्त संस्थानें) नांवाचें स्वतंत्र राष्ट्र स्थापन केलें, त्याचप्रमाणें पन्नास वर्षांपूर्वीं अमेरिकेंतील ब्रेझिल देशांतील लोकांनीं पोर्तुगाल देशाशीं लढाई करून आपला देश स्वतंत्र केला. फ्रान्सच्या ताब्यांतील कित्येक प्रांत व तसेच हालंडच्या ताब्यांतील कित्येक प्रांत, हे, लढाई होऊन, त्यांच्या ताब्यांतून जाऊन, इंग्लिश साम्राज्याच्या अंमलाखालीं आलेल्या साम्राज्यालासुद्धां, युनायटेड् स्टेट्स् स्वतंत्र झाल्यामुळें, एक मोठा धक्का पोंचला. तरी तें आजपर्यंत टिकाव धरून राहिलें आहे. त्यावेळीं सर्व पृथ्वीवरील प्रमुख राष्ट्रांची एक विशिष्ट स्थिति होती. तिचें प्रदर्शक असें आज तागायत एवढेंच ब्रिटिश राष्ट्र अवशिष्ट राहिलें आहे. तथापि वर सांगितलेल्या नाश पावलेल्या चार राष्ट्रांमध्यें व ह्या इंग्लिश राष्ट्रामध्यें एक मोठा महत्वाचा भेद आहे, तो असा.

युरोपांतील राष्ट्रांच्या ताब्यांत येण्यासारख्या ज्या प्रदेशांचा पंधराव्या शतकाच्या शेवटीं शोध लागला, त्यांचे तीन भाग करतां येतील.

---

* टीप.—‡ पान ५७ पहा.